व्याजमुक्त बँकिंग व्यवस्था

लेखक

डॉ. नजातुल्लाह सिद्दीकी

भाषांतर

सय्यद जाकिर अली

अनुक्रमणिका

प्रस्तावना - १	५
प्रस्तावना - २	६
नवीन आवृत्तीच्या निमित्ताने	९
व्याजमुक्त बँकिंग ही मानवाची मूलभूत गरज	१४
प्रकरण पहिले : बँकेची स्थापना	१७
प्रकरण दुसरे : बँक व्यवसाय	२१
* मोबदला घेऊन सेवापुरवठा करणे	२१
* लाभदायक व्यवसायात भांडवल गुंतविणे	२३
* बँकेच्या भांडवलाच्या माध्यमाने भागीदारी	२३
* बँक-भांडवलाच्या माध्यमाने बटाई व्यवसाय	२७
* बँक आणि व्यावसायिक पक्षांदरम्यान नफ्याची वाटणी	३१
* चालू व्यवसायात भांडवल गुंतवणुकीचा नियम	३७
* व्यावसायिक संस्थांच्या रोख्यांची खरेदी	४२
प्रकरण तिसरे : बँक आणि भांडवलदार	४४
* मुज़ारिबत (बटाई) तत्त्वावर अतिरिक्त भांडवल उभारणी	४४
* मुज़ारिबत (बटाई) खाते	४४
* मुज़ारिबत (बटाई) खात्याच्या नफा-तोट्याची निश्चिती	४९
* बँकिंग व्यवसायात कर्जाऊ भांडवलाचा वापर	५२
* कर्ज खाते	५४
* सुरक्षित रोख रक्कम	५६
* बँकांतर्गत स्पर्धा	५८
प्रकरण चौथे : बँकांचे कर्ज	५९
* अल्पमुदतीच्या कर्जांची गरज व त्यांचा पुरवठा	६१
* कर्जखाते आणि अल्पमुदत कर्ज	६२
* व्याजमुक्त कर्ज मिळण्याच्या प्रेरणा	६३
* कर्जखाते आणि कर्जांच्या दरम्यान प्रमाणाची निश्चिती	६८
* कर्जांची गरज आणि पुरवठ्यादरम्यान समतोल	६९
* कर्जाची मुदत	७०
* कर्जांसाठी जामीन	७२
* कर्जाच्या हिशोबांवर येणारा खर्च	७३
* व्यापारी हुंडी	७४
प्रकरण पाचवे : वित्तनिर्मिती कार्य	७७
* बँक भांडवलाचे स्वरूप	७७
* बँक भांडवलाचे निर्मिती कार्य	८२
* उदाहरणे	८४
* बँकेच्या हिशोबाचा प्रारंभी आरखडा	८५
* प्रथम स्थिती : बँकांमध्ये नवीन रोकडची आवक	८६
* दुसरी स्थिती : वित्तपुरवठ्यात वृद्धी	८७
* अंतिम स्थिती : वित्तीय पुरवठ्यातील वृद्धीशी समतोल	८७
* वित्तीय पुरवठ्यातील वाढीचा टप्प्यानुरुप तपशील	८८
* बँक भांडवल रद्द करणे आणि वित्तसामग्री कमी करणे	९३
* बँकांचा नफा व तोटा आणि वित्तनिर्मिती प्रक्रिया	९७

प्रकरण सहावे : उपभोक्त्यांसाठी कर्ज ९९
* उपभोक्त्यांच्या गरजा ९९
* कर्जांची माध्यमे १००
* बँकांकडून उपभोक्त्यांना कर्ज १०२
* जमापेक्षा अतिरिक्त रक्कम काढण्याचा अधिकार १०२
* प्रमाणपत्र खरेदी १०४
* उसन्या खरेदीची व्यवस्था आणि राज्याची भूमिका १०६
प्रकरण सातवे : काही स्पष्टीकरणे १११
* व्यावसायिक भांडवलाचा पुरवठा ११६
* समाजासाठी भांडवलपुरवठा ११७
* बँकिंग व्यवसायाचा नफा ११८
* व्याजमुक्त बँकिंग व्यवस्था आणि राज्यशासन ११८
प्रकरण आठवे : केंद्रीय बँक १२०
मौलिक नियम १२२
* नगदी सुरक्षित राशीच्या प्रमाणात बदल १२७
* कर्ज देण्याच्या प्रमाणातील बदल १३७
* कर्ज प्रमाणाचा मुख्य वापर १४२
* व्यापारी रोख्यांची खरेदी-विक्री १४४
* कर्जप्रमाणात परिवर्तन १४९
* विविध साधनांचा वापर १५२
प्रकरण नववे : बँकिंग व्यवस्था आणि सार्वजनिक वित्त १५४
* शासनाचे विविध खर्च आणि उत्पन्नसाधने १५६
* भागीदारी आणि बटाई तत्त्वावर भांडवलपुरवठा १५९
* बटाईचे शासकीय रोखे १६१
* शासकीय भागीदारी रोखे १६६
* शासकीय कर्ज १६९
* कर्ज प्रमाणपत्र १७५
* शासकीय कर्जप्रमाणपत्र आणि बँकिंग व्यवस्था १७८
* शासकीय भागीदार रोखे आणि बँकिंग व्यवस्था १७९
* शासकीय बटाई रोखे आणि बँकिंग व्यवस्था १८१
प्रकरण दहावे : व्यामुक्त बँकिंग व्यवसायाची २५ वर्षे १८२
* इस्लामी बँकांची स्थापना १८२
* सामान्य बँकांच्या इस्लामी शाखा १८२
* भांडवलनिर्मितीचा एकत्रित इस्लामिक बँकिंग १८३
* राष्ट्रीय पातळीवर व्याजमुक्त बँकिंग व्यवस्था १८४
* व्याजमुक्त वित्तसंस्थांचे चलन १८५
* या बाबींना प्राधान्य देण्याची कारणे १८६
* अत्याचार निर्मूलन व न्याय प्रस्थापना १८७
* उत्तम कारकिर्द १८८
* स्थैर्य १८९
* अधिकांश वृद्धी व विकास १९१

''अल्लाह, असीम कृपावंत व दयावंतच्या नावाने''

प्रस्तावना – १

या पुस्तकात हे स्पष्ट करण्यात आले आहे की, 'व्याज' अवैध घोषित केल्यानंतर व्याजमुक्त बँकेचे व्यवस्थापन कसे करता येईल. यापूर्वी आठ प्रकरणे 'रिसाला-ए-जिंदगी' (रामपूर) या उर्दू मासिकाच्या फेब्रुवारी ते डिसेंबर १९६७ च्या अंकात प्रकाशित करण्यात आली होती. शिवाय 'चिराग' या मासिकातही मार्च १९६८ च्या अंकात पहिली सात प्रकरणे प्रकाशित करण्यात आली होती. मी या मासिकांच्या संपादकांचा आभारी आहे. या मासिकांत माझे लेख प्रकाशित झाल्यानंतर विविध अर्थतज्ञ आणि इस्लामी विद्वानांशी चर्चा करण्याची मला संधी प्राप्त झाली होती. विविध विषयांवर मला फझलुर्रहमान फरीदी साहेबांशी (माजी प्राध्यापक : अर्थशास्त्र विभाग, मुस्लिम विद्यापीठ, अलीगढ़) झालेल्या चर्चेअंती आपली भूमिका मांडण्यात सहकार्य लाभले होते. नूरुल हक़ सिद्दीक़ी (रिझर्व बँक) आणि डॉ. वहीदुद्दीन खान (हैद्राबाद) यांनीसुद्धा प्रकाशित झालेल्या प्रकरणांचा अभ्यास केल्यावर योग्य सल्ले दिले असून प्रा. अली मुहम्मद खुसरो (Institute of echonomic growth, Delhi) यांनी प्रकाशित झालेल्या प्रकरणांचा गंभीरपणे अभ्यास केल्यावर सविस्तर चर्चा करून मला मोलाचे सल्ले दिले आहेत. मी या विद्वान मित्र व सहकाऱ्यांचा आभारी आहे. विशेषकरून इस्लामचे थोर आणि अतिप्रगल्भित सिद्धान्तवादी विचारवंत आणि तत्त्वज्ञ माननीय सय्यद अबुल आला मौदूदी यांनी त्यांची प्रकृती बरी नसूनही आणि कार्यमग्नतेतही माझ्या या प्रकरणांचा अभ्यास करून माझे योग्य मार्गदर्शन केले, मी त्यांचा अतिशय आभारी आहे. त्यांच्या सहकार्यानंतर मी आपल्या लिखाण-प्रकरणांत योग्य सुधारणा केली आहे.

ईश्वरदरबारी प्रार्थना आहे की माझ्या सर्व सहकाऱ्यांना त्यांच्या प्रयत्नांचे फळ प्रदान करो !

आपला

डॉ. नजातुल्लाह सिद्दीक़ी,

अर्थशास्त्र विभाग, मुस्लिम विद्यापीठ अलीगढ,

२८ डिसेंबर, १९६८

प्रस्तावना - २

इस्लाम धर्माने 'व्याजाला' अवैध घोषित करून त्यावर प्रतिबंध लावून समस्त मानवजातीस अन्याय व अत्याचाराच्या अतिभयंकर जोखडातून मुक्त केले, तसेच कार्यात्मक जीवनात आधुनिक काळातील इस्लामी जीवनाच्या नवव्यवस्थापनाच्या बाबतीत हे एक मोठे आवाहनच आहे. आधुनिक अर्थशास्त्रात व्याज आणि व्याजाचे व्यवहार यांना असामान्य महत्त्व प्राप्त झालेले असून बँकिंगची संपूर्ण व्यवस्था व्याजावरच आधारलेली आहे. व्याजाशिवाय बँकिग व्यवहाराची कल्पना करणेसुद्धा शक्य नाही. आर्थिक जीवनाच्या इस्लामी नवनिर्माणासाठी हे आवश्यक आहे की व्याजाशिवाय बँकिंग व्यवस्था उभी करून ती यशस्वीपणे राबविण्यात यावी. या गोष्टीवर आता पुन्हा प्रकाश टाकण्याची गरज नाही की बँकिंग व्यवस्था मूलभूत, लाभदायक आणि आवश्यक असलेल्या सेवा पुरविते. त्याचप्रमाणे या प्रकारच्या कोणत्याही व्यवस्थेशिवाय आधुनिक प्रगत आजीविकेची कल्पना करणेदेखील शक्य नाही. 'इस्लामी अर्थशास्त्र' या विषयांच्या सर्व तज्ञांची यावर सहमती आणि एकमतता आहे की व्याजाशिवायसुद्धा बँकिंगचे कारभार अगदी व्यवस्थितपणे आणि यशस्वीपणे राबविता येतात. त्याचप्रमाणे आधुनिक अर्थशास्त्राचे तज्ञ या गोष्टीवरसुद्धा सहमत आहेत की बँकिंगचे इस्लामी स्वरुपाचे नवव्यवस्थापन 'भागीदारी' आणि 'बटाईतदारी'च्या इस्लामी विधीशास्त्राच्या नियमांच्या आधारांवर यशस्वीपणे राबविण्यात येणे आवश्यक आहे. परंतु अद्यापपर्यंत अशा प्रकारच्या व्यवस्थापनाचे स्वरुप स्पष्ट करण्यात आलेले नाही. त्याचप्रमाणे हेसुद्धा स्पष्ट करण्यात आले नव्हते की, सद्यस्थितीतील व्याजव्यवहारांवर आधारित बँकांपासून मिळणारे लाभ आणि पूर्ण होणाऱ्या गरजा इस्लामी बँकेमार्फत कशा पूर्ण होतील. आपल्या हातातील पुस्तकामध्ये नेमक्या याच विषयांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. पुढील पानांवर आम्ही बँकांच्या व्याजमुक्त व्यवहारप्रणालीचे स्वरुप सविस्तरपणे मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत. विषय दीर्घ आणि लांबलचक असल्याने संक्षिप्तरित्याच मांडला गेला असे समजावे. तसेच या विषयाच्या काही पैलूंचे वेगळ्या ठिकाणी खास वर्णन करण्याची गरज आहे. परंतु आम्ही असे प्रयत्न केले की व्याजरहित अथवा व्याजमुक्त बँक व्यवस्थापनाच्या मूलभूत रुपरेखा स्पष्ट आणि आणखीन सविस्तर अभ्यासासाठी आवश्यक आधारभूत बाबी उपलब्ध व्हाव्यात.

प्रस्तावित करण्यात आलेले स्वरुप आणि त्याच्या स्पष्टीकरणाच्या बाबतीत ज्या भूमिका मांडण्यात येतील त्या अर्थतज्ञासमोर समीक्षणात्मक अभ्यास आणि त्यावर आपली भूमिका मांडण्यास्तव सादर करण्यात येत आहेत. या नवीन विषयावर इस्लाम आणि अर्थशास्त्राच्या विद्वानांच्या अभ्यासाच्या माध्यमाने एका अशा निर्णायक

भूमिकेपर्यंत पोहोचता येणे शक्य होईल की जे इस्लामी विधीच्या दृष्टिकोनात प्रमाणसिद्ध आणि अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनात योग्य सिद्ध होईल, त्याचबरोबर प्रत्येक माणसाच्या मनात याबद्दल स्पष्ट खुलासा होईल.

यापूर्वी थोड्याशा तपशीलात जाऊन भागीदारी आणि गुंतवणूक (शिर्कत और मुज़ारिबत) चे नियम स्पष्ट करण्यात आले आहेत. त्यासाठी निम्नलिखित पुस्तकांचा अभ्यास सोईस्कर ठरेल.

१) शिर्कत और मुज़ारिबत के शरई उसूल (उर्दू) (अर्थात भागिदारी आणि बटाइतदारीचे इस्लामी नियम) पता : मर्कज़ी मक्तबा, इस्लामी पब्लीशर्स, नवी दिल्ली, १९६९.

२) 'सूद' लेखक : सय्यद अबुल आला मौदूदी (उर्दू) (हे पुस्तक 'व्याज' एक आर्थिक दहशतवाद या नावाने मराठीत सुद्धा प्रकाशित झाले आहे.)

३) तिजारती सूद (उर्दू) लेखक : डॉ. फझ्लुर्रहमान फरीदी, मुस्लिम विद्यापीठ, अलीगढ.

त्याचप्रमाणे हे स्पष्ट करणे आवश्यक आणि योग्य ठरेल की आपण इस्लाम धर्मानुसार व्याजास अवैध व धर्मविरोधी असणे स्वीकार करूनच चर्चा करीत आहोत. त्याचप्रमाणे आपण व्यापारातील व्याजव्यवहार आणि बँकेचे व्याजव्यवहारसुद्धा अवैध व्यवहाराच्या परिभाषेत सामील असण्याचे समजून चर्चा करीत आहोत. 'व्याज एक आर्थिक दहशतवाद' या पुस्तकात व्याज किती अन्यायी व अमानवी व्यवहार आहे, याचे बुद्धिसंमत सिद्धान्त मांडण्यात आले आहेत. ते वाचल्यावर व्याजाचे भयंकर स्वरुप वाचकाच्या लक्षात व आकलनात आल्याशिवाय राहणार नाही. शिवाय ज्यांना व्याजमुक्त बँक प्रणालीच्या कार्य व वेतन पद्धतींचा अभ्यास करायचा असेल तर या विषयावर इंग्रजी भाषेत भरपूर पुस्तके उपलब्ध आहेत. या पुस्तकात केवळ एवढेच स्पष्ट करता येईल की 'शिर्कत' (भागीदारी) और 'मुज़ारिबत' (बटाइतदारी) च्या नियमांवर कशा प्रकारे बँकांची स्थापना करता येईल आणि त्या बँकांमध्ये कशा प्रकारे अर्थ व्यवहार चालविण्यात येतील. या चर्चेत पावलोपावली अशा अडचणी समोर येतील ज्यांचा संबंध अर्थनीती अथवा सार्वजनिक वित्त या विषयांशी येत असतो. या विषयांवर सविस्तर चर्चा या पुस्तकात करता येणे शक्य नाही. फक्त गरजेपुरती चर्चा करण्यावर समाधान मानले जाईल.

आधुनिक युगात व्यापारी बँकांशिवाय इतर दरम्यानच्या वित्त संस्था अर्थात विमा कंपन्या, गृह संस्था, भांडवल गुंतवणूक संस्था वगैरेंना अवास्तव महत्त्व प्राप्त होत आहे. या संस्था जनतेने बचत करून जमा केलेली राशी गोळा करून ते भांडवलउभारणीच्या

विशेष मार्गात गुंतविण्यात महत्त्वाचा वाटा उचलत आहेत. त्यांच्या सक्रीय कार्यांमुळे क्रेडिट राशीत वाढ होणारच आणि यामुळे अर्थनीती वर उच्चस्तरीय चर्चा करताना या संस्थांकडे दुर्लक्ष करणे मुळीच शक्य नाही. व्याजमुक्त आजीविकेमध्ये अशा संस्थांचे स्वरुप आणि त्यांची कार्यमर्यादा या विषयांवर एका वेगळ्या ठिकाणी चर्चा व अभ्यासाची गरज वाटते. म्हणून आम्ही हे विषय या ठिकाणी डावलले आहेत. या ठिकाणी आपण फक्त अर्थ आणि बँकांच्या पारंपरिक कल्पना आणि आर्थिक व्यवहारांनुसार चर्चा करू या. कारण ही चर्चा मुळातच प्राथमिक दर्जाची आहे.

व्याजमुक्त बँकांच्या स्वरुपाचा अभ्यास करताना ही वस्तुस्थितीसुद्धा समोर असणे आवश्यक आहे की, ही अर्थव्यवस्था यशस्वीपणे राबविण्यासाठी याची नितांत आवश्यकता आहे की, ज्या देशात ही व्यवस्था लागू करण्यात येईल त्या देशात व्याजावर कायद्याने पूर्णपणे बंदी असावी. तसेच व्याजव्यवहारास कायदेशीर अपराध घोषित करून ते करणाऱ्यास दंडसंहितेच्या नियमानुसार कठोर शिक्षेस पात्र ठरविण्यात यावे. ज्या ठिकाणी हा कायदा लागू करण्यात आलेला नसेल तेथे अशी संभावना निश्चितच असेल की, काही भांडवलदार वैयक्तिक गरजा पूर्ण करण्यासाठी सामुदायिक स्वार्थास क्षती पोहोचवितील, त्या ठिकाणी व्याजव्यवहारावर आधारित देवाणघेवाणीचा चोरटा बाजार अस्तित्वात येऊन व्याजमुक्त अर्थव्यवस्थेच्या कार्यप्रणालीवर आपला विषारी प्रभाव टाकेल. या अनिवार्य, असलेल्या अटीशिवाय काही अशा आर्थिक स्थितीसुद्धा निर्माण केल्याशिवाय या गोष्टीची आशा बाळगणेच कठीण आहे की, व्याजमुक्त वित्तीय व्यवहारांत समतोल साधता येईल. उदाहरणार्थ, गरजवंत उपभोक्त्यासाठी सामुदायिक पालकत्वाची योग्य आणि पुरेपूर व्यवस्था आणि भांडवलाच्या साठ्यातून होणाऱ्या लाभामुळे धैर्य खच्चीकरण यासारख्या इतर अनुकूल परिस्थिती एका अशा इस्लामी व्यवस्थेत यशस्वीपणे निर्माण केल्या जाऊ शकतात आणि व्याजास विधीवत प्रतिबंधित ठरविण्याबरोबरच इस्लामच्या इतर कायद्यांनासुद्धा लागू करता येईल. इस्लामसंमत इतर उद्दिष्टे पूर्ण करण्याचे परिपूर्ण प्रयत्नसुद्धा करता येईल. सामुदायिक व्यवस्थेच्या या प्रयत्नांबरोबरच सामान्यजणांत व संपूर्ण समाजात प्रामाणिकता, जवाबदारीची जाणीव आणि जनसेवेची तीव्र भावना असावी. हीच गुणधर्मे इस्लाम धर्माने आपल्या अनुयायांत यशस्वीपणे निर्माण केली. अशा रितीने प्रस्तावित व्याजमुक्त बँक व्यवस्था सोईस्कर आणि सुरळीतपणे चालवून चांगल्या कामगिरीचे दर्शन घडवील. ज्या समाजात लोकांची नितीमत्ताच बुरसटलेली असेल आणि स्वस्वार्थ हा सामुदायिक स्वार्थापेक्षाही जास्त महत्त्व धारण करेल, त्या ठिकाणी व्याजमुक्त बँक व्यवस्था चालविण्यासाठी कायद्याचा आधार घेणे अनिवार्य ठरते.

नवीन आवृत्तीच्या निमित्ताने

आजपासून तीस वर्षांपूर्वी ज्या वेळेस 'ग़ैरसूदी बँककारी' (उर्दू) अर्थात 'व्याजमुक्त बँकिंग व्यवस्था' हे पुस्तक प्रकाशित झाले होते, त्या वेळेस कोठेच व्याजमुक्त बँक कार्यरत नव्हती. एखादे काम कार्यरत असण्याचे हे वैशिष्ट्य आहे की यातून विचारसरणी व कार्यपद्धतीतील त्रुटी स्पष्ट होतात. त्याचप्रमाणे अनुभवाच्या आधारांवर विचारसरणी आणि कार्यपद्धतीची उच्च, स्पष्ट आणि परिपूर्ण रचना करणे शक्य होते. म्हणून इस्लामी बँकिंग व्यवस्थेअंतर्गत व्याज़मुक्त बँकिंग व्यवस्थेचा चौथ्या शतकात करण्यात आलेला प्रयोगसुद्धा काही असाच अनुभव देतो. येथे त्याचा उल्लेख करणे शक्य नाही. मात्र पुढ़े जाण्यापूर्वी या गोष्टीचा विचार करणे आवश्यक होईल की, अद्याप हा प्रयोग प्राथमिक अवस्थेत आहे. यापुढे यात आणखीन सुधारणा होण्याची शक्यता आहे. तसेच जे निष्कर्ष आज आपल्यासाठी महत्त्वाचे आहेत, उद्या त्याचे हे महत्त्व शेष राहण्याची शक्यता नाही.

ह्या पुस्तकात व्याजमुक्त इस्लामी बँकिंगची रूपरेखा आणि पूर्वस्वरुप सादर करण्यात आले आहे ते भागीदारीवर आधारित आहे. इस्लामी बँक एकीकडे भागीदारीच्या नियमांवर आणि ठेवीदार व भांडवलदारांकडून पैसा जमा करते तर दुसरीकडे भागीदारीच्याच नियमांवर व्यवसाय करणाऱ्यांना भांडवल पुरविते. या भांडवल गुंतवणुकीतून मिळणाऱ्या लाभांतून काही भाग बँक घेते आणि बाकी व्यावसायिक घेतो. सर्व व्यावसायिकांकडून बँकेस जो एकूणरीत्या नफा मिळतो, यातील काही टक्के भाग ठेवीदार व भांडवलदारांना मिळतो, बाकीचा भाग बँकेस मिळतो. हा टक्केवारी भाग करारानुसार निश्चित होतो. परंतु कोणत्याही पक्षास एखादी निश्चित रक्कम नफ्याच्या स्वरुपात मिळत नसते. या स्वरुपात काही आणखीन वित्तसेवा पुरविण्याच्या माध्यमाने बँकेस आणखीन वाढ़ीव नफ्याचा उल्लेख आहे आणि थोड्या संख्येत उपभोक्ता, व्यावसायिक आणि संस्था, तसेच शासनाससुद्धा व्याजमुक्त कर्ज देण्याची संधी आहे, परंतु व्यावसायिक गरजेसाठी भागीदारी आणि गुंतवणुकीशिवाय आणखीन एखाद्या पद्धतीने मोठ्या प्रमाणावर भांडवलपुरवठ्याचे कोणतेच स्वरुप आढळत नाही.

व्याजमुक्त बँकिंगची जी रुपरेखा आणि पूर्वस्वरुप भारत-पाक उपखंडात सादर करण्यात आले होते, यामागे ही कल्पना प्रेरित होती की, व्याजमुक्त बँकव्यवस्था राष्ट्रीय स्तरावर स्वीकारता यावी, परंतु कार्यक्षेत्रात मात्र व्याजमुक्त इस्लामी बँकिंगची सुरुवात खाजगी क्षेत्रात झाली. वैयक्तिक प्रयत्नांच्या परिणामस्वरुप स्थापन होणाऱ्या या व्याजमुक्त इस्लामी बँकांना आपल्या देशातील व्याजावर आधारित बँकांशी स्पर्धा

करावी लागली. देशाचा कायदादेखील यासाठी अनुकूल नव्हता. उदाहरणार्थ, कर्जदाराने वेळेवर कर्जाची फेड न केल्यास न्यायालयामार्फत त्याची संपत्ती जप्त करून मूळ रक्कम व्याजासकट वसूल करणे शक्य असते, परंतु भागीदारी तत्त्वावर कर्ज घेऊन व्यवसाय करणारा (यदाकदाचित) असे म्हणाला की, भांडवल बुडाले अथवा व्यवसायात मोठे नुकसान झाले अथवा नफाच मिळाला नाही, अशा परिस्थितीत त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करणे शक्य होणार नाही किंवा याचे समाधानकारक परिणाम निघणार नाहीत. प्रचलित कायदाच मुळात अशा प्रकारच्या उद्दिष्टपूर्तीवर आधारित नाही. यावर ही वस्तुस्थिती नाकारणे शक्य नाही की वाणिज्य जगतात नीतीमत्तेचे असे कोणतेही प्रमाण नाही ज्या आधारावर भागीदारी अथवा बटाई तत्त्वावर आधारित व्यवसायास अनुकूलता लाभेल. कारण यासाठी प्रामाणिकपणा आणि अनामतदारीची नितांत आवश्यकता असते. तिसरी आणखीन एक मोठी अडचण अशी समोर आ वासून उभी राहते की, व्यवसायाचा हिशोब ठेवणे आणि तपास व पडताळ्याच्या प्रचलित पद्धती कर्जाच्या देवाणघेवाणीस समोर ठेवून तयार करण्यात आल्या असल्याने अशा व्यवसाय व भांडवल गुंतवणुकीमध्ये यापासून पाहिजे तशी मदत मिळत नाही.

अशा परिस्थितींच्या परिणामस्वरुप इ.स. १९७० च्या दशकात स्थापन होणाऱ्या मोजक्या इस्लामी बँकांना काही कटू अनुभव आले व त्यानंतर व्यावसायिकांना बटाई तत्त्वावर भांडवल देण्याच्या पद्धती बंद करून प्रत्यक्षात औद्योगिक, वित्तीय आणि व्यापारी व्यवसायास सुरुवात झाली. काही ठिकाणी व्यवसायात भागीदारीची पद्धत अंगीकारण्यात आली, कारण प्रचलित कायदे भागीदारी तत्त्वावरील कर्ज प्रकरणात थोडे अनुकूल दिसतात. तसेच वित्तीय माध्यमांसाठी (Financial Intermadiation) स्थापन करण्यात आलेल्या आणि विविध कार्यासाठी हव्या असलेल्या पात्र व्यक्ती उपलब्ध नसतात. म्हणून बँकांकडून व्यापार, उद्योग, सेवापुरवठा, कृषी आणि यासारखे प्रत्यक्षात व्यवसाय होणे शक्य नाही, हीच नेमकी वस्तुस्थिती आहे. बँकांनी जर विविध प्रकारचे व्यवसाय सुरु करण्याचे ठरविले तर प्रत्येक व्यवसाय क्षेत्रासाठी त्या क्षेत्रातील पात्र उमेदवार अथवा पात्र व्यवस्थापक वेतनतत्त्वावर नियुक्त करावे लागतील. तसेच या व्यवस्थापकांवरील देखरेखसुद्धा एक समस्याच असेल. हे सर्व घडवून आणूनसुद्धा त्यांना इतर व्यावसायिकांशी स्पर्धा असेलच जे अगदीच तल्लीनतेने आणि कुशलतेने व्यवसायकार्य पार पाडतात. जर इस्लामी बँकांनी प्रत्यक्षात व्यापार व उद्योगांच्या माध्यमातून नफा कमवून तो नफा खातेदारांमध्ये वाटण्यात यश मिळविले तरीसुद्धा ही गोष्ट निश्चितच विचार करण्यासारखी आहे की, यातून आपण काय साध्य केले. इतकेच

नव्हे तर देशामध्ये काही व्यावसायिक संस्थांच्या संख्येत वाढ झाली. परंतु वित्तीय माध्यमांचे कार्य आपल्या ठिकाणी तसेच बाकी राहिले. अर्थातच वित्तीय माध्यमकार्य यापेक्षा आणखीन काही अशा वेगळ्या प्रकारच्या पात्रतांची मागणी करते ज्या प्रत्यक्ष व्यवसायाकरिता आवश्यक ठरतात. तसेच एका आधुनिक प्रगत्त उपजीविकेसाठी वित्तीय माध्यमांच्या संस्था अत्यावश्यक आहेत.

ठेवीदार तीन बाबतीत आपसामध्ये भिन्न असतात. १) भांडवलाची संख्या, २) भांडवल बँकेच्या स्वाधीन करण्याचा मुदतकाळ आणि ३) भांडवलाच्या मालकाची तोटा सहन करण्याच्या पात्रतेची अंतिम मर्यादा. दुसरीकडे भांडवलाचा इच्छुकसुद्धा विविध राशीसंख्येत, विविध कालमर्यादांसाठी आणि जोखमीच्या दर्जास समोर ठेवून विविध प्रकारच्या व्यवसायासाठी भांडवल मिळवू इच्छित असतात. ही तफावतसुद्धा महत्त्वाची आहे की, जास्त मुदतीसाठी आणि सामान्यत: यापेक्षा कितीतरी जास्त पटीने अथवा एक ठेवीदार जेवढी राशी बचत करू शकतो, त्यापेक्षाही कितीतरी जास्त पटीने भांडवल मिळवू इच्छितो.

वित्तीय माध्यमांची कमाल ही आहे की उपरोल्लेखित दोन्ही पक्षांबरोबर असा व्यवहार करावा ज्यामुळे दोन्ही समाधानी राहतील. भांडवलाची जेवढी मोठी राशी त्याच्या ताब्यात येईल. बँकेसाठी हे काम तेवढेच मोठ्या कुशलतेने पार पाडणे शक्य होईल. भूतकाळातील अनुभव, वर्तमान स्थितीची माहिती आणि भविष्यकाळाबाबत विवेकपूर्ण अनुमान या कार्यात सहाय्यभूत ठरतात. व्यवसायात ज्या प्रकारच्या अड्चणी समोर येतात, त्या केवळ बाजारभावाच्या चढ़उतारापर्यंतच मर्यादित नसून देशी चलनाची विदेशी किंमत (Foreign Exchange) सुद्धा अडचण निर्माण करते आणि या बदलणाऱ्या किंमतीसुद्धा व्यवसायास प्रभावित करतात. वित्तीय माध्यमांसाठी भांडवलगुंतवणूक करताना गुंतवणूकदारांसाठी आवश्यक असलेली माहिती आणि कौशल्य मिळविण्यासाठी आपली शक्ती खर्च करणे शक्य होत असते. हे काम प्रत्येक व्यावसायिक वैयक्तिकरित्या करू शकत नाही. ज्या ठिकाणी वित्तगुंतवणूक करणाऱ्यांसाठी चांगल्या दर्जाच्या आर्थिक संस्था उपलब्ध आहेत, त्या ठिकाणी लोक आपल्या बचतराशी जास्तीतजास्त त्यांच्या खात्यात जमा करतात. कारण त्यांना त्यांच्या व्यवसायकौशल्यावर एखाद्या व्यावसायिक संस्थेपेक्षाही जास्त विश्वास असतो. त्याचप्रमाणे उत्तम वित्तगुंतवणूकदारांची उपलब्धता व्यावसायिक वर्गासाठी खूपच फायद्याची असते, कारण प्रत्येक छोटे-मोठे व्यावसायिक रोखे (Shares) विकून प्रत्यक्षात भांडवल मालकांकडून भांडवल मिळवू शकत नाही.

वर उल्लेख केल्याप्रमाणे या पुस्तकात बँकिंगचे जे मॉडेल (Model) सादर करण्यात आले आहे, यामध्ये व्याजाच्या जागी मिळणाऱ्या नफ्यात भागीदारी ठेवण्यात आली असून खूप सविस्तरपणे हे स्पष्ट करण्यात आले आहे की, बँकिंग व्यवसाय असादेखील चालविता येतो. देशपातळीवर करण्याऐवजी बँकिंग व्यवहाराचा प्रयोग वैयक्तिक पातळीवर करण्यात आल्याने यात पाहिजे तेवढे यश मिळाले नाही आणि भागीदारी चालू शकली नाही. कारण सरकारी कायदा आणि नैतिक वातावरण यासाठी अनुकूल नव्हते.

इस्लामी बँकिंगमध्ये याची वाढ ही डॉ. सामू हसन हमूद यांचे पुस्तक प्रकाशित झाल्यावर करण्यात आली. व्यावसायिकाने बँकेतून कर्ज काढून यंत्र अगर कच्चा माल खरेदी करण्याऐवजी या प्रणालीवर तो बँकेशी असा करार करतो की 'अमुक यंत्र किंवा अमुक प्रकारचा कच्चा माल बँकेने स्वत: खरेदी करून मला विकावा. मी याची किंमत हप्त्याने फेड करीन अथवा काही ठराविक मुदतीनंतर एकत्रितपणे देईन. बँकेने यंत्र अगर कच्च्या मालाच्या खरेदी किंमतीवर १०-१५ टक्के किंवा योग्य वाटेल तेवढा नफा वाढवून माझ्याकडून वसूल करावा.' दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास भांडवल उसने घेऊन व्याजासकट परत करण्याऐवजी ते यंत्र अगर कच्चा माल बँकेकडून उसणे स्वरुपात खरेदी करतो. परंतु थोड्या जास्त वा वाढीव किंमतीत. इस्लामी विधीतज्ञाची असा व्यवहार वैध असण्यावर सहमती आहे, कारण कोणताही व्यापारी आपल्या वस्तूची उधारीमध्ये जास्त किंमत घेऊ शकतो. बटाई तत्त्वावरील व्यवसायासाठी भांडवल घेऊन जाणारे व्यावसायिक परतफेडीत अपात्र ठरत असल्याने अथवा त्यांच्या जाचास कंटाळून इस्लामी बँकांनी या पद्धतीस अर्थपुरवठा करण्याची प्रणाली अवलंबिली आहे. याव्यतिरिक्त इस्लामी बँकांनी भाडेतत्त्वावर यंत्रसामग्री, चारचाकी गाड्या (कार), जहाजे, विमाने वगैरे दिले. अशा प्रकारे बँकेने पहिल्यांदा गरजवंतांना जरुरी सामानाचे मूल्य अदा करुन ते सामान भाड्याने देण्याच्या नावावर अशा स्वरुपाचे हप्ते वसूल केले की एका ठराविक मुदतीत अदा केलेली किंमत (खरेदी किंमत) नफ्यासहित वसूल झाली.

त्याचप्रमाणे व्यापारी आणि औद्योगिक साधनांची खरेदी करून उपभोक्त्यांना देऊन अथवा विक्री करून व्यापार-धंदा झाल्यावर एका ठराविक मुदतीनंतर नफ्यासह त्याची किंमत वसूल करण्यात येते. अशा प्रकारच्या कर्जपद्धतींत बँकेचे आर्थिक नुकसान होत नाही. त्याचप्रमाणे पूर्वीपासूनच निश्चित केलेल्या नफ्यासहित दिलेले कर्ज परत मिळते. मात्र व्याजाच्या कर्जपद्धतीच्या अगदी उलट स्वरुपात या पद्धतीत वैचारिकदृष्ट्या जोखीम स्वीकारावी लागते. भाड्यावर देण्यात येणारे सामान अथवा

यंत्रसामग्री आणि किंमत वाढवून उसणे देण्यात येणारी सामग्री भाडेकरू आणि खरेदीदाराच्या ताब्यात जाण्यापूर्वीच नष्ट झाल्यास त्याची जवाबदारी बँकेवर असेल.

ही बाब उल्लेखनीय आहे की अशा पद्धतीने पुरविण्यात आलेले साधन व सामग्री (Financing) ही शेवटी 'वस्तु' आणि 'सेवापुरवठ्या'शी संबंधित असते. व्याजावरील अर्थ सहाय्य केवळ रोकड स्वरुपातील अथवा नगदी स्वरुपातील देवाणघेवाणीवर असते. परंतु इस्लामी बँकेचे कर्ज अशा स्वरुपाचे नसते, हेच याचे वैशिष्ट्य होय. अशा प्रकारचे कर्जव्यवहार व्याजमुक्त असले तरी कर्ज प्रमाणपत्रे अस्तित्वात आल्यामुळे प्रचलित व्यवस्थेमुळे काही अडचणी निर्माण होतात. या बाबतीत ह्या पुस्तकाच्या दहाव्या प्रकरणात माहिती देण्यात आली आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की आधुनिक उपजीविकेत भांडवल हे अशा बऱ्याचशा कार्यातसुद्धा लावणे आवश्यक असते की ज्यामधून सहजासहजी नफा मिळविणे कठीण असते. नगरपरिषदा वा महानगरपालिका शहरात स्वच्छता राखण्यासाठी आणि शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी वा इतर अशा प्रकारच्या कार्यासाठी मोठ्या प्रमाणात भांडवलगुंतवणूक करू इच्छितात. परंतु केवळ करावर आधारित ही योजना यामुळे पूर्ण करता येत नाही की मोठ्या प्रमाणात गुंतविलेले भांडवल वर्षानुवर्षानंतर अथवा खूप दीर्घ कालावधीनंतर नफ्याच्या स्वरुपात परत मिळते. अशा प्रकारच्या दीर्घ मुदतीच्या योजनांसाठी भाडेतत्त्व स्वरुपातील कर्ज योग्य ठरते. अशा प्रकारच्या दीर्घ मुदतीच्या कर्जप्रकरणांत इस्लामी बँक केवळ भागभांडवल पद्धतीव्यतीरिक्त इतर पद्धतींचा अवलंब करेल. भावी इस्लामी बँक व्यवस्था केवळ 'भागभांडवल' पद्धतीवर अवलंबून न राहता यासारख्या पद्धतींचासुद्धा अवलंब करील. याची सविस्तर माहिती दहाव्या प्रकरणात देण्यात आलेली आहे.

व्याजमुक्त बँकिंग ही मानवाची मूलभूत गरज

विसाव्या शतकात मानवी उपजीविकेवर तीन भयानक संकटे आली. पहिले संकट म्हणजे महायुद्धामुळे ओढवलेली विनाशकता होय. यामध्ये कोट्यवधी लोक प्राणास मुकले आणि अतिशय प्रचंड प्रमाणावर वित्तहानी झाली, संपत्ती नाश पावली. दुसरे भयानक संकट साम्यवादाच्या अराजक व्यवस्थेच्या परिणामस्वरुपी प्रकट झाले. यामध्ये मानवाच्या भल्यामोठ्या संख्येला भाकरीच्या नावावर गुलाम बनविण्यात आले आणि मग त्यांच्या तोंडचा भाकरीचा घाससुद्धा पळविण्यात आला. तिसरे भयानक संकट म्हणजे वित्त, संपत्ती साधनाचा असमतोल होय, ज्याचे भयानक परिणाम आजपर्यंत भोगावे लागत आहेत. आधी तर संपूर्ण जग वित्तीय असमतोलाच्या आगीत होरपळून निघाले आणि विसाव्या शतकाच्या अखेरीस बरेचसे देश वैफल्यग्रस्त आणि वित्तीय चढ़उताराच्या परिणामस्वरुपी महागाईच्या गर्ततेत लोटले गेले. या दोन्ही संकटांचा भारतासकट अनेक देशांवर खूप असहनीय परिणाम तर झालाच, शिवाय उत्तरपूर्व आशिया खंडातील मागील दोन दशकांच्या (१९८० च्या दशकाच्या) वेळी तीव्र गतीने प्रगतीपथावर असलेल्या देशांना जबर फटका बसला. थायलँड, मलेशिया, कोरिया, इंडोनेशियासारखे प्रगतीपथावर असलेले देश अचानक कोलमडून पडले. या नुकसानीस निश्चितच देशाची आंतरिक परिस्थितीदेखील जबाबदार आहे, परंतु संकटाची मोठ्या प्रमाणावर झालेली सुरुवात ही विदेशी भांडवलपुरवठा परत घेतल्याने झाली. हे विदेशी भांडवल बहुतेककरून अल्पमुदतीवर आधारित भाग (Shares) आणि बॉन्डच्या खरेदी स्वरुपात देशात दाखल झाले होते. दिलेल्या कर्जांच्या परताव्याची मागणी आणि बॉन्ड व शेअर्सची अचानक विक्री यामुळे देशाच्या चलनाची विदेशी किंमत गडगडली. विदेशी चलनप्राप्ती अशक्य झाल्याने आयात होणाऱ्या वस्तुंच्या किंमती आकाशाला भिडल्या आणि परिणामी हजारो उद्योग बंद पडले, लाखो लोक बेरोजगार झाले.

या ठिकाणी तिसऱ्या महासंकटाचे वर्णन अशक्य असले तरी याचा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे पुस्तकाच्या विषयाशी याचा घनिष्ठ संबंध आहे. प्रचलित अर्थव्यवस्था कर्जावर आधारलेली असून वित्तबाजारात अल्पमुदतीचे कर्ज आणि शेअर्सचा जास्त प्रभाव आहे. अशा प्रकारच्या व्यवहाराचे स्वरुप सोपे आणि तीव्र गतीशील असून हेच स्वरुप या देशासाठी विघातक आहे. अर्थात एकीकडे हे भांडवलाचे लोभी असतात, परंतु दुसरीकडे भांडवल परतीचे दुःखही सहन करू शकत नाहीत. आमचा हेतु असा आहे की या पुस्तकाचा अभ्यास करणाऱ्यांनी गंभीरपणे विचार करावा की, एखाद्या देशात विदेशी भांडवलाचा प्रवेश जास्तीतजास्त

भागभांडवल तत्त्व आणि शेअर्सवर आधारित असल्यास देश कितपत या समस्येपासून दूर राहू शकतो. पहिल्यांदा ही बाब विचार करण्यासारखी आहे की भागीदारी अथवा भागभांडवल तत्त्वावर केवळ तोच भांडवलाची गुंतवणूक करेल ज्याला या गोष्टीचे पूर्व समाधान आणि विश्वास असेल की आपण लावत असलेल्या भांडवलावरील व्यवसाय पूर्णपणे नफा देणारा आणि लाभदायक असेल. कारण भागीदारी तत्त्वावर लावण्यात आलेल्या भांडवलाचा नफ्यासहित परतावा ठराविक मुदतीत शक्य होत असतो. या उलट ही एक वस्तुस्थिती आहे की, बरेच गुंतवणूकदार भांडवल गुंतविण्यापूर्वी या गोष्टीची शहानिशा करीत नाहीत की आपण भांडवल गुंतवित असलेला व्यवसाय कोणता व कशा स्वरुपाचा आहे? कर्ज घेणारा कोण आहे? त्याची आर्थिक परिस्थिती कशी आहे? दुसरा फरक असा आहे की, पूर्ण शहानिशा करूनही भांडवल लावल्यावर ज्या व्यवसायात भांडवल गुंतविण्यात येते, त्यातही काही अडचणींना सामोरे जावे लागल्यास भागीदारी व्यावसायाच्या भांडवल गुंतवणुकदाराचे हित यामध्ये असेल की द्वितीय पक्षाबरोबर या अडचणींना तोंड देण्यास सहकार्य करावे. उलट भांडवल काढून घेऊन त्यास वाऱ्यावर सोडून दिल्यास दोन्ही पक्षांचेही हित नष्ट होईल. उत्तरपूर्व आशियातील देशात भांडवल गुंतविण्यात येणाऱ्या पाश्चात्य वित्तीय संस्थांनी १९९७-९८ मध्ये केलेल्या कारस्थानांचे यासाठी उदाहरण देता येईल.

हे पुस्तक प्रथम भारतात प्रकाशित करण्यात आले, मग पाकिस्तानात पहिली इंग्रजी आवृत्ती लाहोर आणि दुसरी इंग्रजी आवृत्ती ब्रिटनमधून प्रकाशित झाली. या पुस्तकाच्या अरबी आणि पर्शियन भाषेत आवृत्या प्रकाशित झाल्या असून आता या पुस्तकात आणखीन काही सुधारणा करून मराठी आवृत्ती आपल्या सेवेत सादर करण्यात येत आहे. काही वाक्यांची वाढ या पुस्तकातील प्रकरणांत करणे यासाठी आवश्यक आहे की, व्याजमुक्त बँकांचा आपल्या देशाच्या आर्थिक परिस्थितीशी असलेला संबंध स्पष्ट व्हावा. वस्तुस्थिती अशी आहे की प्रचलित अर्थव्यवस्थेत बँकिंगचा व्याजमुक्त पर्याय मानवी गरजपूर्तीसाठी सादर करण्यात आला आहे, ज्यामुळे मानवी समाजात न्यायस्थापना आणि संतुलित आर्थिक प्रगती होणे शक्य होईल.

ही विचारसरणी भारतातही आता लोकप्रिय होत आहे. मुस्लिमांनी शेकडो व्याजमुक्त वित्त संस्था स्थापन केल्या आहेत, ज्यांपैकी काही संस्थांनी तर बचत आणि कर्ज प्रकरणांच्याही पुढे मजल मारुन भांडवल गुंतवणूक क्षेत्रात घोडदौड सुरु केली आहे. काही आंतरराष्ट्रीय स्तरावरील व्याजमुक्त वित्तसंस्थांनीसुद्धा आपल्या देशात कार्य सुरु केले आहे. काही सामान्य व्यावसायिक वर्तुळातसुद्धा विशेषत: अहमदबाद (गुजरात) मध्ये व्याजमुक्त वित्त संस्था स्थापन झाल्या आहेत. उदाहरणार्थ : रोडनी

विल्सन, इस्लामिक फायनान्स (लंडन फायनान्शियल टाइम्स, फायनान्शियल पब्लिशिंग १९९७, पृष्ठ १४५ आणि फिल्प मोर, इस्लामिक फायनान्स लंडन, यूरोमनी - १९९७, पृष्ठ २०० वगैरे.)

देशातील विविध विद्यापीठांत हा विषय पी.एच.डी. साठी निवडण्यात आला असून काही प्रसिद्ध अर्थतज्ञांनी अशा प्रकारच्या संस्था स्थापन करण्यास फायदेशीर म्हटले आहे. आम्हाला असे वाटते की, व्याजमुक्त बँक व्यवस्थांच्या या नवीन आवृत्तीच्या माध्यमातून आपल्या देशाला या नवीन विचारसरणीमुळे आणखीन बळ मिळेल आणि देशात आर्थिक सुखसमृद्धी नांदेल.

आपला,

डॉ. मुहम्मद नजातुल्लाह

इस्लामिक इकॉनॉमिक्स रिसर्च सेंटर,

किंग अब्दुल अज़ीज विद्यापीठ,

जिद्दाह : सऊदी अरब,

३ जून १९९९

प्रकरण पहिले
बँकेची स्थापना

बँकेची स्थापना सामुदायिक भागीदारी तत्त्वावर करण्यात येईल. बँकेच्या उभारणीत दोन किंवा दोनपेक्षा जास्त सभासद निश्चित भांडवल गुंतवणुकीसह या करारावर भागीदारी करतात की, सामुदायिक तत्त्वावर व्यवसाय करून व्यवसायाचा लाभ आणि तोट्यात निश्चित करण्यात आलेल्या प्रमाणात भागीदार असतील. भागीदारी स्वरुपाच्या व्यवसायात संस्थेच्या प्रत्येक सदस्याने सक्रीय भाग घेणे आवश्यक नसते. परंतु एखाद्या सदस्यास सक्रीय सहभागातून वेगळेही करता येणार नाही. काहीजणांच्या एकत्रित भांडवल पुरवठ्यातून भागभांडवल तत्त्वावर व्यवसाय सुरु करण्यात येईल, इतर सेवा, वेतन देऊन पूर्ण करण्यात येतील आणि अशा रितीने नफा कमावण्यात येईल.

बँक भागीदार सभासदांव्यतीरिक्त इतर लोकांकडूनही भागभांडवल तत्त्वावर भांडवल घेऊन चालू असलेल्या व्यवसायात गुंतवून यापासून मिळणाऱ्या नफ्यातून एक निश्चित प्रमाण गुंतवणूकदारास देण्यात येईल. भागभांडवल तत्त्वावर पैसा गुंतविणाऱ्यास बँकेच्या पारिभाषिक शब्दात 'खातेदार' असे संबोधन देण्यास काही हरकत नाही.

एक व्यक्ती स्वत:च्या भांडवलानेसुद्धा बँकेची स्थापना करू शकतो. त्याचप्रमाणे शासनसुद्धा राज्याच्या भांडवलातून बँक स्थापन करू शकते. परंतु सामान्यत: बँकेच्या स्थापनेस प्रचंड भांडवलाची गरज असल्याने काहीजण एकत्र येऊन सामुदायिकरित्या हे कार्य सहज पार पाडू शकतात. म्हणूनच आम्ही या ठिकाणी पुढील चर्चेत इतर संभावित स्वरुपांकडे दुर्लक्ष केले आहे. तसेच अशा स्वरुपांचा अंगीकार करण्याची पूर्ण संधी असेल आणि यापुढील चर्चांचे पूर्ण परिणाम अशा स्वरुपावर लागू होतील.

या व्यवसायात भागीदारांची संख्या कमीतकमी दोन असेल. जास्तीतजास्त संख्येवर कोणतेही बंधन नसेल. व्यवहार सुटसुटीतपणे हाताळण्यासाठी संख्येच्या कमाल मर्यादेची निश्चिती सोईस्कर ठरेल. सभासदांची कमाल संख्या प्रत्येक काळात व प्रत्येक देशात विविध स्वरुपाची असेल तरीदेखील ही संख्या खूप जास्त असता कामा नये.

या भागीदार सदस्यांनी पुरविलेल्या भांडवलाची संख्या समानही असू शकते आणि असमानही असू शकते. यासाठी ही पद्धत जास्त योग्य ठरेल की भांडवलाच्या एका विशिष्ट राशीस (उदाहरणार्थ एक लाख रुपये) 'एक भाग' असे ठरविण्यात यावे आणि असे ठरविण्यात यावे की प्रत्येक भागीदार सभासदाने वाटेल तेवढे भाग खरेदी करावेत. बँकेच्या सामुदायिक- भांडवलाची किमान व कमाल राशीदेखील निश्चित करता येऊ शकते.

एखाद्या भागीदार सभासदाच्या भांडवलाचे एकूण भांडवलाशी असलेले प्रमाण जेवढे असेल त्या प्रमाणात तो बँकेचा मालक समजला जाईल. उदाहरणार्थ, एका बँकेसाठी दहा सभासदांनी एकत्रितपणे दहा लाख रुपयांचे भांडवल उभे केले. या दहा सदस्यांपैकी एका सदस्याने एक लाखाचे भाग (Shares) खरेदी केले. तेव्हा तो या बँकेचा दहा टक्के मालक समजला जाईल.

व्यावसायिक बँकिंगच्या नफ्याच्या बाबतीत हा नियम पाळणे योग्य ठरेल की, नफ्याच्या रकमेची वाटणी भांडवलाच्या प्रमाणात (अथवा शेअर्सच्या संख्येच्या प्रमाणात) असावी. अर्थात बँकेचा एकूण नफा एकूण भांडवलावर विभागण्यात येईल आणि अशा प्रकारे जो टक्केवारी नफा मिळेल, त्या प्रमाणात प्रत्येक सभासदास तो वाटप करण्यात येईल. नियमानुसार ही बाब परवानगीसंमत आहे की, भागीदारांसाठी नफ्याचे असे प्रमाण निश्चित करता येतात जे त्यांनी पुरविलेल्या भांडवलराशीच्या (खरेदी केलेल्या शेअर्सच्या) प्रमाणानुसार नसेलही, असे करण्याचे कारण हेदेखील असू शकते की, काही भागीदार सभासद इतर भागीदार सभासदांपेक्षा जास्त कुशल, अनुभवी व पात्र असू शकतील किंवा ते जास्तीतजास्त व्यवसायात आपला वेळ व कौशल्य पणाला लावित असतील. तरीदेखील व्यवहार सोईस्कर हाताळण्यासाठी आमचा हाच सल्ला आहे की, व्यवसायाच्या एकूण नफ्यात भागीदाराने पुरविलेल्या भांडवलाच्या प्रमाणात नफ्याची वाटणी करणे योग्य ठरेल.

एखाद्या वर्षी बँकेच्या व्यवसायात तोटा उचलावा लागला तर हे नुकसान आवश्यकरित्या बँकेच्या भागीदारांदरम्यान भांडवलांच्या (शेअर्सच्या) प्रमाणात उचलण्यात यावे. याचे इस्लामी विधीनुसार असलेले नियम सातव्या प्रकरणातील दुसऱ्या क्रमांकाच्या शीर्षकाखाली सादर करण्यात आले आहेत.

एकत्रित भांडवल, भागीदारी तत्त्वावर व्यवसायासाठी देण्याची पद्धत अवलंबण्यात येईल. याचबरोबर ही व्यावसायिक बँक भरमसाठ मिळकत वा नफा मिळवून देणाऱ्या सेवासुद्धा पुरवील. उदाहरणार्थ, सामान्य लोक, संस्था आणि शासनास लागणाऱ्या सेवांचा पुरवठा हे नफा देणारे कार्यसुद्धा बँकेच्या मिळकतीचे एक महत्त्वाचे साधन आहे.

प्रत्येक भागीदार सभासद या गोष्टीशी सहमत असेल की, बँकेच्या सामुदायिक व्यवसायातून भागीदारी तत्त्वावर वाढीव भांडवल मिळवून व्यवसायात गुंतविण्यात यावे आणि व्यवसायाच्या वृद्धी व विकासासाठी कर्जस्वरुपातील भांडवल घेण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्व भागीदारांकडून या गोष्टीचीदेखील परवानगी असेल की लोकांना अथवा संस्थांना बँकेचे भांडवल कर्जस्वरुपात द्यावे किंवा भागीदारी तत्त्वावर भांडवल

पुरविण्यात यावे. बँकेस या गोष्टीचा पूर्ण अधिकार असेल की, वेतन अथवा पगार तत्त्वावर मजूर, कारकून, कारागीर वगैरेंकडून कर्मसेवा मिळवावी आणि एकत्रित भांडवलास अशा सर्व कार्यांत गुंतवावे की जेथून बँकेस नफा मिळेल.

प्रत्येक भागीदारास इतर भागीदारांकडून या गोष्टीची परवानगी असेल की, तो वैयक्तिकरित्या दुसऱ्या कोणत्याही व्यवसायात वा भागीदारी तत्त्वात आपले भांडवल गुंतवू शकेल. तसेच भांडवल कर्ज घेण्याची व कर्ज देण्याचीसुद्धा परवानगी असेल. अर्थातच भागीदार सदस्यांच्या सामुदायिक व्यवसायाशी त्यांच्या वैयक्तिक बाबींचा संबंध नसेल.

बँक व्यवहारासंबंधी सर्व महत्त्वाचे निर्णय सर्वांच्या सहमतीने व सामंजस्याने होतील. भागीदार सदस्यांची संख्या मोठी असल्यास यात काही गैर नाही की, त्यांनी बहुतेक प्रकरणांत त्यांची निर्णयनिश्चिती पूर्वीच करावी आणि निर्णयाचा अधिकार आपल्या परिषदेच्या एका प्रतिनिधीस द्यावा. दैनंदिन: व्यावसायिक निर्णय, वेतनावर ठेवण्यात आलेला व्यवस्थापकसुद्धा करू शकतो आणि या व्यवस्थापकाची नियुक्ती करणे वा कमी करणे भागीदार सदस्यांच्या प्रतिनिधी परिषदेच्या अखत्यारीत असेल.

बँकिंग व्यवसाय हा मुळात कायमस्वरुपी व्यवसाय असल्याने याचा शेवट करण्याची वेळ निश्चित करता येत नाही. अशा अवस्थेत भागीदार सभासदांच्या हितात ही बाब जास्त योग्य असेल की, नफा व तोट्याच्या निश्चिततेसाठी अशी पद्धत स्वीकारण्यात यावी, जी 'भागीदार' आणि 'भागीदारी' या दोघांच्या हिताची असेल. यासाठी हे योग्य ठरेल की, प्रत्येक वित्तवर्षाच्या अखेरीस भागीदारीतील नफा व तोट्याच्या निश्चितीसाठी त्याच्या हिशेबाचा अभ्यास करण्यात यावा. एकत्रित नफा व तोट्याच्या निश्चितीनंतर भागीदाराच्या वाट्याला येणारा नफा त्यास देण्यात यावा. नुकसान झाल्यास त्याला रीतसर सूचना द्यावी. यानंतर पुढील वर्षीच्या भागीदारी तत्त्वासाठी करारनाम्याचे नूतनीकरण करावे आणि व्यवसाय सुरु ठेवावा. नवीन वित्तवर्षाचा हिशोब मागील वर्षापेक्षा भिन्न असेल. उचलाव्या लागणाऱ्या नुकसानीच्या परिस्थीतीत नुकसानभरपाईस्तव मागील वर्षाचा नफा परत घेता येणार नाही. त्याचप्रमाणे या नफ्यातून मागील नुकसानीची भरपाई करता येणार नाही. मात्र नुकसानीच्या परिस्थितीत भागीदार सदस्य आपल्या भांडवलात कमी होणाऱ्या राशीच्या भरपाईकरिता आणखीन भांडवल गुंतवू शकतात. याची सविस्तर माहिती सातव्या प्रकरणात देण्यात आली आहे.

प्रत्येक सभासदास कोणत्याही वेळी भागीदारीतून विभक्त होण्याचा पूर्ण अधिकार असेल. कोणत्याही भागीदाराकडून विभक्तीचा विनंती अर्ज मिळाल्यास तत्काळ त्या सभासदाचा हिशेब करून त्यास त्याचे भांडवल नफ्यासह परत करण्यात यावे. असेदेखील शक्य आहे की, भागीदारीचा करार करतेवेळेस सभासदांनी स्वत:स

यावर निर्बंधित अगर जबाबदार समजावे की त्याने वर्षाखेरीस पूर्ण हिशोबाच्या वेळी किंवा वार्षिक हिशोबाच्या वेळी विभक्त व्हावे.

एखाद्या सभासदाचा मृत्यू झाल्यास त्याचे सदस्यत्व आपोआप रद्दबातल ठरेल अथवा संपुष्टात येईल आणि त्याचा रीतसर हिशोब करून नफ्यासहित त्याचे भांडवल त्याच्या वारसाला देण्यात येईल. मात्र इतर सभासदांची संमती असल्यास त्याचा वारसदार त्याची जागा घेऊ शकतो. (याचा तपशील सातव्या प्रकरणात पाहावा.)

बँकेला भागीदार सभासदांकडून कर्ज घेण्याची व कर्ज देण्याची रीतसर परवानगी असल्यामुळे सभासदांची जवाबदारी त्यांनी पुरविलेल्या भांडवलापुरतीच मर्यादित नसावी तर याच्याही पुढे असावी. सामान्यतः कर्जाच्या देवाणघेवाणीच्या बाबतीत बँकेवर कोणाचे कोणतेच बंधन नसेल. त्यासाठी असे म्हणणे वावगे ठरणार नाही की, प्रत्येक भागीदार सभासदाची वित्तीय जवाबदारी अमर्याद असेल. व्यावसायिक बँकेत एवढे प्रचंड नुकसान झाले की, घेतलेल्या कर्जांची व इतरांच्या अधिकाराची पूर्ण रक्कमच नष्ट झाली, अशा परिस्थितीत सर्व सभासद मिळून या नुकसानीची भरपाई करतील. मात्र एखाद्या भागीदार सदस्याने वैयक्तिकरित्या नुकसान उचलले असल्यास इतर सभासद त्यात सहभागी राहणार नाहीत. सभासदांच्या वैयक्तिक व्यवसायाचा वित्तीय जवाबदारीशी काहीही संबंध नाही.

भागीदार सभासदांच्या अमर्याद वित्तीय जवाबदाऱ्या अशा जनमाणसाच्या सुरक्षेच्या आहेत जे या बँकेचे खातेदार आहेत आणि ज्यांच्या रकमा व ठेवी बँकेत ठेवलेल्या आहेत. परंतु वस्तुतः हे पाहण्यात आले की बँक दिवाळखोरीत निघाल्यावर बँकेच्या भागीदार-सभासदांकडून एवढ्या मोठ्या रकमेची भरपाई शक्य नसते की सर्व खातेदारांच्या ठेवी व रकमा परत करणे शक्य होईल. यासाठी खातेदार जनतेच्या हिताच्या रक्षणार्थ इतर अशा पद्धतींचा शोध लावण्यात आला आहे की ज्यापैकी प्रत्येकाचा संबंध केंद्रीय बँकेच्या देखरेखीशी आणि अशा नियमांशी असेल, जे सर्व बँकांवर लागू करण्यात आलेले आहेत. या तरतूदीवर विश्वास ठेवून बँकांच्या स्थापनेस्तव मर्यादित जवाबदारीच्या आधारावर 'ज्वाइंट स्टॉक कंपनी' अथवा 'वित्तीय महामंडळा'ची प्रणाली अवलंबिण्यात आली. ही पद्धत अंगीकारण्यामुळे जास्त विस्तारित प्रमाणावर भांडवल जमा करणे आणि जास्तीतजास्त लोकांना बँकेत घेणे शक्य झाले. संबंधित इस्लामी विधीशास्त्रानुसार या विषयावर चर्चा चालू आहे. परंतु व्यावसायिक बँकिंगच्या विस्तारासाठी हे आवश्यक आहे. मर्यादित जवाबदारीच्या आधारावर 'शेअर्स'च्या स्वरूपात भांडवल उभारून बँक उभारण्याच्या पद्धतीचा अवलंब करण्यात यावा. तसेच खातेदारांचे हीत सुरक्षित राहण्यासाठी केंद्रीय आणि राज्य बँकेने सर्वतोपरी प्रयत्न करावे.

प्रकरण दुसरे
बँक व्यवसाय

बँक व्यवसायाचे तीन प्रकार आहेत.

१) बँकेकडून पुरविण्यात येणारे शुल्क, दलाली किंवा निश्चित वेतनावरील श्रमसेवा.

२) भागीदारी तत्त्वावर व्यवसायात भांडवल गुंतवणूक

३) वेतनरहित सेवापुरवठा

या ठिकाणी आपण प्रथमोल्लेखित प्रकाराची माहिती घेऊया.

१) मोबदला घेऊन सेवापुरवठा करणे

अशा प्रकारच्या सेवापुरवठ्यातून मिळणारे उत्पन्न हे निश्चितच त्यावर होणाऱ्या खर्चापेक्षा जास्त असू शकते. म्हणून हा व्यवसायसुद्धा बँकेसाठी नफा मिळवून देणारा आहे. दुसरीकडे यामुळे समाज आणि विशेषकरून व्यावसायिक वर्गाची महत्त्वाची गरज पूर्ण होते. या बँकेस समकालीन बँक (अथवा सेवापुरवठा बँक) असेही म्हणतात. या बँकेच्या माध्यमाने योग्य शुल्क, मोबदला वा दलाली आकारून सेवापुरवठा करण्यात येतो. अशा प्रकारचा व्यवसाय आजही व्याजमुक्त असल्याने वर्तमान पद्धतीत व्याजाशिवाय करण्यात येतो. यासाठी आपण काही महत्त्वाच्या सेवांचा अभ्यास करुया, ज्या बँकेमार्फत पुरविल्या जाऊ शकतात.

अ) ग्राहकांच्या ठेवी सुरक्षित ठेवणे. या प्रकारात बँकेत लॉकर्स (Lockers) असतात. यामध्ये मौल्यवान दागिने, महत्त्वाची कागदपत्रे, प्रमाणपत्रे आणि इतर मौल्यवान वस्तु सुरक्षित राहतात. योग्य मोबदला घेऊन बँक या वस्तुंच्या रक्षणाची हमी घेईल.

आ) रक्कम स्थानांतरित करणे. धनादेश, बँक ड्राफ्ट, विश्वासपत्रे (Letters of Credit) आणि विविध प्रकारच्या वित्त प्रमाणपत्रांद्वारे लहान-मोठ्या रकमा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी बँकेद्वारे स्थानांतरित करता येतात आणि मोबदल्यात टक्केवारी दलाली अथवा शुल्क घेण्यात येते. प्रत्येक मोठ्या बँकेच्या शाखा प्रत्येक शहर व गावात असल्यामुळे अथवा शाखा नसल्या तरी बँकांची परस्पर देवाणघेवाण असते. यासाठी या प्रकारच्या सेवापुरवठ्यावर बँकेस विशेष खर्च न येता मोबदला चांगला मिळतो. ही पद्धती व्याजमुक्त बँकेसाठी अंगीकारण्यात येऊ शकते आणि बँकेस चांगला मोबदला मिळू शकतो.

इ) जहाज, विमान, रेल्वे अगर मोटारीने मागविण्यात येणारा व्यापारी माल आणि इतर सामान ग्राहकांचे प्रतिनिधित्व करून, त्याची किंमत चुकवून ते माल वा सामान ग्राहकांपर्यंत पोहोचते करण्याची सेवा पुरवून बँकेस चांगला नफा मिळविता येतो. ही पद्धतसुद्धा रीतसर अंगीकारता येईल.

ई) आपल्या ग्राहकांचे प्रतिनिधित्व करून स्थायी संपत्तीच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार करणे वा यासंबंधी कायदेशीर कार्यवाही करून देणे, या प्रकारच्या सेवेतही बँकेस चांगला मोबदला मिळतो.

उ) काही समकालीन बँका व्यावसायिकांना नवीन व्यवसाय व नवीन उद्योगाची सुरुवात करण्यासाठी अथवा विस्तारण्यासाठी योग्य मार्गदर्शन अर्थात व्यावसायिक वा औद्योगिक मार्गदर्शन करतात. यंत्रसामग्री, कच्चा माल, बाजारपेठ व त्यातील नफा, तोटा आणि विक्री पद्धतीं वगैरेंच्या बाबतीत सहकार्य करतात. या कामासाठी बँकेत कुशल आणि अनुभवी तज्ञ असतात. या तज्ञांच्या मदतीने व्यापार वा उद्योगवृद्धी अथवा नवीन व्यवसाय उभारणीचे योग्य मार्गदर्शन दिले जाते. अशा प्रकारचे उद्योग व व्यवसायतज्ञ बँकेत वेतन तत्त्वावर सेवारत असतात. या प्रकारच्या सेवा पुरविण्याचा मुबलक मोबदला बँकेस मिळतो. हे सर्व प्रकारचे मोबदले व्याजमुक्त असून व्याजमुक्त व्यवस्थेत हे प्रकार राबविले जाऊ शकतात.

(David Rockfeller, Creative management in banking, p.p. 40-44, Mc Graw hill, New York, 1964 आणि A. James Meigs : Recent Innovations in the functions of banks. American Economic Review, May 1966)

ऊ) ग्राहकांकडून व्यापार रोख्यांची (Business Bond) खरेदी-विक्री अथवा त्यांचे भांडवल उचित व्यावसायिक संस्थांत गुंतवण्याची सेवा पुरविता येते. आपल्या ग्राहकांचे प्रतिनिधित्व करताना या भांडवल रोख्यातूनही बँकेस नफा मिळतो. तसेच त्यांचे रोखे आपल्या बँकेत सुरक्षित ठेवता येतात. या सर्व सेवांचा बँकेला भरपूर मोबदला मिळतो. ही पद्धतसुद्धा व्याजमुक्त आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे मोबदल्यावर पुरविण्यात येणाऱ्या सेवांची पूर्ण यादी येथे देणे शक्य नाही. परिस्थितीतील बदल, ग्राहकांचा कल आणि बँकांची आपली उपज व पुढाकार यामुळे नवनवीन सेवांची गरज पडते आणि यामुळे बँक व्यवसायात वृद्धी होत असते, ग्राहक संख्येत वाढ होत जाते. अर्थात व्यवसायवृद्धीसाठी बँक प्रत्येक प्रकारची सेवा उपलब्ध करून देईल. बँक आपला अनुभव, प्रतिष्ठा, सुरक्षा व्यवस्था आणि देशव्यापक व याहीपुढे सर्वव्यापक स्वरुपामुळे विविध प्रकारच्या सेवा आणि सवलती किफायतशीर मोबदल्यात पुरवून आपल्या ग्राहक, जनता, व्यावसायिकजण, शासन आणि इतर सार्वजनिक संस्थाकडून भरपूर मोबदला वसूल करू शकेल. सामान्यत: यातून मिळणारे उत्पन्न सेवापुरवठ्यावर लागणाऱ्या व्ययापेक्षा खूप जास्त असेल. विविध बँकांचे मोबदल्यांचे दर वेगवेगळे असू शकतात. परंतु बँकांच्या आपसातील स्पर्धांमुळे हे दर नियंत्रणात आणि मर्यादेत असतात. गरज पडल्यास या मोबदल्यांच्या दरांवर केंद्रीय बँकेकडून अथवा शासनाकडून नियंत्रण ठेवता येईल.

२) लाभदायक व्यवसायात भांडवल गुंतविणे

बँकेसाठी लाभ अथवा नफा मिळविण्याचे सर्वांत मोठे माध्यम म्हणजे आपले भांडवल सामुदायिक भागीदारी तत्त्वावर व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना पुरविणे होय. भागीदारी तत्त्वावर व्यवसाय करणे म्हणजे एका पक्षाने केवळ भांडवल पुरवावे आणि द्वितीय पक्षाने त्या भांडवलावर व्यवसाय करणे. यामध्ये असा करार करण्यात येतो की, या व्यवसायात मिळणाऱ्या नफ्यामध्ये दोन्ही पक्षांचा निश्चित प्रमाणात नफा असेल. भागीदारी स्वरुपाच्या व्यवसायामध्येसुद्धा भांडवलपुरवठा करणारे आणि व्यवसाय करणारे वेगवेगळ्या व्यक्ती असू शकतात. अर्थात काही व्यक्ती भांडवल पुरवितील आणि या भांडवलावर काहीजण व्यवसाय करतील, अथवा एका व्यक्तीचे भांडवल आणि इतर लोक या भांडवलावर व्यवसाय करतील अथवा काहीजण भांडवल पुरवितील आणि एकजण व्यवसाय करेल.

तोटा म्हणजे गुंतविण्यात आलेले मूळ भांडवल नष्ट होणे. यासाठी तोटा हा नेहमी गुंतविण्यात आलेल्या भांडवलावर त्यांच्या संख्येच्या प्रमाणात वाटण्यात येईल आणि हा तोटा भांडवल गुंतविणाऱ्यांना सहन करावा लागेल.

ज्या पक्षाने व्यवसायात भांडवल गुंतविले नसेल, त्यास व्यवसायात येणारा तोटा सहन करावा लागणार नाही. भांडवल गुंतविण्याचे हे दोन्ही प्रकार इस्लामी विधीनुसार आपसात खूप भिन्न असल्याने या दोन्ही प्रकारांवर वेगवेगळी चर्चा करण्यात येईल.

३) बँकेच्या भांडवलाच्या माध्यमाने भागीदारी

भांडवल वापराचे लाभदायक स्वरुप हे आहे की एखाद्या व्यावसायिक पक्षाबरोबर त्याच्या व्यवसायात भागीदार व्हावे. व्यवसायामध्ये व्यावसायिक पक्षाचे भांडवलही सामील असेल व बँकेचे भांडवलही गुंतलेले असेल. तसेच या व्यवसायात व्यवसाय करणाऱ्यांबरोबर बँकेने वेतनावर ठेवलेली कुशल माणसे श्रद्धेने काम करीत असतील. भागीदारीच्या करारात व्यवसायाचे स्वरुप, त्याच्या मर्यादा, योग्य वाटल्यास मुदत आणि नफ्याच्या वाटपाचे प्रमाण वगैरे नियम निश्चित करण्यात येतील. नुकसान झाल्यास भांडवल गुंतवणुकीच्या प्रमाणात नुकसान उचलण्यात येईल. व्यवसाय बंद होणे/करणे, व्यवसाय कालावधी पूर्ण होणे किंवा एखाद्या पक्षाकडून व्यवसाय बंद करण्याची घोषणा वगैरे परिस्थितीत हिशेब पूर्ण करून नफा वा नुकसान भांडवलाच्या प्रमाणात वाटप करण्यात येईल. मूळ भांडवल, नफा व नुकसानीसहित बँकेस आणि व्यवसाय करणाऱ्यास परत करण्यात येईल.

बँक ज्या वेळी भागीदारीचा करार करेल तेव्हा या बाबतीत प्रयत्नशील असावे की, याची वित्तीय जबाबदारी, भांडवल पुरवठ्याच्या प्रमाणात मर्यादित असावी आणि हे केवळ अशाच परिस्थितीत शक्य असेल की, भांडवल गुंतविण्यात आलेला व्यवसाय

या अटीनुसार चालविण्यात येईल की, त्यास गुंतवणूक मर्यादेपेक्षा जास्त भांडवल पुरविले जाणार नाही. अर्थातच त्याने कर्जाच्या देवाणघेवाणीत या गोष्टीचे पथ्य पाळावे अथवा या गोष्टीस बांधील असावे की, कोणत्याही वेळी सामायिक व्यवसायाच्या हमी किंवा जबाबदारीवर त्याची रोख रक्कम अथवा वर्तमान आधाराच्या किंमतीच्या एकत्रित भांडवलापेक्षा जास्त देणे नसावे. मर्यादित जबाबदारीच्या या नियमावर सविस्तर वर्णन आपण सातव्या प्रकरणात पाहूया.

या मर्यादेचे बंधन पाळण्याची गरज वा आवश्यकता या कारणास्तव आहे की, बँकेच्या भांडवलात एक मोठी रक्कम, ही भागीदारी तत्त्वावर रकमा जमा करणाऱ्यांकडून पुरविण्यात आलेली असते. यासाठी बँकव्यवस्थेस यशस्वीपणे चालविण्यासाठी या खातेदारांच्या वित्तीय जबाबदाऱ्या मर्यादित असणे अत्यावश्यक आहेत. याचे स्वरुप केवळ असे असू शकते की बँकेने कोणत्याही ठिकाणी गुंतविलेले भांडवल हे मर्यादित वित्तीय हमीसह गुंतवावे.

भागीदारी तत्त्वावर भांडवल पुरविण्याच्या स्वरुपात बँकेस या गोष्टीचे पूर्ण स्वातंत्र्य असेल की, व्यवसायातील भागीदारांच्या नफा वाटपांसाठी आपल्या नियमांनुसार नफ्याची रक्कम निश्चित करावी. मात्र नफ्यामध्ये बँक आणि भागीदारांच्या नफ्याचे प्रमाण टक्केवारी स्वरुपात निश्चित करावी. कोणत्याही प्रकारासाठी व्यावसायिक पक्षांसाठी कोणतीही निश्चित रक्कम ठरवू नये. या अटीनुसार बँकेस नफ्याच्या वाटणीस भांडवलाच्या रकमा ताब्यात ठेवण्याचे अथवा त्यांच्यापासून विभक्त होऊन नफ्याचे प्रमाण ठरविण्याचे स्वातंत्र्य आहे. त्याचबरोबर विभिन्न व्यावसायिक संस्था अथवा व्यावसायिकांसह त्यांच्या व्यवसायात भागीदारी करतेवेळी नफा वाटणीचे विविध प्रमाण निश्चित करण्याचे बँकेस पूर्ण स्वातंत्र्य आहे.

भागीदारी करार पूर्ण झाल्यावर बँकेस आपले भांडवल परत मिळाल्यास उरलेला नफा हा बँकेच्या व्यवस्थेत जमा करण्यात येईल. एखाद्या भागीदारी व्यवसायात बँकेस नुकसान उचलावे लागल्यास हे नुकसानसुद्‌धा बँकेच्या एकत्रित नफा-नुकसानीच्या गणनेत येईल. नफा व नुकसानीच्या निश्चितीकरणाच्या बाबतीत काही समस्यां निर्माण होतात. उदाहरणार्थ, एखाद्या चालू असलेल्या व्यवसायाच्या नफ्याची निश्चिती कशा प्रकारे करण्यात यावी अथवा एखाद्या चालू व्यवसायात भागीदारी स्वीकारण्याचे किंवा विभक्त होण्याचे स्वरुप कसे असावे, या समस्यावर नंतर चर्चा करण्यात येईल, कारण बँकेने भागीदारी तत्त्वावर भांडवल गुंतविल्यासही समस्या निर्माण होतातच.

ज्या व्यवसायात बँकेने भागीदारी केलेली असेल, त्यात जर व्यावसायिकाने बँकेशिवाय इतर व्यावसायिक पक्षांकडूनही भागीदारी तत्त्वावर भांडवल मिळवून गुंतविले असेल, तर नफा-नुकसानीचे प्रमाण कसे ठरविण्यात यावे, या बाबतीत नंतर चर्चा करुया. एवढे मात्र स्पष्ट करणे आवश्यक आहे की सामायिक व्यवसायातून दीर्घ

मुदतीची कर्जे घेता कामा नये. कर्जाची रक्कम अथवा कर्ज घेऊन उभारलेले भांडवल व्यवसायात गुंतविल्याने व्यवसायाची वित्तीय जबाबदारी वाढत असते, तसेच वर स्पष्ट केल्याप्रमाणे बँकेच्या भागीदारीच्या माध्यमाने करण्यात येणाऱ्या व्यवसायात अशा प्रकारे चालविण्यात येणे आवश्यक आहे की, भागीदारी तत्त्वावर असलेल्या जबाबदारांनी भांडवलाच्या मर्यादेच्या आंत राहावे. यामध्ये अल्पमुदतीचे कर्ज घेणाऱ्यांच्या प्रकरणांबाबतीत आपण वेगळी चर्चा करूया.

इस्लामी विधीनुसार यामध्ये काहीच गैर नाही की बँकेने भागीदारी तत्त्वावर भांडवल गुंतवणूक करावी आणि स्वत:हून व्यवसाय चालविण्यात कसलेच श्रम घेऊ नये, मात्र बँकेस या गोष्टीचा विधीवृत्त अधिकार असेल की बँक या व्यवसायात भांडवलाबरोबरच योग्य वाटेल तेव्हा श्रमपुरवठादेखील करेल. अर्थातच बँक भांडवल पुरवून केवळ देखरेखीव्यतिरिक्त आपल्या कर्मचाऱ्यांचा वापरसुद्धा व्यवसायात करेल. आपल्या दृष्टिकोनात हे एक कार्यरहित आणि न पटणारे स्वरुप आहे, कारण व्यावसायिक पक्ष भागीदारी तत्त्वावर भांडवल मिळविण्यासाठी पक्ष भागीदारी तत्त्वांवर भांडवल मिळविण्याच्या तुलनेत असे स्वरुप पसंत करणार नाही. राहिला प्रश्न नफ्याची वाटणी आणि नुकसानीची जबाबदारी घेण्याचा तर या बाबतीत भागीदारी तत्वातील नियमांत कोणताही फरक नाही. ज्या परिस्थितीत नुकसान होईल, त्या परिस्थितीत भांडवलात त्याची वाटणी निश्चित प्रमाणानुसार होईल. मग हा व्यवसाय भागीदारी तत्त्वावर असो अथवा बटाई तत्वावर असो. नफ्याच्या वाटणीचे प्रमाण बँक आणि व्यावसायिक पक्षाच्या आपसातील राजीमर्जीने निश्चित झालेल्या प्रमाणानुसार होईल. म्हणून नेहमी अशा प्रकारे निश्चित होईल की बटाई आणि भागिदारीचे संभाव्य स्वरुप या दोन्ही प्रकारांत एकसारखेच असेल. अर्थातच जर भागीदारी तत्त्वावर भांडवल पुरवठा करून बँकेने व्यवसाय चालविण्यात कार्यात्मक स्वरुपात भाग न घेण्याचा निर्णय घेतला तर हे त्याच्या नफ्याचा वाटा हा सामायिक भांडवलात तिने (बँकेने) पुरवठा केलेल्या भांडवलाच्या प्रमाणानुसार निश्चित होणार नसून त्यापेक्षाही कमी संख्येत बँकेस नफा मिळेल की जेणेकरून व्यावसायिक पक्षांना बँकेच्या भांडवलामार्फत नफा मिळविण्याच्या स्वरुपात लाभदायक व्यवसाय करण्याचे फळ मिळावे. या तत्त्वांवर बँक कार्य करण्यास तयार जर नसेल तर कोणताच व्यावसायिक पक्ष बँकेबरोबर व्यवसाय करण्यास तयार नसेल. उलट ते बटाई तत्त्वावरील व्यवसायात प्राधान्य देईल की, ज्यामध्ये बँकेने पुरविलेल्या भांडवलावर मिळणाऱ्या नफ्यामधून त्याचा वाटा स्पष्टपणे निश्चित होत असतो.

ही गोष्ट एका उदाहरणावरून स्पष्ट करता येईल. समजा एक व्यावसायिक एक लाखाचे भांडवल स्वत: गुंतवून एक लाख रुपये बँकेकडून मिळवू इच्छितो. अशा प्रकारात पहिले स्वरुप असे की बँकेने त्याच्याबरोबर भागीदारीचा करार करून व्यवसाय

चालविण्यातसुद्‌धा कार्यात्मकरित्या भाग घ्यावा. गृहीत धरा की, यामध्ये दोन्ही पक्षांनी नफ्यामध्ये समान प्रमाण घेण्याचा अर्थात निम्मा निम्मा नफा घेण्याचा करार झाला. या धंद्यात २० हजार रु. नफा झाल्यास दोन्ही पक्षांना प्रत्येकी १० हजार रुपये नफा मिळेल.

दुसरा प्रकार असा की बँकेने व्यावसायिकाबरोबर बटाईचा करार करावा व त्यामध्ये हे निश्चित करावे की बँकेने पुरवठा केलेल्या भांडवलावर होणाऱ्या व्यवसायातून मिळणाऱ्या नफ्यामध्ये बँकेचा निम्मा अर्थात एक द्वितीयांश भाग असेल. अर्थात २० हजार रुपये नफा झाल्यास बँकेस पाच हजार आणि व्यावसायिकास १५ हजार रुपये मिळतील. अर्थात व्यावसायिकास १५ हजार रुपयांपैकी १० हजार रुपये त्याच्या स्वभांडवलाचे आणि पाच हजार रुपये बँकेकडून मिळालेल्या भांडवलदार केलेल्या यशस्वी व्यापाराचे फळ होय.

तिसरा प्रकार असा असेल की बँकेने एक लाख रुपये भांडवल सामायिक भागीदारी तत्त्वावर लावावे. परंतु असा करार करावा की बँकेचा कार्यात्मक सहभाग मुळीच नसेल. अर्थात बँकेचे कर्मचारी व्यवसाय करण्यात कार्यशील नसतील. अशा प्रकारामध्ये व्यावसायिक पक्ष हा केवळ अशा नियम वा तत्त्वावरच सहमत होऊ शकतो की ज्या वेळी बँक सामायिक व्यवसायाचा केवळ एक चतुर्थांश नफा घेण्यास तयार असेल. व्यवसायात २० हजार रुपये नफा झाल्यास ठरलेल्या अटीनुसार बँकेस पाच हजार आणि व्यावसायिक पक्षास १५ हजार रुपये मिळतील. जर बँकेने एक तृतीयांश एवढ्या नफ्याची मागणी केली, तर व्यावसायिक पक्ष हा उपरोल्लेखित भागीदारी तत्त्वाच्या स्वरुपालाच प्राधान्य देईल.

जर उपरोल्लेखित बटाई तत्त्वाच्या करारामध्ये बँकेने नफ्याचे इतर दुसरे प्रमाण निश्चित केले असेल तर अशाच प्रकारे तिसऱ्या स्वरुपातही सुधारणा करता येईल. परंतु ही गोष्ट एकदम स्पष्ट आहे की अशा वेळी दुसऱ्या आणि तिसऱ्या स्वरुपात वस्तुतः काहीच फरक राहणार नाही. तसेच यावर वेगवेगळी चर्चादेखील निरर्थक ठरेल.

जर बँकेस व्यवसाय चालविण्यात कार्यात्मक भाग घ्यायचा असेल तर बँक आपले भांडवल भागीदारी तत्त्वावरील व्यवसाय प्रकारात लावील आणि भाग घ्यायचा नसेल तर सरळसरळ नफ्यातील भागीदारी तत्त्वावरील व्यवसाय प्रकारात लावील, हे मात्र निश्चित.

आधुनिक बँकेच्या इतिहासावरुन स्पष्ट होते की बहुतेक देशांमध्ये सामान्य वा सार्वजनिक व्यावसायिक बँकांनी औद्योगिक, वित्तीय आणि कृषी व्यवसायावर भांडवल लावण्याची कधी तसदी घेतली नाही. या प्रकारांपासून त्या दहा पावले स्वतःस दूर ठेवित आल्या आहेत. ही बाब वेगळी आहे की, काही मोजक्या देशांत काही बँकांचा याकडे कल आहे (खरे पाहता या मोजक्या ठिकाणच्या बँकांनी ही पद्धती अवलंबिल्याने

युरोपच्या औद्योगिक प्रगतीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. फ्रान्समध्ये काही बँकांचे अजूनही असे व्यवहार चालतात. स्पेनमध्येसुद्‌धा हीच पद्धत प्रचलित असून बँकेचे प्रतिनिधी स्वत:हून व्यावसायिक संस्थांच्या व्यवसायात सहभागी असतात.)

(संदर्भ : R.S. Sayers, Banking in western Europen; Page 365, Oxford - 1962)

वस्तुत: ही गोष्ट जास्त योग्य वाटते की, सामान्य व्यावसायिक बँकांनी केवळ भागीदारी तत्त्वावर भांडवलगुंतवणूक पद्धतीचा अवलंब करावा आणि काही विशेष बँकांनी आपल्या व्यवसायाच्या विशेष पद्‌धतीची काळजी घ्यावी. उदाहरणार्थ, काही खातेदारांनी अमर्याद वित्तीय जबाबदारीसह बँकेत रकमा जमा केल्यात, तेव्हा बँका भागीदारी करतेवेळेस सामायिक- व्यवसायास आपल्या भांडवलाच्या मर्यादेत राहण्याच्या अटींतून मुक्त करू शकतात.

या पुस्तकाचा उद्देश हा केवळ व्याजमुक्त बँक व्यवस्थेची एक सर्वसामान्य, सर्वमान्य, कार्यपात्र आणि बुद्धीला पटणारी रुपरेखा सादर करणे हाच आहे. त्यासाठी आपण केवळ याच रुपरेखाविषयी चर्चा करून पुढील पानांवर बटाई तत्त्वावरील व्यवसायात भांडवल लावण्याच्या बाबतीत सविस्तर आणि मुद्देसूद चर्चा करूया. कारण आमच्या दृष्टिकोनात सामान्य व्याजमुक्त बँकासाठी भांडवलाच्या लाभदायक वापराच्या तुलनेत सुरक्षित स्वरूप हेच आहे की व्यावसायिक पक्षांना बटाई तत्त्वावर भांडवल पुरवावे. मग व्यवसायात बँकेचा श्रमसहभाग असो अथवा नसो. उपरोक्त चर्चेचा फायदा असा आहे की सामान्य प्रकारच्या बँकासुद्‌धा भागीदारी तत्त्वांवर भांडवल गुंतवणूक पद्धतींचा अवलंब करू शकतात. मात्र अशाप्रसंगी हे आवश्यक आहे की, त्यांनी एकत्रित वा सामायिक व्यवसायांना काही मर्यादा लावाव्यात. अर्थात यामध्ये दीर्घ मुदतींचे कर्ज भांडवलाच्या मोठ्या प्रमाणात वा मोठ्या संख्येत लावू नये.

४) बँक-भांडवलाच्या माध्यमाने बटाई व्यवसाय

बँकेकडून पुरविण्यात येणाऱ्या लाभदायक व्यवसायाचे दुसरे स्वरुप म्हणजे व्यवसाय करणाऱ्या पक्षास अथवा व्यक्तीस अगर व्यावसायिक संस्थांना बटाई तत्त्वावर भांडवल पुरविणे होय. या तत्त्वावरील व्यवसायात नुकसान झाले असल्यास हे नुकसान भांडवलास होईल आणि हे नुकसान बँकेस उचलावे लागेल. त्याचप्रमाणे व्यवसायात नफा झाल्यास करारानुसार झालेल्या निश्चित प्रमाणानुसार नफ्याची वाटणी होईल.

बटाई तत्त्वावर भांडवल पुरविण्याच्या बाबतीत बँक व्यवसायाच्या दैनंदिन व्यवहारात कोणतीच लुडबुड करणार नाही. मात्र करार करतेवेळेस व्यावसायिक पक्षाच्या राजीमर्जीने व्यवसायाचे स्वरुप, त्याची विस्तारमर्यादा आणि व्यावसायिक पक्षाच्या

कार्यस्वरुपाच्या बाबतीत काही अटी व नियम निश्चित करण्यात येतील. उदाहरणार्थ, करारामध्ये जर हे निश्चित करण्यात आले असेल की, बँकेकडून घेण्यात आलेले भांडवल हे निश्चित केलेल्या व्यापार किंवा उद्योगातच गुंतविण्यात येईल, तेव्हा व्यावसायिक पक्षास हे भांडवल इतर दुसऱ्या ठिकाणी व्यवसाय किंवा उद्योगात लावता येणार नाही, किंवा जर व्यवसाय करारात ही गोष्ट निश्चित करण्यात आली असेल की व्यावसायिक पक्षाने एखाद्या दुसऱ्या व्यावसायिक पक्षाबरोबर भागीदारी किंवा बटाई तत्त्वावर करार करुन याच व्यवसायात गुंतविण्यासाठी आणखीन भांडवल मिळविल्यास त्याच्या अटींचे पालनही आवश्यक ठरेल. त्यावर अशीसुद्धा अट लावण्यात येऊ शकते की, व्यावसायिक पक्षाने उधार माल खरेदी करू नये. अशा प्रकारचा करारसुद्धा योग्य ठरेल की व्यावसायिक पक्षावर कोणतेही निर्बंध लावण्यात येऊ नये आणि त्यास व्यवसायाचे स्वरुप व विस्तार, इतर ठिकाणाहून भांडवल मिळवून व्यवसायात लावण्यासाठी, इतर पक्षाशी भागीदारी अथवा बटाई तत्त्वावर करार करण्यासाठी वा इतर बाबतीत व्यावसायिक पक्षास स्वातंत्र्य देण्यात यावे. व्यावसायिक नियमांत कोणतीच दखल न देण्याच्या पद्धतींचा स्वीकार न करूनसुद्धा या गोष्टीवर पूर्णपणे निगराणी ठेवण्यात येईल की, व्यावसायिक पक्ष हा बँकेकडून घेतलेल्या भांडवल राशीचा अपव्यय अथवा गैरवापर तर करत नाही? बँकेला व्यवसायाच्या हिशोबावर लक्ष ठेवण्याचा पूर्ण अधिकार असेल. परंतु व्यवसायाचे गुपित पाळण्याची आणि व्यवसायाचे हीत जोपासण्याची जबाबदारी देखील बँकेवर असेल. व्यवहारातील पारदर्शकता व प्रामाणिकता टिकविण्यासाठी आवश्यक वाटल्यास व्यवसायावरील देखरेखीच्या बाबतीत सविस्तर बाबी व्यवसायकरारामध्ये सामील करण्यात येतील. अनागोंदी आणि अविवेकतापूर्ण व्यवसायाच्या या स्वरुपाचे स्पष्टीकरणसुद्धा करारात सामील करण्यात येऊ शकते की ज्यामुळे बँकेस व्यवसाय करार संपुष्टात आणण्याचा पूर्ण अधिकार असतो. कराराचे जे नियम संपूर्ण बँकासाठीच महत्त्वाचे असतात, उदाहरणार्थ, व्यवसायाच्या हिशोबांची तपासणी, त्यावरील देखरेख वगैरे कामे केंद्रीय बँकेकडून नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्यांमार्फत होईल याची व्यवस्था करणे योग्य ठरेल. करारामध्ये अनागोंदीपणा आणि अविवेकी व्यवहारावर अंकुश ठेवण्यासाठीसुद्धा काही अशा नियमांचा समावेश असावा की ज्या नियमांनुसार बँकेस करार संपुष्टात आणण्याचा अधिकार असावा. जर व्यवसाय करार एका निश्चित मुदतीसाठीच करण्यात आला असेल आणि व्यावसायिक पक्षाच्या गलथान कारभारामुळे बँकेवर मुदतीपूर्वीच करार संपुष्टात आणण्याची वेळ आली असेल तर त्यास ठरलेल्या नियमांनुसार ही बाब मान्य करावी लागेल. संबंधित अधिकारी अथवा इतर निःपक्ष ट्रिब्युनलला समाधानकारक उत्तर द्यावे की, व्यावसायिक पक्षाने अनागोंदी आणि

विवेकशून्यपणे व्यवसाय केला आहे. या अधिकाऱ्याने अथवा ट्रिब्युनलने व्यावसायिक पक्षाच्या अडचणी ऐकून घेतल्यानंतर असा निर्णय द्यावा की, दोन्ही पक्षांना हा निर्णय शक्यतो मान्य व्हावा. कायदेशीर सुरक्षिततेच्या माध्यमाने या बाबतीत प्रयत्न करण्यात येतील की, बँकेस व्यावसायिक पक्षाकडून बँकेने पुरविलेले भांडवल निश्चित झालेल्या नफ्यासहित ठरलेल्या वेळेवर परत मिळावे. व्यावसायिक पक्षास व्यवसाय-कर्ज देण्यासाठी हमीदार अथवा जामीनदारांची मागणीही बँक करू शकते. जामिनाच्या स्वरुपात ग्राहकांच्या ठेवी, व्यावसायिक पक्षांच्या जमा असलेल्या रकमा, जंगम मालमत्ता व त्याचप्रमाणे बँका आणि प्रतिष्ठित व्यवसायसंस्थांचे लेखी जामीनपत्र स्वीकारले जाऊ शकतात. ही हमी या गोष्टीची असेल की, भांडवल मिळविणाऱ्याने प्रामाणिकपणे बँकेच्या अटी व नियमांचे पालन करावे आणि ठरलेल्या करारानुसार दिलेल्या भांडवलाचा वापर करावा. यामध्ये या गोष्टीचा जामीन देण्यात येणार नाही की बँकेने दिलेले पूर्ण भांडवल परत मिळेल अथवा यापासून होणाऱ्या व्यवसायात नफा मिळेलच.

आमच्या मते बँक आणि व्यावसायिक पक्षांदरम्यान होणाऱ्या बटाईकराराचे योग्य स्वरुप (पुढील पानांवर याचे स्पष्टीकरण देण्यात येईलच) म्हणजे हे असेल की, व्यावसायिक पक्षाला बटाई तत्त्वावर भांडवलदारांकडून भांडवल मिळवून याच व्यवसायात गुंतविण्याची, आपले स्वभांडवल गुंतविण्याची, व्यवसायाच्या एकत्रित भांडवलाच्या तत्त्वांच्या मर्यादेच्या आत राहून उधार माल खरेदी करण्याची, उधारीत माल विकण्याची आणि अल्प मुदतीसाठी कर्जावर भांडवल उभारून गुंतविण्याची परवानगी असावी. यासाठी व्यवसायाची रुपरेखा निश्चित करण्यात यावी. परंतु इतर बाबतीत व्यावसायिक पक्षास स्वातंत्र्य असावे. त्यास एखाद्या दुसऱ्या पक्षाशी भागीदारी तत्त्वावर व्यवसाय करावयाचा असेल तर, ही गोष्ट कराराच्या वेळीच स्पष्ट करण्यात यावी आणि यावर बँकेचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात यावे.

व्यापार, उद्योग आणि कृषी व्यवसायात मोठे भांडवल अथवा मोठ्या प्रमाणात पैसा कायमस्वरुपी लावण्यात येतो. परंतु प्रत्येक व्यवसायात अस्थायी स्वरुपात अधिक भांडवल मिळविण्याची गरज पडतेच. उदाहरणार्थ, कारखान्यात तयार होणाऱ्या वस्तु तयार आहेत, किंवा शेतीचा माल कापणीसाठी तयार आहे. परंतु ते बाजारात विकून रोख पैसा मिळविण्यासाठी काही अवकाश बाकी असून या वेळेत माल बाजारात पोहोचण्यासाठी मजूर लावण्यासाठी आणि माल पोहोचविण्यासाठी पैशांची गरज पड़तेच. तसेच काही कच्च्या मालाचा पैसा चुकविणे बाकी असतो. अशा प्रकारच्या गरजा पूर्ण करण्यासाठी भागीदारी अथवा बटाई तत्त्वावर अस्थायी स्वरुपात कर्ज उचलून भांडवल उभे करावे लागेल आणि हे व्यवसायासाठी लाभदायक आणि गरजेचे आहे. हे कर्ज अस्थायी (Short term) स्वरुपाचे असेल. मालाची बाजारामध्ये विक्री होताच या

कर्जाची परतफेड करण्यात येईल. या कर्जाच्या जामिनासाठी तयार झालेला माल अथवा कारखान्यात तयार झालेली निर्मिती असेल. अशा प्रकारच्या कर्जफेडीचे ठोस माध्यम आणि जामीन वा हमी असलेल्या कर्जांना आपोआप फिटणारे कर्ज (अर्थात Self Liquidating Loans) म्हटले जाते. आधुनिक बँका अशाच स्वरुपाचे कर्ज देत आहेत. यासाठी हे योग्य ठरेल की बँकेने व्यावसायिक पक्षाबरोबर बटाई अथवा भागीदारीचा करार करते वेळेसच ही बाब स्पष्ट करण्यात यावी की, अशा प्रकारच्या गरजा पूर्ण करण्यासाठी असे अल्प मुदतीचे कर्ज (Short Term) घेण्याची परवानगी असेल. आता एक प्रश्न मात्र असा निर्माण होतो की, अशा प्रकारचे कर्ज मुळात व्याजरहित असल्याने ही एक समस्याच आहे. परंतु याचेदेखील अतिशय समाधानकारक उत्तर देण्यात येईलच.

बटाई व्यवसायात बटाईतदार असलेल्या व्यावसायिक पक्षास दीर्घ मुदतीचे कर्ज घेण्याची परवानगी नसेल. कारण अशा दीर्घ मुदतीच्या कर्जांमुळे व्यावसायाच्या वित्तीय जबाबदाऱ्यांमध्ये वाढ होईल व त्याचप्रमाणे या जबाबदाऱ्या भांडवल पुरविणाऱ्या पक्षाच्या ऐपतीच्या आणि अवाक्याच्या बाहेर होतील. व्यावसायिक पक्षास बँकेच्या वित्तीय जबाबदाऱ्यांत वाढ करण्याचा अधिकार नसेल. व्यावसायिक पक्षाला आपल्या स्व: जबाबदारीवर कर्ज घेऊन व्यवसायात गुंतवण्याचे असल्यास याचे स्वरुप त्याच्या वैयक्तिक भांडवलाचे असेल. त्यासाठी या भांडवलाच्या परतफेडीची पूर्णत: जबाबदारीसुद्धा त्याचीच स्वत:ची असेल.

आता आपण पाहूया की, उधार स्वरुपात घेण्यात येणारा माल व्यवसायाच्या मर्यादाकक्षेत असावयाचा अर्थ काय? तर याबाबतीत असे सांगता येईल की, कोणत्याही प्रसंगी उधार मालाची कर्जाऊ रक्कम ही पूर्ण व्यवसायाच्या भांडवलापेक्षा जास्त नसावी. ही मर्यादा पाळणे आवश्यक आहे. अन्यथा व्यवसाय संकटात येईल, या मर्यादांच्या आत उधार माल घेण्याबाबतीत स्पष्टीकरण आम्ही पुढे 'भागीदारी आणि बटाईत व्यवसायाचे इस्लामी नियम' या प्रकरणात करणार आहोतच. तयार झालेला माल उधारीत विकण्याची परवानगीसुद्धा करार पत्रानुसार व्यावसायायिक पक्षाला असेल. याचे स्पष्टीकरण करण्याची गरज नाही. कारण व्यावसायिक पक्षाचे हितसुद्धा व्यवसायातील यश आणि मिळणाऱ्या नफ्याशीच संबंधित असल्याने अशी अपेक्षा करता येईल की, या बाबतीत प्रत्येक काम पूर्ण दक्षता आणि जबाबदारीने करण्यात येईल आणि, तेही विशेषत: अशा स्वरुपात की, ज्यावेळी या व्यवसायात त्याचे स्वत:चे भांडवल गुंतलेले असेल.

कोणतीही बँक व्यावसायिक पक्षाकडून, ह्या बँकेने गुंतविलेल्या भांडवलावरील व्यवसायातून मिळणाऱ्या नफ्याचा एक निश्चित दर शेकडा राशीनुसार वाटा व्यावसायिक पक्षाला देईल. नफ्याच्या विभागणीचे हे प्रमाण बँक आणि व्यावसायिक

पक्षाच्या आपसातील राजीमर्जीनुसार झालेल्या करारपत्रानुसार अमलात येईल. एकच बँक हे विविध व्यावसायिक पक्षांबरोबर नफ्यातील भागीदारीचे विविध प्रमाणसुद्धा निश्चित करु शकते. ही प्रणालीदेखील अवलंबण्यात येऊ शकते की, बँकेने एका सार्वजनिक आवाहनाच्या माध्यमाने किंवा सार्वजनिक घोषणा करून हे सुचित करावे की, व्यावसायिक पक्षांना कोणत्या प्रमाणात अथवा किती टक्केवारीच्या प्रमाणाच्या मोबदल्यात कर्जपुरवठा करण्यात येईल किंवा व्यवसायात होणाऱ्या नफ्यात बँकेचा किती टक्के वाटा असेल आणि मग याच निश्चित झालेल्या प्रमाणानुसार सर्व व्यावसायिक पक्षांशी करार करण्यात यावा. या पुस्तकामध्ये पुढे देण्यात आलेली उदाहरणे ही मुळात असे गृहीत धरून देण्यात आली आहेत की बँकेने बटाई तत्त्वांवर भांडवल पुरवितेवेळेस व्यवसायातील नफ्यामध्ये ५० टक्के आपला वाटा आणि ५० टक्के व्यावसायिक पक्षाचा वाटा निश्चित केलेला आहे. परंतु हे लक्षात ठेवावे की हे केवळ उदाहरण आहे. खरे पाहता बँक आणि व्यावसायिक पक्षांदरम्यान नफ्यातील वाटणीचे प्रमाण कितीही असू शकते. विविध बँका विभिन्न प्रमाण निश्चित करू शकतात. विविध देश अथवा विविध क्षेत्रांच्या बँकांचे नफ्यातील वाट्याचे प्रमाण हे विभिन्न असू शकते.

५) बँक आणि व्यावसायिक पक्षांदरम्यान नफ्याची वाटणी

या ठिकाणी विविध उदाहरणांनी नफा वाटणीच्या नियमांचे स्पष्टीकरण करण्यात येत आहे. याची विभिन्न स्वरुपे आहेत. त्यापैकी काही या ठिकाणी देत आहोत.

पहिले स्वरुप

व्यावसायिक हा केवळ बँकेच्याच भांडवलावर व्यवसाय करीत असेल आणि या व्यवसायात त्याचे स्वत:चे कोणतेच भांडवल गुंतलेले नसेल.

दुसरे स्वरुप

व्यावसायिकाने बँकेकडून भांडवल घेऊन स्वत:चेही भांडवल व्यवसायात गुंतविलेले असेल.

तिसरे स्वरुप

व्यावसायिकाने बँकेकडून घेतलेल्या भांडवलाव्यतिरिक्त स्व:जबाबदारीवर इतरांकडूनही कर्ज घेऊन व्यवसाय केलेला असेल.

चौथे स्वरुप

व्यावसायिकाने बँकेकडून घेतलेल्या भांडवलाव्यतिरिक्त आणखीन एखाद्या भांडवलदाराकडून बटाई तत्त्वावर भांडवल मिळवून याच व्यवसायात गुंतविले असेल.

पाचवे स्वरुप

व्यावसायिकाने ज्या व्यवसायात बँकेकडून बटाई तत्त्वावर भांडवल काढून गुंतविलेले असेल, तोच व्यवसाय व्यावसायिक हा आणखीन एखाद्या व्यावसायिक पक्षाबरोबर भागीदारी तत्त्वावर करीत असेल आणि या व्यवसायात बँकेने पुरविलेल्या भांडवलाव्यतिरिक्त त्याच्या भागीदार पक्षाचे भांडवल देखील गुंतलेले असेल.

सहावे स्वरुप

उपरोल्लेखित सर्वच स्वरुपे एकत्रितपणे असावीत, अर्थात ज्या व्यवसायात बँकेचे भांडवल गुंतविण्यात येत असेल, त्यामध्ये व्यावसायिक पक्षाचे स्वतःचे भांडवल, त्यांच्या भागीदाराचे भांडवल आणि एखाद्या इतर भांडवलदाराचे बटाई तत्त्वावर घेण्यात आलेले भांडवलसुद्धा गुंतविण्यात आले असेल.

आता आपण या सर्व स्वरुपांतील नफ्याची वाटणी आणि तोटा उचलण्याची जबाबदारी संक्षिप्तपणे पाहूया. या ठिकाणी हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, या सर्व प्रकरणांत बँकेकडून मिळविलेले भांडवल हे भागीदारी तत्त्वांवर घेतलेले नसून बटाई तत्त्वावर घेण्यात आलेले आहे. हे गृहीत धरण्यात आलेले आहे की, व्यवसायासाठी बँकेकडून एक लाख रुपये व्यवसायातून मिळणाऱ्या नफ्याच्या ५० टक्के वाट्यावर घेण्याच्या अटीवर घेण्यात आलेले आहे.

१) पहिल्या प्रकारात व्यवसायात जर दहा हजार रुपये नफा होत असेल तर बँकेला आणि व्यावसायिक पक्षाला अनुक्रमे पाच-पाच हजार रुपयेप्रमाणे वाटा मिळेल. शिवाय बँकेला पाच हजार रुपयांशिवाय त्याने दिलेले एक लाख रुपयेसुद्धा परत मिळतील. त्याचप्रमाणे या व्यवसायात दहा हजार रुपये तोटा झाल्यास भांडवलाची एका लाखाची रक्कम ९० हजार रुपये होईल. म्हणून बँकेस ९० हजार रुपयेच परत मिळतील. दहा हजार रुपयांचा तोटा बँकेस सहन करावा लागेल. या तोट्याची जबाबदारी व्यावसायिक पक्षावर नसेल. जर बँक आणि व्यावसायिक पक्षामध्ये नफा वाटणीचे प्रमाण निम्म्याऐवजी एखादे दुसरे निश्चित झाले (उदाहरणार्थ, ४० टक्के व्यावसायिक पक्षाचा वाटा आणि ६० टक्के बँकेचा वाटा) तर नफ्याची वाटणी निश्चित झालेल्या करारानुसार करण्यात येईल. परंतु तोटा झाल्यास हा संपूर्ण तोटा बँकेस सहन करावा लागेल. अर्थात 'मुज़ारिबत' (बटाई तत्त्वावर) करण्यात येणाऱ्या व्यवसायात नफ्यामध्ये दोन्ही पक्ष सहभागी असतील. परंतु तोटा झाल्यास हा संपूर्ण तोटा केवळ भांडवल पुरविणाऱ्यालाच उचलावा लागेल. मग नफ्यामध्ये कोणतेही प्रमाण का निश्चित होत नाही.

२) दुसऱ्या प्रकारामध्ये व्यावसायिक पक्ष हा बँकेकडून एक लाख रुपये घेऊन स्वतःचे सुद्धा एक लाख रुपये व्यवसायात गुंतवितो. अर्थात व्यवसायात बँकेचे आणि व्यावसायिकाचे प्रत्येकी एक-एक लाख रुपये गुंतविण्यात येते. अशा प्रकारे हे एकत्रित भांडवल दोन लाख रुपये असते. समजा, या व्यवसायात २० हजार रुपये नफा झाला तर हा नफा सुरुवातीस एकत्रित भांडवलाच्या प्रमाणावर विभागला जाईल. अर्थात दोन्ही पक्षांना दहा हजार प्रत्येकी नफा विभागला जाईल. यानंतर बँकेला मिळालेल्या दहा हजारच्या नफ्याची विभागणी होईल आणि त्यातील पाच हजार रुपये व्यावसायिक पक्षाला मिळतील. अशा प्रकारे व्यावसायिकास एकूण १५ हजार रुपये आणि बँकेस पाच हजार रुपये मिळतील (कारण व्यवसायात निम्मे भांडवल अर्थात एक लाख रुपये व्यावसायिकाने लावलेले आहे.)

या व्यावसायात जर २० हजार रुपये तोटा झाला तर दहा हजार रुपयांचे नुकसान बँकेस सहन करावे लागेल आणि दहा हजार व्यावसायिकास सहन करावे लागेल. कारण तोटा म्हणजेच भांडवलामध्ये होणारी घट आहे आणि ही घट दोन्ही पक्षांच्या लावण्यात आलेल्या भांडवलाच्या प्रमाणानुसार होईल.

३) तिसऱ्या प्रकारामध्ये व्यवसायात गुंतविण्यात येणाऱ्या एकूण भांडवलापैकी बँकेचे एक लाख रुपये आणि इतर भांडवल हे व्यावसायिकाने स्वतःच्या जबाबदारीवर इतरांकडून एक लाख रुपये कर्ज घेऊन लावलेले असते. अर्थात... भांडवलाची एकूण रक्कम दोन लाख झाली. म्हणजेच, भांडवलाची रक्कम दोन लाख रुपये त्याने इतरांकडून घेतलेले कर्ज एक लाख रुपये + बँकेचे एक लाख रुपये असे प्रमाण असेल. व्यावसायिक दृष्टिकोनानुसार बँकेचे एक लाख रुपये सोडून बाकीचे एक लाख रुपये हे त्याचे स्वःभांडवल असेल. तसेच नफा व तोटा दुसऱ्या प्रकारानुसार वाटप होईल. व्यवसायात नफा मिळो की तोटा येवो, कर्जाच्या परतफेडीची जबाबदारी व्यावसायिक पक्षाची असेल. जर व्यवसायात २० हजार रुपयांचा नफा होऊन भांडवल वाढून दोन लाख २० हजार रुपये झाले तर अशा वेळी बँकेत पाच हजार नफा आणि पुरविलेले भांडवल एक लाख रुपये, असे एकूण एक लाख पाच हजार रुपये मिळतील आणि उरलेले १५ हजार व्यावसायिकास मिळतील. शिवाय एक लाख रुपये कर्ज परतफेडीत जातील. व्यवसायात तोटा झाला अर्थात दोन लाखाच्या भांडवलात घट होऊन (२० हजारांचा तोटा होऊन) एक लाख ८० हजार झाले तर बँकेस ९० हजार परत मिळतील, तसेच उरलेल्या ९० हजारात व्यावसायिक आपल्या खिशातून दहा हजार रुपये टाकून कर्ज देणाऱ्याचे एक लाख रुपये परत करेल. कर्ज परत करण्याची जबाबदारी व्यावसायिकावरच पूर्णपणे असेल. बँकेवर याची काहीच जबाबदारी नसणार.

४) चौथा प्रकार

'बँकेचे एक लाख रु. + व्यावसायिकाचे एक लाख रु. + व्यावसायिकाने इतरांकडून बटाई तत्त्वावर घेतलेले एक लाख रु. = तीन लाख रुपये' भांडवल व्यवसायात लावण्यात आले. समजा, दुसऱ्यांकडून बटाई तत्त्वावर घेतलेल्या पक्षाशीसुद्धा निम्मा नफा घेण्याच्या करारावर भांडवल (एक लाख रु.) घेण्यात आले. अर्थात होणाऱ्या नफ्यात व्यावसायिक आणि बटाईतदाराचा निम्मा वाटा असेल.

या व्यवसायात ३० हजारांचा नफा झाला तर यापैकी २० हजार रु. व्यावसायिक पक्षास मिळतील आणि बटाईतदारास व बँकेस प्रत्येकी पाच हजार रु. मिळतील. शिवाय बँक आणि बटाईतदारास त्याचे मूळ भांडवलसुद्धा मिळेल. नफा विभागणीचा नियम या प्रकारातसुद्धा असाच असेल की एकूण नफ्यास एकूण भांडवलाच्या प्रमाणानुसार विभागण्यात यावे. नंतर बँक आणि बटाईतदारांच्या नफ्यास प्रत्येकी दोन भागांत वाटण्यात यावे आणि मग बँक आणि बटाईतदाराच्या भांडवलावर मिळणाऱ्या एकत्रित नफ्यामध्ये व्यावसायिकाचा वाटा निश्चित केलेल्या करारानुसार त्यास मिळेल. जर 'मुज़ारिबत' (बटाई प्रकार) मध्ये नफ्याच्या समान विभागणीऐवजी दुसरे प्रमाण निश्चित झाले असेल तर त्या प्रमाणानुसार वाटा मिळेल.

या व्यवसायात समजा ३० हजार रु. तोटा झाला तर –

हा तोटा तिन्ही भांडवलांच्या प्रमाणानुसार वाटण्यात येईल. अर्थात बँक, व्यावसायिक पक्ष आणि दुसऱ्या भांडवल पुरविणाऱ्या पक्षास आपापल्या भांडवलात प्रत्येकी १५ हजार रुपयांचा तोटा सहन करावा लागेल आणि प्रत्येकास ८५ हजार रुपयेच मिळतील. अर्थात व्यावसायिक पक्षास कोणताच तोटा सहन करावा लागणार नाही.

५) पाचव्या प्रकारात

व्यावसायिक पक्ष बँकेकडून एक लाख रुपये घेतो. तसेच बँकेच्या परवानगीने हे एक लाखाचे भांडवल दुसऱ्या व्यावसायिकाबरोबर व्यवसायात लावतो. हा व्यवसाय केवळ दोन लाखांच्या भांडवलावर करण्यात येतो. दोन्ही व्यावसायिक पक्षांदरम्यान असा करार होतो की व्यवसायातील नफ्यामध्ये दोघेजण निम्म्या भागाचे वाटेकरी ठरतील. बँक आणि व्यावसायिक पक्षांदरम्यान असा करार होतो की व्यावसायिक पक्षास होणाऱ्या नफ्यात बँकेचा आणि व्यावसायिकाचा निम्मा वाटा असेल.

या व्यवसायात २० हजार रुपयांचा नफा झाला तर यामध्ये दहा हजार रुपये दुसऱ्या व्यावसायिक पक्षास मिळतील, ज्याने भागीदारी तत्त्वावर एक लाख रु. भांडवल

पुरविले. पाच हजार रुपये बँकेस आणि पाच हजार रुपये पहिल्या व्यावसायिक पक्षास मिळतील, ज्याने बँकेच्या भांडवलावर भागीदारीत व्यवसाय करण्याचे कष्ट केले आहे.

या व्यवसायात २० हजार रुपये तोटा झाला तर यामध्ये दहा हजार रुपयांचा तोटा बँकेस सहन करावा लागेल आणि दहा हजार रुपयांचा तोटा भागीदारी केलेल्या दुसऱ्या व्यावसायिक पक्षास (भांडवल पुरविणाऱ्या भागीदारास) सहन करावा लागेल. अर्थातच भांडवल न लावणाऱ्या व्यावसायिकास तोटा उचलण्याची गरजच नाही. मात्र त्यास आपल्या व्यावसायिक प्रयत्नांचे फळही मिळणार नाही. म्हणजेच त्याचे व्यावसायिक परिश्रम वाया गेले, एवढ़ेच!

उपरोक्त प्रकारामध्ये हे वैध असेल की, पहिल्या व्यावसायिक पक्ष आणि त्याच्या भागीदार व्यावसायिकांदरम्यान समान भांडवल गुंतवणुकीचा करार असूनसुद्‌धा असा करार करता येईल की, नफ्यामध्ये प्रथम व्यावसायिक पक्षाला एक तृतियांश (०.३३३ टक्के) वाटा, त्याच्या भागीदार पक्षास दोन तृतियांश (०.६६६ टक्के) वाटा आणि बँकेस या संपूर्ण नफ्यातून ठरलेल्या प्रमाणानुसार वाटा मिळेल. त्याचबरोबर हेसुद्धा योग्य आणि धर्मसंमत ठरेल की, करार करतानाच अशी अट ठेवण्यात यावी की व्यवसायाच्या एकूण नफ्यापैकी भागीदार- पक्षास ५० टक्के, व्यावसायिकास २५ टक्के, बँकेकडून बटाई तत्त्वावर भांडवल घेणाऱ्यास २५ टक्के वाटा मिळेल. अथवा हे टक्केवारी प्रमाण आपल्या इच्छेनुसारही ठरविता येईल.

६) या प्रकाराची विविध उदाहरणे देता येतील. कारण हा प्रकार पहिल्या काही प्रकारांचे एकत्रित स्वरुप आहे. यामध्ये नफ्याच्या विभागणीचा नियम समजण्यासाठी निम्नोल्लेखित एक उदाहरण पुरेसे आहे.

उदाहरण

'अ' या व्यावसायिक पक्षाने एक लाख रुपये स्वत: गुंतविले असून त्याचा व्यावसायिक भागीदार 'ब' याने एक लाख रुपये गुंतविले. एकत्रित व्यवसायासाठी बटाई तत्त्वावर एक लाख रुपये बँकेकडून घेण्यात आले. तसेच एका दुसऱ्या भांडवलदार पक्ष 'क' कडून एक लाख रुपये घेण्यात आले. बँक आणि 'क' या पक्षाबरोबर असा करार झाला की, ते दोन्ही पक्ष या एकत्रित होणाऱ्या व्यवसायातील नफ्यात ५० टक्के नफा या दोन्ही पक्षांचा व ५० टक्के नफा व्यवसाय करणाऱ्यांचा असेल. त्याचप्रमाणे 'अ' आणि 'ब'च्या दरम्यान असा करार झाला की एकत्रित व्यवसायाच्या एकूण नफ्यांमध्ये समान वाटेकरी असतील. हा एकत्रित व्यवसाय एकूण चार लाख रुपयाच्या भांडवलावर करण्यात येतो. या व्यवसायात ४० हजार रुपये नफा झाला तर -

बँकेस पाच हजार (= - ३५ हजार), 'क' पक्षास पाच हजार (= - ३० हजार), 'ब' पक्षास पंधरा हजार (= - १५ हजार) आणि 'अ' पक्षास (अर्थात व्यावसायिकास) पंधरा हजार रुपये मिळतील. (अर्थात बँकेचे ५ + 'क' चे ५ + 'ब' चे १५ + 'अ' चे १५ = ४० हजार रुपये)

यामध्ये नफा वाटणी प्रमाणाचा नियम असा आहे की, प्रथम एकूण नफा एकूण भांडवलावर विभागण्यात आला, अर्थात प्रतिलाखावर दहा हजार नफा झाला. बटाई तत्त्वानुसार बँक आणि 'क' पक्षास या नफ्याचा निम्मा भाग म्हणजे दोघांना प्रत्येकी पाच हजार रुपये मिळतील. उरलेले ३० हजार रुपये हे एकत्रित व्यवसायाच्या नफ्याची रक्कम होय आणि ही रक्कम ठरलेल्या करारानुसार दोघांमध्ये समप्रमाणात वाटण्यात येईल.

बँकेच्या दृष्टिकोनानुसार, या सर्व प्रकारांमध्ये जी बाब समान आहे ती अशी की, व्यवसायामध्ये तोटा झाल्यास बँकेकडून पुरविण्यात येणाऱ्या भांडवलात येणाऱ्या तोट्यास बँकेनेच सहन करावे लागेल. तसेच व्यवसायात होणाऱ्या नफ्यामध्ये ठरलेल्या प्रमाणानुसार व्यावसायिक पक्षाचा वाटा द्यावा लागेल. उपरोक्त उदाहरणे आम्ही केवळ याकरिता दिली आहेत की, या मूळ प्रकारावर या गोष्टीचा काहीच फरक पडत नाही की, ज्या व्यावसायिक पक्षास बँक बटाई तत्त्वावर भांडवल पुरविते, त्या व्यवसायाचे स्वरुप कसे असावे. अर्थात या व्यवसायात इतर भांडवलदेखील असेल किंवा नसेलही.

उपरोल्लेखित स्वरुपात व्यावसायिक पक्षांकडून घेण्यात येणाऱ्या अल्प मुदतीच्या कर्जांचा उल्लेख करण्यात आलेला नाही. नफा आणि तोट्याचा हिशोब लावण्यापूर्वी या कर्जाची परतफेड करण्यात यावी आणि, नफा-तोट्याच्या हिशोबात ही कर्जे व्यावसायिक भांडवलात सामील करण्यात येणार नाहीत. नफा व तोट्याचे प्रमाण, हे टक्केवारीच्या प्रमाणात मूळ भांडवल आणि दीर्घ मुदतीच्या आधारावर निर्णय घेण्यात यावा. अल्पमुदतीच्या कर्जाचे स्वरुप हे दैनंदिनी उधार घेवाणदेवाणीचे असते. यात काहीच शंका नाही की, उधार देवाणघेवाणीमुळे व्यवसायाचे स्वरुप विस्तारित होते आणि नफ्यामध्ये वृद्धी होत असते. परंतु ही उधार देवाणघेवाणसुद्धा व्यवसायाच्या मूळ भांडवलाच्या आधारावरच होत असते. नफा आणि तोट्याची गणना मूळ भांडवल राशीच्याच आधारावर होत असते. हेच स्वरुप अल्प मुदतीच्या (अर्थात छोट्या भांडवलाच्या) कर्जांचे आहे. यांच्यामुळे व्यवसायात विकास आणि नफ्यात वृद्धी होत असते. परंतु नफा आणि तोट्याचा हिशोब व्यवसायाच्या मूळ भांडवलावर आधारित आहे. अर्थातच मूळ भांडवलात हे सामील करता येणार नाही.

बँकेकडून आपल्या भांडवलाच्या माध्यमाने इतर भांडवलदार व्यक्ती आणि व्यावसायिक संस्थांबरोबर भागीदारी करताना असेदेखील करता येणे शक्य आहे की, या व्यवसायात बँक आणि त्याच्या भागीदाराच्या भांडवलाखेरीज बटाई तत्त्वावर

मिळविण्यात येणारे भांडवल, भागीदारी तत्त्वावर मिळविण्यात येणारे भांडवल अथवा दीर्घ मुदतींची कर्जे सामील करता येतील. या सर्व प्रकारांमध्ये नफा वाटणीचे विविध प्रमाणाचे नियम विभिन्न उदाहरणांवरून स्पष्ट करता येईल. परंतु उपरोल्लेखित अंतिम प्रकारावर निरीक्षण केल्याससुद्धा या नियमाचे आकलन करणे सोपे होईल. नियम असा आहे की जो व्यवसाय, भागीदारी तत्त्वावर करण्यात येतो, तसेच यामध्ये बटाई तत्त्वावर आणि कर्जावरसुद्धा सर्वांचे भांडवल सर्वसंमतीने गुंतविण्यात आले असेल, तेव्हा त्या व्यवसायाच्या एकूण नफ्यातून प्रथम बटाई तत्त्वावर भांडवल पुरविणाऱ्या पक्षांना त्यांचा नफा देण्यात येईल आणि तद्नंतर बाकीचा नफा भागीदार असलेल्या व्यावसायिक पक्षांना ठरलेल्या प्रमाणानुसार देण्यात येईल. तोटा झाल्यास सामायिक व्यवसायास्तव घेण्यात आलेल्या कर्जाची पूर्ण परतफेड करण्यात येईल. बटाईच्या भांडवलाची फेड केवळ एवढ्या प्रमाणात करण्यात येईल की जे एकत्रित तोट्यास एकूण भांडवल भागीदारी, बटाई आणि कर्ज घेऊन उभे केलेल्या भांडवलावर विभागून बटाईच्या भांडवलाच्या वाट्याला येईल आणि बाकीचा तोटा हा सामायिक व्यवसायाचा तोटा असेल. हा तोटा भागीदार व्यावसायिक, त्यांनी पुरविलेल्या भांडवलाच्या प्रमाणात सहन करतील. आमच्या दृष्टिकोनानुसार बँकेने कोणत्याही अशा व्यवसायास भांडवल पुरवू नये की, ज्यामध्ये दीर्घ मुदतीस्तव भांडवल पुरविण्याची गरज असते. त्यामुळे भागीदारीच्या भांडवलाव्यतिरिक्त केवळ बटाई तत्त्वावर मिळविलेले भांडवलच गुंतविण्यात यावे की, ज्यामध्ये नफा आणि तोट्याच्या विभागणीचा नियम उपरोल्लेखित अंतिम प्रकारात स्पष्ट करण्यात आला. भागीदारी तत्त्वावरील घेण्यात आलेल्या अल्प मुदतीच्या कर्जाचे नियम आणि वरील उल्लेख केलेल्या बटाई प्रकाराचे नियम समान आहेत.

६) चालू व्यवसायात भांडवल गुंतवणुकीचा नियम

व्यावसायिक पक्षांना भांडवल पुरविण्याबाबत नफा व तोट्याच्या वाटणीची पद्धत आपण पाहिली आहे. परंतु याबाबत आणखीन काही गोष्टींचा उलगडा होणे आवश्यक आहे. खाली आपण काही विशेष बाबींचा अभ्यास करुया.

बँकेकडून बटाई तत्त्वावर भांडवल मिळविणारा व्यावसायिक पक्ष या भांडवलावर एक नवीन व्यवसाय सुरु करू इच्छित असल्यास, या व्यवसायातील नफा-तोटा विभागणीचे प्रमाण ठरविण्यात काहीच अडचण भासत नाही. परंतु व्यावसायिक पक्षाच्या चालू असलेल्या व्यवसायात अथवा चालू असलेल्या कारखान्यात, कृषी उद्योगात अथवा व्यापारात भांडवल गुंतविण्याचे झाल्यास, बँकेने या गोष्टीचा पूर्णपणे अभ्यास व पड़ताळणी करणे आवश्यक ठरेल की, या व्यवसायात किती भांडवल लागलेले आहे आणि बँकेचे भांडवल लावण्यात आल्यावर हे एकत्रित भांडवल किती

होईल? याशिवाय उभय पक्षांतील नफा व तोट्याचे प्रमाण ठरविणे शक्य होणार नाही. म्हणून कोणत्याही चालू व्यवसायाच्या भांडवलाची पडताळणी करण्याची योग्य प्रणाली अशी असेल की, त्याची एकूण संपत्ती, एकूण साहित्य व यंत्रसामुग्री, इमारत, तयार उत्पादन, कच्चा माल वगैरेची तत्कालीन बाजारातील किंमत जाणून घ्यावी. अर्थात या सर्व साधनसामग्रीची खरेदी किंमत जाणून घ्यावी. यानंतर व्यवसायावरील येणारी रक्कम आणि व्यवसायावरील कर्ज असलेली रक्कम जाणून घ्यावी आणि या दोहोंतील धन व ऋण फरकास संपूर्ण व्यवसायकिंमतीत सामील करण्यात यावे. अर्थातच यानंतरची बाकी येणारी रक्कम म्हणजेच व्यवसायाची एकूण किंमत किंवा भांडवल होय. हेच 'वित्त' बँकेने पुरविलेल्या भांडवलाव्यतीरिक्त व्यवसायाचे स्व:भांडवल निश्चित होऊन पुढील व्यवसायाच्या एकत्रित नफा आणि तोट्यामधून बँकेच्या वाट्याला येणारा नफा किंवा त्याच्या वाट्याला येणाऱ्या तोट्याची निश्चिती होईल. या प्रकारात या गोष्टीचा काहीच फरक पडत नाही की, बँकेच्या भांडवलाच्या गुंतवणुकीपूर्वी व्यावसायिक पक्ष हा केवळ व्यावसायातील सदस्य आहे अथवा व्यावसायिक आहे किंवा त्याच्या सामायिक भांडवलात इतर भागीदार अथवा बटाईतदार असतील.

वित्त पडताळणीची पद्धत अशी असावयास हवी की या पद्धतीवर बँक आणि व्यावसायिक पक्ष सहमत असावेत. या कामासाठी नि:पक्ष आणि तज्ञ मंडळींची सेवा घेतली जाऊ शकते. कराराच्या वेळी देणे असलेल्या आणि येणे असलेल्या रकमांच्या बाबतीत असेदेखील करता येईल याची पूर्ण जबाबदारी व्यावसायिक पक्षावर टाकण्यात यावी आणि व्यवसायाचे अथवा प्रकल्पाचे वित्त अगर भांडवल निश्चित करण्यात येणे व देणे असलेल्या रकमांना सामील करण्यात यावे.

हा प्रश्न अशा परिस्थितीत निर्माण होईल की जेव्हा एखादा व्यावसायिक पक्ष आपल्या पूर्वापार चालू असलेल्या व्यवसाय अथवा प्रकल्पास वृद्धिंगत करण्यासाठी अथवा चालू ठेवण्यासाठी भागीदारी तत्त्वावर बँकेचे भांडवल व्यवसायात गुंतवणुकीसाठी घेईल. काही इस्लामी विधिज्ञांनी कलह आणि कुरापती टाळण्यासाठी असादेखील सल्ला दिला की, भागीदारीच्या वेळी दोन्ही भागीदारांनी रोख रक्कम गुंतवून व्यवसाय करावा. चालू असलेल्या व्यवसायाचे भागीदारी व्यवसायात परिवर्तन करताना ही प्रणाली खूप किचकट आणि व्यवसायाच्या हिताविरुद्ध तसेच वित्तविकासात अडसर ठरते. त्यामुळे औद्योगिक व्यवसायातील उपरोल्लेखित स्वरुप आपणास योग्य वाटते. वित्त पडताळणीमार्फत व्यावसायाचे सामायिक वित्त जाणून घेऊन व्यावसायिक पक्षाचे भांडवल निश्चित करण्यात यावे आणि आपले भांडवल रोख स्वरुपात पुरविण्यात यावे.

त्याचप्रमाणे दोन्ही पक्षांना कलह आणि कुरापतीपासून सुरक्षित ठेवण्यासाठी दोन्ही पक्षांच्या सामंजस्याने प्रत्येक गोष्ट ठरवून करारपत्र तयार करावे.

दुसरा महत्त्वाचा प्रश्न हा करारपत्राचा आहे. जर एखाद्या व्यवसायाचे स्वरुप असे असेल की, एका निश्चित मुदतीत व्यवसाय पूर्ण होत असेल आणि यात लागणारे भांडवल परत एकदा रोखीचे स्वरुप धारण करीत असेल, तसेच बँकेस या पूर्ण मुदतीसाठी भांडवल गुंतविण्याची इच्छा असेल, तर अशा परिस्थितीत नफा आणि तोट्याची गणती करण्यात काहीच अडचण येणार नाही. व्यवसायाच्या पूर्णत्वावर उभय पक्ष आपसात हिशोबाचे आकलन करू शकतील. परंतु आधुनिक काळात बहुतांश औद्योगिक व्यवसाय चालूच असतो आणि त्याच्या पूर्णत्वाची वेळ निश्चित करता येत नाही. अशा प्रसंगी बँकेसमोर दोन पर्याप्त पद्धती आहेत. प्रथम हे की, बँकेने आपले वित्तीय भांडवल एका ठराविक मुदतीसाठी पुरवावे. दुसरे, मुदत निश्चितीविना भांडवल लावून वाटेल तेव्हा आपले भांडवल परत घ्यावे. दोन्ही प्रकारामध्ये भांडवल परतीच्या वेळी हिशोबाच्या वेळेस वित्त पडताळणीची पद्धत वरीलप्रमाणेच असेल. कारण व्यावसायिक पक्षाने बँकेचे भांडवल परत केल्यानंतरही व्यवसाय चालू ठेवू इच्छिल्यास हिशोब करण्यासाठी व्यवसायाचे पूर्ण भांडवल रोखीच्या स्वरुपात बदलणे अशक्य होईल. केवळ व्यवस्थित हिशोब करण्यासाठी कारखाना, साधनसामग्री, कच्चा माल आणि इतर बाबींची विक्री करून रोख पैसा बनविणे अशक्य असेल. सतत चालू असलेल्या व्यवसायात हिशोब पूर्ण करण्यासाठी व्यवसायाच्या एकूण साधनसामग्रीचे रोख रकमेमध्ये परिवर्तन करणे आवश्यक ठरविल्यास हे औद्योगिक व्यवसायासाठी घातक ठरणार. त्याचप्रमाणे याचे विपरित परिणाम उद्योजकाव्यतिरिक्त संपूर्ण अर्थकारणावर होतील. शिवाय व्यावसायिक आणि उद्योजक बँकेकडून भांडवल घेण्यास धजावणार नाहीत. वस्तुस्थिती पाहता हे आवश्यक आहे की वित्त पडताळणीच्या उपरोक्त पद्धतीनुसार हिशोब करणे आणि नफा-तोट्याची अंतिम विभागणी वैध ठरविण्यात यावी. बँकेस तिचे भांडवल आवश्यकरित्या नगदी स्वरुपात मिळेल आणि संपूर्ण नफादेखील नगदी स्वरुपात मिळावयास हवा. या राशीचा रोख पुरवठा हा आपला व्यवसाय चालू ठेवू इच्छिणाऱ्या परंतु बँकेचे भांडवल परत करू इच्छिणाऱ्या व्यावसायिकाच्या जबाबदारीवर असेल. मग यासाठी त्याने कोणती व्यवस्था करावी, हा विषय वेगळा. भागीदारी आणि बटाईच्या इस्लामी विधीतत्त्वावर चर्चा करताना स्पष्ट केल्याप्रमाणेच इस्लामी विधिज्ञांच्या मतानुसार व्यावसायिक हिशोबाची पूर्तता आणि नफा व तोट्याची अंतिम विभागणी करतेवेळेस हे आवश्यक आहे. व्यावसायिक भांडवलाचे परिवर्तन रोख रकमेत करण्यात यावे. (याचे सविस्तर स्पष्टीकरण मागे देण्यात आले आहे.) त्यांची ही भूमिका या हितावर आधारित आहे की अंतिम हिशोब अथवा

मोजमापाच्या पद्धतीमध्ये धोका, अज्ञान अथवा कोणत्याही पक्षाचे हित वा वैध अधिकार हिरावू नये. यात खरोखरच शंका नाही की, त्यांच्या हितोपदेशाची पूर्तता त्यांनी सादर केलेल्या परिस्थितीत विनासायास शक्य असूनही त्यांनी सुचविलेली पद्धती ही, व्यापारी आणि कृषिक व्यवसायात अंगीकारली जाऊ शकते. परंतु आधुनिक काळातील औद्योगिक व्यवसायात ही पद्धती घातक ठरू शकते. अशा परिस्थितीत आपल्याला पर्यायी स्वरुपाचा अंगीकार करावा लागेल की, जेणेकरून या हितांचे रक्षण करणे शक्य होईल. या हितांच्या रक्षणास्तव व्यवसायवित्ताच्या सर्व संमतीनुसार होणाऱ्या निरीक्षणाचा पर्याय योग्य वाटतो. याच आधारावर वर्तमानकाळात गरजेनुसार व्यावसायिक हिशोबाचे आकलन करणे वैध ठरते.

हिशेब आकलनात सवलत आणि पारदर्शिता अबाधित ठेवण्यास्तव व्यवसायाची एक योग्य प्रणाली अशी असेल की, प्रत्येक व्यावसायिक पक्षासाठी हे आवश्यक ठरविले जावे की, योग्य आणि निश्चित मुदतीनंतर (उदा. वार्षिक, सहामाही, त्रैमासिक) हिशोब संपादित करावा आणि आधुनिक पद्धतीनुसार व्यवसायाची सामूहिक वित्तराशी ठरवावी. बँकेनेदेखील आपले भांडवल आशाच मुदतींनुसार गुंतवावे. म्हणजेच वार्षिक, सहामाही अथवा त्रैमासिक अथवा काही वर्षांसाठी, ही मुदत पूर्ण झाल्यावर व्यावसायिक पक्षांपैकी सर्वांनाच आपला करार संपविण्याचा अधिकार असावा. बँकेस तिचे भांडवल परत करण्यात यावे आणि नफा व नुकसानीचा हिशेब करून बँकेचा पूर्ण हिशोब करण्यात यावा. व्यावसायिक पक्षांना वाटल्यास ते आपल्या कराराची मुदत वाढवू शकतात. अशा परिस्थितीत नफा व तोट्याचा हा हिशोब आणि वाटणी ही अंतिम स्वरुपाची असेल. मग नंतर करारनाम्याचे नूतनीकरण करून मुदत वाढविण्यात येऊ शकते. या वाढ़ीव मुदतीच्या व्यवसायाचा संबंध मागील नफा व तोट्याशी मुळीच नसतो. व्यावसायिक पक्षांना वाटत असेल तर हा करार पुढ़े वाढ़विताही येऊ शकतो. नफा व तोट्याच्या वाटणीस अस्थायी स्वरुप गृहीत धरावे आणि करार संपण्याच्या वेळेस नफा-तोट्याच्या वाटणीचे काम पुढ़े ढकलण्यात यावे. ठराविक मुदतीसाठी करार करण्याच्या परिस्थितीत, ही मुदत पूर्ण होण्यापूर्वी दोन्ही पक्षांच्या सामंजस्याने अथवा दोन्हींपैकी एकाचा मृत्यू झाल्यानेच करार संपुष्टात येणे शक्य आहे.

व्यावसायिक पक्षांनी बँकेकडून काही भांडवल घेऊन व्यवसायात गुंतविल्यानंतर यापुढेही याच व्यवसायात आणखीन भांडवल गुंतविण्यासाठी बँक किंवा इतर आणखीन एखाद्या भांडवलदाराकडून भांडवल मिळवायचे झाल्यास यापूर्वी व्यवसायाची वित्त- पडताळणी उपरोल्लेखित प्रणालीनुसारच व्हावी. नवीन भांडवल गुंतवितेवेळी प्रत्येक व्यावसायिक पक्ष एका नवीन करारानुसार व्यवसायात

सहभागी होईल. त्याचप्रमाणे या वेळे- पर्यंतच्या नफा व तोट्याची निश्चिती करून पूर्वी लावलेल्या भांडवलाच्या मालकांचा हिशोब चुकता करावा लागेल. त्यांचा हिशोब चुकता करण्यासाठी त्यांचे भांडवल परत करणेच आवश्यक नसून त्यांचे भांडवल नफा-तोट्याची राशी निश्चित करणेही पुरेसे ठरेल. तसेच यापुढे त्यांना याच भांडवलासहित व्यवसायात सहभागी करण्यात येईल.

बँकेने व्यावसायिकास अनिश्चित काळासाठी भांडवल पुरविले असेल तरीसुद्धा योग्य वेळेवर अर्थात सहामाही, त्रैमासिक किंवा वार्षिक मुदतीनुसार नफा वा तोट्याची निश्चिती करणे योग्य ठरेल. बँकेला तिच्या खातेदारांच्या हिशोबाच्या पूर्ततेसाठी योग्य वा त्यांना ठरवून दिलेल्या मुदतीनुसार हिशेब करण्याची गरज पडेल. त्यामुळे अनिश्चित अथवा दीर्घ मुदतीसाठी भांडवल पुरविणाऱ्यांना प्रत्येक तिमाही, सहामाही किंवा वार्षिक मुदत झाल्यावर नफा व तोट्याच्या निश्चिततेमध्ये कोणतीही अडचण न येता बँकेला तिने गुंतविलेल्या भांडवलाचा लाभही होत राहावा.

या संपूर्ण चर्चेमध्ये आम्ही भागीदारी आणि बटाई तत्त्वाच्या दोन्ही पद्धतीनुसार भांडवल लावण्याचा उल्लेख केला. परंतु पुढील चर्चेच्या वेळी आम्ही असे गृहीत धरून चर्चा करीत आहोत की, बँकेने आपले भांडवल बटाई तत्त्वावरच पुरविले आहे. यामुळे या चर्चेचा गुंता सुटेल आणि त्याच्या परीणामांवरदेखील काही विशेष प्रभाव पडणार नाही. प्रचलित बँकिंग व्यवस्थेची संपूर्ण रुपरेखा स्पष्ट झाल्यानंतर या गोष्टीचे सहजतेने व सुलभतेने निरीक्षण करणे शक्य होईल की, बँकेने बटाई तत्त्वाबरोबरच भागीदारी तत्त्वप्रणालीचा जरी अवलंब केला, तर तिच्या व्यवस्थेवर याचे काय परिणाम होतील आणि तिच्या कोणकोणत्या बाबींमध्ये सुधारणा करण्याची गरज पडेल.

त्यामुळे पुढे जाण्यापूर्वी या चर्चेच्या परिणामांचा वेध घेणे योग्य ठरेल.

१) बँक आपले भांडवल बटाई तत्त्वावर व्यावसायिकास देईल.

२) बँकेच्या नफ्याचा वाटा तिने पुरविलेल्या भांडवलावर मिळणाऱ्या नफ्याच्या एका राशीनुसार निश्चित होईल.

३) बँकेला व्यवसायात होणारा संपूर्ण तोटा स्वत:लाच सहन करावा लागेल.

४) बँकेची वित्तीय जबाबदारी, ही तिने पुरविलेल्या भांडवलाच्या मर्यादेपेक्षा जास्त नसेल. (अर्थात बँकेचे जास्तीतजास्त नुकसान म्हणजे तिने पुरविलेले पूर्ण भांडवल बुडू शकते एवढेच.)

५) शेवटच्या प्रसंगी हिशेब लावण्यापूर्वीसुद्धा नफ्याची वाटणी शक्य असू शकते.

६) करार संपल्यावर बँकेस तिचे भांडवल नफ्यासहित अथवा तोट्याच्या कपातीसहित परत मिळेल.

७) कराराच्या प्रारंभीच बँकेने पुरविलेल्या भांडवलाखेरीज या व्यवसायात आणखीन किती भांडवल लागलेले आहे व लावण्यात येत आहे, याची निश्चिती होणे आवश्यक आहे.

८) ज्या व्यवसायात बँकेने भांडवल लावले असेल, त्याच व्यवसायात आणखीन बँकेमार्फत अथवा इतर पक्षाकडून भांडवल लावण्याची गरज पडल्यास नवीन करार करावा लागेल.

९) बँकेचे भांडवल निश्चित मुदतींकरितासुद्धा लावता येईल.

१०) मुदत निश्चित न होण्याच्या स्थितीत आणि मुदत निश्चित होण्याच्या स्थितीत व्यावसायिक पक्षाच्या राजीखुशीने बँक कोणत्याही वेळेस आपले भांडवल काढून घेऊ शकते. मात्र हिशोब पूर्ण करण्याची आवश्यकता असल्यास बँकेस आणखीन काही मुदतीकरिता वाट पाहावी लागेल.

७) व्यावसायिक संस्थांच्या रोख्यांची खरेदी

बँकेसाठी आपल्या भांडवलाच्या लाभदायक वापराचे एक योग्य स्वरुप म्हणजे व्यावसायिक आणि औद्योगिक व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांचे भाग (Shares) खरेदी करणे होय. आजकाल बऱ्याच व्यावसायिक संस्था शेअर अथवा रोखे विकून भांडवल उभे करतात. प्रत्येक शेअरचा मालक हा नियमानुसार त्या व्यवसायातील भागीदार असतो. त्याच्या शेअरच्या किंमतीचे एकूण भांडवलाशी असलेल्या प्रमाणानुसारच तो कंपनीचा मालक असतो. उदाहरणार्थ, जर एका कंपनीत दहा लाख रुपयांचे भांडवल लागलेले असेल आणि त्याच्या एका शेअरची किंमत एक हजार रुपये असेल, तर हा शेअरहोल्डर (ज्याने हा शेअर खरेदी केला आहे तो मनुष्य) या कंपनीचा 'एक हजारांश' एवढ़ा मालक असेल. (अर्थात त्याचा मालकीवाटा १ : १००० एवढ़ा असेल.)

व्यवसायात नफा होण्याच्या स्वरुपात हा नफा शेअरहोल्डरांमध्ये समान प्रमाणात विभागण्यात येईल. ज्या वर्षी व्यवसायात नुकसान होईल त्या प्रसंगी कोणताच नफा वाटप होणार नाही. तसेच शेअरहोल्डरांकडून नुकसानभरपाईची मागणीदेखील करण्यात येणार तर नाहीच, शिवाय पुढ़ील नफा किंवा मागील न वाटण्यात आलेल्या नफ्यातून याची भरपाई करण्यात येईल. या पुढे नुकसानभरपाईपेक्षाही जास्त नफा झाल्यास तो नफा प्रमाणानुसार वाटण्यात येईल.

हे कंपनीचे शेअर्स व त्यावर मिळणाऱ्या नफ्याच्या वर्तमान परिस्थितीतील स्वरुपात बरेच साम्य आढळते. त्यामुळे ही बाब विचारणीय ठरते.

बाजारात शेअर्सची खरेदी आणि विक्री होत असते. त्याचे भाव बाजाराच्या

चढ़-उतार वा तेजी-मंदी ही मोठ्या प्रमाणात मागील काळातील त्यांची लाभदायकता आणि भविष्यात संभावित नफ्यावर अवलंबून असते.

शेअरखरेदीची वर्तमान पद्धत इस्लामी अर्थव्यवस्थेत चालू ठेवता किंवा अंगीकारता येऊ शकते. निश्चितच या शेअर्सच्या वित्तीय जबाबदारीच्या बाबतीत, सामायिक व्यवसायामध्ये मत मांडण्याच्या अधिकाराच्या बाबतीत आणि शेअर खरेदी-विक्रीच्या बाबतीत काही नवीन प्रश्न निर्माण होतात, परंतु या प्रश्नांचे निराकरणदेखील शक्य आहे. सामायिक व्यावसायिक कंपन्यां (Public limited) ची वर्तमान स्वरुपात सुधारणा करून, सट्टेबाजीला प्रतिबंधित करून आणि शेअरवर नफ्याची प्रमाणबद्ध वाटणी करून, तसेच त्यांच्या खरेदी-विक्रीवर काही नियम लावून प्रचलित पद्धतीला इस्लामी विधीच्या प्रणालीवर आणावे लागेल आणि प्रत्येक अवैध घटक त्यातून विभक्त करण्यात यावा. या विषयावर येथे सविस्तर चर्चा करण्याची संधी नाही. आपण असे गृहीत धरून चर्चा पुढे चालू ठेवूया की शेयर खरेदीची पद्धत व्याजरहित अर्थात इस्लामी बँक व्यवस्थेत अंगीकारता येईल आणि व्याजाच्या निषिद्धतेमुळे हा प्रकार खूप लोकप्रिय ठरेल. त्याचप्रमाणे हेदेखील स्पष्ट आहे की व्याजाशी संबंधित असलेले किंवा कमीतकमी नफा दर असण्याची हमी असलेले व्यावसायिक शेअर्स आपल्या चर्चेतून वगळण्यात आलेले आहेत. या ठिकाणी केवळ सामान्य शेअर्स (Common stocks) चा उल्लेख करण्यात येत आहे. ज्यांची लाभदायकता कंपनीच्या नफ्यावर अवलंबून आहे.

बँक आपल्या भांडवलाचा एक भाग अशा प्रकारच्या शेयर खरेदीवर गुंतवू शकते जेणेकरून बँकेस दरवर्षी नफा मिळावा. ती एकाच वेळी विभिन्न प्रकारचे आणि विभिन्न व्यावसायिक संस्थांचे शेअर्स खरेदी करून या बाबतीत प्रयत्नशील असेल की, आपण खरेदी केलेल्या शेअर्सवर तिला एकत्रितरित्या नेहमी आर्थिक लाभ होत राहावा.

शेअर्समध्ये भांडवल गुंतविण्याचा एक मोठा लाभ असा आहे की, बँकेस नगदी भांडवलाची गरज पड़ल्यास हे शेअर्स विकून भांडवल उभे करता येते. यापुढील चर्चेत हा विषय हताळण्यात येईलच. बँकेला आपल्या रोख भांडवलाची रक्कम अबाधित ठेवणे वा कायम ठेवणे खूप महत्त्वपूर्ण असते. त्यामुळे शेअर्स संपत्ती या कामी लाभदायक ठरते.

शेअर्स विक्रीमुळे बँकेस नुकसानदेखील उचलावे लागू शकते. यासाठी बँकेस आपल्या हितासाठी तोट्यात शेयर विक्री करण्याचे टाळावे लागेल या प्रकारात नफा व तोटा हा सामुदायिक व्यवसायाचा एक भाग असतो.

प्रकरण तिसरे

बँक आणि भांडवलदार

मागील प्रकरणात हे स्पष्ट करण्यात आले की बँक आपले भाडवल 'मुज़ारिबत' (बटाई) च्या तत्त्वावर लावून, व्यावसायिक शेअर्स खरेदी करून आणि दलाली व शुल्क घेऊन विभिन्न प्रकारच्या सेवा पुरवून मेहनताना घेऊन कशा प्रकारे आर्थिक कमाई करु शकते. मागील प्रकरणात आम्ही केवळ बँक कायम करणाऱ्या भागीदारांनी पुरविलेल्या भांडवलाचा उल्लेख केला. या प्रकरणात मात्र बँकेच्या आणखीन भांडवल उभे करण्याच्या पद्धतींचा आढावा घेण्यात येईल.

१) मुज़ारिबत (बटाई) तत्त्वावर अतिरिक्त भांडवल उभारणी

यासाठी बँक सर्व जनता आणि ठेवीदारांना आवाहन करेल की, त्यांनी आपले भांडवल 'मुज़ारिबत' (बटाई) तत्त्वावर बँकेस द्यावे. मागील प्रकरणात उल्लेख केलेल्या व्यवसायात बँक हे भांडवल गुंतवेल. या व्यवसायातून होणाऱ्या नफ्यात ठराविक प्रमाणानुसार एक वाटा बँकेचा असेल आणि बाकीचा नफा भांडवलपुरवठा करणाऱ्यामध्ये वाटप करण्यात येईल. खालील मजकुरात बँक आणि बटाई तत्त्वावर भांडवल पुरविणाऱ्या भांडवलदारांदरम्यान होणाऱ्या करारपत्राचे स्पष्ट वर्णन करण्यात येईल. आपल्या आकलनसवलतीसाठी आपण या भांडवल पुरविणाऱ्यांना 'खातेदार' अशा शब्दाने संबोधित करूया. या खातेदारांव्यतिरिक्त काही इतर व्यक्तींसुद्धा आपले भांडवल कर्जस्वरुपात जमा करतील. या भांडवलाचे स्वरुपसुद्धा स्पष्ट करण्यात येईल.

२) मुज़ारिबत (बटाई) खाते

मुज़ारिबत (बटाई) खात्यात रकमा जमा करणाऱ्यांशी बँकेचा करार अशा प्रकारे होईल.

१) बँक यांचे भांडवल आपल्या भांडवलाबरोबर व्यवसायात गुंतवेल. एकूण भांडवलावर एकत्रितपणे जो नफा मिळेल त्याची एकूण भांडवलावर विभागणी करण्यात येईल. या विभागणीनुसार एका खातेदाराच्या भांडवलावर जेवढ़ा नफा मिळेल, त्याचे एक ठराविक प्रमाण (उद: एक द्वितीयांश, एक तृतीयांश, एक चतुर्थांश वगैरे) बँकेच्या वाटेला येईल आणि बाकीचा नफा खातेदारांना मिळेल. नफा वाटणीचे हे प्रमाण उभय पक्षांच्या सामंजस्याने निश्चित करण्यात येईल.

२) बँकेस एखाद्या व्यवसायात एकूणरित्या तोटा झाल्यास हा तोटा व्यवसायात गुंतवणूक करण्यात आलेल्या एकूण भांडवलावर विभागण्यात येईल. या विभागणीवरून खातेदारास आपल्या भांडवलात होणाऱ्या तोट्याच्या परिणामस्वरुप झालेली कपात सहन करावी लागेल.

३) कोणत्याही खातेदाराची वित्तीय जबाबदारी त्याने जमा केलेल्या रकमेच्या मर्यादेपेक्षा जास्त नसेल. अर्थात त्याचे महत्तम नुकसान म्हणजे त्याचे भांडवल बुडू शकते. बँकेने जर कर्जभांडवल व्यवसायात गुंतविले असेल आणि त्यास शेअरहोल्डर्स आणि खातेदारांनी पुरविलेल्या भांडवलावर जास्त विस्तारले असेल आणि व्यवसायात एवढा जबरदस्त तोटा झाला की, संपूर्ण भांडवल दिवाळखोरीत निघाले असेल आणि परताव्याची रक्कम बाकी असेल, तर अशा प्रसंगी या संपूर्ण रकमांच्या परतफेडीसाठी खातेदारांकडून अतिरिक्त रकमेची मागणी करता येणार नाही. ही मागणी केवळ अमर्याद वित्तीय जबाबदारी असलेल्या भागीदार सदस्यांकडे करता येऊ शकते.

४) बटाई खात्यात जमा होणाऱ्या रकमा कोणत्याही मुदतीच्या निश्चिततेशिवायसुद्धा जमा केली जाऊ शकते आणि एका ठराविक मुदतीसाठी (उद: सहामाही किंवा त्याच्या पटीत) जमा केली जाऊ शकते.

५) प्रत्येकी सहामाही मुदतीच्या पूर्ततेवर खातेदाराच्या नफा नुकसानीचा हिशोब करून त्यास सुचित करण्यात येईल की त्यास करार संपविण्याचा अथवा पुढे चालू ठेवण्याचा पूर्ण अधिकार आहे. इच्छा असेल तर आपले भांडवल नफा-नुकसानीसह परत घ्यावे किंवा आपला नफा घ्यावा अथवा नफा मूळ खात्यात सामील करावा. मग हेच भांडवल पुढील मुदतीकरिता बटाई तत्त्वावर द्यावे. अशा परिस्थितीत वस्तुत: रक्कम परत करणे गरजेचे नसून पारदर्शकपणे हिशोब करून बँकेने करार पत्राचे नूतनीकरण करण्याची सूचना देणे पुरेसे होईल.

६) खातेदाराला इच्छा होईल तेव्हा आपली रक्कम परत मागण्याचा अधिकार असेल. परंतु त्याला सहामाही मुदत पूर्ण होण्याची वाट पाहावी लागेल. मात्र बँकेची परवानगी असल्यास मागील सहामाही मुदतीवरसुद्धा हिशोब पूर्ण करता येईल. खात्यातील रकमा धनादेशा (Cheque) द्वारे काढताही येणार नाही आणि धनादेशाद्वारे रक्कम इतरांना देता (Transfer करता) येणार नाही. उलट या रकमा काढण्यासाठी एका योग्य मुदतीपूर्वी बँकेस सूचना द्यावी लागेल. मात्र जर बँकेने पूर्व सूचनेवर आग्रह धरला नसल्यास हेदेखील शक्य होईल.

७) उपरोक्त हिशोब पूर्ण करण्याची गरज पूर्ण करण्यासाठी प्रत्येक सहामाही मुदत पूर्ण झाल्यावर बँक आपल्या संपूर्ण नफा-नुकसानीची निश्चितता करेल. ज्या व्यावसायिक पक्षांना बटाई तत्त्वांवर भांडवलपुरवठा करण्यात आले असेल, त्यांच्या हिशोबाकरिता वित्त पडताळणीची वर उल्लेखलेली पद्धत अवलंबण्यात येईल. शेअर्सची किंमत तत्कालीन बाजारभावानुसार ठरवून त्यांच्या कमाईवर मिळालेला नफा आणि मूळ वृद्धी (Capital gain) ची निश्चिती करण्यात येईल. मात्र दक्षता पाळण्यासाठी हे आवश्यक आहे की हिशोबात सामील होणाऱ्या शेअर्सची किंमत बाजारातील प्रचलित दरापेक्षा काही कमी करण्यात यावी.

८) बटाई खात्यात नवीन रकमा प्रत्येक त्रैमासिक मुदतीच्या सुरुवातीस जमा करण्यात येतील. त्याचप्रमाणे भांडवलदारांची इच्छा असल्यास त्रैमासिक मुदतीच्या आतसुद्धा त्यांच्या रकमा स्वीकारल्या जाऊ शकतात. परंतु या रकमांचा तत्काळ वापर होत नसल्यास चालू त्रैमासिक मुदतीच्या पूर्णत्वावर ते हिशोबात सामील नसतील. मात्र बँकेसाठी जर शेअर खरेदी करून बटाई तत्त्वावर भांडवलपुरवठा अथवा सेवापुरवठा करणे शक्य व्हावे आणि त्रैमासिक मुदतीच्या पूर्णत्वावर नफा व नुकसानीच्या निश्चिततेमध्ये या रकमांना मुदतीनुसार सामील करून ज्यांच्यासाठी या रकमा लावण्यात आल्यात, ते असेच करतील. बँकेच्या दरम्यान ठेवी आणि भांडवल मिळविण्याची जोरदार स्पर्धा सुरु होईल आणि परिणामी ही स्पर्धाच या गोष्टीची जामीन अथवा हमी सिद्ध होईल की, ते शक्यतो यासाठी प्रयत्नशील असतील की, त्यांच्या बटाई खात्यात नेहमीच जास्तीतजास्त रकमा जमा असाव्यात. परंतु बँकेची काळजी वा निगराणी करणारी केंद्रीय बँक या बाबतीत सदैव प्रयत्नशील असावी की, तिने अशा रितीने हिशोब करून घ्यावा की, ज्यामुळे कोणत्याही खातेदार किंवा शेअरहोल्डरच्या हितामध्ये बाधा वा अडचण येता कामा नये. हिशोब किंवा गणतीच्या पद्धतीत कोणतेच अज्ञान आणि दगाबाजीची किंचितमात्र संभावना नसावी. यासाठी केंद्रीय बँकेस असे कडक नियम लागू करावे लागतील आणि हे नियम तज्ञलोकांच्या मदतीने व प्रत्येकाच्या हिताचे रक्षण करण्याच्या गरजेपोटी तयार करण्यात आलेले असतील.

बटाई तत्त्वावर खात्यात जमा करण्यात येणाऱ्या रकमा एका त्रैमासिक मुदतीस्तव किंवा काही त्रैमासिक मुदतीस्तव जमा करण्यात याव्यात आणि रकमांचा स्वीकार आणि परतावा त्रैमासिक मुदतीच्या पूर्णत्वावर व्हावा. ही बाब केवळ आमच्यातर्फे सादर करण्यात आलेली तजवीज किंवा भूमिका होय. याचा हेतू असा की हिशोबामध्ये अज्ञानता, दगाबाजी आणि घोटाळा होऊ नये. त्याचबरोबर ही पूर्ण कृती न्यायपूर्ण असण्याचा विमा अथवा हमी असावी. म्हणूनच आम्ही अशी भूमिका सादर केली आहे की बँकेकडून भांडवल घेतलेल्या प्रत्येक व्यावसायिक पक्षाने दर त्रैमासिक मुदतीवर पूर्ण हिशोब करावा, जेणेकरून त्याच्या नफा व तोट्याची निश्चिती संपूर्ण व्यवसायाच्या आधारावर करणे शक्य व्हावे. अर्थातच जोपर्यंत पूर्ण व्यवसायाचे परिणाम समोर येत नाहीत, तोपर्यंत खातेदार किंवा शेअरहोल्डरच्या नफ्या-तोट्याची निश्चिती शक्य होणार नाही, ही बाब वैध आणि धर्मसंमत अर्थात न्यायसंमत व सत्यसंमत ठरणारच नाही की, योग्य प्रमाणात निश्चिततेशिवाय केवळ अनुमानावर हिशोब करण्यात यावा.

तीन महिन्यांची मुदत म्हणजे काहीच नाही. याशिवाय आणखीन इतर मुदतीचे प्रमाण ठरविता येईल. परंतु या बाबतीत काही गोष्टींवर विशेष लक्ष पुरवावे लागेल. जे

व्यावसायिक पक्ष बटाई तत्त्वावर बँकेतून भांडवल मिळवितील आणि व्यवसायात त्याची गुंतवणूक करतील त्यांना या गोष्टीची समाधानपूर्वक हमी मिळावयास हवी की, त्यांना हे भांडवल एवढ्या किंवा अमुक मुदतीसाठी वापरण्यास मिळत आहे आणि, एवढ्या मुदतीकरिता हे भांडवल व्यवसायात वापरण्याचे त्यास स्वातंत्र्य असेल. कोणताही एक उद्योजक अथवा कारखानदार अशीच इच्छा करणार की त्यास या भांडवलावर कच्चा माल खरेदी केल्यावर त्याच्यापासून निर्मित होणाऱ्या वस्तु तयार करून बाजारात विकण्याची पूर्ण संधी मिळावी आणि अशा प्रकारच्या व्यवसायासाठी काही महिन्यांची मुदत अवश्य पाहिजे. विभिन्न प्रकारच्या कारखान्यांसाठी अथवा व्यावसायिक संस्थासाठी आपापल्या गरजेनुसार विविध मुदतींचे व्यावसायिक भांडवल मिळणे आवश्यक असते. दुसरीकडे भांडवल पुरविणारे आणि पैशांची बचत करून बटाई खात्यात जमा करणारे लोक अशीच इच्छा करतील की, त्यांच्या रकमा दीर्घ मुदतींसाठी बँकात अडकून पडू नयेत. तसेच त्यांना नफ्यासाठी जास्त काळ वाट पाहण्याची गरज पडू नये. जर खातेदारांच्या हिशोबाची मुदत खूप जास्त ठरविण्यात आली असेल तर, त्याचा परिणाम बचतराशी आणि बटाईच्या खात्यांतील भांडवलीच्या आवकक्रियेवर पडेल. बँकेच्या हिशोबाची मुदत निश्चित करताना उभय पक्षांच्या राजीमर्जीनुसार हिशोबकाळ ठरविण्यात यावा.

तीन महिन्यांची मुदत यासाठी योग्य ठरू शकते की, ही एक दरम्यानची मुदत आहे. याचा अर्थ असा मुळीच नाही की, प्रत्येक त्रैमासिक काळ संपताच बँकेने व्यावसायिक पक्षांकडून भांडवल परत घ्यावे. गरज केवळ एवढीच पडेल की, बँकेने प्रत्येक त्रैमासिक मुदतीवर हिशोब मागावा. एकाच व्यावसायिक पक्षास विविध त्रैमासिक मुदतीवर भांडवल देता येऊ शकते. अर्थात याचे सामान्य स्वरुप असे की भांडवल दीर्घ मुदतीसाठी देता येते. हिशोब मात्र प्रत्येक त्रैमासिक मुदतीवर करता येईल. त्याचप्रमाणे बँक आणि व्यावसायिक पक्षास आवश्यक वाटल्यास आपापल्या हितासाठी दोघांच्या राजीमर्जीने भांडवल परत घेता येऊ शकते आणि करार संपविता येतो. त्याचप्रमाणे बँकेच्या खातेदारांकडूनही दीर्घ मुदतींसाठी बचत ठेवी आणि भांडवल घेता येईल. याकरितासुद्धा प्रत्येक त्रैमासिक मुदतींवर नफा तोटा काढून हिशोब करता येईल. परंतु बहुधा रकमा बटाई तत्त्वांवर जमा असतील. इतर लाभदाय व्यवसायात गुंतविण्यासाठी किंवा स्वत:च्या अडचणी सोडविण्यासाठीच खातेदार आपली ठेव अथवा अनामत रक्कम काढू शकेल. एका बँकेतून दुसऱ्या बँकेत बटाई खात्यातून रक्कम हलवायची (Transfer) असल्यास बँकिंग व्यवस्थेवर याचा काहीच परिणाम होणार नाही. प्रत्येक त्रैमासिक मुदत संपल्यावर बँकेकडून बटाई खात्याच्या ज्या

रकमा परत काढण्यात येतील, त्याच्या तुलनेत आणखीन रकमा त्यात पुढ़ील त्रैमासिक मुदतीकरिता जमा देखील करण्यात याव्यात. याचा अर्थ असा झाला की असामान्य परिस्थितीशिवाय या गोष्टीची क्वचितच गरज पडेल की, बँकेस व्यावसायिक पक्षांकडून भांडवल परत करण्याची मागणी केवळ यासाठीच करावी लागेल की, तिला बटाई खात्याच्या काही रकमा परत करावयाच्या असतील.

या हेतुपूर्तीसाठी हे योग्य ठरेल की, बँकेने बटाई खात्याची एक निश्चित टक्केवारी रक्कम राखीव ठेवावी, जेणेकरून खातेदारांना त्यांच्या रकमा सामान्य अवस्थेत परत करण्यासाठी व्यावसायिक पक्षांकडून भांडवल परत घेण्यावर अवलंबून रहावे लागणार नाही. तीन ते पाच टक्के एवढ़ी अल्प रक्कम राखीव ठेवून हा हेतू पूर्ण करणे शक्य होईल.

याचीदेखील आवश्यकता नाही की सर्वच बँकाच्या त्रैमासिक मुदतीचा एकाच वेळी प्रारंभ व्हावा आणि एकाच वेळी या मुदती संपवाव्यात. प्रत्येक बँकेस या मुदतीचा प्रारंभ निश्चित करण्याचे स्वातंत्र्य आहे. उदाहरणार्थ, एका बँकेने बटाई तत्त्वावर रक्कम जमा करण्याच्या निश्चित तारखा १ जानेवारी, १ एप्रील, १ जुलै आणि १ ऑक्टोबर अशा ठरविल्या. तर दुसऱ्या बँकेच्या तारखा १ फेब्रुवारी, १ मे, १ ऑगस्ट आणि १ नोव्हेंबर अशा असू शकतात. शिवाय प्रत्येक बँकेची कार्यमुदत त्रैमासिक असेल. यामुळे खातेदारांना चांगली सवलत मिळेल आणि कामही सुटसुटीतपणे हाताळणे शक्य होईल. त्याचबरोबर व्यावसायिक पक्षांनासुद्‌धा प्रत्येक वेळी नवीन भांडवल मिळविणे शक्य आणि सोपे होईल.

त्रैमासिकाऐवजी आणखीन दुसरी एखादी मुदत (उदाहरणार्थ, चार महिने, सहा महिने किंवा एक वर्ष) अनुभवावरून जास्त योग्य वाटल्यास अंगीकारणे योग्य ठरेल. जास्त अपेक्षा अशी आहे की विविध बँकानी विविध मुदतकार्यांवर हिशोब करण्याची प्रणाली अवलंबण्यात यावी. ही गोष्ट सामान्य ठेवीदार, भांडवलदार तसेच व्यावसायिक पक्षांसाठीसुद्‌धा खूप सवलतीची ठरेल. म्हणजेच एका बँकेची हिशोबाची मुदत तीन महिने, दुसरीची सहा महिने तर तिसरीची बारा महिने असेल. काही बँकांचे तर हे वैशिष्ट्यच ठरेल की त्या अत्यंत दीर्घ मुदतीसाठी औद्योगिक व्यवसायासाठी भांडवलाच्या इच्छुक व्यावसायिक पक्षांना भांडवल पुरवून त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी असतील. इतर अल्प मुदतीसाठी कर्ज पुरवठा करतील. त्यासाठी प्रत्येक प्रकारच्या अल्प वा दीर्घ व्यावसायिक गरजा पूर्ण होण्यास सवलत निर्माण होईल. कार्यानुभव, स्पर्धा आणि केंद्रीय बँकेच्या सामुदायिक गरजापूर्तीस्तव असलेले मार्गदर्शन हे संपूर्ण बँकिंग व्यवस्थेस योग्य प्रणालीवर चालविण्याचे माध्यम बनतील.

३) मुज़ारिबत (बटाई) खात्याच्या नफा-तोट्याची निश्चिती

दुसऱ्या प्रकरणात आम्ही उदाहरणांसहित स्पष्ट केले आहे की, बँकेने व्यावसायिक पक्षांना पुरविलेल्या भांडवलाच्या नफा व तोट्याची निश्चिती कशी करावी. आता आपण पाहूया की, बँक आपल्या खातेदार आणि भागीदारांदरम्यान आपल्या नफा व तोट्याची निश्चिती कशी करेल. त्याचबरोबर याची वाटणी कशी होईल. हा मुद्दा जास्त सोप्या पद्धतीने लक्षात येण्यासाठी आपण असे गृहीत धरून चर्चा करूया की बँकेने खरेदी केलेल्या रोख्यांच्या माध्यमाने होणारी आय (किंवा कमाई) सुद्धा बटाईवर देण्यात येणाऱ्या भांडवलावरील नफा व तोट्यात सामील आहे. तसेच सेवापुरवठ्यामार्फत होणारी कमाई बँकेच्या एकत्रित व्यवस्थापित खर्चाएवढीच आहे. अशा प्रकारे वस्तुत: निव्वळ कमाईचे केवळ एकच साधन असेल आणि ते म्हणजे बटाईवर लावण्यात येणाऱ्या भांडवलाचा नफा.

नफा आणि तोट्याची निश्चितीदेखील वर उल्लेख केल्याप्रमाणेच असेल. बटाई खात्यात जमा करण्यात येणारी संपूर्ण रक्कम शेअरहोल्डरांनी पुरविलेल्या संपूर्ण भांडवलात मिळवून व्यवसायात वापरण्यात येईल. (जर मुज़ारिबत (बटाई) खात्याचा एक निश्चित भाग राखीव ठेवला असेल तर, हेसुद्‌धा त्याच्या व्यावसायिक वापरात सामील असलेले समजले जाईल. या राखीव व्यतिरिक्त शेष रकमा व्यावसायिक पक्षांना पुरविण्यात येतील. परंतु यापासून मिळणाऱ्या नफ्याची एकूण खात्यांवर राखीवसहित वाटणी करून टक्केवारी काढण्यात येईल.) म्हणजेच शेअरहोल्डर्सची बटाई तत्त्वावरील खरेदी, शेअर्स खरेदी आणि ग्राहकांच्या विभिन्न सेवा पुरविण्यासाठी लावण्यात येतील. बटाई खात्यांमध्ये प्रत्येक वैयक्तिक खातेदाराच्या हिशोबात ठराविक प्रमाणानुसार नफ्याची वाढ करण्यात येईल. व्यवसायात सामुदायिकरित्या नुकसान झाले असेल तर हा तोटा पूर्ण एकत्रित भांडवलावर विभागून तोट्याची टक्केवारी काढण्यात येईल आणि यावरून प्रत्येक खातेदार शेअरहोल्डरच्या वाट्यात येणारा घसारा घोषित करण्यात येईल. हे नियम या उदाहरणावरून समजणे सोपे होईल.

समजा, दहा शेअरहोल्डरांनी प्रत्येकी एक लाख रुपये जमा करून एकत्रित भांडवलावर बँकेची स्थापना केली. या बँकेच्या बटाई खात्यामध्ये दहा हजार खातेदारांनी सरासरी प्रत्येकी पाच हजार रुपये जमा केले. अर्थात, ही रक्कम ५० लाख रुपये एवढी झाली. शेअरहोल्डर्सदरम्यान असा करार झाला की ते व्यवसायातील मिळणाऱ्या नफ्यात समप्रमाणात वाटेकरी असतील. बँकेचा आपल्या खातेदारांबरोबर असा करार आहे की त्यांचे भांडवल बँकिंग व्यवसायात गुंतविल्यावर होणाऱ्या नफ्यात एक चतुर्थांश भाग बँकेच्या आणि तीन चतुर्थांश भाग खातेदारांच्या वाट्यास येईल.

हे एकत्रित साठ लाखांचे भांडवल बँक विविध व्यावसायिक पक्षांना एका वर्षाच्या मुदतीसाठी बटाई तत्त्वावर पुरवील. ते या अटीवर की व्यावसायिक पक्ष या भांडवलाच्या आधारावर होणाऱ्या व्यवसायाच्या नफ्यापैकी निम्मा वाटा बँकेस आणि निम्मा वाटा स्वत:करिता ठेवील. एका वर्षाची मुदत संपल्यावर हिशोब करण्यात येईल. या हिशोबावरून लक्षात येते की काही व्यावसायिक पक्षांना नफा व काहींना तोटा झाला आहे. काहींना नफा कमी व काहींना नफा जास्त झाला आहे. तोट्याच्या सर्व रकमा आणि नफ्याच्या सर्व रकमापैकी बँकेचे वाटे एकत्रित करण्यासाठी तीन विविध पद्धतींचा अंगीकार करता येईल. प्रथम पद्धत अशी की सामुदायिकरित्या नफा मिळावा. द्वितीय पद्धत अशी की सामुदायिकरित्या तोटा असावा. तृतीय पद्धत अशी की नफा आणि तोटा न होता बँकेस आपले भांडवल परत मिळावे. खालील मजकुरात या तिन्ही पद्धतींवर वेगवेगळ्या प्रकारे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे.

पहिल्या पद्धतीत आपण असे गृहीत धरूया की, बँकेने ज्या व्यावसायिक पक्षांना भांडवलपुरवठा केलेला आहे, त्यांच्याकडून सामुदायिकरित्या तीन लाख रुपये बँकेस नफा मिळाला. (उदाहरणार्थ, ज्या व्यावसायिकांना नफा झाला आहे, या सर्वांच्या नफ्याची रक्कम आठ लाख रुपये एवढ़ी आहे. ज्या व्यावसायिकांना तोटा झाला, त्यांच्या तोट्याची रक्कम एक लाख रुपये आहे. याप्रमाणे बँकेस चार लाख रुपये एवढ़ा नफा आणि एक लाख रुपये तोटा झाला. अर्थात, यानुसार बँकेचा, निव्वळ नफा 'चार लाख, एक लाख, तीन लाख' एवढ़ा झाला.) साठ लाखाच्या भांडवलावर तीन लाख रुपये नफा झाला. म्हणजेच पाच टक्के नफा झाला. खातेदारांबरोबर ठरविलेल्या अटींनुसार त्यांना प्रत्येकी शंभरावर ३.३/४ रुपये मिळतील आणि बाकीचे १.१/४ रुपये प्रत्येकी शंभरावर नफ्याच्या स्वरुपात मिळतील. ५०० रुपये जमा केलेल्या प्रत्येक खातेदारास १८ रुपये ७५ पैसे वार्षिक नफा होईल.

बटाई खात्याची एकूण रक्कम म्हणजे पन्नास लाखावर 'एक लाख सत्त्याऐंशी हजार पाचशे (१,८७,५००) रुपयांच्या नफ्याची वाटणी करण्यात येईल. बाकीचा नफा म्हणजे 'एक लाख, बारा हजार, पाचशे रुपये (१,१२,५००) भागीदारीचा सामुदायिक नफा होय. हा नफा शेअरहोल्डर्सना वाटण्यात येईल. प्रत्येक शेअरहोल्डरला एक लाखाच्या भांडवलावर 'अकरा हजार, दोनशे पन्नास रुपये (११,२५०) नफा मिळेल.

दुसऱ्या प्रकारात गृहीत धरूया की, बँकेला आपल्या व्यावसायिक पक्षांकडून सामुदायिकरित्या तीन लाख रुपये तोटा उचलावा लागला. (याची विविध कारणे असू शकतात. उदाहरणार्थ, नफा झालेल्या व्यावसायिक पक्षांना त्यांच्या नफ्याची एकत्रित

रक्कम चार-लाख रुपये आहे. यापैकी दोन लाख बँकेचे असतील. परंतु ज्या व्यावसायिक पक्षांना तोटा झाला असेल, त्यांच्या तोट्याची सामूहिक रक्कम पाच लाख एवढी असेल. त्यासाठी एकूणरित्या बँकेस तीन लाखाचा तोटा उचलावा लागेल.) म्हणजे बँकेने बटाई तत्त्वावर पुरविलेल्या ६० लाख रुपयांपैकी केवळ ५७ लाख रुपये परत मिळतील. यातील तोट्याचा दर पाच टक्के झाला. त्यामुळे प्रत्येक खातेदारास त्यांनी जमा केलेल्या रकमेमध्ये पाच टक्के घसारा सहन करावा लागेल. म्हणजेच ५०० रुपये जमा करणाऱ्या प्रत्येक खातेदारास केवळ ४७५ रुपये परत मिळतील. त्याचप्रमाणे शेअरहोल्डरांनासुद्धा प्रत्येकी पाच टक्के तोटा सहन करावा लागेल. प्रत्येक शेअरहोल्डरचे भांडवल आता एक लाख रुपये नसून केवळ ५५ हजार रुपये एवढे उरलेले असेल.

तिसऱ्या प्रकारात असे की, ज्या वेळी बँकेस आपल्या काही व्यावसायिक पक्षांकडून एवढा तोटा उचलावा लागला असेल, इतर व्यावसायिक पक्षांकडून मिळणाऱ्या नफ्यासमान हा तोटा झाला अथवा होणारा नफा याच नुकसानीच्या राशीत गड़प झाला असेल तर, अशा प्रसंगी खातेदार आणि शेअरहोल्डर्सना नफाही मिळणार नाही व तोटाही सहन करावा लागणार नाही.

या उदाहरणांवरून एक गोष्ट स्पष्ट झाली की, तोट्याच्या वेळेस शेअरहोल्डर्स आणि खातेदारांना एकाच दरानुसार नुकसान होते, परंतु नफ्याच्या प्रसंगी शेअरहोल्डरांच्या नफ्याचा दर हा खातेदारांपेक्षा जास्त असतो. या तफावतीचे कारण असे की शेअरहोल्डरांना आपल्या भांडवलावर मिळणारा संपूर्ण नफा मिळतो आणि बटाई खात्याच्या भांडवलावर मिळणाऱ्या नफ्यामध्येसुद्धा वाटा मिळतो. या उलट बटाईच्या खातेदारांना आपल्या भांडवलावर मिळणारा नफासुद्धा पूर्णपणे मिळत नसून केवळ एक भाग म्हणजेच तीन-चतुर्थांश एवढा मिळतो. या तफावतीचे मूळ असे आहे की शेअरहोल्डर्स हेच बँकिंगचा व्यवसाय पूर्णत: सांभाळतात आणि आपली व्यावसायिक पात्रता, अनुभव आणि प्रयत्न पणाला लावून एकूण भांडवलास नफा मिळविण्याचे माध्यम बनवितात. बटाई खातेदारांत रकमा जमा करणारे हे तर केवळ भांडवल पुरवितात आणि व्यवसायात त्यांचा सक्रिय सहभाग नसतो. बँकेची व्यवस्था उभारणे, वेतनरहित सेवा पुरविणे, योग्य व्यवसायाचे शेअर्स निवडून त्यांच्या खरेदी-विक्रीचे योग्य निर्णय घेणे आणि बटाई तत्त्वावर भांडवल गुंतविण्याकरिता योग्य, पात्र व यशस्वी व्यावसायिकांची निवड करणे ही अत्यंत महत्त्वाची कार्ये आहेत व याच कार्यांना शेअरहोल्डर्स स्वत:हून तडीस लावतात किंवा याकरिता वेतनावर तज्ञ मंडळीचे मार्गदर्शन घेतात. बटाई खात्याच्या भांडवलावर मिळणाऱ्या नफ्यांवर त्यांना जो वाटा मिळतो, तो वाटा म्हणजे

त्यांच्या कार्यपात्रतेचे फळ होय. हे शेअरहोल्डर्स वाढीव नफ्यासहित खातेदारांपेक्षा जास्त जोखीमसुद्‌धा उचलतात. कारण बँकिंग व्यवसायात तोट्याच्या प्रसंगी खातेदार हे केवळ आपल्या भांडवलातील एका घटकाचेच नुकसान उचलतात. परंतु शेअरहोल्डर्स हे भांडवलातील नुकसानीव्यतिरिक्त त्यांनी केलेल्या व्यावसायिक धावपळींच्या अपेक्षित फळासमुद्धा मुकतात. अशा प्रकारे त्यांचे द्विगुणित नुकसान होते. या नुकसानीची संभावना आणि परिणाम व्यवसायात नि:संशयरित्या असूनही व्यावसायिक धावपळ करणाऱ्या शेअरहोल्डर्सच्या दृष्टिकोनासमोर ही बाब अगदीच न्यायास अनुसरून आहे की, नफ्याच्या प्रसंगी त्यांना खातेदारांच्या तुलनेत अधिक नफा मिळावा.

४) बँकिंग व्यवसायात कर्जाऊ भांडवलाचा वापर

बँक आपल्या व्यवसाय वृद्धीसाठी सामान्य जनतेकडून घेतलेले कर्जसुद्धा व्यावसायिक गरजांसाठी वापरु शकते. या ठिकाणी हे स्पष्ट करणे आवश्यक आहे की, कर्जाऊ भांडवलसुद्धा व्यवसायात सामील असल्यास नफा-तोट्याच्या वाटणीची पद्धत कशी असेल? अशा परिस्थितीत कर्जाऊ भांडवल हे शेअरहोल्डरांच्या भांडवलात सामील करण्यात येईल. तसेच एकूण भांडवलावर सामूहिक नफा व्यवसायाच्या वाटणीत या कर्जाऊ भांडवलासदेखील हिशोबास सामील करण्यात येईल. उपरोल्लेखित प्रणालीनुसार बटाई खात्याच्या नफ्याच्या वाट्याची निश्चिती आणि विभक्तीकरणानंतर शेष राहिलेल्या नफ्यास केवळ शेअरहोल्डरांनी पुरविलेल्या भांडवलावरच विभागण्यात येईल. कर्जाऊ भांडवल या हिशोबात सामील करण्यात येणार नाही. कारण कर्जाऊ भांडवलाच्या बाबतीत शेअरहोल्डर्सची जबाबदारी केवळ भांडवल परत करणे एवढीच असेल. यावर त्यांना नफा वाटणी करण्याची गरज नाही. व्यवसायात जर तोटा झाला असेल तर प्रथम हा तोटा बटाई खाते, शेअरहोल्डरांचे भांडवल आणि कर्जाऊ भांडवल या सर्वांवर विभागण्यात येईल. बटाई खातेदारांच्या वाट्यात येणाऱ्या तोट्याची निश्चिती झाल्यावर बाकीचा तोटा हा शेअरहोल्डर्स, हे स्वत: त्यांनी पुरविलेल्या भांडवलात (कपात करून) सहन करतील. कारण कर्जाची परतफेड ही, नफा होवो की तोटा, दोन्हीही परिस्थितीत अनिवार्य आहे व याची पूर्णत: जबाबदारी शेअरहोल्डर्सवर आहे. खातेदारांना या प्रकरणाशी काहीच घेणे देणे नसेल.

वर दिलेल्या पहिल्या उदाहरणात असे गृहीत धरावे की बटाई खात्याची एकूण रक्कम केवळ ४० लाख रुपये एवढी होती. शेअरहोल्डरांची रक्कम १० लाख आहे. तसेच त्यांनी १० लाख रुपये कर्ज काढून व्यवसायात गुंतविले आहे. आता तीन लाखाच्या

सामूहिक नफ्यापैकी ४० लाखावर खातेदारांना एक लाख ५० हजार रुपये मिळतील. बाकी एक लाख ५० हजार रुपये शेअरहोल्डरांना वाटप करण्यात येतील. व्यवसायात गुंतविण्यात आलेले आणि व्यवसाय पूर्ण झाल्यावर परत आलेल्या भांडवलातून ४० लाख रुपये खातेदारांना मिळतील आणि १० लाख खातेदारांचे भांडवल बँकेत परत येईल, तसेच १० लाख रुपये कर्जाच्या परतफेडीत जातील. अशा अवस्थेत या परिस्थितीच्या तुलनेत शेअरहोल्डरांना जास्त नफा मिळेल की, ज्यामध्ये कर्जाऊ भांडवल वापरण्यात आलेले नाही. याचे कारण असे की आपल्या जबाबदारीवर घेण्यात आलेल्या कर्जाचा संपूर्ण नफा हा शेअरहोल्डरांनाच मिळेल. खातेदारांना यामध्ये काहीच मिळणार नाही. कारण कर्ज परतफेडीची त्यांच्यावर कोणतीच जबाबदारी नसते.

या व्यवसायात सामुदायिकरित्या तीन लाख रुपये नुकसान झाले असेल आणि ६० लाखाचे जे भांडवल बटाई तत्त्वावर व्यवसायात गुंतविले होते, त्यापैकी केवळ ५७ लाख रुपये बँकेस मिळतील, तेव्हा खातेदारांना पाच टक्केप्रमाणे तोटा सहन करावा लागेल. अर्थात त्यांना ४० लाखांऐवजी केवळ ३८ लाख रुपये मिळतील. बाकी १९ लाखांपैकी दहा लाख रुपये कर्जाच्या परतफेडीत लागतील. शेअरहोल्डरांचे भांडवल १० लाखांपेक्षा कमी होऊन नऊ लाख होईल. प्रत्येक शेअरहोल्डरला दहा टक्के नुकसान होईल, हे नुकसान त्या नुकसानीच्या तुलनेत जास्त असेल की, ज्यामध्ये कर्जाऊ भांडवल न वापरण्याच्या परिस्थितीत शेअरहोल्डरला सहन करावे लागले होते. याचे कारण असे की, शेअरहोल्डर्स हे बँकेने घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीचे जबाबदार आहेत. मग बँकिंग- व्यवसायात नफा मिळो वा तोटा होवो. हे नुकसान खातेदारांच्या तोट्यापेक्षाही टक्केवारीनुसार जास्तच आहे. याचे कारण असे की खातेदारांवर कर्जाच्या परतफेडीची मुळीच जबाबदारी नाही.

या उदाहरणावरून हे स्पष्ट झाले आहे की बँक ज्या वेळेस कर्जाऊ भांडवलाचा व्यवसायासाठी वापर करील, तेव्हा नफ्याच्या स्वरुपात तिला जास्त नफा होईल. तसेच तोट्याच्या वेळीदेखील जास्त तोटा उचलावा लागेल. कर्ज घेतलेल्या भांडवलाची रक्कम भागीदारी तत्त्वावर पुरविण्यात आलेल्या (अर्थात शेअरहोल्डरांच्या) भांडवलाच्या तुलनेत जेवढी जास्त असेल, तोट्याच्या परिस्थितीत शेअरहोल्डरांच्या वाट्याला तोट्याचा दरदेखील जास्त असेल. वैचारिकदृष्ट्या हेसुद्धा शक्य आहे की त्यांना नुकसानीची भरपाई करून कर्जाऊ भांडवलाच्या परतफेडीसाठी त्यांनी पुरविलेल्या भांडवलाव्यतिरिक्त अतिरिक्त भांडवल परत करावे लागेल. परंतु या जोखीमांच्या तुलनेत जेवढे जास्त कर्जाऊ भांडवल वापरण्यात येईल, तेवढाच व्यवसायाच्या नफ्याच्या वेळी भागीदारांच्या (Shareholders) नफ्याचा दर वाढत जाईल.

५) कर्ज खाते

बँक जनतेस जाहीर सुचनेद्वारे कळवील की, जनतेने आपली आय (कमाई) आणि बचती सुरक्षेस्तव आणि अदायगीच्या सवलतीसाठी बँकेस कर्जस्वरुपात द्यावी. बँक याबाबतीत ही जबाबदारी घेईल की, जनतेच्या कोणत्याही व्यक्तीने कर्जस्वरुपात बँकेस दिलेली रक्कम तिने मागणी करताच परत करण्यात येईल. कर्ज खात्यात आपल्या रकमा व ठेवी जमा करणारे खातेदार धनादेशामार्फत काढू शकतील किंवा इतरांना धनादेश (Cheque) देऊन आपली रक्कम स्थलांतरित करू शकतील आणि तेही वाटेल तेव्हा बँक अशा प्रकारच्या सेवा पुरविण्याचा कोणताही मोबदला घेणार नाही. अशा प्रकारचे कर्जखाते हे सध्या प्रचलित असलेल्या चालू खाते (Current account) किंवा डिमांड डिपॉझिट (Demand Deposite) प्रमाणे असेल. तसेच यामुळे सध्या प्रचलित असलेल्याच करंट अकाऊंटप्रमाणेच संपूर्ण सवलती मिळतील.

बँकेजवळ या रकमा अमानतीच्या नव्हे तर कर्जाच्या स्वरुपात असतील. कर्ज खात्यात आपल्या रोख रकमा जमा करणाऱ्यांना पूर्ण हमी देण्यात येईल की मागणी करताच त्याची रक्कम त्यास तत्काळ परत करण्यात येईल. अशा प्रकारची हमी ही देशाच्या केंद्रीय बँकेकडून प्रमाणित असेल. केंद्रीय बँकेचे हे प्रमाणपत्र सार्वजनिक बँकांचे नगदी स्वरुप कायम ठेवून आणि खात्यांच्या वीमायोजनेद्वारे ही हमी विश्वसनीय ठरवील.

या रकमा कर्जस्वरुपी असण्याचा अर्थ असा की, या रकमां जोपर्यंत बँकेत असतील, बँकेच्या वापरात असतील बँकेस याचा पूर्ण अधिकार असेल की, या रकमांचा लाभदायक व्यवसायात बँक वापर करील. कर्ज खात्याच्या भांडवलावरील व्यवसायात बँकेस तोटा झाला तर हा तोटा बँकेस सहन करावा लागेल. खातेदारांना त्यांच्या रकमा कोणतीही कपात न करता परत करावी लागेल. त्याचप्रमाणे कर्ज खात्याच्या भांडवलावरील व्यवसायात बँकेस नफा झाला तर हा नफासुद्धा बँकेस मिळेल. खातेदारांना या नफ्यातून कोणताही वाटा मिळणार नाही.

सामान्यत: लोक आपला कमाविलेला पैसा एकाच वेळी पूर्णपणे खर्च करीत नाहीत. थोडे थोडे पैसे खर्च होतात. या काळात ते आपली कमाई स्वत: जवळ ठेवण्याऐवजी बँकेच्या करंट अकाऊंटमध्ये जमा ठेवतात. आम्ही सादर करीत असलेल्या व्याजरहित व्यवस्थेत या रकमा कर्जखात्यात मोडतील. कारण याचे नेमके स्वरुप प्रचलित करंट अकाउंटप्रमाणेच आहे. शिवाय कर्ज खात्यात अशांच्या बचत रकमादेखील येतील, ज्या त्यांनी बटाई खात्यात ठेवून नफ्याच्या आशेवर नुकसानीची जोखीमा घेण्यासाठी इच्छुक नव्हते. या उलट आपल्या बचतींचे संरक्षण इच्छित होते.

पुढील पानावर हेसुद्धा ठरविण्यात आले की, (व्याजरहित) बँकांना कर्ज प्राप्त होण्याच्या आधारावर त्यांच्याकडून (व्याजरहित) कर्ज पुरवठ्याचीदेखील सेवा प्राप्त करण्यात येईल. जणू प्रचलित व्यवस्थेत व्यावसायिक पक्ष आणि काही अंशी शासन आणि बँकांकडून कर्ज मिळणे हे यावर अवलंबून असेल की त्यांच्या कर्ज खात्यात काही रक्कम जमा असेल. सामुदायिक अथवा सामाजिक जाणीव असणाऱ्या जनतेस कर्जखात्याची ही परिस्थिती या गोष्टीसाठी प्रेरित करेल की, जनतेने स्वत:हून आपल्या रकमेची बचत करून ठेवण्याऐवजी त्या बँकांच्या कर्जखात्यांत जमा करावी.

बँकेच्या कर्ज खात्याचा हिशेब ठेवणे आणि या रकमांच्या सुरक्षेवर येणाऱ्या खर्चाच्या समस्येबाबतीत असे सांगता येईल की, या कर्जखात्यातील जमा रकमांच्या एका भागाच्या व्यावसायिक वापरामधून जी अपेक्षा असेल ती यासाठी पुरेशी असेल की, हा खर्च बटाई व्यवसायातून पूर्ण करण्यात यावा. या रकमांचे स्वरुप कर्जांचे असून केवळ सुरक्षेस्तव ठेवण्यात आलेल्या ठेवींचे नव्हे. यासाठी बँक या खात्यांवर कोणताच सेवा मोबदला (Service charge) लावू शकणार नाही.

आधुनिक बँकांच्या अनुभवावरून असे लक्षात येते की परताव्याच्या अटीनुसार ठेवण्यात आलेल्या अशा खात्यातील रकमा या निश्चितच बचत खात्यात जमा होणाऱ्या रकमांपेक्षा जास्त असतात. (याच्या सविस्तर माहितीस्तव 'अर्थ व्यवस्थेचा वृत्तान्त' ऑग. १९५९ इ. स. पृष्ठ ४३ इ. स. १९५८ मध्ये ग्रेट ब्रिटनच्या बँकांच्या एकूण खात्यांत ६०% रक्कम अशाच प्रकारच्या म्हणजे कर्जखात्यात जमा होती आणि ४०% दीर्घ मुदतीच्या खात्यात जमा होती. कर्जाऊ खात्यांच्या रकमांवर बँक व्याज देत असे. अमेरिकेतसुद्धा दोन्ही खात्याचे प्रमाण हेच आहे. संदर्भ : Whittlesey, Charles R and others : Money and Banking, Page 120, MacMillan N.y. 1963) हीच अवस्था कर्ज आणि बटाई खात्यांच्या बाबतीतही अपेक्षित आहे. उलट वर संकेत दिल्याप्रमाणे आज जे लोक आपल्या बचती दीर्घ मुदतींच्या बचत खात्यांत (Time Deposites) जमा करतात, यापैकी काही आम्ही सादर केलेल्या व्याजमुक्त व्यवस्थेत आपल्या बचती बटाई खात्यांऐवजी कर्जखात्यांत जमा करू शकतात. पुढील चर्चेत आम्ही असे गृहीत धरले आहे की कर्जाऊ खाते आणि बटाई खात्यांचे प्रमाण हे ३:२ असे असेल. (मागील अर्धशतकात लोकांचा कल बदलला आहे. संपूर्ण जगामध्ये कर्जाऊ खात्यांचे प्रमाण कमी होत आहे. परंतु या पुस्तकाची सर्व उदाहरणे ही मागच्या काळातीलच उदाहरणांवर अवलंबून आहेत. कारण काहीही असले तरी मूळ उद्देशावर याचा काहीच प्रभाव होत नाही.)

६) सुरक्षित रोख रक्कम

बँकेसाठी ही बाब शक्य आहे की, कर्जाऊ खात्यातील जमा असलेली एक छोटीशी रक्कम रोख स्वरुपात उपलब्ध ठेवावी, जेणेकरून कर्जाऊ खातेदाराने आपली रक्कम परत मागताच रोख स्वरुपात ती परत करणे शक्य व्हावे. कारण सर्वच खातेदार एकाच वेळी आपल्या रकमा परत घेत नसतात. या व्यवस्थेत ही पद्धत अवलंबण्यात येते. म्हणजेच यासाठी बँक एक ठराविक टक्के रक्कम राखीव ठेवते आणि बाकीची रक्कम वापरत असते.

कर्जाऊ खात्याच्या राखीव ठेवण्यात येणाऱ्या रकमेचे प्रमाण दीर्घ मुदत खात्यांतील रकमांच्या तुलनेत जास्त असते. कारण दीर्घ मुदतीस्तव ठेवलेल्या रकमा परत घेण्यासाठी बँकेस काही काळाआधीच पूर्वसूचना द्यावी लागते. हे असूनही वस्तुत: इंग्लंडमध्ये आणि इतर अनेक देशांत राखीव रक्कम ठेवण्याच्या बाबतीत बँका दोन्ही खात्यांदरम्यान काहीच तफावत बाळगत नाहीत. (D.H. Robertoon : Money, Page 96, Cambridge 1956) जगातील इतर सर्वच बँकांचा आढावा घेतल्यास असे लक्षात येईल, यांची निम्मी संख्या अशी आहे की ज्यामध्ये दोन्ही प्रकारच्या खात्यांतील राखीव प्रमाण सारखेच आहे. बाकीच्या देशांत या दोन्ही प्रकारच्या खात्यांतील राखीव प्रमाण विभिन्न आहे. परंतु आधुनिक काळामध्ये दोन्ही खात्यांतील राखीव प्रमाण समान ठेवण्याचा कल वाढत आहे. या उलट आपल्या खात्याच्या एकत्रित मोजमापाची एक ठराविक टक्केवारी नगदीच्या स्वरुपात राखीव ठेवण्यात येते. आकलन सवलतीकरिता आपणही असेच गृहीत धरलेले आहे की, बँक कर्ज खाते आणि बटाई खात्यादरम्यानातील तुलनेत दहा टक्के राखीव ठेवी. दोन्ही प्रकारच्या खात्यांसाठी समान राखीव प्रमाण गृहीत धरण्याचा आपल्या तात्त्विक चर्चेवर काहीच फरक पड़णार नाही. मात्र बचतीसंबंधीच्या विषयावर जी संख्यात्मक उदाहरणे देण्यात येत आहेत, तीं मात्र किचकट होण्याची संभावना आहे.

व्यावसायिक बँकिंग व्यवस्थेत एक योग्य पद्धत अशी आहे की, भागीदारांच्या (Shareholders) भांडवलांवर मिळणारे नफे त्यांना पूर्णच्या पूर्ण दिले जात नसून त्यातील काही अंश रोखून धरण्यात येतात आणि विविध प्रकारचे राखीव (निधी) फंड स्थापण्यात येतात. सर्वांत जास्त महत्त्वाची अथवा राखीव राशी बँकेला दिवाळखोरीपासून वाचविण्याच्या उद्दिष्टपूर्तीस्तव ठेवण्यात येणारीच असते. एखाद्या असामान्य स्वरुपाचा तोटा बँकेस झाल्यास ही राखीव राशी वापरण्यात येते. सामान्य अवस्थेतसुद्धा ही पद्धत चांगलीच उपयुक्त ठरते. ती म्हणजे अशी की, नफ्यातील काही भाग रोखून बँकेस होणाऱ्या आर्थिक हानीची भरपाई करण्यात यावी आणि भांडवलदारांचे भांडवल कमी होऊ देऊ नये.

प्रश्न असा आहे की, बटाई खातेदारांच्या वाट्यास येणाऱ्या नफ्याचा काही भाग खातेदारास न देता तसाच रोखून या रोखलेल्या रकमेच्या माध्यमाने बँकेस होणाऱ्या नुकसानीची भरपाई (मागे झालेल्या नफ्याने) करण्यात यावी काय? तसेच त्यांच्या जमा रकमेतही कपात करावी काय? याचे उत्तर असे की, ''होय! असे करता येईल.'' मात्र अट एवढीच आहे की, हे पथ्य पाळणे या ठिकाणी अत्यावश्यक आहे की, 'अ' पक्षाच्या नुकसानीची भरपाई 'ब' पक्षाच्या नफ्याच्या रकमेतून करता कामा नये. ही गोष्ट अगदी निरीक्षण करून जाणून घेतली पाहिजे की, कोणत्या खातेदाराच्या नफ्यातून किती रक्कम राखीव राशीत ठेवण्यात आली आहे. त्याचबरोबर खातेदाराच्या नुकसानीची भरपाई त्याच खातेदाराच्या नफ्यातून करण्यात यावी. ज्या वेळी एखादा खातेदार आपले खाते बंद करीत असेल त्या वेळी त्याला चालू वर्षाच्या नफ्याबरोबरच राखीव असलेल्या रकमेतूनसुद्धा एवढी रक्कम अवश्य मिळावी की, जेवढी रक्कम त्याच्या मागील नफ्यातून रोखून ठेवण्यात आलेली होती आणि जी नुकसानीच्या वेळी वापरण्यात आलेली नसेल.

ही पद्धत अंगीकारण्याचा असा फायदा आहे की, व्यवसायात होणाऱ्या तोट्याच्या वेळी बँकेला कोणत्याही खातेदाराच्या खात्यातील रक्कम कपातीची घोषणा करण्याची गरज पडणार नाही. केवळ अशाच खातेदारांच्या रकमा कपात करण्याची गरज पडेल जे आपले खाते बंद करीत आहेत. तसेच त्यांच्या मागील नफ्यातून सुरक्षित केलेली रक्कमसुद्धा वर्तमान नुकसानीची भरपाई करण्याएवढी नसेल.

उपरोक्त पद्धत अंगीकारताना न्यायानुरुप वागणुकीसाठी हिशोबाचा बोजा खूप जास्त वाढ़ेल आणि यावर खूप खर्चही येईल. ही समस्या सोडविण्यासाठी या बाबीवर लक्ष द्यावे लागेल की, प्रत्येक भागीदार व खातेदाराने या गोष्टीवर सहमती दर्शवावी की, नुकसान उचलणाऱ्या भागीदार व खातेदारांची मदत व सहकार्य आणि व्यावसायिक बँकिंग व्यवस्थेचे सामुदायिक हित जोपासण्याकरिता सहकार्याच्या भावनेनुसार त्यांनी आपल्या नफ्याचा एक वाटा नुकसान भरपाईकरिता समर्पित करावा. अशा परिस्थितीत रोखून ठेवलेल्या नफ्यातून स्थापन करण्यात आलेले राखीव फंड हे बँकेच्या मालकीचे असेल आणि जर बँकेने व्यवसाय बंद करण्याचा निर्णय घेतला, तर याविषयीची जमा असलेली रक्कम भागीदारांच्या दरम्यान वाटण्यात येईल.

या पद्धती अवलंबिण्यात येऊ शकतात. पुढील प्रकरणांत आपण या पद्धती आणि राखीव खात्यांना डावलून चर्चा करूया, तसेच राखीव खात्यांच्या बाबतीतही. केवळ अशाच खात्यांबाबतींत चर्चा करूया की, ज्यांचा संबंध बटाई आणि कर्जाऊ खात्यांच्या एकूण रकमांची एक निश्चित टक्केवारी या गरजेस्तव ठेवण्यात येईल की यामुळे परत मागण्यात येणारी रक्कम ताबडतोब देणे शक्य व्हावे. राखीव फंडसाठी काढण्यात आलेली नफ्याची काही रक्कमसुद्धा हिशोब ठेवण्यात अडचण निर्माण करणार नाही.

७) बँकांतर्गत स्पर्धा

प्रत्येक बँकेस आपली प्रतिष्ठा कायम ठेवण्याबरोबरच या गोष्टीचीदेखील काळजी लागलेली असते की, आपल्या व्यवसायात जास्तीतजास्त वृद्धी कशी होईल. वृद्धी आणि यश हे बहुधा यावरच अवलंबून असते की भांडवल लावण्यासाठी बँकेने चांगल्या व तज्ञ आणि जास्तीतजास्त नफा देणाऱ्या व्यावसायिकांची निवड करावी. त्याचबरोबर ही बाबसुद्धा महत्त्वाची आहे की त्याच्या बटाई आणि कर्जाऊ खात्यात जास्तीतजास्त रक्कम असावी. बँकांच्या खात्यात जेवढे जास्त भांडवल जमा असेल, तेवढीच जास्त संधी या गोष्टीची उपलब्ध होईल की भांडवल पुरविण्यात एक प्रकारचे नाविन्य किंवा विचित्रता (Diversification) ची नीती अवलंबिण्यात येईल. भांडवल लावण्यासाठी विविध व्यावसायिक पक्ष, विभिन्न उद्योग, विभिन्न प्रदेश आणि विभिन्न मुदतींच्या निवडीमुळे नुकसानीचे प्रमाण कमी तर होते, परंतु असे करणे मोठे भांडवल मिळाल्याशिवाय शक्य होणार नाही.

सामान्य ठेवीदार आणि भांडवलदारांची नजर बँकेने आपल्या बटाई खातेदारांना वस्तुत: सादर करीत असलेल्या नफा दरावर असेल. तसेच जी बँक भूतकाळात आपल्या खातेदारांना नुकसानीतून वाचविण्यासाठी आणि जास्तीतजास्त दरानुसार नफा देण्यात यशस्वी ठरली असेल, तीच बँक जास्तीतजास्त प्रमाणात ठेवीदार आणि भांडवलदारांना आपल्याकडे आकर्षित करू शकेल. यावरच बँकांच्या आपसातील स्पर्धा असतील.

स्पर्धेचे आणखीन दुसरे क्षेत्र म्हणजे मोबदल्यावर पुरविण्यात येणाऱ्या सेवांची योग्य पद्धत, पारदर्शकता आणि कमीतकमी मोबदला हे होय. बँकांच्या दरम्यान व्याजरहित व्यवस्थेतसुद्धा त्यांची कार्यप्रणाली उच्च आणि उत्तम बनविण्याचा आधारसिद्ध होईल.

आधुनिक वित्तशास्त्रात वा उपजीविकेत दिवसेंदिवस मध्यम वित्त संस्था (Financial Intermediaries) चे महत्त्व वाढतच आहे. या संस्था जनतेच्या ठेवी वा अनामती मिळविण्याकरिता तऱ्हेतऱ्हेच्या सवलती पुरवित आहेत. उदाहरणार्थ, प्रोव्हिडेंट फंडची योजना, इन्शुरन्स कंपन्या, गृहनिर्माण संस्था, वगैरे या संस्थांबरोबरही बँकांना स्पर्धा करावी लागते. अशा स्पर्धेत यश मिळविण्यासाठी हे देखील आवश्यक आहे की, त्यांनी या सेवांचा जास्तीतजास्त विस्तार करावा आणि या सेवा विनामोबदला किंवा अत्यल्प मोबदला घेऊन पुरवाव्यात.

प्रकरण चौथे

बँकांचे कर्ज

बँक ही व्यावसायिकांना अल्पमुदतींचे विनामूल्य कर्ज देईल. मात्र अशा प्रकारची सेवा मर्यादित असेल आणि ही मर्यादा तिच्या कर्जखात्यातील जमा असलेल्या भांडवलावर ठरविण्यात येईल. कर्ज घेणाऱ्यांना ठराविक वेळेसाठी घेतलेल्या कर्जाच्या रकमेच्या परतफेडीचा जामीन द्यावा लागेल.

हे कर्ज व्याजरहित आणि विनामूल्य असले तरी समाज मात्र या सेवेकरिता बँकांना या महत्त्वाच्या समाजसेवेचे फळ अवश्य देईल. म्हणजेच बँकांना कर्जखात्यातील जमाराशी लाभदायक व्यवसायांमध्ये गुंतविण्याची पूर्ण परवानगी देईल. तसेच बँक तिच्या कर्जखात्यात जमा असलेल्या भांडवलावर कोणत्याच प्रकारचे व्याजही देणार नाही.

बँकेत जे लोक आपल्या बचती आणि भांडवल, कर्ज स्वरुपात जमा करतील, त्यांना वाटेल त्या वेळी ते परत घेता येईल. परंतु बँकाच्या दीर्घ अनुभवावरून असे लक्षात आले की, चालू खात्यामध्ये जमा करण्यात येणाऱ्या रकमांचा एक भला मोठा भाग तसाच पडून राहतो. त्याच्या परतीची मागणी सहसा होत नसते. एखाद्या दिवशी वा एका आठवड्यात एक छोटीशी रक्कम या खात्यातून परत करण्याची गरज पडते. अर्थात १० टक्क्यांच्या जवळपास रक्कम परत करण्याची गरज पडत असते आणि ९० टक्के भांडवल म्हणजे मोठे भांडवल जशास तसेच पडून असते. शिवाय दररोज नवीन रकमादेखील जमा होतच असतात. (वैयक्तिक खात्यांच्या संख्येत वाढ आणि घट होत जाते. खातेदार येत-जात असतात, परंतु सामूहिकरित्या करंट अकाउंटची रक्कम जशास तशीच असते. संदर्भ : रेड कल्फ कमेटी रिपोर्ट, पृष्ठ ४३) बँकेने कर्जखात्यातील एकूण रकमेपैकी काही भाग (उदा. : १० ते २० टक्के) नेहमी रोख स्वरुपात आपल्याजवळ सुरक्षित ठेवल्यास या सुरक्षित रकमेमुळे आणि रोज जमा होणाऱ्या रकमेमुळे लोकांना नगदी रक्कम देणे शक्य होईल. सद्यस्थितीतील बँकिंग व्यवस्थेतील करंट अकांऊटमध्ये जमा होणाऱ्या रकमेचा उर्वरित मोठा भाग हा अल्पमुदतीकरिता व्याजावर कर्ज देण्यासाठी वापरण्यात येतो आणि यामुळे बँकांची भरघोस कमाई होत असते. परंतु व्याजरहित व्यवस्थेमध्ये ही मोठी रक्कम व्याजरहित कर्ज देण्यासाठी वापरण्यात येईल. तसेच दुसरा भाग बटाई तत्त्वावर भांडवल पुरवून नफा मिळविण्यासाठी वापरण्यात येईल.

यातून मिळणाऱ्या नफ्याचा काहीही अंश खातेदारांना देण्यात येणार नाही. आमचा अनुमान असा आहे की, बटाई तत्त्वावर भांडवल पुरवून मिळणाऱ्या नफ्याची रक्कम ही त्यापासून मिळणाऱ्या व्याजापेक्षा निश्चितच जास्त असेल. यासाठी आपण हा विषय सध्या बाजुला ठेवून मूळ चर्चेचा महत्त्वाचा विषय घेऊया. कर्ज खात्याच्या लाभदायक उपयोगाचा अधिकार या बाबीवर अवलंबून आहे की, या खात्यातील दुसरा भाग व्याजरहित लोकांना व्याजरहित कर्ज देण्यात यावे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे व्याजरहित बँकांच्या कर्जखात्यात काही अशा प्रकारच्या रकमासुद्धा जमा असतात, जशा वर्तमान बँकात दीर्घ मुदतींच्या खात्यात जमा असतात. मुदत संपेपर्यंत या रकमेंच्या मालकांना आपल्या रकमा वापरण्याचा अधिकार नसला तरी त्यांना बटाई खात्यात जमा करून तोटा उचलण्याची जोखीमदेखील नसते. ही बाब खरी असेल तर आम्ही प्रस्तुत केलेल्या व्यवस्थेच्या कर्जखात्यात निश्चितच वर्तमान व्यवस्थेच्या (व्याजव्यवस्थेच्या) खात्याच्या तुलनेत जास्त रकमा जमा होतील.

पुढील मजकुरात 'केंद्रीय बँके'च्या बाबतीत स्पष्ट करण्यात येईलच की, व्याजरहित कर्ज देण्याच्या कारणास्तव व्यावसायिक बँकांना याचासुद्धा अधिकार असेल की, त्यांना गरज पडल्यास केंद्रीय बँकेकडूनही कर्ज घेता यावे.

आमचा प्रस्ताव असा आहे की सर्वसामान्य व्यावसायिक बँकांना त्यांनी दिलेल्या कर्जाच्या एकूण रकमेच्या एका ठराविक प्रमाणाच्या मर्यादेपर्यंत केंद्रीय बँकेतर्फे कर्ज देता येऊ शकेल. सामान्य बँक ही, केंद्रीय बँकेकडून कर्ज घेतेवेळेस आपण दिलेल्या कर्जांची कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे जामिनाच्या स्वरुपात सादर करील. केंद्रीय बँक तिने दिलेल्या कर्जावर कोणत्याही प्रकारचे व्याज अथवा सेवाशुल्क वा सेवाकर आकारणार नाही.

या संक्षिप्त वर्णनानंतर याच्या काही पैलूंवर सविस्तर चर्चा करणे योग्य ठरेल. कारण आधुनिक वित्तशास्त्र आणि वर्तमान बँकव्यवस्थेच्या तज्ज्ञांसाठी ही एक अशा प्रकारची नवीन व अपरिचित आर्थिक विचारधारा आहे आणि एक नवीन प्रस्ताव आहे की, याच्या बुद्धिसंमत आणि वास्तविक उपयुक्ततेवर समाधान होण्यासाठी या प्रस्तावाच्या प्रत्येक पैलू आणि प्रत्येक बाजूला स्पष्ट करावेच लागेल. यासाठी खाली दिलेल्या काही बाबींवर आपण स्वतंत्ररित्या चर्चा करूया.

१) व्यावसायिकांसाठी अल्पमुदतीच्या कर्जांचे महत्त्व आणि व्याजरहित उपजीविकेत यांच्या पुरवठ्याचे संभावित स्वरुप.

२) सामान्य बँकांसाठी व्याजरहित कर्ज देण्याच्या आधारभूत प्रेरणा.

३) कर्जखात्यातून बिनव्याजी कर्ज देण्यासाठी मर्यादांची निश्चिती.

४) वास्तविक गरजवंतास कर्ज देण्याचा निर्णय.

५) देण्यात येणाऱ्या कर्जांच्या मुदती ठरविण्याचे नियम.

६) देण्यात येणाऱ्या कर्जांचे जामीन.

७) देण्यात येणाऱ्या कर्जांच्या हिशोब व कागदपत्रांवर येणाऱ्या खर्चांची समस्या.

आता आपण या बाबींवर क्रमवार सविस्तर चर्चा करूया.

१) अल्पमुदतीच्या कर्जांची गरज व त्यांचा पुरवठा

व्यावसायिकांना कधीकधी अल्पावधीकरिता भांडवलाची गरज पड़त असते. अशा प्रकारची गरज औद्योगिक, वित्तीय आणि कृषिक वगैरे सर्वच प्रकारच्या व्यवसायासाठी पड़त असते, परंतु औद्योगिक व्यवसायात अशा प्रकारच्या गरजा सामान्यत: निर्मिती कार्याच्या पूर्णत्वाच्या वेळी पडत असतात. अशा प्रकारची उद्योजकांस काही दिवस वा काही आठवड्यांकरिता भांडवलाची गरज भासत असते. त्यास या गोष्टीची शास्वती असते की या मुदतीनंतर आपल्या उत्पादनाच्या विक्रीपासून मिळणाऱ्या कमाईच्या माध्यमाने तो हे कर्जाऊ भांडवल परत फेडू शकतो. बाहेरून माल आयात करून बाजारात विकणारा व्यापारीसुद्‌धा त्याचा माल बाजारामध्ये विकण्यापर्यंत भांडवलाचा गरजवंत असतोच. कृषी व्यवसायात पीक तयार होऊन ते बाजारात विकेपर्यंत भांडवलाची गरज पडू शकते. आधुनिक वित्त क्षेत्रात ही गरज बँकेकडून अल्पमुदतीवर मिळणाऱ्या कर्जाने पूर्ण होत असते. ही कर्जे तत्काळ परतीच्या वायद्यावर एका दिवसासाठी, काही दिवसांसाठी अथवा काही आठवड्यांसाठी मिळविण्यात येत असतात आणि या कर्जांवर निश्चित दरानुसार व्याज आकारण्यात येत असते.

व्यावसायिकांना अल्प मुदतीकरिता लागणारे भांडवल हे भागीदारी अथवा बटाई तत्त्वावर मिळविणेच या समस्येचे समाधान होऊ शकते. याचे पहिले कारण असे की एवढ्या अल्पावधीसाठी देण्यात येणाऱ्या कर्जाचा हिशोब खूप किचकट होतो. दुसरे असे, कोणताही व्यावसायिक हे सहन करणार नाही की व्यवसायकार्यपूर्तीच्या वेळेवर कोणताही भांडवलदार भागीदारीचा करार करून त्याच्या नफ्यात वाटेकरी व्हावा. कारण हा नफा व्यावसायिकाने स्वत: कष्ट करून कमावलेला असून आयत्या मालावर भांडवलदाराचा वाटाच होईल. या व्यवसायात शेवटच्या वेळी तोटा झाल्यास अथवा तोटा होण्याची चिन्हे दिसत असल्यास व्यावसायिकास कोणताही भांडवलदार भांडवल पुरविणार नाही.

या समस्येचे समाधान अशा प्रकारेसुद्‌धा शक्य नाही की, व्यावसायिकाने ह्या गरजपूर्तीस्तव सुरुवातीपासूनच भांडवल सुरक्षित ठेवावे. कारण हे सुरक्षित ठेवण्यात आलेले भांडवल इतक्या दिवस पडून राहणे आणि अगदी शेवटच्या काळासाठी त्या भांडवलाचा वापर होणे म्हणजे ही रक्कम भांडवलाच्या प्रमाणात मर्यादित होईल. वित्त क्षेत्रात अशाच प्रकारे या समस्येचे समाधान ठरविल्यास यामुळे एकूण व्यवसायाच्या सीमा अकुंचित होतील. तसेच आर्थिक प्रगती मंदावेल. यासाठी व्यवसायाच्या वृद्धीसाठी आणि त्याच्या वैभवसंपन्नतेसाठी अल्पमुदतीच्या कर्जाचीच खरी आवश्यकता आहे.

अशा प्रकारच्या गरजेची पूर्ती केवळ 'पत' (Credit) अथवा बँकेमार्फत भांडवल पुरवठ्यानेच शक्य आहे. कारण ही 'पत'सुद्धा गरजेपुरतीच अल्पावधीची असते. एखादा व्यावसायिक बँकेतून कर्ज घेतेवेळेस तो बँकेसाठी नवीन आर्थिक

शक्तीचे स्त्रोत निर्माण करतो. (अर्थात ही अर्थशक्ती म्हणजेच बँक संपत्ती अथवा 'पत' निर्मितीचे कार्य हे तात्पुरत्या स्वरुपातील आणि उपयुक्त समाजसेवांसाठी योग्य स्त्रोताकडे संबंधित करणे योग्य ठरेल. उदाहरणार्थ : D. H. Robertson : Mondy, Chapter V Cambridge, 1956) व्यवसायापूर्तीनंतर आणि उत्पादन विक्रीनंतर बँकेकडून घेतलेले कर्ज व्यावसायिक परत करीत असतो. अशावेळी बँकेत उभारलेला निधी हा परत झालेल्या रकमेच्या प्रमाणात कमी होत असतो. तात्पुरत्या स्वरुपात उभारण्यात आलेल्या या रकमेच्या माध्यमाने एक अतिशय महत्त्वाची समाजसेवा होत असते. अर्थात उत्पादन वगैरेच्या तयारीसाठी लावण्यात येणाऱ्या उत्पादनसेवांना त्यांचा मोबदला बाजारात विक्रीपूर्वीच आणि त्याची किंमत मिळण्यापूर्वीच हस्तगत होतो.

आधुनिक व्याजावर आधारित असलेल्या आर्थिक चलनातील अल्पमुदतीच्या कर्जपद्धतीवर कार्य होत असते. अशा प्रकारच्या कर्जांवर बँक जे व्याज घेत असते, त्यामुळे ही वस्तुस्थिती मुळीच प्रभावित होत नाही की, बँकेने दिलेली कर्जे अशा नवीन निधी असतात की ज्या याच हेतुपूर्तीस्तव तात्पुरत्या स्वरुपात अस्तित्वात आणून कर्ज परतीसह आपोआप नष्ट होत असतात. आपल्या वर्तमान प्रचलित व्यवस्थेतसुद्धा याचे असेच स्वरुप असेल. याचा अर्थ असा झाला की वित्तव्यवस्थेत व्याजप्रणाली असो वा नसो, बँक निधीच्या स्वरुपावर आणि तात्पुरत्या कर्जांच्या समाजकार्यावर कोणताच प्रभाव पड़त नाही.

२) कर्जखाते आणि अल्पमुदत कर्ज

वरील प्रकरणात आम्ही स्पष्ट केले की बँक ही तत्काळ परतीच्या करारावरील कर्जांचे एक ठराविक प्रमाण (उदाहरणार्थ : १० टक्के) रोख स्वरुपात सुरक्षित ठेवित असल्यास या सुरक्षितनिधी किंवा दैनंदिन जमा करण्यात येणारी नवीन कर्जभांडवलाच्या साहाय्याने या खात्यातून परत मागण्यात येणाऱ्या एकूण रकमा परत करता येऊ शकतात. सद्यस्थितीत सामान्यत: लोक आपल्या बचती आणि भांडवल आपल्याजवळ ठेवण्याऐवजी बँकेत जमा ठेवतात. याशिवाय आपल्या कमाईचा बराचसा भाग बँकेत जमा ठेवतात. तसेच देवाणघेवाणीच्या व्यवहारात चेक (धनादेश) द्वारे आर्थिक उलाढाल होत असते. यामध्ये आदान-प्रदानाची खूप सवलतदेखील निर्माण होते. हे लोक व्यापारी, कर्मचारीवर्ग, विविध सेवा पुरविणारे तज्ञ हे धनादेश आपापल्या खात्यात जमा करीत असतात आणि व्यवहार सुरळीत होतो. लोकांच्या याच पद्धतीमुळे बँकेमध्ये भरमसाठ पैसा जमा असतो आणि अगदी आपल्या थोड्याशा खर्चापुरताच पैसा घरात असतो. बरेचशे धनादेश न वठविता ते सरळ आपल्या खात्यात जमा होत असतात. लोकांचा हाच पैसा बँकेचे मूळ भांडवलस्त्रोत असून यामुळेच समाजात निधीची एकूण रक्कम त्याच्या किंमतीच्या कितीतरी पटीने वाढ़त असते.

याच पद्धतीमुळे बँका ही पद्धत अवलंबित असतात की त्यांच्या खात्यात जमा होणाऱ्या रकमेचा एक भाग (१० टक्के) सुरक्षित ठेवल्यावरसुद्धा ही रक्कम वापरण्याजोगीच गृहीत धरली जाते आणि या रकमेचा सर्रास वापर केला जातो. वर्तमान बँकिंग व्यवस्थेत हा वापर म्हणजे व्याजावर कर्ज देण्याच्या स्वरुपात होत असतो. परंतु आमची विचारधारा अशी आहे की व्याजमुक्त उपजीविकेत या जमा रकमेचा एक भाग बटाई तत्त्वावर भांडवल पुरवून लाभ मिळविण्याकरिता वापरण्यात येईल आणि एक भाग अल्प मुदतीचे व्याजरहित कर्ज देण्यासाठी वापरण्यात येईल.

बटाई तत्त्वावर व्यावसायिकांना पुरविण्यात येणाऱ्या भागाचा मोठा हिस्सा परत कोणत्या ना कोणत्या बँकेत जमा करण्यात येईल. कारण व्यावसायिकांनासुद्‌धा सामान्यांसारखी सवय असते की ते बरेच परतावे (Payments), कच्च्या मालाचे दाम, वेतन, कारखान्याच्या इमारतींचे भाडे वगैरे धनादेशाच्या माध्यमानेच अदा करीत असतात. याच सवलतीसाठी ते आपल्या रकमा बँकांमध्ये चालू खात्यांत जमा ठेवतात आणि आम्ही सादर केलेल्या व्यवस्थेत मात्र ते आपल्या रकमा 'कर्जखात्यात' जमा ठेवतील. व्याजमुक्त कर्जखातेच वर्तमान चालू खात्यांना योग्य पर्याय आहेत.

या कर्जखात्यांचा जो भाग व्यावसायिकांना अल्पमुदतींसाठी कर्ज देण्यासाठी वापरण्यात येईल त्याचा बराच भागसुद्‌धा पुन्हा कोणत्या ना कोणत्या बँकेत जमा करण्यात येईल. कारण या रकमासुद्‌धा व्यावसायिक धनादेशाद्वारेच प्रदान करतात.

या प्रकरणात आपण बँक निधी उभारणीच्या कार्याबाबत आणि व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेत तिला चालू ठेवण्याविषयी चर्चा करीत नसून या विषयावर आपण पुढील काही प्रकरणांत सविस्तर चर्चा करुया. येथे केवळ एवढ्याच मुद्दा स्पष्ट करण्याचा उद्देश आहे की, आम्ही सादर केलेल्या पद्धतीनुसार बँका कर्जखात्यांच्या रकमांचा मोठा भाग कर्ज देणे आणि बटाई तत्त्वावर भांडवल पुरविण्यासाठी वापरु शकतील. या पद्धतीमुळे त्यांच्याच खात्यात वाढीव रकमा जमा होत जातील आणि ही शृंखला वर्तमान काळातील बँकेप्रमाणेच खूप वाढत जाईल. अशा प्रकारे व्यावसायिक पक्षांस अल्प मुदतींच्या कर्जांची गरज आणि या गरजांच्या महत्त्वांना दृष्टीसमोर ठेवून आम्ही ही (व्याजरहित) प्रणाली सादर केली आहे. या प्रणालीवरून येणाऱ्या समस्यांवर अथवा अडचणींवर आपण पुढे चर्चा करू, परंतु यामध्ये निश्चितच या प्रणालीनुसार या गरजा पूर्ण होतील.

३) व्याजमुक्त कर्ज मिळण्याच्या प्रेरणा

आता आपण या प्रस्तुत प्रणालीच्या कार्यात्मक स्वरुपावर चर्चा करुया की, बँकांना व्याजमुक्त कर्ज देण्याच्या शक्तिशाली प्रेरणा (Efforts) किंवा बाबीं पुरवून याकरिता प्रयत्न केले जाऊ शकतात की त्यांनी व्याजमुक्त कर्जपुरवठा करीत जावा जेणेकरून एक सामाजिक गरज पूर्ण होत राहावी.

वर उल्लेख केल्याप्रमाणे केंद्रीय बँकेकडून असा नियमच तयार करण्यात यावा की, प्रत्येक बँकेची ही जबाबदारी असेल की, तिने आपल्या कर्जखात्यात जमा असलेल्या एकूण रकमेपैकी काही रक्कम (उदा : ५० टक्के रक्कम) व्याजमुक्त कर्जासाठी द्यावी. याचा फायदा असा होईल की, या कर्ज देण्याच्या मोबदल्यात तिला (बँकेला) या गोष्टीचा अधिकार असेल की, तिने या खात्याची ४० टक्के रक्कम लाभदायक व्यवसाय कार्यात गुंतवावी. बाकी १० टक्के रकमेच्या बाबतीत आपण असे गृहीत धरीत आहोत की ही रक्कम बँकेंत रोख (Cash) स्वरुपात सुरक्षित असेल. जी बँक व्याजमुक्त कर्ज देण्यास तयार नसेल, त्या बँकेस कर्जखाते उघडण्याची परवानगी नसेल. म्हणजेच लोकांच्या अनामत रकमा व ठेवी आणि भांडवल बिनव्याजी तत्त्वावर त्या बँकेस स्वीकारण्याची परवानगी नसेल. केवळ अशा बँकेलाच लोकांकडून कर्ज घेण्याचा अधिकार असेल की, जी बँक या कर्जांचा निम्मा भाग इतरांना व्याजमुक्त कर्ज देईल.

हाच नियम बिनव्याजी कर्ज देण्याचा पहिला प्रेरणादायक घटक असेल. कारण बँकेसमोर आपल्या कर्ज खात्याच्या एका ठराविक म्हणजेच ४० टक्के भाग लाभदायक व्यावसायिक कार्यात वापरण्यासाठी मिळत असल्याने हीच संधी बँकेसाठी अतिशय महत्त्वाची असेल आणि कोणत्याही परिस्थितीत बँक ही संधी सोडणार नाही. ही संधी म्हणजेच याच्या मोबदल्यात दुसरा निम्मा भाग (५० टक्के) व्याजमुक्त कर्ज देण्यास्तव तयार असेल. व्याजमुक्त तत्त्वावर घेतलेल्या कर्जाऊ भांडवलास व्याजमुक्त तत्त्वावर कर्ज देण्यात कोणताच तोटा होणार नाही. कारण अशा प्रकारचे कर्ज निश्चितच परत मिळतील. संपूर्ण व्यवस्थाच अशा प्रकारे चालविण्यात येईल की बँकेने लोकांना दिलेली कर्ज अनिवार्यरित्या परत मिळतील. त्याचप्रमाणे कोणतेही नुकसान नसलेल्या या कार्याच्या मोबदल्यात बँकेस ही संधी लाभेल की, तिला एक मोठे भांडवल बटाई तत्त्वावर व्यवसायात गुंतवून यामार्फत व्यावसायिक भाग (Shares) खरेदी करून नफा मिळवता येईल. या पद्धतीमध्ये या गोष्टीची शक्यता नाकारता येत नाही की, फायद्याऐवजी बँकेस तोटा उचलावा लागेल. कारण बँकेस तर कर्ज खात्यांत लोकांनी जमा केलेल्या रकमा तर निश्चितच परत कराव्या लागतील म्हणूनच नुकसानीची जोखीम न उचलण्याचे बँक आटोकाट प्रयत्न करील. तरी ही, दक्षता बाळगण्यासाठी हे भांडवल व्यर्थ पडू देणे योग्य ठरणार नाही. या उलट जास्त शक्यता याच गोष्टीची गृहीत धरता येईल की, पूर्ण दक्षता बाळगून जास्तीतजास्त सुरक्षित व्यवसायात हे भांडवल लावण्यात येईल. मग नफ्याचा दर कमीतकमी का असेना. लाभदायक व्यवसायाचे एक सुरक्षित स्वरुप 'मोबदल्यावर सेवापुरवठा' आहेच. बँकेसमोर अशा व्यावसायिक संस्थांच्या निवडीतसुद्धा काहीच अडचण वा तसदी होणार नाही की, ज्यांच्या बाबतींत मागील अनुभवाच्या आधारावर त्यांना याचे समाधान व्हावे की, त्यांना बटाई तत्त्वांवर भांडवल पुरविण्यात तोट्याची संभावना कमी असेल.

मागील प्रकरणावरून हे स्पष्ट झाले आहे की बँकेस एक मोठे भांडवल बटाई तत्त्वावर खातेदारांकडून आणि भागीदारी तत्त्वावर भागीदारांकडून (By Shareholders) हस्तगत होईल. कर्ज खातेदाराकडून मिळालेल्या भांडवलाच्या वापरायोग्य भागास बँक बटाई आणि भागीदारी तत्त्वावर मिळालेल्या भांडवलासहित एकत्रित करून अथवा जमा करून व्यवसाय कार्यात गुंतवील. अशी अपेक्षा करण्यात काहीच हरकत नाही की, बटाई तत्त्वावर भांडवल लावण्यासाठी योग्य सदस्यांच्या निवडीत बँकामध्ये एवढे कौशल्य असेल की, या व्यवसायात एकूणरित्या नुकसानीची संभावना केवळ ग्राह्य असलेली बाबच वाटेल.

सारांश, आमच्या सादर केलेल्या प्रणालीनुसार बँकेच्या एकूण व्यावसायिक परिणामस्वरुप एका प्रचंड भांडवलाच्या लाभदायक नव्हे तर अतिलाभदायक वापराची संधी मिळते, तीदेखील या अटीसहित की या नफ्याचा किंचित भागसुद्धा भांडवलदारास देणे नाही. ही प्रत्येकासाठी अतिशय आकर्षणाची बाब आहे. तसेच या गोष्टीसाठी ही बाब खूप प्रेरणादायी आहे की, अशी उत्तम संधी मिळविण्यासाठी बँक कर्ज खात्यातील दुसरा भाग व्याजमुक्त तत्त्वावर देण्यास निश्चितच तयार असेल.

केंद्रीय बँक असा नियम लागू करील की, सामान्य व्यावसायिक बँका गरजप्रसंगी केंद्रीय बँकेकडून कर्ज घेऊ शकतील. या कर्जांवर कोणत्याही प्रकारचे व्याज आकारले जाणार नाही. शिवाय कोणत्याही स्वरुपाचे शुल्क वा मोबदला आकारण्यात येणार नाही. मात्र त्यांना देण्यात येणाऱ्या कर्जाची रक्कम त्यांनी दिलेल्या कर्जाच्या प्रमाणावर अवलंबून असेल. ज्या बँकांनी व्याजमुक्त कर्ज दिलेले नसतील, त्या बँकांना केंद्रीय बँकेकडून कर्ज मिळणार नाही. केंद्रीय बँक कोणत्याही बँकेस या बँकेने दिलेल्या कर्जाच्या १० ते २० टक्के कर्ज देईल. उदाहरणार्थ, एखाद्या बँकेने १० लाख रुपये कर्ज दिले असल्यास त्या बँकेस केंद्रीय बँकेकडून एक ते दोन लाख रुपये कर्ज मिळू शकेल. हे कर्ज बँक आपल्या रोखीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि खातेदारांनी मागणी केलेल्या रकमा देण्यासाठी वापरण्यात येईल. बँकांसाठी सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे जनतेचा विश्वास संपादन करणे होय. अर्थात अचानक गरज पडलेल्या वेळी आणि पाहिजे तेव्हा त्यांना रक्कम परत करण्यासाठी बँकेने तत्काळ आणि विनाविलंब त्यांची मागणी पूर्ण करावी. तसेच त्यांच्या बटाई तत्त्वावरील खात्याच्या रकमा मागणी झाल्यावर योग्य किंवा ठरलेल्या कालमर्यादा संपल्यावर परत कराव्यात. सामान्यत: बँक यासाठी प्रयत्नशील असेल की, ती आपल्याजवळ एवढी रोख रक्कम (Cash) सुरक्षित ठेवील आणि आपण कर्ज दिलेल्या रकमा अथवा बटाई तत्त्वावर पुरविलेल्या रकमांच्या परताव्यासंबंधी कर्ज घेणाऱ्यांकडून अथवा व्यावसायिक- पक्षांकडून अशा प्रकारचे करार करील की, ऐन वेळी

तिला रोखीच्या मागण्या पूर्ण करण्यात कोणतीही अडचण येता कामा नये. परंतु बाजाराची अवस्था आणि जनतेची रकमेची मागणी ही नेहमीच बदलत्या स्वरुपाची असून अशी परिस्थितीदेखील समोर येऊ शकते की बँकेतील रोख रक्कम अशा रोख स्वरुपाच्या मागण्या पूर्ण करण्यास अपुरे पडेल. अशा परीस्थितीत बँकेस केंद्रीय बँकेकडून कोणत्याही मोबदल्याशिवाय कर्ज मिळण्याची सवलत हे एक वरदानच आहे आणि हेच वरदान बँकेस व्याजमुक्त कर्ज देण्यासाठी प्रेरित करील. या विषयावर 'केंद्रीय बँक' या प्रकरणात चर्चा करण्यात येईल.

कर्ज देण्याचा तिसरा प्रेरक घटक म्हणजे बँकेने आपला उच्चतम प्रतिमेचा ठसा खातेदार आणि ग्राहकांच्या मनावर ठसविणे आणि त्यांच्याशी विश्वासपूर्ण संबंध प्रस्थापित करणे होय. लोकांना व्याजमुक्त कर्ज दिल्यामुळे समाजात बँकेविषयी स्नेहपूर्ण आणि जिव्हाळ्याचे संबंध प्रस्थापित होतील. तसेच बँकांची समाजामध्ये अशी प्रतिमा निर्माण होईल की बँकेच्या व्यवस्थेत केवळ आर्थिक स्वार्थाची भावना नसून ती एक समाजसेवी संस्था आहे. बँकिंग- व्यवस्था यशस्वीरित्या राबविण्यासाठी समाजाची ही स्नेहपूर्ण भावना आणि बँकेवरील विश्वास या बाबी निर्णायक सिद्ध होतील. त्यामुळे या भूमीकेत जबरदस्त वजन आहे की बँकेने जनतेचा स्नेह आणि विश्वास संपादन करण्यासाठी व्याजमुक्त कर्जपुरवठा करून कोणतीही जोखीम नसणारी समाजसेवा करावी.

या गोष्टीला कोणत्याही प्रमाण व पुराव्याची गरजच नाही, ज्या लोकांना वा संस्थांना बँकेकडून व्याजमुक्त कर्ज मिळेल ते निश्चितच बँकेचे आभारी व कृतज्ञ असतील आणि परिणामस्वरुप लोक आपले खाते याच बँकेत उघडतील. कारण गरज पडल्यास व्याजमुक्त कर्ज घेता येणे शक्य होईल. आपण जर असा प्रश्न केला की, बँकेने कोणत्या लोकांना व संस्थांना व्याजमुक्त कर्ज द्यावे, तर ही बाब समजण्यासाठी हे समजणेदेखील गरजेचे असेल की या लोकांकडून वा संस्थाकडून बँकेस कशा प्रकारच्या फायद्याची अपेक्षा आहे.

बँक सहसा व्यावसायिकांनाच कर्जपुरवठा करील. तसेच याच बँकेत बटाई तत्त्वावर भांडवल मिळवून व्यवसाय करणाऱ्यांचीच संख्या अशा प्रकारच्या कर्जाचा लाभ घेणाऱ्यांची असेल. हे अल्पमुदतींचे बिनव्याजी आणि अलाभदायक कर्जाचा जितका फायदा व्यावसायिक कार्यात सवलत निर्माण करील, तितकाच जास्त लाभ आणि सवलत बँकेस मिळेल. कारण बँकेचे मूळ हित व्यवसायाच्या यशाशीच संबंधित आहे आणि बँकदेखील त्याच्या नफ्यात भागीदार आहे. हे कर्ज जेवढे त्याच्या नफ्यात वृद्धीचे कारण बनतील तेवढेच वाढणाऱ्या नफ्याच्या वाढत्या प्रमाणाचा लाभ बँकेससुद्धा वाढीव स्वरुपात होईल (वरील मजकुरात आम्ही स्पष्ट केले आहेच की व्यवसायाच्या हिशोबात या अल्पमुदतींच्या कर्जांना सामील करण्यात येणार नाही.)

यात शंकाच नाही की आपल्या व्यावसायिक पक्षांना (बटाई तत्त्वावर) कर्ज दिल्याने बँकेस लाभ होईल आणि हा लाभच कर्ज देण्यासाठी बँकेला प्रेरित करील. अशा प्रकारे ज्या व्यावसायिकांना आणि संस्थांना बँकेकडून अल्पमुदतींसाठी बिनव्याजी कर्ज मिळेल, ते या बँकेशी संबंध वाढविण्यासाठी याच बँकेत कर्जखाते उघडतील. प्रत्येक व्यावसायिक पक्ष अथवा व्यावसायिक संस्था आपल्या व्यावसायिक गरज- पूर्तीस्तव यासाठी चालू खाते उघडते की आपल्याजवळील रकमा जमा करता याव्यात आणि दैनंदिनीच्या देवाणघेवाण व्यवहारासाठी धनादेशामार्फत व्यवहाराची पद्धती वापरता यावी. त्यामुळे आपोआपच ते याच बँकेत आपले खाते उघडतील जेणेकरून गरज भासल्यास त्यांना बँकेकडून वाढ़ीव जमा रक्कम (Overdraft) किंवा अल्पमुदतींची कर्जे (बिनव्याजी) मिळण्याची शास्वती असेल.

बँक अशा प्रकारच्या व्यावसायिक पक्षांना आणि व्यावसायिक संस्थांनादेखील कर्ज देईल की, ज्यांच्याशी कोणत्याच प्रकारचा बटाई किंवा भागीदारी पद्धतीचा करार झालेला नसेल. परंतु असे गृहीत धरणेच योग्य ठरेल की, या पक्षांनी किंवा संस्थांनी कर्ज देणाऱ्या बँकांशी जरी करार केला नसला तरी इतर कोणत्यान कोणत्या बँकेशी तर बटाई किंवा भागीदारी करार अवश्य केलेलाच असणार. अर्थात सर्वच बँकांच्या सामुदायिक हितासाठी हे आवश्यकच ठरते.

आता प्रश्न असा आहे की, बँक व्यावसायिकवर्गाच्या सदस्यांशिवाय इतर ग्राहक आणि शासन अथवा जनकल्याणाच्या इतर संस्थांना कर्ज देईल की नाही? या प्रश्नाविषयी स्वतंत्र स्वरुपात चर्चा करण्याची गरज आहे. या ठिकाणी संक्षिप्तरित्या एवढे स्पष्ट करीत आहोत की, बँकेत चालू खाते असलेल्या लोकांना आणि संस्थांना ही बँक व्याजरहित कर्ज कशा प्रकारे देऊ शकते. या कर्जांचे स्वरुप बहुतेक करून शिलकीपेक्षा अधिक रक्कम (Overdraft) किंवा खात्यांच्या संख्येपेक्षा जास्त रकमांचे असेल. अशा रितीने बँक आपल्या कर्ज खातेदारांना अशी सवलत देईल की कर्ज खात्यात या सवलतीमुळे आपल्या रकमा जमा करण्याची प्रेरणा मिळेल. तसेच बँकेच्या हितासाठीच हे गरजेचे आहे की, बँकेत जास्तीतजास्त रक्कम जमा व्हावी, जेणेकरून जास्तीतजास्त कर्जभांडवलाचा लाभदायक वापर व्हावा. याशिवाय खातेदारांना अकस्मात गरजेच्या वेळी त्याच्या खात्यातील रकमेपेक्षाही जास्त रक्कम म्हणजे छोट्या रकमांचे कर्ज देण्याचे नियम तयार करून त्यांची सहानुभूती आणि विश्वास संपादन करावा. अर्थातच या बाबी बँकेच्या हितांसाठी खूप आवश्यक आहेत.

या तीन प्रेरक बाबीं म्हणजेच लाभदायक वापरासाठी मोठे भांडवल कर्जस्वरुपात मिळविणे, अचानक पडलेल्या गरजपूर्तीस्तव केंद्रीय बँकेकडून व्याजमुक्त कर्ज घेऊन आपल्या रोख भांडवलास स्थैर्य प्रदान करणे आणि व्यावसायिक व जनतेची

सहानुभूती व विश्वास संपादन करणे, हे आपल्या दृष्टिकोनानुसार एवढ्या शक्तीशाली प्रेरक बाबी आहेत की यामुळे यात काहीच शंका नाही की बँक विनासायास आणि स्वखुशीने आपल्या कर्जखात्यातील भांडवलाची एक निश्चित टक्केवारी रक्कम व्याजमुक्त कर्ज देण्यासाठी वापरण्यास तयार होईल.

४) कर्जखाते आणि कर्जांच्या दरम्यान प्रमाणाची निश्चिती

या ठिकाणी एक महत्त्वाचा प्रश्न असा की, नियमानुसार बँकेने कर्जखात्याच्या एकत्रित रकमेच्या किती प्रमाणात कर्ज द्यावे. या प्रश्नाचे नेमके उत्तर हे केवळ व्याजमुक्त अर्थव्यवस्थेच्या कार्यात्मक अनुभवाच्या आधारेच मिळू शकते. व्यावसायिक पक्षांच्या गरजा, बँकेचे व्यावसायिक हित आणि आजीविकेचे एकूण स्वरुप या तिन्ही बाबींचा योग्य आढ़ावा घेऊनच हे प्रमाण ठरविणे शक्य होईल. या नियमाचा हेतु असा आहे की, आजीविकेची एक महत्त्वाची गरज कमीतकमी इतक्या प्रमाणात जरी पूर्ण व्हावी की, व्यवसाय चांगल्या प्रकारे आर्थिक सवलतीसह चालावा आणि त्यात विकास होत राहावा. निश्चित करण्यात आलेली प्रमाणमर्यादा एवढ़ी कमी सुद्धा असू नये की व्यावसायिक पक्षांची गरजही अपुरी असावी वा पूर्ण होऊ नये आणि त्यास आर्थिक चणचण भासावी. आम्ही वर संकेत दिल्याप्रमाणे याचा परिणाम असा होईल की, जे भांडवल दीर्घ मुदतीच्या भांडवलनिर्मितीस्तव वापरात येत असते, याचा एक भाग अस्थायी गरजांच्या पूर्तीमध्येच वापरण्यात येईल आणि परिणामी व्यवसायाची सीमा आकुंचित होईल. त्याचप्रमाणे निश्चित करण्यात आलेली प्रमाणमर्यादा एवढ़ी जास्तसुद्धा असता कामा नये की, नगदी वा रोख राखीव रक्कम काढल्यावर कर्जखात्यामधून बँकेच्या लाभदायकवापरासाठी उरलेला भाग एवढ़ा कमी व्हावा की, बँकेचा यापासून मिळणारा नफा हाच बँकेच्या दृष्टीने इतका पर्याप्त समजला जाऊ नये की, कर्ज खाते ठेवण्याच्या व कर्ज देण्याच्या भानगडीतच पडण्याची तिला गरज पडू नये. प्रस्तुत व्यवस्था यशस्वीरित्या राबविण्यासाठी हे आवश्यक आहे की, उपरोल्लेखित प्रेरक बाबी विश्वास ठेवण्याइतपत शक्तिशाली असाव्यात.

यासाठी आम्हाला असे वाटते की, बँकिंग व्यवस्थेचे तज्ञ आणि व्यावसायिकवर्गादरम्यान सुसंवाद घडवून आणून दोन्ही पक्षांच्या सहमतीने एक विशिष्ट प्रमाण ठरविण्यात यावे, मग अनुभवाच्या आधारे या प्रमाणात कमी-जास्त करण्याची सवलत निर्माण करावी. आम्ही याबाबतीत पुढ़ील प्रकरणात सविस्तर माहिती देऊ. केंद्रीय बँकेस हे प्रमाण कमी-जास्त करण्याचे अधिकार असतील. केवळ उदाहरणास्तव आपण असे गृहीत धरूया की, हे प्रमाण ५० टक्के एवढ़े आहे. अर्थात प्रत्येक बँकेने आपल्या कर्ज खात्यातील एकूण रकमेपैकी ५० टक्के रक्कम व्याजमुक्त कर्ज देण्यासाठी वापरावी. पुढ़ील पृष्ठांवर आपण या प्रमाणासाठी 'प्रमाण कर्ज' (Lending ratio) असे विशेषण वापरुया.

५) कर्जांची गरज आणि पुरवठ्यादरम्यान समतोल

कोणत्याही वेळी उपजीविकेमध्ये बँकांकडून देण्यात येणाऱ्या कर्जाचा एकूण पुरवठा यावर अवलंबून असेल की, हे बँकेच्या एकूण जमा असलेल्या रकमेवर अवलंबून असेल. आम्ही गृहीत धरलेले प्रमाण कर्जानुसार कर्जाचा पुरवठाही कर्जखात्याच्या निम्म्या प्रमाणात (अर्थात ५० टक्के) असेल. कर्ज प्रमाणात योग्य बदल घडवून आणून केंद्रीय बँक कर्जाचा पुरवठा कमी-जास्त करू शकते. कर्जाच्या गरजेबाबतीत मात्र असे म्हणणे योग्य ठरेल की, हे वित्तशास्त्रात दीर्घ मुदत भांडवलाच्या स्तरावर जास्त अवलंबून आहे. कर्ज भांडवलाच्या व्यवसायाच्या अस्थायी स्वरुपातील गरजपूर्ततेसाठीच घेतले जाऊ शकेल. तसेच या अस्थायी गरजा निश्चितच, व्यवसायात वापरण्यात येणाऱ्या स्थिर प्रकारच्या भांडवलावर अवलंबून असतात. वित्तीय भांडवल आणि कार्यात्मक समीक्षा आणि संख्यामार्फत केंद्रीय बँकेसाठी हे अवघड होणार नाही की, एखाद्या वेळी व्यावसायिक वर्गाच्या कर्जाच्या गरजांचा एक योग्य अनुमान लावता येईल. याच अनुमानावरून कर्जाच्या गरजांच्या बाबतीत केंद्रीय बँकेस मार्गदर्शन मिळेल. तसेच 'प्रमाण कर्जांच्या' (Lending ratio) प्रमाणातील बदल आणि 'पत' च्या विस्तारीकरण किंवा अविस्तारीकरणाच्या माध्यमाने कर्जाच्या रकमेला या गरजेसमान करणे अथवा यात समतोल साधणे शक्य होईल.

अल्पमुदतींच्या व्याजमुक्त कर्जांच्या गरजवंतांदरम्यान कर्ज देण्यासाठी उपलब्ध भांडवलाच्या वाटपाबाबतीत आजीविकेचे एकूण हित आणि कर्ज भांडवलाच्या उपयुक्त वापरास प्राधान्य देण्याचा आधार बनवायला पाहिजे. प्राधान्याची गरज यासाठी पडू शकते की, या कर्जांची गरज पुरवठ्यापेक्षा जास्तही वाढू शकते. अशा परिस्थितीत दीर्घ मुदत भांडवलाची ही रक्कम कोणत्याही व्यावसायिकपक्ष अथवा संस्थेने आपल्या व्यवसायात गुंतविली का असेना; ही परिस्थिती समोर ठेवून या गोष्टीचा अनुमान लावणे शक्य होईल की, कोणत्या उद्योगात आणि कोणत्या क्षेत्रात दीर्घ मुदतीच्या भांडवलाच्या प्रमाणापेक्षा किती जास्त अल्प- मुदतीच्या कर्जांची गरज पडू शकते. त्यासाठी योग्य असे होईल की, अनुमान लावण्याचे हे काम स्वतंत्र बँकेवर सोडण्याऐवजी त्यांच्या प्रतिनिधी, व्यावसायिक सदस्य अथवा व्यक्ती आणि नि:पक्ष अर्थतज्ञांची एक समिती स्थापन करून त्याकरवी हे काम करवून घ्यावे आणि ही समिती केंद्रीय बँकेच्या देखरेखीखाली कार्यरत असावी.

एखादी बँक कर्जाच्या एखाद्या अर्जावर विचार करीत असल्यास या अनुमानानुसार बँकेस योग्य मार्गदर्शन अर्जदारामार्फत मिळू शकते. अर्जदाराकडून बँकेस त्याच्या व्यवसायाचे स्वरुप माहीत करून घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे हेसुद्धा माहीत करून घेता येऊ शकते की, या व्यवसायात किती दीर्घ मुदतीचे भांडवल गुंतविण्यात आलेले आहे आणि इतर ठिकाणांहून किती कर्ज घेण्यात आलेले आहे. बँक अर्जदाराच्या कर्जात्मक

गरजेच्या बाबतीत आणि त्याच्या परतफेडीच्या सामर्थ्य व आर्थिक क्षमतेबाबतीतसुद्धा शहानिशा करू शकते. कर्ज घेण्याच्या इच्छुकादरम्यान प्राधान्याचा एक आधार कर्जदारांना मिळालेल्या जामीनींचे प्रमाणसुद्धा आहे. बँकेस या गोष्टींचे पूर्ण अधिकार असावयास हवे की, बँकेने अविश्वसनीय, बेजबाबदार व अक्षम जामीनदारांच्या तुलणेत विश्वसनीय आणि जबाबदार व सक्षम जामीनदारांचा पाठिंबा असलेल्या कर्जाच्या इच्छुकांना कर्ज द्यावे. त्याचप्रमाणे बँकेस या गोष्टीचादेखील अधिकार असावयास पाहिजे की, बँकेने अशा व्यावसायिकपक्षांच्या अर्जांना प्राधान्य द्यावे की, ज्यांच्याबरोबर बँकेने बटाई अथवा भागीदारीचा करार केलेला असेल.

बँकेस असलेल्या प्राधान्य देण्याच्या अधिकाराचा गैरवापर होऊ नये अथवा कर्जाच्या इच्छुकांदरम्यान पक्षपात वा भेदभाव होऊ नये वा इतर अशा समस्यांच्या निराकरणासाठी केंद्रीय बँकेने स्पष्ट प्रकारचे आदर्श नियम तयार करावयास हवेत. कधी कधी कर्जांपासून वंचित असलेल्यांना संधी द्यावयास हवी की, उघडपणे अन्याय करणाऱ्यांवर कार्यवाही करता यावी.

हेदेखील शक्य आहे की, एका बँकेस एखाद्यावेळी जे कर्जमागणींचे अर्ज मिळतील त्या अर्जांपैकी देण्यात येणाऱ्या प्राधान्यास्तव उपरोल्लेखित बाबींची पूर्तता करणाऱ्या सर्वच अर्जांना याकरिता ही मंजुरी देता येणे शक्य नसेल की, बँकेजवळ एवढे कर्ज देण्यापुरते भांडवल उपलब्ध नसते. अशा परिस्थितीत ही पद्धत अवलंबिता येऊ शकते की सुरुवातीस येणाऱ्या कर्जमागणीच्या अर्जांचा प्रथम विचार करण्यात यावा आणि याच क्रमवारीने कर्ज देण्यात यावे.

'व्याजमुक्त कर्जांचा एकूण पुरवठा कर्जाच्या इच्छुकांदरम्यान वाटप करणे आणि कर्ज- भांडवलाचा पुरवठा इच्छुकांशी पूरक ठेवणे' ही समस्या व्याजमुक्त बँकिंगव्यवस्थेच्या अशा समस्यांपैकी एक आहे की, ज्या बाबतीत गंभीरपणे विचार करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे. अशी शक्यता नाकारता येत नाही की, ही व्यवस्था चालू केल्यावर अनुभवाच्या आधारे अशा प्रकारच्या समस्यांचे समाधान होईल.

६) कर्जाची मुदत

व्यावसायिकवर्गासाठी अल्पमुदतींच्या कर्जांच्या गरजेवर चर्चा करतेवेळेस आम्ही हे निदर्शनास आणले आहे की, एवढ्या कमी मुदतीवर बटाई तत्त्वावर भांडवल मिळविणे म्हणजेच हिशोब ठेवण्याच्या अडचणींमुळे शक्य नाही. यामुळे आपोआपच या प्रश्नाचे उत्तर मिळते की, अशा प्रकारच्या कर्जाची कमाल मुदत किती असावी. यामध्ये आमची भूमिका अशी आहे की, ही मुदत बँकेने बटाई तत्त्वावरील कर्जाच्या मुदतींपेक्षाही काही कमी असावी. आमच्या भूमिकेनुसार ही मुदत तिमाही अथवा तेरा आठवड्यांची असावी. देण्यात येणारे कर्ज यापेक्षाही कमी मुदतींचे असावे. ज्या

व्यावसायिकांना तीन महिने किंवा यापेक्षा जास्त मुदतीसाठी भांडवलाची गरज असेल, त्यांनी बँकेकडून बटाई तत्त्वावर कर्ज घेऊन आपली गरज पूर्ण करावी.

जर बटाई तत्त्वावर भांडवलपुरवठ्याची मुदत तेरा आठवडे असेल तर आमच्या भूमिकेनुसार कर्जाची कमीतकमी मुदत दहा आठवडे असायला हवी. याचबरोबर याबाबतीतसुद्धा प्रयत्नशील असावे की, एखाद्या व्यावसायिक व्यक्तीने किंवा संस्थेने अशा कामासाठी बँकेकडून कर्ज घेऊ नये की, ज्यामध्ये बटाई तत्त्वावर मिळविलेले भांडवल लावणे शक्य होईल. यामुळे हे आवश्यक ठरते की, व्यावसायिक आणि संस्थांकरिता हे शक्य होता कामा नये की, त्यांनी एका कर्जाची मुदत संपल्यावर पुन्हा एकदा कर्ज घेऊन या कर्जाचे नूतनीकरण करून वस्तुत: तीन महिन्यांच्या मुदतीच्या भांडवलाससुद्धा कर्जाच्याच माध्यमाने पूर्ण करावे. या कामांवर केंद्रीय बँकेने पूर्णत: लक्ष घालावयास अथवा काळजीपूर्वक हाताळावयास पाहिजे आणि याकरिता योग्य नियम व संहिता तयार करावी लागेल.

कर्जाच्या कमीतकमी मुदतीच्या बाबतीत सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की या मुदतीची कोणतीच मर्यादा ठरविता येत नाही. बँकांनी एकमेकांना कर्ज देण्याच्या बाबतीत २४ तासांसाठी वा यापेक्षा कमी मुदतींसाठी दिलेली कर्जे खूप महत्त्वाची असतात.

कर्ज घेणाऱ्यांना कोणत्याही प्रकारचे व्याज देण्याची गरज नसल्यामुळे आणि या आधारावरच कर्ज परतफेडीच्या मुदतीत वाढ झाल्याने त्यांच्यावर कोणतेही आर्थिक ओझे वाढत नसल्यामुळे त्यांच्यात या गोष्टीची प्रवृत्ती निर्माण होऊ शकते की, ते कोणतीही गरज नसताना कर्जफेडीत विनाकारण उशीरही करतील. यामुळे समाजाचे हीत धोक्यात येऊ शकते. त्यासाठी कर्जाची गरज संपताच ते तत्काळ परत करणे आवश्यक आहे. यासाठी त्यांच्यात समाजहित जोपासणेची जाणीव करून देणे अत्यावश्यक आहे. त्यामध्ये कमीतकमी एवढी जाणीव तर अवश्य निर्माण व्हावी की कर्ज परतफेडीत विनाकारण उशीर केल्यामुळे समाजाच्या एकूण हिताला धोका निर्माण होऊ शकतो. त्याचबरोबर बँकेलादेखील या गोष्टींचे अधिकार द्यावयास पाहिजेत की कर्जाच्या इच्छुकांच्या गरजेच्या खऱ्या-खोट्याचा व्यवस्थित आढावा घेऊनच कर्जाची मुदत ठरवावी. तसेच कर्जाची मुदत संपताच कर्ज वसूल करण्यात यावे. कार्यात्मक अनुभवावरून गरज भासल्यास कर्जफेडीची मुदत संपल्यावरही कर्ज न फेडल्यास कर्ज घेणाऱ्यास दंड किंवा शिक्षा आकारता येईल. या शिक्षेचे एक स्वरुप असेदेखील असू शकते की, विनाकारण कर्जाची फेड न करणाऱ्यास एका विशेष मुदतीसाठी कर्ज देणे बंद करण्यात येईल किंवा त्यांची प्रतिष्ठा व पत संपण्याची घोषणा करण्यात येईल.

या प्रकारे बँकांच्या कर्जफेडीत विलंब न होता बँकेचा आणि व्यावसायिकांचा व्यवसाय व आर्थिक व्यवहार सुरळीत चालेल.

७) कर्जांसाठी जामीन

सध्या प्रचलित असलेली जामीन व्यवस्थाच व्याजमुक्त बँकेसाठी योग्य ठरेल. तयार झालेली उत्पादने, अर्धवट तयार असलेली उत्पादने, गोदामात ठेवलेला किंवा दळणवळण होत असलेला व्यापाराचा माल, तयार झालेला शेतीचा माल, कारखाना, व्यापारी रोखे, संपत्तीची मालकी प्रमाणपत्रे, अस्थायी संपत्ती, बँकेत ठेवण्यात आलेल्या ठेवी, कर्ज किंवा बटाईवर घेतलेले भांडवल वगैरेचा जामीन (Security) कर्ज घेण्यासाठी देणे शक्य आहे. त्याचप्रमाणे वैयक्तिक जामीनावरसुद्धा कर्ज देण्याचे बँकेस अधिकार असतील. प्रचलित बँका विनाजामीन तत्त्वांवरदेखील कर्ज देतात. कारण काही व्यावसायिक किंवा संस्थांवर त्यांचा पूर्ण विश्वास असतो. अशाच प्रकारे आम्ही प्रस्तुत केलेल्या व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेतसुद्धा सतत बटाई व्यवसाय चालू असलेल्यांना वा बँकेचे भागीदार असलेल्यांना विनाजामीन कर्ज देण्यात येईल. जामिनाच्या बाबतीत एकीकडे अशी पद्धत अवलंबिण्यात आलेली आहे की, कर्जाची वसुली अवघड होऊ नये, तर दुसरीकडे एवढी तंगी होता कामा नये की त्यामुळे व्यावसायिकवर्गाचे कार्यस्वातंत्र्य प्रभावित होईल.

बँकेने दिलेले कर्ज आवश्यकरित्या बँकेस परत मिळावयास हवेत. कारण तिच्या कर्जखात्यांतूनच ही कर्जे तिने दिलेली असल्याने कर्जखातेदारांना त्यांचे भांडवल परत करण्याची तिची सर्वस्वी जबाबदारी आहे. या वस्तुस्थितीनुसार देशाच्या कायद्यानुसार बँकेस या गोष्टीचे पूर्णत: अधिकार असावयास हवेत की, ज्या कर्जदारांनी कर्जांची परतफेड केलेली नाही, त्यांचे जामीन जप्त करण्यात यावे किंवा त्यांच्या व्यवसायाची स्वत: विक्री करून कर्ज परत घेण्यात यावे. प्रत्येक सभ्य देशांमध्ये कर्जपरतीचा कायदा निर्माण करण्यात आलेला आहे. मात्र कर्जदाराचे दिवाळे निघाल्यास वस्तुत: बँकेस याचा अधिकार नसणार.

ही बाब निश्चितच दाहीदिशा सत्य आहे की, व्याजमुक्त बँकेने दिलेले कर्ज परत न मिळाल्यास बँक बंद पडेल. अशा परिस्थीतीत बँक व्याजमुक्त अर्थकार्य चालवू शकणार नाही. निश्चितच ही बाब न्यायास अनुसरून नाही की, कर्ज खातेदारांच्या भांडवलातून देण्यात आलेल्या कर्जाच्या वसुलीची सर्वस्वी जबाबदारी बँकेवरच टाकावी. तरीसुद्धा या नुकसानीच्या भरपाईची जबाबदारी मात्र बँकेवर असणारच. जो समाज बँकेवर व्याजमुक्त कर्ज देण्याची जबाबदारी सोपवितो, त्या समाजाने वस्तुत: घेतलेली कर्जे जबाबदारीने परत करावयास हवीत.

ही बाबसुद्धा प्रमाणसिद्ध सत्य आहे की, कर्ज घेणाऱ्या पक्षाचे जर दिवाळे निघाले आणि त्याच्याकडे कर्ज फेडण्याइतकी क्षमतादेखील नसेल तर मात्र त्याच्याकडून कर्ज परत घेणे अशक्य आहे. अशा बिकट परिस्थितीत समस्येचे समाधान मात्र एवढ़ेच असेल की अशा प्रकारच्या नुकसानीच्या भरपाईची जबाबदारी समाजानेच उचलावी. या

बाबतीत आमची प्रस्तावित भूमिका अशी आहे की इस्लामी समाजव्यवस्थेत अशा सर्व प्रकारची कर्जे 'जकात'च्या माध्यमाने फेडण्यात यावीत. (जकात म्हणजे प्रत्येक सबळ आणि सक्षम व्यक्तीने आपल्या संपत्तीतून अडीच टक्के राशी जनकल्याणास्तव द्यावी) आणि या व्यवस्थेची जबाबदारी राज्यशासनाने घ्यावी. मात्र बँकिंग व्यवस्थेच्या अनुसार ही पद्धत जास्त योग्य असेल की, दिवाळखोरी निघालेल्या व्यावसायिकाचे कर्ज जकातच्या रकमेतून स्वत: बँकेनेच फेड़ावे आणि याची सूचना केंद्रीय बँकेस द्यावी व केंद्रीय बँक समस्येचे गांभीर्य लक्षात घेऊन आणि बँकेच्या सूचनेवर गंभीर विचार करून स्वसमाधान करून घेतल्यावर संबंधित रक्कम बँकेस प्रदान करील.

या पुस्तकामध्ये 'जकात' आणि तिच्या वापरप्रणालीवर सविस्तर चर्चा करणे शक्य नाही. केवळ योग्य असलेल्या बाबींच्या उल्लेखांवरच समाधान मानावे लागेल. इस्लामच्या सुरुवातीच्या काळामध्ये इस्लामी शासनव्यवस्थेतसुद्धा दिवाळखोरीला हाच पर्याय होता. कोणावरही अचानक ओढवलेले संकट असो वा दिवाळखोरी असो वा नैसर्गिक संकट असो, या नुकसानीची भरपाई 'ज़कात'च्या माध्यमानेच होत असे. दिव्य कुरआनानेच असा आदेश दिलेला आहे.

८) कर्जाच्या हिशोबांवर येणारा खर्च

कर्जांच्या अर्जांची तपासणी करणे, कर्जांबाबतीत निर्णय घेणे, दिलेल्या कर्जांचा हिशोब ठेवणे आणि क़र्जवसुलीसाठी वेतनतत्वांवर कर्मचारी नियुक्त करणे किंवा संपूर्ण कामकाज चालविण्यासाठी बँकेला खर्च हा येणारच. स्वभाविकरित्या असा प्रश्न निर्माण होतो की हा खर्च कशा प्रकारे भागविता येईल? त्यासाठी याच्या दोन पद्धती आहेत.

पहिली पद्धत अशी आहे की, बँकेला कर्ज खात्याच्या एका भागातून लाभदायक वापरातून जो नफा मिळेल, त्याच्या एका भागाचा वापर करून हा खर्च पूर्ण करता येऊ शकतो. परंतु केवळ कर्जप्रमाण कमी असल्याच्या आणि कर्जखात्याचा मोठा भाग बँकेच्या लाभदायक वापरात असल्याच्या परिस्थितीमध्येच ही कार्यप्रणाली अवलंबिता येऊ शकते. एवढे मात्र नक्की की या प्रणालीमधली त्रुटी अशी की, कर्ज भांडवलाच्या लाभदायक वापराचे परिणाम अनिश्चित आणि अविश्वसनीय असून याच्या तुलनेत उपरोल्लेखित खर्च निश्चित स्वरुपाचे आहेत.

दुसरी पद्धत अशीदेखील शक्य आहे की, बँक या खर्चपूर्तीसाठी कर्ज घेणाऱ्यांकडून काही प्रमाणात या कामासाठी शुल्क (सेवा मोबदला) वसूल करू शकते. हे शुल्क वसूल करण्याचे योग्य स्वरुप असे असेल की कर्जाच्या प्रत्येक अर्जावर एक ठराविक शुल्क आकारण्यात यावी. त्याचबरोबर मागणी करण्यात आलेल्या कर्जांची रक्कम आणि मुदत किती असेल आणि ते मंजूर होईल की नाही, हे पाहणेदेखील गरजेचे आहे. मग ज्या कर्जमागणाऱ्यांना कर्जपुरवठा करण्यात येईल,

त्यांच्याकडून बँक आपल्या नोंदणीपुस्तिकेत होणाऱ्या प्रत्येक नोंदणीवर एक ठराविक शुल्क वाढीव स्वरुपात आकाराते. शुल्क किती आकारण्यात यावे अथवा त्याचे प्रमाणस्वरुप कसे असावे हे वापरण्यात येणारे कर्जभांडवल आणि त्यांच्या परतफेडीच्या मुदतींवरील विचारांनी ठरविण्यात येईल. अशा प्रकारचे शुल्क हे बँकेचे कमाईचे साधन बनविता येणार नसून हे केवळ कामकाजाच्या खर्चाची भरपाई करण्यासाठी असेल. या शुल्काची मर्यादा निश्चित ठेवण्यासाठी केंद्रीय बँकेची यावर काटेकोर देखरेख असेल.

आम्हाला ही दुसरी प्रणालीच यासाठी योग्य वाटते. तसेच प्रथमोल्लेखित प्रणालीचा अवलंब करण्याचे देखील बँकेस स्वातंत्र्य असावे. शुल्क वसुलीच्या आणि आकारणीच्या बाबतीत बँकेस या गोष्टीचे स्वातंत्र्य असावयास हवे की त्यांनी उपरोल्लेखित दोन्ही पद्धतींचा अथवा त्यापैकी जी योग्य वाटेल, त्या पद्धतीचा अवलंब करावा. अशा प्रकारे विभिन्न बँकेत स्पर्धा निर्माण होऊन कमीतकमी शुल्क आकारण्यावर भर देण्यात येईल.

बँकांच्या कर्जांच्या बाबतीत वरील प्रकरणात जे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे, त्या स्पष्टीकरणानुसार, ही भूमिका स्पष्ट केली जाऊ शकते की प्रस्तूत व्यवस्था समाधानकारकरित्या राबविण्यात घेऊ शकते. ही व्यवस्था राबविण्यात कोणतीच, अडचण निर्माण न होता यश मिळू शकते. व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेत व्यावसायिकवर्गाची भांडवलाची गरज ही सहसा जास्तीतजास्त बटाई आणि भागीदारी तत्त्वावर मिळविलेल्या भांडवलावरच पूर्ण होते, परंतु ज्या परिस्थितीत मुदत अल्प असल्याने किंवा हिशोबात अडचण निर्माण होण्यामुळे असे शक्य नसेल, तेव्हा अशा व्यवस्थेकडून अल्पमुदतीसाठी कर्ज भांडवलसुद्धा मिळविता येणे शक्य होईल.

१) व्यापारी हुंडी

एक व्यापारी एखाद्या कारखानदाराकडून उत्पादने खरेदी करतो, परंतु त्यांची किंमत रोख देण्याऐवजी असे करारपत्र करून देतो की अमक्या तारखेस अमक्या व्यक्तीस इतकी इतकी रक्कम देण्यात येईल. यालाच 'दस्तावेज हुंडी' (Bill of Exchange) असे म्हणतात. अशा प्रकारच्या हुंड्या देशांतर्गत वस्तुंच्या खरेदी-विक्रींमध्ये येतात, तसेच परदेशी व्यवहारातसुद्‌धा लिहिण्यात येतात. आपण या ठिकाणी केवळ अशा प्रकारच्या हुंड्यांच्या बाबतीत चर्चा करुया की ज्या प्रकारामध्ये दोन्ही पक्ष एकाच देशात असून एकाच देशात हा व्यवहार होत आहे.

विक्रेत्याने ठराविक तारखेपर्यंत हे दस्तावेज स्वत:कडेच ठेवल्यास तो स्वत: त्यात नमूद केलेली रक्कम हुंडी लिहून देणाऱ्याकडून वसूल करू शकतो. बहुतेक वेळा असे घडते की, हुंडी लिहून देणारा एखाद्या वित्त संस्था किंवा बँकेकडून दस्तावेजावर

असे प्रमाणित करुन घेतो की ठराविक वेळेवर रक्कम मिळण्याचा जामीन मिळावा किंवा रक्कम न मिळाल्यास ही रक्कम बँकेने द्यावी.

परंतु असे सहसा घडतच नाही की, विक्रेत्याने ठराविक तारखेपर्यंत हुंडी आपल्याच जवळ ठेवली असेल. तो आपल्या हुंडीच्या मोबदल्यात तत्काळ रोख रक्कम घेऊ इच्छितो. हुंडीसाठी विश्वसनीय जामीनांची नोंद असल्यास तो एखाद्या बँकेतून हुंडी वठवून घेऊ शकतो. मात्र प्रचलित व्यवस्थेत हुंडी वठविण्यासाठी एक विशेष रक्कम आकारण्यात येते. सामान्यत: ही रक्कम प्रचलित व्याजदरासमान असते. हुंडीची मुदत पूर्ण झाल्यावर बँकेला हुंडीत लिहीलेली पूर्ण रक्कम मिळते. अर्थातच काही आठवड्यांपूर्वीच हुंडीच्या लिखित रकमेतून एक ठराविक रक्कम (Discount) कपात करून उपभोक्त्यास देऊन हुंडीतील पूर्ण रक्कम स्वत: बँक घेते. उदाहरणार्थ, एक हजार रुपयाच्या हुंडीच्या मोबदल्यात बँकेने तीन महिन्यापूर्वी ९७० रुपये दिले. म्हणजेच बँकेने या रकमेवर हुंडीधारकास १२.४ टक्के दराने वार्षिक एवढ़ा व्याज आकारला. अशा प्रकारे हीदेखील अल्पदराने व्याजावर कर्ज देण्याचीच पद्धत होय. व्यावसायिक वर्गाचे हित यामध्ये आहे की, व्यावसायिकास हुंडी वठविण्याची सवलत असावी जेणेकरून त्याच्या व्यवसायामध्ये भांडवलाच्या कमतरतेमुळे अडचण निर्माण होऊ नये. उपरोल्लेखित उदाहरणामध्ये कारखानदार हुंडी वटवून आपल्या कारखान्यावर असलेल्या कर्जाचे ओझे उतरवून टाकतो अथवा व्यवसाय चालू ठेवण्यासाठी आणखीन जास्त प्रयत्नशील होतो.

प्रचलित वित्तव्यवस्थेत देशांतर्गत हुंड्यांची प्रथा कमी होत असून याऐवजी बँकेकडून अल्पमुदतीवर कर्ज घेण्याची प्रथा सुरु झाली आहे. (R.S. Sayers : Banking in Western Europe P. 243, op. cit) व्याजमुक्त अर्थव्यवस्थेमध्ये व्यावसायिक अशी पद्धत अवलंबू शकतात की हुंडी लिहिण्याऐवजी त्यांनी बँकेकडून बटाई तत्त्वावर भांडवल मिळवून खरेदीदारास मालाचे दाम नगदी प्रदान करावे आणि पूर्ण माल विकल्यावर बँकेला तिच्याकडून घेतलेले भांडवल परत करण्याबरोबरच निश्चित केलेल्या प्रमाणाची रक्कम देण्यात यावी. बऱ्याच वेळा अगदीच अल्पमुदत म्हणजेच काही आठवड्यांसाठीच भांडवलाची गरज पडत असल्याने जास्त योग्य हेच ठरेल की बँक व्यावसायिक पक्षाच्या नफ्यातून जेवढ़ा भाग तीन महिने किंवा यापेक्षा जास्त मुदतीसाठी बटाई तत्त्वावर भांडवल लावण्याच्या परीस्थितीत यापेक्षाही कमी रक्कम घेण्यासाठी तयार होईल. जर व्यावसायिकास माल विक्री करण्यावर तोटा झाला असेल तर हा तोटा बँकेस सहन करावा लागेल. नुकसानीच्या या संभावनेमुळे बँक अल्पदराच्या बटाई तत्त्वावर थोड्या मुदतीसाठी व्यावसायिकांना भांडवल देण्यासाठी केवळ अशा वेळीच तयार होईल की ज्या वेळी नफ्याची संभावना ही तोट्याच्या तुलनेत खूप जास्त असेल.

अशा स्वरुपाच्या परीस्थितीनुसार हे शक्य आहे की काही व्यावसायिकांच्या भांडवलाची गरज बटाईच्या माध्यमाने पूर्ण होईल. त्यासाठी आपण याचबरोबर एक अशी प्रणाली सादर करुया की, जी वस्तुत: बँकेकडून व्याजमुक्त कर्ज घेण्यास पात्र ठरेल. एकच गरज दोन भिन्न पद्धतीने पूर्ण होणे हे व्यावसायिकांच्या नेहमी हिताचे ठरते.

प्रचलित बँकिंग-व्यवस्थेत हुंडी वठविण्याची पद्धतसुद्धा बँकेकडून कर्ज घेण्यासारखीच असेल. हुंडीच्या मोबदल्यात रोख रक्कम देण्याची बँकेस विनंती करण्यात येईल आणि कर्जांच्या इतर अर्जांबरोबरच या अर्जाचादेखील विचार करण्यात येईल.

बँकेस हुंडी वठवावयाची झाल्यास हुंडीमध्ये नोंदविण्यात आलेली पूर्ण रक्कम अदा करण्यात येईल. या रकमेचे स्वरुप हुंडी वठवून देण्यात येणाऱ्या कर्जाचे असेल. हुंडीची मुदत पूर्ण झाल्यावर बँक हुंडी जारी करणाऱ्या कारखानदाराकडून किंवा संबंधित बँकेकडून त्यात नोंद असलेली रक्कम स्वत: काढून घेऊन हुंडीच्या मोबदल्यात बँकेतून रोख रक्कम (Cash) हस्तगत करणाऱ्याची जबाबदारी संपून जाईल. मुदत पूर्ण झाल्यावर बँकेस हुंडी जारी करणाऱ्यास बँकेतून संबंधित रक्कम मिळाली नाही तर हुंडीच्या मोबदल्यात रोख रक्कम (Cash) घेणाऱ्याकडून पैशांची मागणी करण्यात येईल. प्रचलित व्यवस्थेमध्येसुद्धा हुंडी वठविणाऱ्याची वित्तीय जबाबदारी ही हुंडीची मुदत पूर्ण झाल्यावर मूळ दायकाने नोंदणीकृत रक्कम देईपर्यंत कायम असते.

व्यापारी हुंडीची जास्तीतजास्त कालमर्यादा किती असावी? बँकेने कोणत्या प्रकारच्या व्यवसायांसंबंधीच्या हुंड्यांना प्राधान्य द्यावे? वगैरेसारख्या प्रश्नांच्या बाबतीत केंद्रीय बँक यथायोग्य व उचित नियम तयार करील. केंद्रीय बँकेस एखाद्या विशेष व्यवसाय मर्यादेत वाढ हवी असल्यास आणि यासंबंधित व्यावसायिकवर्गास जास्त सवलतींचा पुरवठा करू इच्छित असल्यास बँकेस व्यवसाय वर्तुळास निर्माण होणाऱ्या हुंड्यांबरोबरच उत्तम व्यवहारांना प्राधान्य द्यावे लागेल.

देवाणघेवाण अर्थात व्यापाराच्या बाह्य धोरणाच्या वर्तुळ सीमाबाबतीत हुंडी प्रकरण हे देशांतर्गत असलेल्या व्यापारासंबंधीच्या हुंडी प्रकरणांपेक्षा थोडे भिन्न आहे. परंतु या पुस्तकात आमचा हेतु देशांतर्गत असलेल्या वित्तीय प्रकरणाच्या व्याजमुक्त व्यवस्थेचे स्वरुप स्पष्ट करणेच असल्यामुळे आपण केवळ एवढ्याचविषयी चर्चा करुया. केवळ संक्षिप्तरित्या एवढे संकेतच या ठिकाणी पुरेसे ठरेल की दोन्ही देशात व्याजमुक्त वित्त व्यवहार असल्यास कोणतीच नवीन समस्या उत्पन्न होणार नाही. मात्र एक व्याजमुक्त वित्तव्यवस्था आणि व्याजावर आधारित इतर वित्तव्यवस्थांच्या दरम्यान व्यापारसंबंधित हुंड्यांवर विचार करण्यात आल्यास एक नवीन समस्या निर्माण होईल आणि या समस्येचे समाधान अशा आजीविकेपासून वित्तीय संबंधांच्या बाबतीत अवलंबिण्यात आलेल्या नीतीनुसार काढ़ण्यात येईल. तरीदेखील हा विषय आपल्या चर्चेबाहेरील आहे.

प्रकरण पाचवे

वित्तनिर्मिती कार्य

मागील प्रकरणांमध्ये बँकव्यवसायाची मूळ रूपरेखा स्पष्ट करण्यात आली आहे. काही भांडवलदार भागीदारी तत्त्वांवर भांडवल लावून बँक स्थापन करतात. या बँकेत सामान्य लोक आपल्या बचती आणि भांडवल बटाई तत्त्वावर जमा करून कर्ज खाते उघडतात आणि यामुळे बँकेस भांडवल उभारणीसाठी 'बटाई भांडवला'व्यतिरिक्त लोकांकडून मोठ्या प्रमाणात कर्जाच्या स्वरुपात भांडवल मिळते. या संपूर्ण खात्यातील एकूण रकमेच्या दहा टक्के राशी सुरक्षित किंवा राखीव भांडवलाच्या स्वरुपात अबाधित ठेवण्यात येते. कर्जखात्याच्या ५० टक्के रक्कम कर्ज देण्यासाठी राखीव असते आणि बाकीची (४० टक्के) रक्कम भागीदारी आणि बटाई तत्त्वावर व्यावसायिकांना पुरविण्यासाठी, व्यापारी रोखे (Business Bond) खरेदी करण्यासाठी आणि आर्थिक मोबदला घेऊन सेवापुरवठा करण्यासाठी खर्च करण्यात येते. भांडवलाच्या या व्यावसायिक उपयोगामुळे होणाऱ्या नफ्यातून बटाई तत्त्वावर भांडवल जमा करणाऱ्यांना निश्चित केलेल्या प्रमाणानुसार वाटा देण्यात येईल. बाकीचा नफा बँकेच्या भागीदारांमध्ये त्यांनी लावलेल्या भांडवलाच्या प्रमाणानुसार वाटण्यात येईल. बँक लोकांच्या बचती सुरक्षित ठेवण्याचा, चालू खात्यांच्या हिशोबांच्या सवलती पुरविण्याच्या आणि बचती व भांडवलांना लाभदायक व्यवसायात लावण्याच्या संधी उपलब्ध करीत असते. बँकेच्या माध्यमाने व्यावसायिक पक्षांना नफ्यात भागीदारीच्या तत्त्वावर भांडवल हस्तगत होते आणि अल्प मुदतीसाठी कर्जे मिळतात. हे संपूर्ण व्यवसाय बँक स्थापन करणाऱ्या भागीदारांसाठी एक लाभदायक व्यवसायाचे स्वरुप असले तरी याच्या माध्यमाने समाजाची एक उत्कृष्ट सेवा होत असते.

१) बँक भांडवलाचे स्वरुप

बँकिंग व्यवस्थेची एक महत्त्वाची आय ही बँकिंगची आर्थिक स्थिती आणि पतनिर्मिती होय. हे कार्य बँकेच्या व्यावसायिक प्रयत्नांच्या परिणामस्वरुप घडून येत असते. पुढील मजकुरात या कार्याविषयी सविस्तर चर्चा करण्यात येईल.

आधुनिक काळातील इस्लामी वित्तशास्त्रातील अर्थव्यवस्थेसंबंधी सांगायचे झाल्यास या बाबतीत मतभेद शक्य नाही. या बाबतीत एकच भूमिका आहे की, ही व्यवस्था राज्याच्या देखरेखीत असेल. राज्य शासनाकडूनच नाणी आणि नोटा चलनात आणल्या जातील. मात्र या कार्यासाठी राज्यशासन एक विशेष संस्था स्थापन करू शकते. इतर कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेस नाणी किंवा नोटा चलनात आणण्याचा अधिकार नसेल. या ठिकाणी इस्लामी वित्तव्यवस्थेवर सविस्तर चर्चा करणे शक्य नाही. आम्ही

केवळ एवढेच मत मांडू इच्छितो की, ही व्यवस्था आधुनिक काळातील अर्थ व्यवस्थेपेक्षा फारशी भिन्न नाही. देशाची आर्थिक परिस्थिती, सवलतकार्य आणि इतर उपयुक्त बाबींना समोर ठेवून आधुनिक काळातील इस्लामी शासन हे वित्तशास्त्राच्या बाबतीत आधुनिक काळाच्या विभिन्न अनुभवाच्या आधारे योग्य अशी नियमावली तयार करू शकेल.

ज्या अर्थव्यवस्थेत बँक-व्यवस्था स्थापन झालेल्या आहेत, त्यांमध्ये राज्याच्या प्रचलित चलनाव्यतिरिक्त अर्थात नाणी आणि नोटाव्यतिरिक्त एक महत्त्वाचा अर्थ प्रकार हा बँकभांडवल आहे, जे बँककार्यापासून निर्माण होते. जनतेच्या कमाईचा मोठा भाग, त्यांच्या ठेवी वगैरे बँकेत जमा करण्याची लोकांची सवय हीच मुळात बँकभांडवल उभारणीचे महत्त्वाचे स्रोत आहे. एखाद्या व्यक्तीस दुसऱ्या व्यक्तीला काही रक्कम द्यावयाची असल्यास ही रक्कम धनादेशाच्या माध्यमाने देण्यात येते. अर्थातच बँकेतून नगदी रक्कम काढून देण्याची गरज नसते. नगदी व्यवहार हा केवळ दैनंदिनीच्या लहानसहान व्यवहाराकरिताच होत असतो. धनादेश म्हणजेच एखाद्या खातेदाराकडून बँकेस अशा प्रकारची सूचना आहे की सदरील खात्यातून धनादेशावर नोंदविण्यात आलेली रक्कम धनादेश घेणाऱ्याच्या खात्यात जमा करण्यात यावी. बऱ्याच वेळा धनादेश घेणारी व्यक्ती धनादेशावर नोंदविण्यात आलेली रक्कम बँकेकडून नगदी स्वरुपात न घेता आपल्या खात्यातच जमा करते. सध्याच्या काळात आर्थिक व्यवहार पूर्णत: अशाच पद्धतीने चालतो.

ज्या व्यक्ती धनादेशाची रक्कम बँकेकडून नगदी स्वरुपात घेतात अथवा जे खातेदार नगदी रक्कम काढून पैसे देतात, हा पैसासुद्धा सहसा बँकेतच जमा होत असतो. कारण ते ज्यांना नगदी पैसे देतात, त्यांच्यापैकी बरेचजण या रकमा आपापल्या (कर्ज) खात्यात अथवा बचत खात्यात (बटाई खात्यात) जमा करतात.

जनतेच्या या व्यावहारिक सवयीमुळे बँकेत तिचा भरमसाठ पैसा जमा होतो आणि यामुळेच हा पैसा बँकेस स्वत: वापरण्यासाठी शक्य होते. आम्ही प्रस्तुत केलेल्या योजनेनुसार या अर्थोपयोगाचे दोन प्रकार आहेत. ते म्हणजे कर्ज देणे किंवा बटाई तत्त्वावर व्यावसायिकांना भांडवल पुरविणे होय. ज्या वेळी बँक खातेदारांच्या रकमा या दोन्हींपैकी एका पद्धतीने वापरात घेते तेव्हा नवीन वित्त निर्माण होते. हे नवनिर्मित वित्त म्हणजेच कर्ज घेणाऱ्या किंवा बटाई तत्त्वावर भांडवल घेणाऱ्या व्यक्तींना देण्यात आलेले आहे. तसेच या पद्धतीमुळे खातेदारांच्या खात्यातील संपत्तीत कमतरतादेखील येत नाही. कारण अशा प्रकारची पद्धत मुळात खातेदार आणि बँकेदरम्यान करारानुसारच ठरविण्यात आलेली असते. (ही बाब कर्ज आणि बटाई या दोन्ही खाते प्रकारासाठी योग्य आहे. बटाई खात्यामध्ये भांडवल जमा करणाऱ्या व्यक्ती झालेल्या करारानुसार मुळात या नियमाशी बांधील आहेत की, त्या एका ठराविक मुदतीपर्यंत हे भांडवल परत मागणार नाही. मात्र वर

संकेत दिल्यानुसार कधीकधी मुदतपूर्वसुद्‌धा आपल्या रकमा खात्यातून परत काढता येतील.) मात्र ज्या पक्षास कर्ज वा बटाई तत्त्वावर भांडवल देण्यात आलेले आहे, त्याला एका अशा भांडवलावर मिळकती आणि वापराचे अधिकार प्राप्त होतात की ज्यावर त्याला पूर्वी हे अधिकार प्राप्त नव्हते, अर्थात हेच नवीन वित्त होय.

ज्यांना बँकेने कर्ज अथवा बटाई स्वरुपात नवीन भांडवलपुरवठा केला आहे ते हे भांडवल मजुरांना मजुरी देण्याकरिता, कर्मचाऱ्यांना वेतन देण्याकरिता, कच्च्या मालाचा पैसा देण्याकरिता किंवा कारखाना वा दुकानाचे भाडे देण्याकरिता वापरतात. मग या रकमा नगदी स्वरुपात देण्यात येवो की धनादेशाद्वारे देण्यात येवोत. ज्यांना या रकमा देण्यात येतात ते या रकमांचा महत्तम भाग बँकेत जमा ठेवून दैनंदिनीच्या गरजा पूर्ण करण्याएवढी अल्पशी रक्कम नगदी स्वरुपात घेतात. ज्या व्यक्ती व्यावसायिक वर्गाकडून प्राप्त होणारी ही आय (Income) लवकर खर्च करू इच्छीतील त्या या रकमा कर्ज खात्यात जमा ठेवतील. तात्पर्य असे की कर्ज आणि बटाईनुसार बँकांनी जे नवीन भांडवल व्यावसायिकांना पुरविले होते, याचा एक महत्तम भाग यांच्या वापरण्याच्या परिणामस्वरुपी विविध जणांच्या वापरातून येऊन शेवटी बँकांच्याच विविध खात्यात येऊन जमा होत असतो. (बँकांच्या व्यावसायिकांना कर्ज देण्याची प्रचलित पद्धती अशी आहे की त्या कर्ज घेणाऱ्यांना कर्ज घेतलेले पूर्ण भांडवल नगदी स्वरुपात देण्याऐवजी ही रक्कम त्या व्यावसायिकाच्या खात्यात जमा करण्यात येते. किंवा हा व्यावसायिक खातेदार नसल्यास त्याचे खाते उघडून त्यात रक्कम जमा करण्यात येते. कधीकधी या नोंदणीचे स्वरुप असे असते की कर्ज घेणारा जास्तीतजास्त एवढी रक्कम घेऊ शकतो, परंतु या रकमेचा अमुक टक्के भाग त्यास खात्यात जमा ठेवणे आवश्यक असते. त्यासाठी कर्ज घेणारा व्यावसायिक गरजेनुसार आपल्या खात्यातून धनादेशाद्वारे पैसा देत असतो. या पद्धतीस अनुसरून असे म्हणणेच जास्त योग्य ठरेल की हे नवीन खाते उघडणे म्हणजेच नवीन वित्तनिर्मितीसम होय. खरे पाहता बटाई तत्त्वावर देण्यात येणाऱ्या रकमांच्या बाबतीतसुद्धा हीच प्रणाली स्वीकारली जाऊ शकते. आपण विषयाच्या सहज आकलनाकरिता असे गृहीत धरलेले आहे की कर्ज अथवा बटाई तत्त्वावर भांडवल घेणाऱ्या पक्षाला पूर्ण भांडवल देण्यात येत जे त्याच्या वापरामुळे परत बँकेत जमा होत जाते. दोन्ही प्रकारात एकच परिणाम आहे. म्हणजेच बँकांनी दिलेले भांडवल परत बँकेतच येऊन जमा होते.) अर्थातच लोक आपली आर्थिक संपत्ती आणि ठेवी स्वत:जवळ न ठेवता बँकेतच ठेवतात. तसेच आर्थिक व्यवहार धनादेशाद्वारे करण्यात येत असल्यामुळे संपूर्ण पैसा बँकेतच जमा असतो. तो फक्त एका व्यक्तीच्या खात्यातून दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर स्थलांतरित करण्यात येतो.

जेव्हा बँकांच्या कर्ज खात्यामध्ये आणि बटाई खात्यांमध्ये या नवीन रकमांच्या कमाईमुळे वृद्धी होईल तेव्हा व्यावसायिकवर्गास कर्ज आणि बटाईच्या स्वरुपात आणखीन भांडवल पुरविणे शक्य होईल. ही एक सतत वाढत जाणारी शृंखला आहे. मात्र बँक आपल्या खात्यांत जमा करण्यात आलेल्या भांडवलाचा एक भाग नगदी स्वरुपात आपल्याकडे सुरक्षित ठेवणे आवश्यक असल्यामुळे लोकांना हवे तेव्हा पैसे परत करणे शक्य होते, ही शृंखला एका मर्यादेवर पोहचून थांबते. प्रत्येक वेळी बँकेकडून व्यावसायिकवर्गास पुरविण्यात येणारे भांडवल तिच्या खात्यांमध्ये येणाऱ्या भांडवलापेक्षा कमी असते, म्हणूनच नवीन वित्तनिर्मितीची ही शृंखला मात्रेच्या स्वरुपात कमी होत जाते आणि शेवटी कमी होऊन एका मर्यादेवर थांबते. मात्र या शृंखलेच्या अंतिम टप्प्यापर्यंत वित्ताच्या एकूण रकमेमध्ये प्रचंड वाढ़ झालेली असते. बँकेच्या खात्यांमध्ये प्रारंभी जेवढ़े भांडवल जमा होते, यामध्ये व या वाढ़ीमध्ये असलेले प्रमाण या गोष्टीवर अवलंबून असते की बँक आपल्या खात्याच्या तुलनेत नगदी सुरक्षित राशीचे प्रमाण किती ठेवू इच्छिते. बँकभांडवलाच्या निर्मितीमध्ये या गोष्टीस खूप महत्त्व प्राप्त आहे की बँका आपल्या खात्यात जमा करण्यात येणाऱ्या संपूर्ण भांडवलास नगदी स्वरुपात जमा न ठेवता त्याचा एक मोठा भाग कर्ज आणि बटाई तत्त्वावर व्यावसायिकांना पुरवितात आणि पुरविण्यात आलेल्या भांडवलाचा बराच मोठा भाग पुन्हा त्यांच्या खात्यात परत येत असतो आणि याच्याच परिणामस्वरुप आणखीन कर्ज देणे किंवा बटाई तत्त्वावर भांडवलपुरवठा करणे शक्य होत असते.

एखाद्या देशात नाणी व चलनी नोटांच्या स्वरुपात आढळणाऱ्या वित्ताचा एक भाग जनतेमध्ये चलनात येत असून दुसरा भाग बँकांच्या खजिन्यांमध्ये नगदी सुरक्षित राशीच्या स्वरुपात ठेवण्यात आलेला असतो. बँका आपल्याजवळ एवढ़ी रोकड ठेवतात की आपल्या खातेदारांनी मागणी करताच तत्काळ त्यांना देणे शक्य व्हावे. दैनंदिनी खर्चांसाठी लागणारी अल्पशी रक्कम आपल्या गरजेनुसार लोक बँकेतून काढत असतात. जनतेच्या बचती, भांडवल व कमाईचा मोठा भाग बँकांमध्येच जमा असला तरी या सर्व रकमा बँकेतसुद्धा नगदीच्या स्वरुपात जमा नसतातच. जनतेच्या या रकमा केवळ बँकांच्या नोंदवह्यांतच नोंदलेल्या असतात. बँक आपल्याजवळील नगदी राशीच्या विश्वासावर यासाठी यशस्वीपणे प्रयत्नशील असते की खातेदारांना पाहिजे तेव्हा आणि हवी तेवढ़ी रक्कम नगदी स्वरुपात प्रदान करता यावी. यासाठी बँकांच्या नोंदवह्यांमधील नोंदीच मुळात नोंदणी स्वरुपातील भांडवल असते. अर्थातच केवळ कागदोपत्री व्यवहार असतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास असे सांगता येईल की वित्ताच्या एकूण रकमेचा अल्पभाग हा नाणी आणि नोटांच्या स्वरुपात असतो आणि मोठा भाग हा खाते किंवा बँकांच्या नोंदवह्यांत नोंदणी स्वरुपात असतो.

खाते किंवा बँक वित्ताचे प्रमाण बँकेच्या आटोक्यात असणाऱ्या नगदी रोकडवर अवलंबून असते. नगदी रोकडीचे हे प्रमाण बदलत असल्यामुळे खात्यातील रकमेच्या प्रमाणात कधी वाढ़ होत असते आणि कधी कमतरता होत असते. बँकांना आणखीन रोकड प्राप्त होण्याचे एक स्वरुप हे देखील आहे की, जनतेच्या हातामध्ये जी रोकड आर्थिक व्यवहारामुळे फिरत आहे, अथवा जी रोकड साठा करून ठेवण्यात आलेली आहे, त्यातील एक भाग त्यांनी बँकांमध्ये जमा करावा. म्हणजेच जनतेतील नगदीची मानसिकता कमी होईल. ज्या वेळी बँकांना जनतेकडून नवीन रोकडी प्राप्त होईल, त्या वेळी त्यांच्यासाठी अशा नवीन प्रगत वाटांवर वाटचाल करणे शक्य होईल. ज्यांच्या परिणामस्वरुप त्यांना प्राप्त झालेल्या नवीन रोकड (Cash) च्या कितीतरी पटीने जास्त बँक भांडवल निर्माण करणे शक्य होईल. या उलट ज्या वेळी जनतेच्या रोख मागणीतील वाढ़ीस्तव बँकांच्या नगदी राशीत कमतरता निर्माण होईल, त्या वेळी बँकांना असे कार्य करणे भाग पड़ेल, ज्यांमुळे बँक वित्तामध्ये कितीतरी पटीने कमतरता व ऱ्हास निर्माण होईल.

बँकेच्या संपत्तीत चढ़-उतारीचे आणखीन एक कारण केंद्रीय बँकेची भूमिकादेखील असू शकते. याविषयी आपण पुढ़ील प्रकरणात चर्चा करुया. केंद्रीय बँकेच्या कार्य आणि वेतनांच्या अभ्यासावरून हे स्पष्ट होईल की, जनतेच्या रोख मागणीत कमी-जास्ती किंवा चढ़-उतारामुळे बँक- वित्तातील होणाऱ्या चढ़-उतारामुळे उद्‌भवणारे परिणामसुद्धा केंद्रीय बँकेच्या अर्थनीतीवर अवलंबून आहेत. केंद्रीय बँकेस वाटल्यास असे प्रयत्नसुद्धा करू शकते की ज्यामुळे असे परिणाम भोगण्याची वेळ येऊ नये आणि वित्ताची एकूण रक्कम एका ठराविक स्तरावर स्थिर राहावी. आधुनिक अर्थनीतीमध्ये वित्ताची एकूण रक्कम जनतेच्या सतत बदलणाऱ्या मानसिक परिस्थितीच्या स्वाधीन न करता पूर्णत: केंद्रीय बँकेच्या अखत्यारीत ठेवण्याचे प्रयत्न करण्यात येतात. आपण अजून बँकिंग व्यवस्थेत केंद्रीय बँकेच्या स्थान व स्वरुपाचा अभ्यास न केल्यामुळे या ठिकाणी केंद्रीय बँकेविषयी चर्चा बाजूला ठेवणेच योग्य ठरेल. त्यासाठी आपण असे गृहीत धरुया की जनतेकडून बँकेस नवीन रोख मिळण्याचे किंवा जनतेचे बँकेकडून काही नगदी पैसे परत घेण्याने पूर्ण परिणाम होतात आणि असे गृहीत धरूनच आपण वित्तनिर्मिती कार्य स्पष्ट करुया.

आजकाल बँक आपल्या खात्याची एक ठराविक टक्केवारी रक्कम रोख स्वरुपात सुरक्षित ठेवण्याव्यतिरिक्त आपल्या खात्यांमधील एक दुसरी टक्केवारी रक्कम परत करण्याजोगे कर्ज देण्यासाठी किंवा अशी सुरक्षापत्रे खरेदी करण्यात खर्च करतात की ज्यांना तत्काळ विकता येते. अशा प्रकारे रोख राखीव रकमेबरोबर एक द्वितीय राखीव रक्कम अशा आधारांच्या स्वरुपात असते, ज्यांचे विनाविलंब रोख स्वरुपात परिवर्तन शक्य

असेल. अशा आधारांवर मागणी करण्यात आलेल्या कर्जांवर आणि उच्च दर्जांच्या सुरक्षापत्रांवर त्यांना अल्प दरानुसार व्याज कमविण्याचीदेखील संधी मिळते. तसेच त्यांच्या भरवशावर ते जनतेच्या रोख मागण्यादेखील पूर्ण करू शकतात. मागील प्रकरणांत आम्ही केवळ नगदी सुरक्षिततेचा उल्लेख केला आहे. परंतु पुढील प्रकरणामध्ये आम्ही हेदेखील स्पष्ट करु की 'एका व्याजमुक्त अर्थ- शास्त्रामध्ये द्वितीय राखीवचे कार्य कोणत्या आधारांवर करण्यात येईल. (यासाठी सहावे प्रकरण : 'केंद्रीय बँक' आणि सातवे प्रकरण 'बँकिंग व्यवस्था आणि सार्वजनिक मालमत्ता' वाचावे.) अजून या आधारांचे स्वरुप स्पष्ट न झाल्यामुळे या ठिकाणी आपण असे गृहीत धरूया की बँकेची नगदी सुरक्षित संपत्ती खातेदारांच्या नगदीच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी पुरेसी आहे.

२) बँक भांडवलाचे निर्मिती कार्य

व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेत बँक-भांडवल निर्मितीचे कार्य स्पष्ट करण्यासाठी संख्यात्मक उदाहरणे देणे फायदेशीर ठरेल. ही उदाहरणे निम्नलिखीत बाबींवर आधारित आहेत.

१) बँकेने जनतेच्या नगदीची मागणी पूर्ण करण्यासाठी आपले कर्ज खाते आणि बटाई खात्याच्या एकूण रकमेचा १० टक्के भाग रोख सुरक्षित म्हणून आपल्याजवळ सुरक्षित ठेवावा. हा भाग नगदीच्या मागण्या पूर्ण करण्यायोग्य असाव्यात.

२) बँकेकडून कर्ज किंवा बटाई स्वरुपात घेतलेले भांडवल हे बँकेच्याच कर्ज आणि बटाई खात्यात जमा करण्यांत येते.

या बाबतीचा आधार वरील प्रकरणात स्पष्ट करण्यात आलेला आहे, मात्र वस्तुस्थिती अशी आहे की बँकांनी पुरविलेले संपूर्ण भांडवल त्यांच्या खात्यांमध्ये परत येत नसून त्याचा एक छोटासा भाग जनतेमध्ये नगदीच्या स्वरुपात फिरण्यासाठी स्थिर होतो. भांडवलाचा बराच भाग बँकांच्या खात्यांत परत जमा होतो. असे गृहीत धरण्याचा उद्देश (की, संपूर्ण भांडवल बँकेत जमा होते) असा आहे की, सांख्यिकी उदाहरणे सुलभ व्हावीत. आपण जर असे गृहीत धरले की बँकांनी पुरवठा केलेल्या भांडवलाचा पाचवा भाग नगदी स्वरुपात जनतेच्या हाती स्थिरावतो आणि केवळ बाकीचा ८० टक्के भाग बँकेच्या खात्यांत परत येतो, तरीसुद्धा सांख्यिकी उदाहरणे देता येतील. परंतु ही उदाहरणे समजण्यासाठी किचकट होतील. चर्चेचा परिणाम दोन्ही स्वरुपात एकच होत असल्याने सुरुवातीस आपण असेच गृहीत धरून चर्चा करूया की जनतेच्या हाती पैशांचा काहीच भाग राहात नसून पूर्ण भांडवल बँकेच्या खात्यांत परत जाते. नंतर आपणही गृहीत धरलेली बाब सोडून देऊया आणि हे स्पष्ट करुया की, ही ग्राह्य बाब सोडून दिल्याने आपल्या चर्चेच्या परिणामांवर काही फरक पडत नाही.

३) सुरुवातीला बँकांचे कर्जखाते आणि बटाई खात्यांतील आढळणारे प्रमाण हे खात्यांतील एकूण संख्या कमी-जास्त झाल्यावरसुद्धा तटस्थ आणि स्थिर राहते.

येथे आपण असे गृहीत धरले आहे की, बँकेत जमा असलेल्या एकूण भांडवलाच्या ६० टक्के भाग कर्जखात्यात आणि ४० टक्के भाग बटाई खात्यात जमा करण्यात आला आहे. (वर उल्लेख केल्याप्रमाणे बँक स्थापन करणारे लोक आणि ज्यांनी भांडवलपुरवठा केला, यांनासुद्धा बटाई खात्यात सामील करण्यात आले आहे असे समजण्यात येईल, जेणेकरून हिशेब आणि सांख्यिकी उदाहरणे किचकट होऊ नये. हे भांडवल पुढील हिशोबात जबाबदाऱ्यांच्या रकाण्यात नोंद करण्याची यामुळे गरज आहे की, आधाराच्या रकाण्यात बँकेची इमारत, फर्निचर आणि इतर मूलभूत सामानाची किंमतसुद्धा समाविष्ट करण्यात यावी. परंतु सवलतीसाठी हे प्रकरण वेगळे मांडण्यात आलेले नाही. या चर्चेसाठी भागीदारांचे भांडवल आणि बँकेच्या या विशेष आधारांना स्वतंत्रपणे चर्चेत घेण्याची गरज नाही.) आता आपण हेसुद्धा गृहीत धरीत आहोत की, ज्यावेळी जनता बँकेत नवीन भांडवल जमा करील, याचा ६० टक्के भाग कर्ज खात्यात आणि ४० टक्के भाग बटाई खात्यात येईल. ज्या वेळी बँक व्यावसायिकांना भांडवलपुरवठा करील आणि व्यावसायिक पक्षाच्या भांडवलाच्या उपयोगाच्या परीणामस्वरुपी त्यांच्या खात्यांत आर्थिक वृद्धी होईल, तेव्हा ती कर्ज आणि बटाई खात्यांदरम्यान वर उल्लेखलेल्या प्रमाणानुसार विभागण्यात येईल. अशा प्रकारे बँकेच्या खात्यातून काढण्यात येणाऱ्या रकमासुद्धा सरासरी दोन्ही खात्यांच्या आपसांतील प्रमाणानुसार काढण्यात येईल. या ग्राह्य बाबींचे बुद्धीसंमत असणे हे अगदीच स्पष्ट आहे. प्रारंभी कर्ज आणि बटाई खात्यांच्या दरम्यान जे प्रमाण निश्चित आहे, ते जनतेच्या काही सवयी आणि मानसिकतेचे प्रतिबिंबित स्वरुप आहे. जर या सवयी आणि मानसिकता बदलल्या नसतील तर खात्यांच्या संख्येतील प्रमाणात बदल होण्याचे काहीच कारण नाही. अशा प्रकारचे परिवर्तन झाले असले तरी ते अस्थायी स्वरुपाचे असून लवकरच दोन्ही खात्यांदरम्यान असलेले ते बचत आणि खर्च, नफ्याची इच्छा आणि सुरक्षेच्या इच्छासंबंधी जनतेच्या मानसिकतेत प्रारंभी कायम झालेले प्रमाण निर्माण होईल.

ही ग्राह्य असलेली बाबसुद्धा सांख्यिकी उदाहरणांतील निर्माण होणाऱ्या गुंतागुंतीपासून आपल्याला सुरक्षित ठेवते. आपण या बाबीस सोडून जर असे गृहीत धरले की, व्यावसायिक वर्ग ज्या वेळी बँकेकडून प्राप्त झालेल्या भांडवलाचा वापर करतो, त्या वेळी या भांडवलाचा ७० टक्के भाग कर्ज खात्यात येतो आणि बाकीचा फक्त ३० टक्के भाग बटाई खात्यात येतो. तरीसुद्धा सांख्यिकी उदाहरणे देता येतील आणि वित्तीय रकमेमध्ये कार्यविस्तार स्पष्ट केला जाऊ शकतो. परंतु यामुळे उदाहरणे क्लिष्ट होतील.

४) मागीलप्रमाणे आपण असे गृहीत धरीत आहोत की, बँक आपल्या कर्ज खात्यात जमा रकमेचा ५० टक्के भाग उपयोगात घेत आहे. नगदी सुरक्षित आणि देण्यात आलेल्या

कर्जाव्यतिरिक्त बाकीचे भांडवल बटाई तत्त्वावर लावणे, रोखे (Bond) खरेदी करणे आणि आर्थिक मोबदल्यावर सेवापुरवठ्याच्या व्यवस्थापनावर खर्च, इत्यादींवर वापरण्यात येते. मात्र सवलतीसाठी आणि सुलभ आकलनासाठी सांख्यिकी उदाहरणामध्ये येथे केवळ बटाई वर भांडवलपुरवठ्याचाच उल्लेख करण्यात येत आहे. रोखे खरेदी किंवा सेवापुरवठा वगैरेसारखे इतर लाभदायक कार्य यातच गृहीत धरण्यात यावे.

५) एखाद्या देशात विभिन्न बँका असतात. एखादी बँक कर्ज किंवा बटाई तत्त्वावर जे भांडवल पुरविते ते याच बँकेच्या खात्यात परत येत नसून त्याचे विभिन्न भाग विभिन्न बँकांत परत येतात. ही व्याख्या प्रत्येक बँकेकडून पुरविण्यात आलेल्या भांडवलाच्या बाबतीत लागू पडते. तेव्हा एका वेगळ्या आणि स्वतंत्र असलेल्या बँकेच्या खात्यांमध्ये तिने पुरवठा केलेल्या भांडवलाचा काही भाग आणि इतर दुसऱ्या बँकांनी पुरवठा केलेल्या भांडवलांचे काही भाग परत येतात. आमची दुसरी ग्राह्य बाब अर्थात बँकेकडून कर्ज आणि बटाई तत्त्वावर जे भांडवल मिळविण्यात येते, शेवटी ते बँकेच्याच खात्यात जमा करण्यात येते. हे सर्व बँकांना एकाच वेळी नजरेत ठेवूनच लक्षात येते. प्रत्येक भिन्न व स्वतंत्र असलेल्या बँकेच्या बाबतीत हे लागू करणे कठीण होईल. पुढे देण्यात येणाऱ्या उदाहरणांच्या बाबतीत अशा प्रकारे विचार करावयास पाहिजे की जणू संपूर्ण देशात एकच बँक आहे आणि याच बँकेद्वारे सर्व व्यवहार चालत आहेत.

३) उदाहरणे

सर्वप्रथम आपण एका निश्चित तारखेस देशाच्या सर्व बँकांच्या हिशोबाचा आराखडा नोंदवू या. या आराखड्याच्या उजव्या रकाण्यात जनतेने कर्ज खात्यांत किंवा बटाई खात्यांत जमा केलेल्या रकमांची नोंद करुया. बँकेच्या दृष्टिकोनानुसार या जबाबदाऱ्या आहेत. कारण बँक या रकमा परत करण्यास जबाबदार आणि वचनबद्ध आहे. डाव्या रकाण्यात असे स्पष्ट करण्यात आले आहे की बँक, हे भांडवल कशा प्रकारे वापरीत आहे. नगदी, सुरक्षित, देण्यात आलेली कर्जे आणि बटाई तत्त्वावर देण्यात आलेले भांडवल हेच बंकेचे मूळ आधार आहेत. त्यासाठी जबाबदाऱ्या आणि आधारांचा समतोल साधणे आवश्यक आहे. (बटाई खात्यात जमा करण्यात आलेल्या सर्व रकमा परत करणे मात्र बँकेची जबाबदारी नाही. त्याचप्रमाणे बँकेने बटाई तत्त्वावर दिलेले भांडवल पूर्णत: परत न येण्याचीदेखील संभावना आहे. नुकसानीच्या परिणामस्वरुपी बँकेच्या या आधारांची या भागात कमतरता आली तर ही कमतरता तिच्या जबाबदाऱ्यांच्या प्रमाणात असेल आणि अशा प्रकारे आधार आणि जबाबदाऱ्यांच्या प्रमाणात समतोल राहील. बटाई खात्याच्या रकमा बटाई तत्त्वावर देण्याच्या परिणामस्वरुपी तोटा झाल्यास हा पूर्ण तोटा खातेदारांना सहन करावा लागेल.

कर्ज खात्यातील जो भाग बँकेने बटाई तत्त्वावर पुरविला असेल. त्यातील नुकसानीची जबाबदारी भागीदारांची (अर्थात बँकेच्या भागीदारांची) असेल. त्याचप्रमाणे बटाई तत्त्वावर दिलेल्या भांडवलावरील नफा हा भागीदार आणि खातेदारांचा अधिकार असेल आणि हा नफा जबाबदाऱ्यांमध्ये सामील होईल.)

या आराखड्यात वित्तीय पुरवठ्याचा नगदी अर्थात चलनी नोट आणि नाण्यांच्या स्वरुपात जनतेच्या हातातील व्यवहारात असलेला भाग दर्शविण्यात आलेला नाही. या उदाहरणांमध्ये असे गृहीत धरून चर्चा करण्यात येईल की, वित्ताची एकूण रक्कम आणि बँक खात्यांचे मोजमाप एकाच बाबींची दोन संबोधणे आहेत. तसेच जनतेच्या हात व्यवहारातील नगदी स्वरुपातील वित्त चर्चेतून वगळण्यात येईल. आपल्या चर्चेच्या निष्कर्षावर या गोष्टीचा काहीच परिणाम होणार नाही की, वित्ताच्या एकूण रकमेचा एक भाग नेहमी जनतेच्या हाती नगदी स्वरुपात असतो. मात्र ज्या वेळी जनतेची नगदीची मागणी बदलत असते, अर्थात जनता पूर्वीच्या तुलनेत कमी अथवा जास्त नगदी राशीच्या स्वरुपात आपल्याकडे ठेवू इच्छिते, अशा प्रसंगी एकूण वित्तपुरवठ्यावर काही प्रभाव पडतात. या प्रभावांचे स्पष्टीकरण पुढे स्पष्ट करण्यात येईल.

४) बँकेच्या हिशोबाचा प्रारंभी आरखडा

जबाबदाऱ्या (Liabilities)		आधार (Assets)		
कर्ज खाते	बटाई खाते	रोख सुरक्षित	कर्ज	बटाई
60%	40%	10%	30%	60%
60,000	40,000	10,000	30,000	60,000

या आराखड्यावरून असे लक्षात येते की प्रस्तावित बँकेमध्ये लोकांचे एक लाख रुपये जमा आहेत. पैकी ६० हजार रुपये कर्ज खात्यांत आणि ४० हजार रुपये बटाई खात्यात बँकेने नगदी सुरक्षित म्हणून १० हजार रुपये ठेवले आहेत आणि ३० हजार रुपये कर्ज म्हणून दिलेले आहेत. बाकीचे ६० हजार रुपये बटाई तत्त्वावर दिलेले आहेत. हे बँकेच्या हिशोबातील समतोलाचे स्वरुप आहे. आता जनतेकडून बँकेत जर नगदीच्या स्वरुपात वाढीव रोकड जमा झाल्यास हा समतोल संपून बँकेच्या व्यावसायिक कार्यनीतीच्या परिणामस्वरुपी उपरोल्लेखित हिशोबांमध्ये परिवर्तन होईल. उदाहरणार्थ, जनतेने १,००० रुपये नगदी जमा केलेत. ६०० कर्ज खात्यांत आणि ४०० मुज़ारिबत (बटाई) खात्यांत. बँक एक हजाराच्या या नवीन जबाबदारीच्या तुलनेत आपल्या नगदी

सुरक्षित रकमेत १०० रुपयांची वाढ करून यासाठी प्रयत्नशील असेल की ज्या वेळी त्यांचे खातेदार काही नगदी रकमेची मागणी करतील, त्या वेळी त्यांची मागणी तत्काळ पूर्ण करण्यात येईल आणि बाकीची ९०० रूपयांची राशी बँक वापरील. नियमांनुसार यातील ३०० रुपये कर्ज मागणाऱ्यांना देण्यासाठी वापर होईल. कारण बँकेच्या कर्ज खात्यांत ६०० रुपयांची वाढ झालेली आहे. बाकी ६०० रुपये बँक बटाई तत्त्वावर व्यावसायिकांना नफा मिळविण्यासाठी पुरविल. समजा बटाई तत्त्वावर भांडवल घेणारे लोक तयार आहेत आणि बँक त्यांना ६०० रुपये भांडवल पुरवठा करते. या कार्याच्या परिणामस्वरुपी हिशोबात येणारे परिवर्तन खाली स्पष्ट करण्यात आलेले आहे. या आराखड्याच्या पहिल्या वाक्यावरून हे स्पष्ट होत आहे की, १,००० रुपयाचे नवीन भांडवल जमा झाल्यामुळे बँकाच्या खाते आणि आधारांवर तत्काळ स्वरुपाचे कोणते परिणाम घडतील या आधारांच्या अभ्यासावरून स्पष्ट होते की तत्काळ स्वरुपात हे पूर्ण रोख भांडवल बँकांच्या सुरक्षित नगदी भांडवलात सामील करण्यात आले होते. दुसऱ्या वाक्यात असे आढळते की ज्या वेळी बँका आपल्या रोख भांडवलाचा वापर करतात तेव्हा हिशोबाचे स्वरुप कसे असेल. मात्र या दुसऱ्या वाक्यात जबाबदाऱ्यांचे रकाणे रिक्त सोडण्यात आलेले आहे. कारण आता त्यांच्यात पहिल्या वाक्यात नोंदलेल्या संख्या नोंदता येत नाहीत.

५) प्रथम स्थिती : बँकांमध्ये नवीन रोकडची आवक

जबाबदाऱ्या (Liabilities)		आधार (Assets)		
कर्ज खाते	बटाई खाते	रोख सुरक्षित	कर्ज	बटाई
66,600	40,400	11,000	30,000	60,000
		10,100	30,300	60,600

वरील मजकुरात स्पष्ट केल्याप्रमाणे की, बँकेकडून व्यावसायिक वर्गास कर्ज आणि बटाई तत्त्वावर मिळालेले नवीन भांडवल शेवटी बँकेच्याच खात्यांत परत जाईल. ६० टक्के अर्थात ५४० रुपये कर्ज खात्यात आणि ४० टक्के अर्थात ३६० रुपये बटाई खात्यात. खात्यात ९०० रुपयांच्या या वाढीमुळे तत्काळ बँकेच्या नगदी रकमेत परत वाढ होईल. परंतु बँक आपल्या नगदी सुरक्षित रकमेत ९०० रुपयांच्या या नवीन जबाबदारीच्या तुलनेत केवळ ९० रुपायांची वाढ पुरेशी समजली जाऊन बाकीचे ८१० रुपये वापरात घेईल. कर्ज खात्यामध्ये ५४० रुपयांची वाढ होत असल्यामुळे असे गृहीत धरून चालूया

की, कर्जाची मागणी करणारे उपलब्ध असून अशा प्रसंगी २७० रुपये कर्ज देऊन बाकीचे ५४० रुपये बटाई तत्त्वावर कर्जाची मागणी करणाऱ्यांना देण्यात येतील. या कार्य स्वरुपाचे स्पष्टीकरण खाली नमूद करण्यात आलेल्या आराखड्यात करण्यात आलेले आहे.

६) दुसरी स्थिती : वित्तपुरवठ्यात वृद्धी

जबाबदाऱ्या (Liabilities)		आधार (Assets)		
कर्ज खाते	बटाई खाते	रोख सुरक्षित	कर्ज	बटाई
61,140	40,760	11,000	30,300	60,600
		10,190	30,570	61,140

मागीलप्रमाणे पहिल्या वाक्यात नवीन रोकडीच्या आवकचे तत्काळ परिणाम आणि दुसऱ्या वाक्यात तिच्या रोख वापराच्या स्वरुपाचे स्पष्टीकरण करण्यात आलेले आहे.

परंतु ही स्थितीदेखील अस्थायी स्वरुपाची आहे. कारण ज्या प्रक्रियेचे वरील मजकुरात स्पष्टीकरण करण्यात आले आहे, ते अजून चालू राहील. तसेच अशा प्रकारे बँकांच्या खात्यांत वृद्धी अर्थात नवीन वित्त निर्माण होण्याची शृंखला चालू राहील. शेवटी एक स्थिती अशी येईल की बँक खात्यात होणाऱ्या एकूण वृद्धीची संख्या दहा हजार होईल. ज्याच्या तुलनेत बँकेने आपल्या नगदी सुरक्षित भांडवलात एक हजार रुपयांची वृद्धी केलेली असेल, या प्रक्रियेच्या सुरुवातीस बँकांना जनतेकडून मिळणारी पूर्ण नवीन रोख रक्कम नगदी सुरक्षितमध्ये सामील करून आता वित्ताच्या पुरवठ्यातील आणखीन वाढीची शृंखला थांबेल. शेवटी बँकांच्या हिशोबाचा एकूण आराखडा खाली नमूद केल्याप्रमाणे आहे.

७) अंतिम स्थिती : वित्तीय पुरवठ्यातील वृद्धीशी समतोल

जबाबदाऱ्या (Liabilities)		आधार (Assets)		
कर्ज खाते	बटाई खाते	रोख सुरक्षित	कर्ज	बटाई
66,000	44,000	11,000	33,000	66,000
(6,000	4,000	1,000	3,000	6,000)

कंसात दिलेल्या दुसऱ्या वाक्यात स्पष्ट करण्यात आले की, सुरुवातीच्या तुलनेत आता वित्तीय पुरवठा विभिन्न खाते आणि विभिन्न आधारात कोणती वाढ करण्यात आली. बँकांचे हिशेब आता समतोल आहेत. आता त्यांच्याजवळ आणखीन वित्तनिर्मिती कार्य होण्यासाठी नगदी रक्कम नाही. सुरुवातीचा आराखडा या अंतिम आराखड्यात परिवर्तीत करताना बँकांचा व्यवसाय ज्या परिस्थितींतून वाटचाल करीत जातो, यांपैकी दोन परीस्थितींचा आढ़ावा वर नमूद करण्यात आलेल्या आराखड्यात सादर करण्यात आला असून खाली नमूद करण्यात आलेल्या विभिन्न परिस्थितीपर्यंत या प्रक्रियेच्या परिणामी वित्तीय पुरवठ्यात होणारी वाढ़ सादर करण्यात येत आहे.

८) वित्तीय पुरवठ्यातील वाढीचा टप्प्यानुरुप तपशील

टप्पा	बँकेच्या खात्यांत वाढ़	नगदी सुरक्षित रकमेत वाढ़	कर्ज आणि बटाई वरील कर्जातील वाढ़
नवीन भांडवलाची आवक			
पहिली परिस्थिती	१०००	१००	९००
दुसरी परिस्थिती	९००	९०	८१०
तिसरी परिस्थिती	८१०	८१	७२९
चौथी परिस्थिती	७२९	७३	६५६
पाचवी परिस्थिती	६५६	६६	५९०
सहावी परिस्थिती	५९०	५९	५३१
सातवी परिस्थिती	५३१	५३	४७८
आठवी परिस्थिती	४७८	४८	४३०
नववी परिस्थिती	४३०	४३	३८७
दहावी परिस्थिती	३८७	३९	३४८
वगैरे	०	०	०
वगैरे	०	०	०
एकूण परिस्थिती स्वरुप	१०,०००	१,०००	९,०००

उपरोक्त आराखड्यात प्रत्येक वाक्यावरून असे लक्षात येते की खात्यातील वृद्धीच्या परिणामस्वरुपी बँक नवीन भांडवलाचा १० टक्के भाग नगदी सुरक्षित भांडवलात सामील करून बाकीच्या ९० टक्के भागाचा वापर करते. एका टप्प्यात जे भांडवल बँकेच्या वापराच्या परिणामस्वरुप व्यावसायिक पक्षांना मिळते, पुढील टप्प्यात तेच भांडवल बँकेच्या खात्यात वृद्धीच्या स्वरुपात प्रकट होते. अशा प्रकारे खाते, नगदी सुरक्षित आणि कर्ज व बटाई तत्त्वावर देण्यात आलेल्या भांडवलात सतत वाढ होत असते. खात्यांच्या रकान्यांचा अभ्यास केल्यावर हेदेखील लक्षात येते की प्रत्येक नवीन वाढ मागील वाढीपेक्षा लहान आणि ९/१० आहे. वृद्धींची संख्या लहान लहान होत जाते. पहिल्या टप्प्यात एक हजाराची वृद्धी झालेली होती, परंतु दहाव्या टप्यात केवळ ३८७ चीच वृद्धी झाली. यावरून अनुमान काढता येतो की एक टप्पा असादेखील येईल की ज्या वेळी वृद्धीची संख्या जवळपास शून्य होईल. १० टप्प्यांत खात्यांमध्ये होणाऱ्या वाढीची एकूण संख्या ६५०० एवढी आहे. परंतु सर्व टप्प्यांनंतर ही संख्या १० हजार एवढी होईल. (हिशोबाच्या एका प्रसिद्ध नियमानुसार व निम्नलिखित सूत्रानुसार अशा प्रकारे मांडता येईल $1 + (\frac{9}{10})^2 + (\frac{9}{10})^3 + ...$)

नगदी सुरक्षित राशीच्या रकान्यावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. बँकेचा नियम असा आहे की, ज्या ज्या वेळी तिच्या जबाबदाऱ्यांत (म्हणजे खात्यांत) वृद्धी होईल या तुलनेत १० टक्के नगदी सुरक्षित करते. म्हणूनच या रकान्याची प्रत्येक संख्या ही पहिल्या रकान्याच्या संख्येच्या $\frac{9}{10}$ एवढी आहे. त्यामुळे नगदी सुरक्षित राशीमध्ये होणारी वाढ लहान होत जाते आणि एक टप्पा असादेखील येईल की तो जवळपास शून्य असेल. या रकान्यात १० टप्प्याची ६५० रुपये आणि एकूण टप्प्याची राशी एक हजार आहे.

शेवटचा रकाना असे दर्शवितो की, बँकेच्या खात्यांत नवीन भांडवलाच्या आगमनामुळे बँकेकडून देण्यात येणारे कर्ज आणि बटाई भांडवलात किती गतीने वाढ होत आहे. वाढीची संख्या प्रत्येक टप्प्यात मागील संख्येपेक्षा कमी आहे. एक वेळ अशी येईल की ती शून्यावर पोहोचेल. या प्रसंगी ही वाढ ९ हजारापर्यंत पोहोचली असेल. हा तोच टप्पा आहे, ज्यामध्ये बँकेच्या खात्यात आणि नगदी राशीत होणाऱ्या वाढीची संख्या शून्याच्या जवळपास पोहोचलेली असेल. या टप्प्यावर वित्त पुरवठ्याच्या विस्तारीकरणाची प्रक्रिया थांबलेली असते. कारण की, ही प्रक्रिया खात्यातील भांडवलाच्या आवकवर अवलंबून होती. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास शेवटच्या रकान्यावरून असे निदर्शनास येते की बँक आपले नगदी भांडवल कशा रितीने वापरते आणि ज्या वेळी तिच्याजवळ नगदी भांडवल नसेल तेव्हा हा वापरसुद्धा बंद होईल.

संपूर्ण टप्प्यांच्या पूर्णत्वावर विविध रकान्यांच्या अभ्यासावरून निदर्शनास येते की बँकांना जनतेकडून एक हजाराएवढी जी नवीन रोकड प्राप्त झाली होती, ती पूर्णत: बँकेच्या रोख सुरक्षित भांडवलात सामील करण्यात आलेले होते. परंतु यामुळे वित्त पुरवठ्यात ९ हजाराची वाढसुद्धा झालेली आहे. हे नऊ हजार रुपये बँकेचे कर्ज खात्यात आणि बटाई खात्यात वेगवेगळ्या खातेदारांच्या नावाने जमा झालेले असून हे खातेदार या वित्ताचा मालकीहक्काप्रमाणे वापर करू शकतात. परंतु या वित्ताचे अस्तित्व केवळ बँकेच्या नोंदवहीतील नोंदणीपुरतेच आहे. अर्थात नाणी आणि चलनी नोटांच्या स्वरुपात मुळीच नसते. बँकेकडून हा नवीन व्यवसाय यामुळे शक्य झाला की, यापासून बँकेस नवीन रोख राशी प्राप्त झाली आणि व्यावसायिकांमध्ये भांडवलाची इच्छा निर्माण झाली.

नियोजनाच्या सुरुवातीच्या वेळी वित्ताची एकूण रक्कम एक लाख होती. परंतु आता मात्र एक लाख दहा हजार एवढी आहे. या दहा हजाराच्या वाढीमधून एक हजाराची ही रक्कम जनतेने बँकेत रोख जमा केलेली होती. तसेच नऊ हजाराची रक्कम ते नवीन वित्त होय, जे बँक व्यवसायाच्या माध्यमाने निर्माण झाले. हे नवीन वित्त बँकेच्या खात्याच्या स्वरुपात आहे. बँकेचे खाते वित्त स्वरुपाचे आहे. कारण प्रत्येक खातेदार आपल्या खात्यांतून त्याने दिलेल्या चलनी स्वरुपातील पैसा काढू शकतो अथवा धनादेशाच्या माध्यमाने पैसा इतरांकडे स्थलांतरित करू शकतो. ते नवीन वित्त असेल. (बटाई खात्यातून धनादेशांच्या माध्यमाने पैसा हस्तांतरित करण्यात येऊ शकतो तसेच या खात्यांत रकमा परत घेण्यासाठी पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. अशी वस्तुस्थिती असल्यामुळे अशी पद्धत अंगीकारणे सवडीचे होईल की, वित्त हे केवळ कर्ज खात्यालाच समजावे. अशा परिस्थितीत उपरोल्लेखित उदाहरणांमधील वित्तपुरवठ्यातील विस्तारीकरणाची जी क्रिया स्पष्ट करण्यात आली आहे. तिच्या स्वरुपावर काहीच फरक पडणार नाही. मात्र असे सांगता येईल की वित्ताची एकूण रक्कम ६० हजारापेक्षा वाढून ६६ हजार रु. एवढी झाली. दुसरी पद्धत अशी की बँका आपला व्यवसाय अशा पद्धतीने शिस्तबद्ध करतील की, बटाई खात्यांतून रकमा परत मागणाऱ्यांना जास्त विलंब न लावता रक्कम परत देण्यात येईल. यामुळे खाते आणि बटाई खात्यांतील असलेली तफावत दुर्लक्षित करण्यात यावी. सुलभ आकलनास्तव आम्ही हीच प्रणाली अंगीकारली आहे.) बँकांच्या खात्यांत १० हजारांची वृद्धी ही वित्त पुरवठ्यात १० हजारांची वृद्धी होय.

आता ही गोष्ट स्पष्ट झाली आहे की जेव्हा बँकेस नवीन रोख प्राप्त होते, तेव्हा बँक भांडवलाची निर्मिती आणि पत (Credit) च्या विस्तारीकरणाची प्रक्रिया कशा रितीने चालते. मूलभूत गोष्ट अशी की बँकांचा हेतु आधिक लाभ कमविणे होय. म्हणून बँका आपल्याकडे एवढीच रोकड सुरक्षित ठेवतील, की ज्यांमुळे लोकांच्या नगदीच्या मागण्या पूर्ण करणे शक्य होईल. बाकीची रोख रक्कम उपयोगात घेण्यात येते. व्यावसायिकवर्गास भांडवल पुरवठा करणे आणि बँकिंग व्यवस्थेनुसार हे भांडवल

बँकेच्या खात्यांत परत येण्याच्या परिणामस्वरुप टप्प्याटप्प्याने उपरोल्लेखित स्पष्टीकरण करण्यात आल्याप्रमाणे प्रक्रिया होते.

यानंतर आता हे पाहणे योग्य ठरेल की ज्या गोष्टी उदाहरणांच्या आकलनास्तव सुलभ करण्यासाठी गृहीत धरण्यात आल्या होत्या, त्या बदलून टाकल्यास गृहीत धरलेल्या बाबींतील परिवर्तनामुळेसुद्धा या मजकुरावर काहीही फरक पडणार नाही.

आम्ही गृहीत धरलेली पहिली बाब अशी होती की नगदी सुरक्षित रोकड आणि खात्यांदरम्यान असणारे प्रमाण हे एकास दहा (१:१०) आहे. जर हे प्रमाण एकास पाच किंवा एकास वीस (१:५ किंवा १:२०) ठेवल्यास उदाहरणांतील विविध आराखड्यांतील संख्यादेखील अवश्य बदलणार. मात्र प्रक्रियेचे स्वरुप आणि परिणाम मुळीच बदलणार नाहीत. नगदी रोख खात्यांतील राशी केवळ पाच टक्के असेल, तर बँकांना एक हजार नवीन रोख मिळण्याच्या परिणामस्वरुपी वित्त पुरवठ्यात २० हजारांची वाढ आणि नगदी सुरक्षित खात्यात २० टक्क्यांची वाढ झाल्यास वित्त पुरवठ्यात केवळ पाच हजारांची वाढ होईल. परंतु हा परिणाम जशास तसाच राहील. नवीन वित्त अस्तित्वात येऊन वित्त पुरवठ्यात वाढ होईल.

या ठिकाणी हेदेखील स्पष्ट करणे योग्य होईल की कर्ज खाते आणि बटाई खात्यांसाठी नगदी रोकडचे वेगवेगळे प्रमाण गृहीत धरल्यास आपल्या चर्चेच्या निष्कर्षांवर काहीच फरक पडणार नाही. समजा कर्ज खात्याच्या तुलनेत १० टक्के रोख रक्कम सुरक्षित करण्यात येते. परंतु बटाई खात्यासाठी केवळ पाच टक्केच रकम सुरक्षित ठेवण्यात येते. अशा वेळी सुरुवातीस बँकेची नगदी सुरक्षित रक्कम केवळ आठ हजार एवढी होईल आणि बटाई तत्त्वावर देण्यात येणारे भांडवल केवळ ६२ हजार एवढे असेल. एक हजार रुपये नवीन भांडवलाच्या आवकमुळे वित्तपुरवठ्यात १२५०० रुपयांची वाढ होईल. संख्येतील होणाऱ्या या परिवर्तनाव्यतिरिक्त वित्तनिर्मिती आणि वित्तपुरवठ्यात वाढ होण्याच्या प्रक्रियेच्या स्वरुपावर काहीच फरक पडणार नाही.

दुसरी ग्राह्य बाब अशी होती की, व्यावसायिक पक्षास कर्ज किंवा बटाई तत्त्वावर भांडवल पुरविणाऱ्या व्यावसायिक पक्षाचे संपूर्ण भांडवल शेवटी बँकेच्या खात्यातच परत येते. आता या गृहीत धरलेल्या बाबीस सोडून असे गृहीत धरा की, पुरविण्यात आलेल्या भांडवलाचा नववा भाग जनतेच्या हाती स्थिर होतो आणि केवळ ९/८ एवढा भाग बँकेच्या खात्यात जमा करण्यात येतो. आता टप्पेवारी वृद्धीच्या वरील आराखड्यात खाते मापनांमध्ये होणारी वाढ ही मागील वाढीच्या केवळ ४/५ एवढी आहे आणि वित्त पुरवठ्यात होणारी एकूण वाढ ही केवळ पाच हजार एवढी होईल. बँकेच्या नगदी सुरक्षित रकमेत केवळ ५०० ची वाढ होऊन एक हजाराचे जे नवीन भांवडल प्रारंभीस बँकेत जमा करण्यात आलेले होते, त्यातील ५०० रुपये जनतेच्या हातात स्थिर असतील. याचे तपशीलवार वर्णन खालील आराखड्यात दिलेले आहे.

टप्पा	खात्यांत वाढ	नगदी सुरक्षित रकमेत वाढ	कर्ज व बटाई वर दिलेल्या भांडवलात वाढ	जनतेच्या नगदी रोकड मधील वाढ
नवीन भांडवलाची आवक				
पहिला टप्पा	१०००	१००	९००	
दुसरा टप्पा	८००	८०	७२०	१००
तिसरा टप्पा	६४०	६४	५७६	८०
चौथा टप्पा	५१२	५१	४६१	६४
पाचवा टप्पा	४१०	४१	३६९	५१
वगैरे	-	-	-	-
वगैरे	-	-	-	-
एकूण परिस्थितीचे स्वरुप	५०००	५००	४०००	५००

वरील आराखड्यावर विचार केल्यास या गोष्टीचे समाधान होऊ शकते की वित्तपुरवठ्यात होणाऱ्या वृद्धीची प्रक्रिया या ग्राह्य बाबीवर अवलंबून नाही की, बँकेने पुरविलेल्या भांडवलाचा कोणताही भाग जनतेच्या हाती न थांबता शेवटी हे संपूर्ण भांडवल बँकांच्या खात्यांत परत यावा. ही गोष्ट पुरेशी आहे की, दिलेल्या भांडवलाचा एक भाग बँक खात्यांत परत यावा. बँकिंग कार्यपद्धती आणि आधुनिक समाजातून मिळणाऱ्या अनुभवाच्या आधारे वास्तविकतेशी संबंधित असलेली ग्राह्य बाब हीच आहे की, बँकांनी पुरवठा केलेल्या भांडवलाचा महत्तम भाग शेवटी बँकांच्या खात्यांतच परत येत असतो. या भांडवलाचा एक भाग जनतेच्या हातीच स्थिरावल्याने त्याच्या प्रमाणावर प्रभाव पडतो आणि हा प्रभाव प्रारंभी येणाऱ्या नवीन भांडवलाच्या आणि वित्तपुरवठ्याच्या एकूण वाढीदरम्यान दिसून येतो. नवीन भांडवलाच्या आवकीमुळे वित्तपुरवठ्याच्या विस्तारप्रक्रिया याशिवाय चालू असतात.

आमच्या तिसऱ्या आणि चौथ्या ग्राह्य बाबीच्या नियोजित प्रक्रियेबरोबर कोणताच प्रत्यक्ष संबंध नाही. कारण ही प्रक्रिया खात्यांतील मोजमापाच्या अशा अर्थात कर्ज आणि बटाई खात्यांच्या आपसांतील प्रमाणांवरील परिवर्तनांवर अवलंबून आहे. दोन्ही प्रकारच्या खात्यांतील ठरविण्यात येणाऱ्या राखीव राशीचे प्रमाण भिन्न

असल्यास आणि दरम्यानी टप्प्यांतील या खात्यांतील प्रमाणात परिवर्तन झाल्यास उदाहरणांमधील नमूद केलेल्या संख्यामध्ये परिवर्तन होईल. परंतु या परिवर्तनाशिवायसुद्धा वित्तपुरवठ्यात होणाऱ्या वाढीची प्रक्रिया जशास तशीच राहील आणि वर नमूद केल्याप्रमाणेच सुरु राहील.

वरील चर्चेतून असा निष्कर्ष निघतो की आम्ही प्रस्तुत केलेल्या व्याजमुक्त बँकिंग-व्यवस्थेतसुद्धा बँक भांडवलाची निर्मितीदेखील अगदी सद्यस्थितीतील बँक प्रणालीच्या मूळ आधारांवरच होईल. आपल्या रकमा बँकेत सुरक्षित ठेवण्याच्या आणि दैनंदिन व्यवहारासाठी स्वत:कडे थोडासा पैसा बँकेतून काढून घेण्याच्या या जनतेच्या सवयी (कारण बहुतेक व्यवहार हा धनादेशद्वारेच चालतो.) तसेच आपल्या खात्यातील जमा असलेल्या एकूण भांडवलाची छोटीशी राशी लोकांच्या त्वरीत मागणीनुसार त्यांना तत्काळ प्रदान करण्यासाठी राखीव रक्कम सुरक्षित ठेवून बाकीचे भांडवल वापरात घेण्याचा बँकेचा नियम असतो. ज्याप्रमाणे प्रचलित असलेल्या बँकेच्या व्याजव्यवस्थेत बँकिंग प्रणाली आणि वित्तनिर्मितींची पद्धत आहे, नेमकी हीच पद्धत व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेची आहे. वित्तनिर्मिती प्रक्रियेवर या गोष्टीचा काहीच परिणाम होत नाही की, बँकेने व्यावसायिकांना भांडवलपुरवठा करून व्याजाची मागणी करावी अथवा नफ्याची मागणी करावी किंवा आपल्या खातेदारांना त्यांनी खात्यांत जमा केलेल्या रकमेवर व्याज द्यावे अथवा मिळणाऱ्या नफ्यातून एक भाग द्यावा.

१) बँक भांडवल रद्द करणे आणि वित्तसामग्री कमी करणे

ज्याप्रमाणे नवीन नगदी रक्कम बँकेस मिळाल्याने त्यांच्या व्यवसायात वृद्धी आणि भरभराट निर्माण होते आणि याच्या परिणामस्वरुप नवीन वित्तसामग्री निर्माण होते. याचप्रमाणे खातेदाराने आपल्या खात्यांतून काही भांडवल काढून घेतल्यास आणि जनतेची रोख मागणी वाढत गेल्यास, काही रकमा काढत गेल्यास अशी रक्कम जनतेच्याकडेच स्थिरावेल आणि बँकेत परत येणार नाही. यामुळे बँकेचा व्यवसाय अकुंचित होतो आणि परिणामी बँक भांवडलाचा काही भाग घटत असतो. खालील मजकुरात नमूद करण्यात आले आहे की, बँकेच्या नगदी रकमेत कमतरता आल्यामुळे कशा रितीने बँक व्यवस्था बंद पडते आणि वित्तसामग्रीत घट होते.

रोख सुरक्षित रक्कम आणि खात्याची गोळाबेरजेदरम्यान असलेले प्रमाण १:१० असे गृहीत धरूया. आमची दुसरी ग्राह्य बाब अशी की, ज्या वेळी बँक व्यावसायिक कर्ज किंवा बटाई तत्त्वावर दिलेले भांडवल परत घेते, त्या वेळी या कारणास्तव शेवटी तिच्या खात्यांमधूनसुद्धा एवढेच भांडवल परत काढण्यात येते. कारण ज्याअर्थी व्यावसायिक आपला व्यवसाय बंद करतील अथवा पहिल्यापासून सुरु असलेला व्यवसाय कमी करतील, त्याअर्थी मिळकत घट होण्याच्या स्वरुपात याचा परिणाम जाणवेल. ज्या लोकांच्या (मजूर, कर्मचारी, मालक, दुकानाचे मालक वगैरे) उत्पन्न कमी होतील अथवा

कमाईच संपून जाईल, ते या कमतरतेच्या भरपाईसाठी आपल्या बँक खात्यातून रकमा काढून घेण्यास विवश होतील. स्वत: व्यावसायिकांचे चालू खाते अर्थात कर्ज खात्यात घट होणे निश्चित आहे. ही बाब बँकेच्या खात्यातील होणारी घट ही त्यांनी परत मागणी केलेल्या भांडवला समान असेल. ही बाब केवळ एवढ्यासाठी गृहीत धरण्यात आली आहे की सांख्यिकी उदाहरणे क्लिष्ट होऊ नयेत. वस्तुस्थितीच्या जास्त जवळ हे आहे की, खात्यातील घट होण्याचे प्रमाण परत घेतलेल्या भांडवलाच्या प्रमाणापेक्षा कमी असेल. परंतु आमच्या ग्राह्य बाबीचा आमच्या चर्चेच्या निष्कर्षांवर अर्थात वित्तसामग्रीतील घट प्रक्रियेच्या स्वरुपावर काहीही परिणाम होत नाही.

वर स्पष्ट केल्याप्रमाणे आम्ही असे गृहीत धरीत आहोत की, कर्ज आणि बटाई खात्यांदरम्यान असलेले प्रारंभी काळातील आढळणारे प्रमाणच खात्यांच्या एकूण संख्येतील घट होऊनसुद्धा जशास तसे कायम राहील. म्हणून निश्चितरित्या ज्याअर्थी बँका व्यावसायिकांकडून भांडवल परत घेतील आणि परिणामी व्यवसाय व उद्योग बंद पडतील अथवा व्यवसायाच्या मर्यादा सीमित होतील, त्याअर्थी बऱ्याचजणांच्या कमाईत विलक्षणरित्या घट होईल आणि परिणामस्वरुपी ते आपल्या बचती बँकेतून काढून खर्च भागवून घेतील. अशा प्रकारे भांडवल परतीचा प्रभाव दोन्ही खात्यांवर पडेल. सुलभ आकलनासाठी आपण असे गृहीत धरूया की खात्यात एकूण होणाऱ्या कमतरतेचा प्रभाव हा ६० टक्के कर्ज खात्यांवर आणि ४० टक्के बटाई खात्यांवर होईल. उदाहरणे दिल्यानंतर ही ग्राह्य बाब सोडून देण्यात येईल कारण खात्यांच्या आपसातील प्रमाणातील परिवर्तनाचा आमच्या चर्चेवर काहीच फरक पडत नाही.

समजा, बँकेच्या कर्ज खात्यातून आणि बटाई खात्यांतून एक हजार रुपये काढण्यात आले. बँकेने ही रक्कम नगदी अदा करून लोकांच्या वाढत्या रोख रकमेच्या मागणीमुळे ही रोकड परत बँकेत येऊ शकली नाही. बँकेच्या नगदी सुरक्षित रकमेत एक हजाराची घट झाली आणि खात्यांच्या गोळाबेरजेतसुद्धा एक हजाराची घट झाली. खात्यांतील एक हजाराच्या कमतरतेमुळे बँक आपल्या रोख रकमेत १०० रुपयांची घट करू इच्छिणार. ही कमतरता पूर्ण करण्यासाठी बँकेस असे प्रयत्न करावे लागतील की, ज्यातून बँकेस नवीन नगदी भांडवल हस्तगत व्हावे. यासाठी कर्ज आणि बटाई वर देण्यात आलेले भांडवल परत घेण्यास (किंवा रोखे (Bond) विकण्यास) बँक विवश होईल. भांडवल परत घेण्याची पद्धत कोणतीही असली तरी हे भांडवल व्यावसायिकवर्गाकडून परत घेण्यात येईल.

ज्याअर्थी व्यावसायिकवर्ग बँकेस ९०० रुपये परत देईल, तेव्हा बँकेच्या खात्यांमधून आणखीन ९०० रुपये काढ़ण्यात येतील. याच्या परिणामस्वरुपी बँकेच्या रोख सुरक्षित रकमेत परत ८१० रुपयांची आपोआप घट होईल. याच्या भरपाईसाठी ती परत ८०० रुपयांसम भांडवल व्यावसायिकवर्गाकडून परत घेईल. बँकेकडून भांडवल

परत घेण्याची आणि तिच्या परतीसाठी खात्यांमधून भांडवल परत काढण्याची सततची क्रिया चालूच राहील. मात्र प्रत्येक टप्प्यावर खात्याच्या गोळाबेरजेमध्ये होणारी घट ही मागील टप्प्यातील घटीच्या ९/१० एवढी असेल. संख्येनुसार खात्यांत होणारी ही घट लहान होईल आणि शेवटी ही घट संपुष्टात येईल. या शृंखलेच्या समाप्तीवर बँकेच्या खात्यांत एकूण १० हजारांची घट झालेली असेल. यातील सद्यस्थितीतील रोख रक्कम जी जनतेला १००० रुपये रोख दिल्यानंतर फक्त ९००० एवढीच बाकी राहिली, खात्यांची सध्याची गोळाबेरीज अर्थात ९० हजारांसाठी राखीव ठेवण्यासाठी पुरेशी असेल. बँकेच्या हिशोबात परत एकदा समतोल निर्माण होईल. खाली दिलेल्या आराखड्यात प्रारंभी काळातील आणि अंतिम काळातील असलेले बँकांचे हिशोबपत्र नमूद करण्यात आले आहे.

जबाबदाऱ्या (Liabilities)		आधार (Assets)		
कर्ज खाते	बटाई खाते	नगदी सुरक्षित	कर्ज	बटाई
60,000	40,000	10,000	30,000	60,000
54,000	36,000	9,000	27,000	54,000

विषयवाढीच्या भयास्तव दरम्यानच्या टप्प्याचा सविस्तर तपशील वर्णन करण्यात आलेला नाही. उपरोक्त स्पष्टीकरणानुसार टप्पेवारी होणाऱ्या घटीचे सांख्यिकी स्पष्टीकरण सहजतेने नमूद करता येऊ शकते. आपल्या स्वरुपानुसार ही प्रक्रिया अशाच खात्यांच्या संख्येतील टप्पेवारी वाढीच्या प्रक्रियेप्रमाणे उलट दिशेने चालते. या प्रक्रियेचा खुलासा अथवा सार असा की, पाहिजे असलेली आपली रोख रक्कम कमी वाटल्यास बँक या घट अथवा कमतरतेच्या भरपाईसाठी भांडवल परत करण्याची मागणी करते. भांडवलाच्या परताव्यामुळे खात्यात घट होत असल्या कारणाने वस्तुत: बँकेने या प्रकारचे पाऊल उचलल्यास नवीन रोकड तर प्राप्त होत नाही, परंतु तिच्या खात्यांत एवढी कमतरता होते की, तिच्या जवळील वर्तमान नगदी खात्यांच्या नवीन गोळाबेरजेचा केवळ दहावा भागच उरतो.

वरील उदाहरणात बँकांच्या खात्यात जी १० हजारांची घट झालेली आहे, यापैकी एक हजाराची ती रक्कम आहे की, जी नगदी स्वरुपात बँकेच्या खजिन्यातून जनतेच्या हाती स्थलांतरीत होते. बाकी नऊ हजारांची घट ही खात्यांतून नष्ट झाल्याचा परिणाम होय. जनतेने आपल्या नगदी साठ्यात जी वाढ केली ती नाणी आणि चलनी नोटांच्या स्वरुपात कोठेतरी असेल, परंतु या नऊ हजारांचे आता अस्तित्व संपलेले आहे. भूतकाळात

बँकेच्या व्यवसायातील विस्तारीकरणाच्या परिणामस्वरुपी बँकेची निर्मिती झाली होती. त्याचा एक भाग आता बँकेच्या व्यवसायातील होणाऱ्या घटीमुळे नष्ट झाला.

समजा, असे गृहीत धरा की बँकेने आपले दिलेले बटाई तत्त्वावरील कर्ज किंवा इतर कर्ज परत घेतले तर याच्या परिणामस्वरुपी तिच्या खात्यांतून काढून घेण्यात येणाऱ्या रकमा, या परत घेतलेल्या भांडवलांपेक्षा कमी असतील. अशा परीस्थितीत खात्यांत टप्पेवारीने होणाऱ्या घटीची संख्या उपरोल्लेखित उदाहरणाच्या तुलनेत खूप छोटी असेल. तसेच 'घटी'चे प्रमाणसुद्धा तुलनात्मकरित्या कमी असणार. उदाहरणार्थ, जर खात्यांतून परत काढण्यात आलेल्या रकमा बँकेस परत होणाऱ्या भांडवलाचा ८/९ असेल तर वित्तसामग्रीमधील एकूण घट ही केवळ ५००० असेल. हे संक्षिप्त बाबीचे वर्णन वित्तसामग्रीत विस्तारीकरणाच्या प्रक्रियेच्या स्पष्टीकरणामध्ये दिलेल्या (टप्पेवारी वृद्धीच्या) इतर आराखड्याच्या मदतीने सहज आकलन करणे शक्य होईल. यावरून हे स्पष्ट होते की वित्तसामग्रीत घट प्रक्रिया या गोष्टीवर अवलंबून नाही की खात्यात निर्माण होणारी घट ही परत घेण्यात येणाऱ्या भांडवलासम असावी.

याचप्रमाणे आमच्या इतर ग्राह्य बाबीत होणारे परिवर्तनसुद्धा या निष्कर्षांना प्रभावीत करू शकणार नाहीत की बँकांच्या नगदी राशींमध्ये होणारी वित्तीय घट नष्ट होण्याचे आणि पत (Credit) मध्ये कमतरता येण्याचे कारण बनते. रोख सुरक्षित आणि खात्यांच्या मोजणीदरम्यान अथवा कर्ज खाते व बटाई खात्यांदरम्यान अथवा कर्ज खाते आणि दिलेल्या कर्जांदरम्यान यापेक्षा विभिन्न प्रमाण गृहीत धरता येईल. हेच आम्ही उदाहरणे देण्यासाठी गृहीत धरले आहे. असे असूनही आमची चर्चा याच निष्कर्षापर्यंत पोहोचणार.

आता हे स्पष्ट करण्यात आले आहे की बँकांच्या व्यवसायांत घट किंवा वृद्धीच्या परिणामस्वरुप कशा प्रकारे नवीन वित्त नष्ट होते किंवा निर्माण होते. ही वास्तविकतादेखील स्पष्ट झालेली आहे की बँकांच्या व्यवसायातील विस्तारीकरण किंवा घट हे जास्तकरून त्यांच्या नगदी रकमेत होणाऱ्या वाढीवर किंवा घटीवर अवलंबून आहे. हेसुद्धा स्पष्ट आहे की बँकेच्या नगदी भांडवलातील घट व वृद्धी जनतेच्या नगदीच्या मागणीतील वृद्धी वा घटीवर आणि केंद्रीय बँकेच्या अर्थनीतीवर अवलंबून असल्यामुळे बँक भांडवलाची निर्मिती आणि संपुष्टता हे केवळ बँकांच्या अधिकारात नाही. आता केवळ एवढाच प्रश्न बाकी उरतो, तो असा की, पत विस्तारीकरणात बँका कशा प्रकारे सक्रिय भूमिका निभावू शकतात. परंतु याविषयी या प्राथमिक दर्जाच्या माहितीमध्ये चर्चा योग्य नाही. एवढा संकेत पुरेसा ठरेल की केंद्रीय बँकेच्या मर्यादाकक्षेत राहून साधारण बँका भांडवलाची निर्मिती आणि पत विस्तारीकरणाच्या बाबतीत एक सक्रिय भूमिका निभावू शकते. सक्रिय भूमिकेची संधी याकारणामुळेदेखील जास्त वाढते की सामान्यत: बँकेजवळ नगदी भांडवल नियमानुसार ठेवण्याच्या तुलनेत जास्त असते. याहीपेक्षा जास्त हे की, द्वितीय

राखीव आधारामुळे अर्थात ज्यांना तत्काळ नगदी स्वरुपात बदलणे शक्य होय, या गोष्टीची संधी देते की स्वतंत्र बँकांच्या व्यवसायांवर त्यांच्या नगदी राशीतील प्रत्येक घट किंवा वृद्धीचे पूर्ण परिणाम होऊ नये. नगदीत घट होऊनही बँकांजवळ नियमानुसार नगदी सुरक्षित भांडवल असल्यास त्या व्यावसायिक पक्षाकडून भांडवल परत घेण्यास व याचप्रमाणे वित्तसामग्रीतील घट प्रक्रिया सुरु करण्यास विवश होणार नाहीत. त्याचप्रमाणे बँकेस वित्त सामग्रीतील विस्तारीकरण करावयाचे झाल्यास त्या नवीन नगदी भांडवलाची आवक आपल्या भांडवलाच्या वृद्धीसाठी वापरता येईल.

१०) बँकांचा नफा व तोटा आणि वित्तनिर्मिती प्रक्रिया

बँकांना नवीन रोख रक्कम प्राप्त झाल्यास 'पत' (Credit) मध्ये विस्तारीकरण किंवा घट झाल्यास ज्या प्रक्रियेचे स्पष्टीकरण वर देण्यात आले आहे, यात या गोष्टीमुळे काहीच फरक होत नाही की ज्यामुळे बँकांना व्यवसायामुळे एकूणरित्या नफा होत असेल. प्रचलित व्यवस्थेत बँकांना बटाई तत्त्वांवर पुरविण्यात आलेल्या भांडवलाच्या माध्यमाने नफा हा व्यावसायिक वर्गास आपल्या भांडवल व्यवस्थेच्या परिणामस्वरुपी होणाऱ्या नफ्याच्या स्वरुपात होईल. अशाप्रसंगी नफ्यामुळे व्यावसायिकवर्गाकडून भांडवलाची मागणी असेल. जर बँकांना नवीन नगदी भांडवल मिळत असेल तर भांडवल मागणीमुळे त्यांच्या व्यवसायात वाढ तर होईलच तसेच वित्तसामग्रीतदेखील वाढ होईल. अशा प्रसंगी की जेव्हा वित्तशास्त्रात वाढलेल्या भांडवल व्यवस्थेच्या परिणामस्वरुपी निर्मितीत वृद्धी होत असेल तर केंद्रीय बँकेने यासाठी प्रयत्नशील होणे आवश्यक आहे की तिने नगदी सामग्रीत वाढ करावी की जेणेकरून वित्तसामग्रीतसुद्धा वस्तुंच्या वाढ़ीसह प्रमाणशीर वाढ होत राहावी. असे न केल्यास वस्तु आणि सेवांच्या दरात घट होईल. दरांतील घटींची वृत्ती जास्त काळापर्यंत कायम राहिल्यास व्यावसायिकवर्गांचा नफा कमी होईल. व्यावसायिक क्रियांना ग्रहण लागेल आणि परिणामस्वरुप रोजगाराचा आणि कमाईचा आलेख कोलमडून जाईल. बँकांना नफा होत असेल, परंतु केंद्रीय बँकेच्या काहीशा नीतीमुळे आणि लोकांच्या नगदी मागणीच्या वाढ़ीमुळे बँकांच्या नगदी रकमेत घट होत असल्यास भांडवलाची मागणी असूनदेखील बँकेला आपला व्यवसाय विस्तारणे शक्य होणार नाही. उलट व्यावसायिकांकडून भांडवल परत घेण्यास विवश तर होईलच व याचबरोबर वित्तसामग्रीमध्येसुद्धा घट होईल. ही घट प्रक्रिया जास्त काळ सुरु असल्यास व्यवसायाची वर्तुळमर्यादा सीमित होईल. बेरोजगारीत वाढ होईल, उलाढाल आणि पैशांची आवक कमी होईल. मागणी कमी होईल आणि व्यावसायिकांना प्रचंड तोट्यास सामोरे जावे लागेल. परिणामी बँकांची आर्थिक स्थितीदेखील कोलमडून जाईल. बँकेच्या व्यावसायिक नफावाढीसाठी हे आवश्यक आहे की वाढ़ती निर्मिती आणि व्यवसाय

विस्तार प्रक्रियेबरोबरच वित्तसामग्रीमध्येदेखील याच गतीने वाढ होत राहावी. परंतु ही बाब सामान्य बँकेच्या अधिकारात नसून केंद्रीय बँकेच्या अधिकारात आहे. या विषयावर विस्तारीत चर्चा करणे या ठिकाणी योग्य होणार नाही. येथे केवळ एवढेच स्पष्ट करण्याचा आमचा उद्देश आहे की नगदी भांडवलातील वाढ ही वित्तसामग्रीतील विस्तारीकरणाचा आणि नगदी भांडवलातील घट ही वित्तसामग्रीतील घट होण्याचे कारण सिद्ध होईल. हा विचारच मुळात करण्याची गरज नाही की सर्वच बँकांना एकूणरित्या तोटा होईल. कारण असे केवळ अशा स्थितीतच शक्य आहे की, जेव्हा व्यावसायिकवर्गाच्या भांडवलनिर्मितीचे अनुकूल परिणाम मिळणार नाहीत. भांडवलनिर्मितीचा स्वभाविक परिणाम हा निर्मितीत घट नसून वृद्धी आहे. ही बाब तर सतत शक्य आहे की काही व्यावसायिकांच्या चुकीच्या निर्णय व नीतीमुळे नुकसान होत असते, परंतु संपूर्ण व्यावसायिकांच्या भांडवलनिर्मितीत नुकसान होणे हे केवळ अशा परिस्थितीतच शक्य आहे, जेव्हा विघटन अथवा बाजाराच्या मंदीमुळे वस्तुंच्या वा उत्पादनांच्या किंमतीत सतत घट होत असेल. या प्रतिकूल परिस्थितीस सार्वजनिक संपत्ती आणि चुकीची अर्थनीती जबाबदार असेल. याविषयी येथे चर्चा योग्य ठरणार नाही. केंद्रीय बँक वित्ताच्या बाबतीत योग्य पावले उचलून आणि शासन सार्वजनिक संपत्तीच्या बाबतीत विस्तारनीती अवलंबून लवकरच या प्रतिकूल परिस्थितीत सुधारणा करु शकते. समजा, सर्व बँकांचे आपल्या व्यवसायात नुकसान होत असल्यास हे स्पष्ट करणे आवश्यक ठरेल की बँकांना नवीन रोख प्राप्त झाल्यास किंवा नगदी रकमेत घट झाल्यास कोणत्या परिणामांस सामोरे जावे लागेल.

ज्या वेळी व्यावसायिकवर्गास व्यवसायात नुकसान होत असेल तेव्हा भांडवलाची मागणी घटत जाईल, अशा परिस्थितीत बँकांना नवीन रोख रक्कम प्राप्त होत असल्यास वाढीव भांडवलाची मागणी नसल्याकारणाने त्यांच्यासाठी व्यवसायात वृद्धी करणे शक्य होणार नाही. बँकात नवीन रोख रकमेची आवकसुद्धा वित्तसामग्रीचा विस्तार करू शकते. नुकसानीच्या परिस्थितीत रोख रकमेची चणचण आणि जर ही चणचण एवढी वाढली की खात्यांतील कमी होत जाणाऱ्या संख्येच्या तुलनेत नियमानुसार जी रोकड सुरक्षित व्हावयास हवी, तेवढी राहिली नाही तर हे वित्त सामग्रीतील घट होण्याचे कारण बनेल. अशा परिस्थितीत वित्त सामग्रीतील घट किंवा कमतरतेची गती वाढेल. (अर्थातच अशी परीस्थिती केंद्रीय बँकेच्या चुकीच्या नीतीमुळेच निर्माण होईल.)

नुकसानीच्या परिस्थितीत नगदी रकमेतील वाढीत वित्तसामग्रीत वाढ न होणे मुळात ही काही अशी बाब नाही की, जी आमच्या मूळ बचतीच्या परिणामांविरुद्ध असेल. कारण वरील मजकुरात आम्ही हे स्पष्ट केले आहे की ही प्रक्रिया व्यावसायिक वर्गाकडून भांडवल मागणीवर अवलंबून आहे. व्यवसायात नुकसानीमुळे भांडवलमागणीत घट झाल्यासही नवीन रोख रकमेचा विस्तार होत नाही.

प्रकरण सहावे

उपभोक्त्यांसाठी कर्ज

व्याजमुक्त अर्थशास्त्रात बँकिंग व्यवस्थेची जी रुपरेखा मागील प्रकरणात सादर करण्यात आली आहे. त्यामध्ये याबाबीवर चर्चा झालेली नाही की, उपभोक्त्यांना (Consumers) कशा प्रकारे व्याजमुक्त कर्ज मिळेल? याचे कारण केवळ उपभोगासाठी देण्यात येणाऱ्या कर्जांचे विशेष स्वरूप आहे. ज्याप्रमाणे शासनास कर्जपुरवठा प्रकरणावर विचार करण्यासाठी सार्वजनिक संपत्ती उभी करणे आवश्यक ठरले, त्याचप्रमाणे जोपर्यंत आपण इस्लामी विचारसरणीनुसार समाजातील गरजवंताच्या गरजा पूर्ण करणाऱ्या जनकल्याणाच्या संपूर्ण व्यवस्थेवर गंभीर विचार करीत नाही तोपर्यंत या विषयाचे आकलन मुळीच शक्य नाही. परंतु विषयविस्ताराच्या भयास्तव सध्या हा विषय बाजूला ठेवून निम्नलिखित मजकुरात स्वयोपयोगी कर्जाचे प्रकरण हाताळूया.

१) उपभोक्त्यांच्या गरजा

समाजाच्या ज्या लोकांना स्वत:च्या उपयोगासाठी कर्जांची गरज असते याचे विभिन्न प्रकार आहेत.

पहिला प्रकार अशा गरजवंतांचा आहे की ज्यांना कोणताच आधार नसून कोणत्याच प्रकारचे कमाईचे साधन उपलब्ध नाही. त्यासाठी त्यांना दिलेले कर्ज परत मिळणे शक्य नाही. अशा प्रकारच्या निराधार व असहाय्य लोकांना कर्जांची गरज नसून सहानुभूतीपूर्वक मदतीचीच गरज आहे. इस्लामी शासन व्यवस्थेस अशा निराधार लोकांना त्यांच्या पायावर उभे करण्याची पूर्णत: जबाबदारी घ्यावी लागेल. बँकांकडून केवळ अशाच उपभोक्त्यांना कर्ज देण्यात येईल, ज्यांच्याकडून कर्ज परत मिळणे शक्यप्राय असेल.

दुसरा प्रकार अशा गरजवंताचा आहे की ज्यांना कमाईचे साधन उपलब्ध असते आणि ज्यांच्यात कर्ज परत करण्याची ऐपत व आर्थिक क्षमता असते. गरजांच्या स्वरुपाचा आढावा घेतल्यास मूलभूत गरजा आणि इतर प्रकारच्या गरजांदरम्यान फरक करता येईल. मूलभूत गरजा, ज्या पूर्ण केल्याशिवाय मानवी जीवन असह्य होऊन बसते. यामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, उपचार, शिक्षण आणि लग्न या असून याव्यतिरिक्त एक जबाबदार नागरिक बनून जगण्याची कल्पना करणेदेखील शक्य नाही. निश्चितच या गरजांना अपार महत्त्व आहे. यानंतर अशा गरजांना महत्त्व आहे की ज्यामुळे जीवन समाधानकारक आणि आरामशीर जगणे शक्य होईल. या गरजांच्या पूर्ततेमुळे व्यक्तीच्या पात्रतेचा विकास होतो. तसेच समाजास याच्या कर्तुत्वाचा लाभ होतो. या गरजा पूर्ण न झाल्यास माणूस विविध समस्यांत आणि संकटांत गुरफटून त्याच्यात ऋण विचारसरणी

व विपरीत स्वभाव निर्माण होतो. त्यासाठी व्यक्तिगत आणि सामूहिक कल्याणासाठी हे आवश्यक आहे की, प्रत्येक व्यक्तीच्या अशा प्रकारच्या गरजा पूर्ण कराव्यात जेणेकरून समाजाचा विकास उत्तमप्रकारे व्हावा. या पूर्ण गरजपूर्तीमुळे जीवन सुलभ, वैभवशाली बनते. सुप्रसिद्ध इस्लामी विचारवंत माननीय 'शातबी' यांनी यासाठी 'हाजियात' (अर्थात सुलभ जीवन) या शब्दाचा प्रयोग केला आहे.

स्वाभाविकरित्या प्रत्येक मानवाचे असे प्रयत्न सुरु असते की आपल्या एकूण गरजा आपल्या कष्टातूनच पूर्ण व्हाव्यात. ज्या व्यक्ती आपल्या अपात्रतेमुळे अथवा प्रतिकूल परिस्थितीमुळे अशा प्रयत्नात यशस्वी होत नाहीत त्यांच्यासाठी इस्लामी शासन व्यवस्था ही जबाबदारी स्वत: उचलेल आणि अशा व्यक्तींना आर्थिक मदत करील.

जे लोक आपल्या स्वसंपत्तीने वा स्वत:च्या कमाईने आपल्या परिवाराच्या मूलभूत गरजा स्वत:हून पूर्ण करतात, ते लोक दुसऱ्या प्रकारच्या गरजेकडे वळून पाहू लागतात. बरेचजण या प्रयत्नात यशस्वी होतात. इस्लामी विचारवंतांनी वस्तुनिष्ठ आणि सद्सद्विवेक बुद्धीने विचार करून इस्लामी शासनावर अशा प्रकारच्या गरजपूर्तीची कोणतीही स्पष्ट आणि ठराविक जबाबदारी टाकली नसली तरी इस्लामी विधीचा हेतु असा आहे की देशाच्या आर्थिक साधनात जेवढ़ी क्षमता असेल, त्यानुसार समाज व शासनास या प्रकारच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी प्रत्येक नागरिकास सहकार्य करावे. सर्वजण सक्षम, सबळ, सक्रिय तसेच कमावता आणि विकसित नागरिक असावेत आणि अशा प्रकारचे नागरिक समाजासाठी खूप फायदेशीर तर ठरतीलच, शिवाय सामूहिक हित जोपासण्यास भरपूर मदत करतील.

२) कर्जांची माध्यमे

यानुसार आता आपण मूळ विषयाकडे वळूया, म्हणजेच मूळ आधार आणि कमाईची साधने असलेल्या व्यक्तींना तात्पुरत्या स्वरुपाचे कर्ज कसे देता येईल? यांपैकी ज्या व्यक्तींना आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी पैशांची गरज आहे, त्यांच्या बाबतीत आमची अशी भूमिका आहे की त्यांना कर्ज देण्याची जबाबदारी मूलत: 'बैतुलमाल' (जनकल्याण विभाग) कडे असावी. शक्य होईल तेवढ़े समाजजणांना आपसांतील सहकार्याच्या माध्यमानेसुद्धा अशा गरजांची पूर्तता करण्यात यावी. या कार्यपूर्तीस्तव समाजातील लोकांच्या सहकार्यांतून स्वतंत्र जनकल्याण संस्था स्थापित करता येऊ शकतात. या संस्थांमध्ये प्रत्येकजण छोट्या छोट्या रकमा जमा करून आपल्या बचतीने फंड जमा करू शकतात व संस्थेच्या एखाद्या सभासदास गरज पडल्यास हा फंड दिला जाऊ शकतो. बचतीच्या बँका किंवा विमा (Insurance) संस्था सहकारी तत्त्वावरील इतर संस्था की ज्यांचा उद्देश नफा मिळविणे मुळीच नसावा, या अती महत्वाच्या सामाजिक आणि मूलभूत गरजांच्या पूर्ततेस्तव सक्षम व्यक्तींना तात्पुरत्या तत्त्वावर कर्जपुरवठा करू शकतात.

ज्या ठिकाणी ही गरज वैयक्तिक कर्ज आणि सहकार्यावर अवलंबून असलेल्या संस्थांमार्फत पूर्ण होऊ शकत नाही त्या ठिकाणी इस्लामी शासनाने या गरजांची पूर्तता करावी. राज्यशासनाने या हेतूपूर्तीस्तव एक स्वतंत्र फंड स्थापन करण्यासाठी दानशूर व्यक्तींकडून व्याजमुक्त आणि नफामुक्त कर्ज घ्यावे किंवा मदतीसाठी दानधर्माचे आवाहन करावे. या हेतूपूर्तीस्तव जकात (अड़ीच टक्के जनकल्याण कर) आणि 'उश्र' (दहा टक्के जनकल्याण दान) चा काही भाग वापरता येईल. ह्या फंडातून कर्जाची मागणी करणाऱ्या गरजवंतांच्या गरजांचा अभ्यास करून योग्य जामीन घेऊन योग्य मुदतीनुसार कर्जदेखील देता येईल.

काही विचारवंतांनी अशी भूमिका मांडली की गिरणीमालक आणि इतर उद्योजक वगैरेंवर ही जबाबदारी सोपविण्यात यावी आणि त्यांनी आपापल्या कर्मचाऱ्यांना गरजेप्रसंगी कर्ज द्यावे आणि हे कर्ज पुढील वेतनांतून हप्त्यानुसार वसूल करावे. एका मर्यादित पातळीवर ही पद्धत प्रचलित पद्धतीमध्येसुद्धा आढळते. कर्मचाऱ्यांना आपल्या प्रोव्हीडेन्ट फंडातून कर्ज मिळते, तसेच काही संस्थामध्येदेखील कर्ज मिळण्याच्या सवलती आहेत. येथे एक योग्य योजनाही सादर करण्यात आली आहे की गिरणीमालकांच्या हिताची जोपासना करीत असताना या कार्यास योग्य नियमांची जोड द्यावयास हवी. या योजनेचे मोठे वैशिष्ट्य हे आहे की अशा प्रकारचे कर्ज वसूल करणे खूप सोपे आहे.

या अंतिम प्रणालीस केवळ मूलभूत गरजांच्या पूर्ततेसाठी आवश्यक असलेल्या कर्जांपर्यंतच मर्यादित ठेवण्याचे काहीच कारण नाही. आमच्या मते या कर्जांच्या मर्यादां-मध्ये वाढ करण्यात यावी आणि ठरविलेल्या नियमांची बंधने पाळून अशा गरजांची पूर्तता करावयास हवी.

दुसऱ्या प्रकारच्या गरजांच्या बाबतीत विशेषत: दोन गोष्टी लक्षणीय आहेत. घर बांधणी वा घर खरेदीच्या बाबतीत (गृहकर्ज) आणि फर्निचर किंवा विद्युत उपकरणे किंवा मोटार गाड़ी व वाहनांची खरेदीसाठी कर्ज.

घर म्हणजे एकार्थाने मानवाची मूलभूत गरज आहे. तसेच ती दुय्यम दर्जाचीदेखील गरज आहे. या गरजपूर्तीसाठी बरेच मोठे भांडवल लागते. या गृहभांडवलाचे ओझे कोण्या एकट्या संस्थेवर टाकणे बऱ्याच वेळा योग्य नाही. त्यासाठी विविध माध्यमातून ही गरज पूर्ण करता येईल. परंतु मूलत: याची जबाबदारी काही प्रमाणात राज्यशासनाने घ्यावी. यासाठी हे योग्य ठरेल की निवासनिर्मिती अगर खरेदीसाठी कर्जपुरवठ्यासाठी जनकल्याणास्तव असलेली एक विशेष संस्था स्थापन करण्यात यावी. ही संस्था कर्ज घेणाऱ्यांच्या गरजा आणि कर्जफेडीची पात्रता वगैरे बाबींची तपासणी करून योग्य तेवढ़े कर्ज देईल. या कर्जांच्या हप्तेवारी फेडीसाठी वा

वसुलीसाठी योग्य नियम तयार करावेत. तसेच ज्या निवासाच्या बांधणी वा खरेदीसाठी कर्ज देण्यात आलेले असेल, तेच निवास जामीन म्हणून गहाण ठेवून घ्यावे. या गृहसंस्थेव्यतिरिक्त सहकारी संस्था आणि गिरणीमालकांकडून मिळणारे आणि इतर बँकांकडून मिळणारे कर्जसुद्धा उपभोक्त्यांच्या गरजा पूर्ण करू शकतात.

जीवनावश्यक साहित्य वा चीजवस्तुंच्या खरेदीसाठीसुद्धा राज्य शासनाने कर्जपुरवठा करण्यात भाग घ्यावा. या बाबीवर आम्ही लवकरच प्रकाश टाकू. सध्या असे योग्य वाटते की आपण याविषयी बँकांच्या योगदानावर चर्चा करुया.

३) बँकांकडून उपभोक्त्यांना कर्ज

मूलत: बँका या व्यावसायिक संस्था असून त्यांचा उद्देशच हा नफा कमाविणे होय. त्यांच्यावर व्याजमुक्त कर्जपुरवठ्याची जबाबदारी कशी आणि किती प्रमाणात टाकण्यात यावी, याविषयी आम्ही चौथ्या प्रकरणात स्पष्टीकरण दिलेले आहे. खरे पाहता बँकांवर व्यावसायिक संस्थांचाच जास्त अधिकार असून उपभोक्त्यांना कर्ज पुरवठ्याची जबाबदारी बँकेवर खूप मर्यादित प्रमाणात टाकता येईल. दोन परीस्थितींत बँकेकडून उपभोक्त्यांना कर्ज देण्यात येऊ शकते.

४) जमापेक्षा अतिरिक्त रक्कम काढण्याचा अधिकार

प्रथम प्ररिस्थितीत ज्या व्यक्तीचे ज्या बँकेत कर्जखाते आहे त्या व्यक्तीस काही परिस्थिती आपल्या खात्यातील जमा रकमेपेक्षा अतिरिक्त रक्कम काढण्याचा अधिकार देण्यात यावा. ही अतिरिक्त रक्कम ठराविक मुदतीसाठी देण्यात यावी आणि गरज पड़ल्यास बँक योग्य जामिनाची याकरिता मागणी करू शकते. सामान्यत: आपली ओळख असलेल्या खातेदारांना छोट्या-मोठ्या रकमा विनाजामीन देण्यात कोणतीच अडचण येणार नाही. एखाद्या खातेदारास अशा प्रकारे देण्यात आलेल्या कर्जांची एक ठराविक मर्यादा निश्‍चित करण्यात यावी. या ठराविक मर्यादा निश्‍चित करण्यासाठी त्याच्या खात्यातील मागील उलाढ़ाल दृष्टीसमोर ठेवण्यात यावी.

कर्ज देण्यासाठी आवश्यक असलेल्या परिस्थिती व गरजा समोर ठेवूनच कर्ज मंजूर करण्यात येईल. या कर्जाचा मूळ हेतू हा दुय्यम दर्जाच्या गरजा पूर्ण करणे असला तरी हे अशा प्रकारे ठरविण्यात यावे की हे उपरोक्त प्रकारच्या दोन्ही गरजांपेक्षा वरचढ़ असावे. जर कोणास वापरा योग्य साहित्य खरेदी करावयाचे असेल तर त्याने बँकेतील आपल्या खात्यातील जमापेक्षा अतिरिक्त रक्कम काढण्याची पद्धत वापरावयास हवी. मात्र बँकांनादेखील या गोष्टींचा अधिकार देणें आवश्यक ठरेल की, आपल्या परिस्थिती आणि साधनांनुसार अशा प्रकारचे कर्ज देण्याचा अथवा न देण्याचा त्यांनीच निर्णय घ्यावा.

हा नियम सामान्य भांडवलदार आणि श्रीमंतांना बँकेचे खातेदार बनण्यासाठी आकृष्ट करेल जेणेकरून गरज पडल्यावर जमापेक्षा अतिरिक्त रक्कम काढ़ण्याच्या

सवलतीचा लाभ घेता येईल. त्याच्या परिणामस्वरुपी बँकांच्या कर्ज खात्यात भरपूर वाढ़ होऊन बँकिंग व्यवसायात भरभराट होईल, तसेच उपभोक्त्यांना मर्यादित प्रमाणात कर्जपुरवठा करण्यात जास्त अडचण निर्माण होणार नाही.

बँका आपल्या उपभोक्त्यांना उपरोक्त नियमानुसार जो कर्जपुरवठा करतील तो ठराविक प्रमाणातील कर्ज नियमांनुसार असलेल्या मर्यादांच्या आत असेल. या प्रकारच्या कर्जांसाठीसुद्धा केंद्रीय बँकेकडून कर्जपुरवठ्याच्या नियमांनुसार कर्ज घेता येईल. तसेच बँकांना या गोष्टीची पूर्ण जामीन मिळालेली असेल की उपभोक्त्यांना देण्यात आलेली कर्जे पूर्णत: परत मिळतील. बँक आणि खातेदारांदरम्यान हा व्यवहार असल्यामुळे सामान्यत: कर्जवसुलीत अडचण निर्माण होणार नाही. परंतु एखादा कर्जदार वा खातेदारावर अचानक प्रतिकूल परिस्थिती ओढावली आणि कर्ज देण्यास तो असमर्थ ठरला किंवा त्याचा मृत्यू झाला तर कर्जफेडीची जबाबदारी राज्य शासनावर असेल. अशा परिस्थितींचा बँकेने पूर्व विचार करूनच पावले उचलावी. आमच्या या प्रस्तावाचा मूळ आधार हा आहे की, बँकावर व्याजमुक्त कर्जपुरवठा करण्याची जबाबदारी टाकण्याची अनिवार्य मागणी ही आहे की त्यांना कर्ज परतफेडीचा विश्वसनीय जामीन मिळावा.

बँकांच्या वसूल न होणाऱ्या कर्जांची जबाबदारी ही राज्यशासनावर टाकणे म्हणजे ही काही नवीन व नवल वाटण्यासारखी बाब नव्हे. जकात (अड़ीच टक्के जनकल्याण निधी) आणि 'उश्र' (दहा टक्के जनकल्याण निधी) च्या एकूण राशीपैकी काही राशी अशा कर्ज- बाजारी लोकांच्या मदतीसाठी स्वतंत्र ठेवण्यात आलेली असते. आदरणीय प्रेषित मुहम्मद (स) यांच्या शासनात अशा असमर्थ लोकांच्या कर्जफेडीची जबाबदारी राज्यशासनच उचलत असे. आदरणीय प्रेषित मुहम्मद (स) यांनी म्हटले आहे,

"मी मुस्लिमांच्या त्यांच्या स्वकीयांपेक्षाही जास्त जवळ आहे. त्यामुळे जो मुस्लिम कर्ज न फेड़ता मृत्यू पावला, त्याच्या कर्जफेड़ीची जबाबदारी माझ्यावर आहे. त्याने मृत्यूपश्चात जी संपत्ती सोडली ती त्याच्या वारसदारांची आहे."

(संदर्भ : बुखारी व मुस्लिम)

यावरून स्पष्ट होते की इस्लामी शासनाची ही जबाबदारी आहे की असमर्थ आणि अक्षम लोकांचे कर्ज फेडावे.

तसेच एका प्रमाणसिद्ध इस्लामी विधीच्या नियमानुसार, बँकेत जमा असलेल्या त्या सर्व रकमा, ज्यांच्या मालकांचा कोणीच संपत्तीवारस नसेल व अशा अवस्थेत ते मृत्यू पावले अथवा दीर्घ काळांपासून बेपत्ता झाले, त्यांची बँकेतील संपत्ती बैतुलमाल (जनकल्याण खजिना) मध्ये जमा करण्यात येईल. अशा प्रकारच्या रकमासुद्धा उपरोक्त जबाबदाऱ्या पूर्ण करण्यास्तव वापरण्यात येतील.

५) प्रमाणपत्र खरेदी

बँकांकडून उपभोक्त्यांना कर्ज देण्याची दुसरी पद्धत अशी आहे की उपभोक्त्याने वापरायोग्य वस्तु अर्थात मोटार, दुचाकी वगैरे हप्त्यावर खरेदी करावी. उपभोक्त्याने विक्रेत्यास उसणे खरेदीवर एक प्रमाणपत्र लिहून द्यावे. बँकेने हे प्रमाणपत्र व्यावसायिक हुंडीच्या प्रणालीवर वठवावी. खरेदी प्रमाणपत्रावर साहित्याचा तपशील, संख्या, एकूण किंमत, परतफेडीची मुदत, परफेडीची पद्धत, विक्रेता आणि खरेदीदाराचे नाव व पत्ता वगैरेचा तपशील असावा. खरेदी प्रमाणपत्र हे विक्रेता पक्षाकडे असून त्या प्रमाणपत्रावर तो बँकेतून हुंडी स्वरुपात पैसा वा किंमत वसूल करेल. अर्थातच या प्रमाणपत्राच्या मोबदल्यात यावर नमूद असलेली संपूर्ण रक्कम नियमानुसार वसूल करेल. या प्रमाणपत्राच्या माध्यमाने बँकेतून मिळालेल्या रक्कमेची विक्रेताच हप्त्याने परतफेड करील. खरेदीदाराकडून हप्त्याने रक्कम वसूल करणे आणि अंतत: हिशोबात पारदर्शिता कायम ठेवणे ही विक्रेत्याचीच जबाबदारी असेल. अशा पद्धतीने उसणवारीवर घेण्यात आलेले सामान वा साहित्यच जामीन म्हणून नजर गहाण ठेवण्यात येईल. सततचे हप्ते न भरल्यास अथवा हप्ते गोठल्यास विक्रेता पक्षास न्यायालयीन कार्यवाही करून हप्ते वसुलीचा अधिकार असेल.

ही पद्धत आणि उपरोक्त पद्धतीदरम्यान हा फरक आहे की पहिल्या पद्धतीनुसार केवळ बँकेचे खातेदार असलेल्या उपभोक्त्यांनाच कर्जलाभ मिळेल आणि दुसऱ्या पद्धतीमध्ये प्रत्येक उपभोक्ता हा खातेदार नसूनसुद्धा कर्जलाभ घेऊ शकतो. शिवाय पहिली पद्धत बहुतेक परिस्थितीत केवळ छोट्या रकमांचे कर्ज घेण्यासाठीच उपयोगी पडेल, परंतु दुसरी पद्धत जास्त विस्तारपूर्ण दिसते.

निश्चितच प्रत्येक खरेदी प्रमाणपत्र कॅश करण्याची जबाबदारी बँकांवर टाकता येणे शक्य नाही. खरेदी प्रमाणपत्रांचे नियमसुद्धा व्यावसायिक हुंडीप्रमाणेच आहेत. यासाठी काही खरेदी प्रमाणपत्रांच्या मोबदल्यात नगदी कर्ज देण्याचा तसेच काहींना कर्ज नाकारण्याचादेखील बँकांना अधिकार देण्यात यावा. खरेदी प्रमाणपत्र वठविण्यासाठी त्यांच्या दर्जाचीदेखील तपासणी करावी लागेल. अर्थात खरेदीदार आणि विक्रेत्याची प्रतिष्ठा व क्षमता, रक्कम, साहित्याचे स्वरुप वगैरे तपासण्यात येतील. या सर्व बाबींवर लक्ष ठेवून बँक कर्ज देण्याच्या वा नाकारण्याच्या अधिकाराचा वापर करील.

आपला खातेदार असलेल्या खरेदी प्रमाणपत्रधारकास बँक स्वभावत:च प्राधान्य देईल. मग तो खरेदीदार असो वा विक्रेता असो. यामुळे सर्वांनाच लाभ मिळणारी पद्धत रुढ होत जाईल. उदाहरणार्थ, बँकेचा एक खातेदार हा अशाच व्यावसायिक संस्थेकडून उसणे, सामान खरेदी करील की जी संस्था याच बँकेकडून बटाई तत्त्वावर भांडवल मिळवून व्यवसाय करीत असेल आणि बँकेस सूचना देईल की, साहित्याच्या एकूण किंमतीचे हप्ते

त्याच्या खात्यातून विक्रेत्यास ठराविक तारखेवर फेडण्यात यावेत. विक्रेता या खरेदीदाराने दिलेल्या खरेदी प्रमाणपत्रास याच बँकेमार्फत वठवील. तसेच खातेदाराची हस्तांतरित रक्कम त्याच्याकडून वसूल करण्याची बँकेस सूचना देण्यात येईल. या विक्रेत्यास कर्ज देणे हे बँकेच्या हिताचे ठरेल. तसेच जास्तीतजास्त हस्तांतरणीय संपत्ती उपभोक्त्या खात्यांत परिवर्तनाच्या स्थितीत पूर्ण होतील. हे तर एक उदाहरण होय. ही प्रणाली कार्यान्वित करताना यापेक्षाही जास्त विस्तारपूर्ण कार्य करता येईल.

सर्व बँका एकत्रित येऊन खरेदी प्रमाणपत्र वठविण्याची निश्चित वेळ ठरविणे हे या बाबीवर अवलंबून असेल की निश्चित ठरविलेली वेळ कर्ज प्रमाणानुसार उपभोक्त्यांना कर्ज देण्याची किती संधी वा सवड असेल. काही प्रमाणात हे केंद्रीय बँकेच्या ठराविक कर्ज प्रमाणावरदेखील अवलंबून असेल. समजा केंद्रीय बँक एखाद्या विशेष साहित्य - उदा : शिलाई मशीन, मोटार-कारच्या उसण्या खरेदीचे धाडस निर्माण करू इच्छिते. या धाडस वा आकर्षणनिर्मितीची प्रेरणा ही संबंधित उद्योग विकासाचा निर्णय, उपभोक्त्यांचे हित, सार्वजनिक रोजगारवृद्धी, बँकांतील अतिरिक्त कर्जक्षमता वगैरेंना मिळू शकते. अशा परिस्थितीत ती शिलाई मशीन वा मोटार-गाडीच्या उसणवार खरेदीसंबंधी प्रमाणपत्रासाठी कर्ज प्रमाण, सामान्य खरेदी प्रमाणपत्र आणि सामान्य व्यावसायिक हुंड्या दोन्हीपेक्षा जास्त ठेवून बँकांना या वठविण्यासाठी जास्त फायदेशीर बनविते. या उलट जर ती काही कारणास्तव काही फ्रीज, ए.सी.सारख्या विशेष वापरवस्तुंच्या खरेदीचे प्रमाण कमी करू शकते.

वापरवस्तुंच्या उसणवारी खरेदीची व्यवस्था सुलभ आणि यशस्वीरित्या चालविण्यासाठी आणि योग्य मर्यादेत ठेवण्याकरिता शासन खरेदीवर, विक्रेता बँक आणि इतर संस्थांना योग्य नियम ठरवून देऊ शकते. हे नियम परिस्थिती आणि अनुभवाच्या आधारांवर तयार करण्यात येऊ शकतात.

व्यावसायिक पक्ष, शासन आणि उपभोक्त्यांना बँकेतर्फे मिळणाऱ्या कर्जाचे मूळ- स्त्रोत म्हणजे बँकातील कर्ज खात्यात जमा असलेल्या रकमेचा एक भाग असल्याने हे तीन अशा विभिन्न बाबींवर अवलंबून असेल की, ज्या भांडवलातून तिन्ही कर्जप्रकार योग्य प्रमाणानुसार देण्यात यावे.

पहिली बाब ही केंद्रीय बँकेने ठरविलेल्या कर्जप्रकाराचे प्रमाण होय. ते विभिन्न प्रकारच्या कर्जांसाठी तयार करण्यात आलेले असतात. या प्रमाणात वेळप्रसंगी योग्य सुधारणा करून केंद्रीय बँक तिन्ही प्रकारच्या कर्जांची सामग्री सुरु ठेवण्यासाठी त्यांच्यादरम्यान संतुलन निर्माण करील जे आजीविकेच्या परिस्थिती आणि समाजाच्या विविध वर्गाच्या परीस्थितीनुरूप योग्य वाटावे.

दुसरी बाब ही बँकिंग व्यवसायाच्या तत्त्वावर आधारित अधिकार होय. वरील मजकुरात नमूद केल्यानुसार बँका म्हणजे नफा मिळविणाऱ्या संस्था आहेत. परंतु त्यांना यासाठीदेखील प्रयत्नशील राहावे लागेल की त्यांची रोकड अबाधित असावी. नफ्याची मागणी जरी कर्ज दिल्याने पूर्ण होत नसेल तरी बँका आपले ग्राहक व व्यावसायिक संस्थांना कर्ज देण्याची प्रवृत्ती अवश्य निर्माण करतील. उपभोक्त्यांना देण्यात येणाऱ्या कर्जाबाबतचे प्रमाण हे व्यावसायिकवर्गास देण्यात येणाऱ्या कर्जांसाठी निश्चित केलेल्या कर्जप्रमाणापेक्षा जास्त असल्यास रोख रकमेची मागणी ही बँकांना उपभोक्त्यांना कर्ज देण्यास प्रवृत्त करील. प्रत्येक बँकेस नफ्याची आवड आणि रोख रकमेच्या स्थैर्याबाबतीत समतोल व संतुलनाची नीती अवलंबिण्यात येणे गरजेचे आहे. त्यामुळे हे संतुलन निर्माण करण्यासाठी बँकेस दोन्ही प्रकारची कर्जे द्यावी लागतील.

तिसरी बाब ही आहे की जर गरज पडली तर विशेष प्रकारच्या कर्जासाठी देण्यात येणाऱ्या एकूण रकमेचा काही भाग निश्चित करता येईल. उदाहरणार्थ, १० टक्के भाग उपभोक्त्यांसाठी निश्चित करता येईल. परंतु ही पद्धत अनुभवाच्या आधारे अतिशय मर्यादित पातळीवर असून नियमांच्या बांधिलकीतील वाढीमुळे बँकांची कार्यशैली प्रभावित होईल. यापेक्षाही जास्त हे की अशा प्रकारचे नियम लागू करण्यात येऊ नये की ज्यामुळे व्यावसायिक वर्गाच्या कर्जप्रकाराच्या गरजा पूर्ण होणे कठीण व्हावे.

६) उसन्या खरेदीची व्यवस्था आणि राज्याची भूमिका

काही विकसित देशांमध्ये उपभोगयोग्य वस्तुंच्या खरेदी-विक्रीच्या प्रमाणात असामान्य प्रचंड वाढ झालेली आहे. या उलट आम्ही ज्या प्रकारचे प्रस्ताव सादर केले आहेत, यापासून पूर्णपणे फायदा उचलूनसुद्धा व्याजमुक्त अर्थशास्त्रात या उलाढालीचा बाजार अतिशय मर्यादीतच दिसतो. परंतु या विषयाच्या सर्वांगीण निरक्षणपूर्ण अभ्यासावरुन ही वस्तुस्थिती समोर येते की उसन्या खरेदी-विक्रीच्या बाजाराचे वर्तमान असामान्य अस्तित्व उपभोक्ता आणि समाजाच्या वास्तविक हिताच्या विरुद्ध आहे. तसेच व्याजमुक्त अर्थशास्त्रात या बाजारास अतिरिक्त विस्तारित करण्यासाठी राज्यशासन एक अतिशय महत्त्वाची भूमिका बजावू शकते. या दोन्ही वास्तविकतांना समोर ठेवल्यास एक असा संतुलित दृष्टिकोन समोर येण्याची वा संशोधित होण्याची शक्यता आहे की ज्यामध्ये कोणतीच गड़बड़ वा धांदल होणे शक्य नाही.

या ठिकाणी या गोष्टीची संधीच नाही की जास्त प्रगत देश उदाहरणार्थ, अमेरिका, फ्रान्स, ब्रिटन वगैरेंमध्ये हप्तेवारी कर्ज परतफेडीच्या वायद्यावर होणाऱ्या व्यवहाराची जी पद्धत प्रचलित आहे, याच्या दुष्परिणामांचा सविस्तर वेध घेण्यात यावा. वस्तुस्थिती अशी आहे की या पद्धतीने व्याजाचे अतिशय गंभीर दुष्परिणाम समाजावर झाले आहेत. हे किळसवाणे घृणास्पद दुष्परिणामाच्या विळख्यात समाजाच्या प्रत्येक व्यक्तीस घेण्यासाठी

आणि अल्पसे उत्पन्न असलेल्या व्यक्तीच्या उत्पन्नाचा महत्तम भाग व्याजाच्या माध्यमाने भांडवलदार- वर्गाच्या घशात टाकण्याचे जे कुकर्म केले आहे, याचे उदाहरण भूतकाळात संपूर्ण इतिहासात मुळीच नाही. राज्याची बंधने आणि नियमसंहिता व देखरेख असूनदेखील उसने खरेदी करणाऱ्यांना जास्त दराने व्याज मोजावे लागते.

(उपभोक्त्यांच्या कर्जांवर व्याजदर दरसाल दर शेकडा १२ ते २४ टक्के आहे. संदर्भ : Paul M. Horvitz : Monetory Policy and the Financial System, Page No.140, Prentice Hall inc. new York. 1963.) याच लेखकाने या ग्रंथाच्या पृष्ठ क्र. १४७ वर लिहिले की, ''आता तर व्याजाचा सर्वसामान्य दर २४ ते ३६ एवढा आहे. हे दर कंपन्यांचे आहेत. काही संस्था आजही २० ते ४० टक्के दर आणि तेही मासिक वसूल करतात. या संस्था अशा ठिकाणी अस्तित्वात आहेत, जेथे कंपन्यांचे अस्तित्व नाही. यावरून अनुमान काढता येईल की अशा प्रकारच्या व्याजावर आधारित लूटमारींच्या माध्यमाने उपभोक्त्यांच्या कमाईची राशी किती असेल. ही वास्तविकतादेखील समोर असावी. याच लेखकाच्या स्पष्टीकरणानुसार इ. स. १९६२ मध्ये अमेरिकेत उपभोक्त्यांच्या कर्जांची एकूण रक्कम ५६६५ कोटी डॉलर एवढी होती.

आणखीन एका विचारवंताने लिहिले आहे की व्याजदराची परिस्थिती अतिशय गंभीर वळणावर येऊन ठेपली आहे. मागील चार-पाच वर्षांमध्ये दहा-पंधरा राज्यांत व्याजदरांच्या उच्चतम मर्यादा निश्चित केल्या आहेत, ज्या हप्तेवारी परतफेडी आणि सतत चालू असलेली (Revolving) पत (Credit) वसूल केली जाऊ शकते. बऱ्याच नियमांना अनुसरून कमीतकमी स्वीकृत दर २० टक्के आहे. (संदर्भ : Arch W troelstr up : Te In Fluence of moral and Social Responsibility in Selling Consumer Credit, American Economic Review, May 1961, Page : 553) कधी कधी हिशोबावर येणारा खर्च आणि सेवाशुल्क म्हणून बरीच रक्कम मोजावी लागते.

अशा प्रकारे एका सामान्य उपभोक्त्यांच्या कमाईचा, जो निवास, फर्निचर, मोटारकार वगैरे साहित्य केवळ हप्तेवारी परतफेडीच्या वायद्यावर घेऊ इच्छितो, त्या साहित्याचा बराच भाग व्याज आणि सेवाशुल्कासारख्या बाबींचा बळी ठरतो. हे साहित्य लवकर मिळविण्यासाठी तो शंभर डॉलरच्या मूल्यांच्या साहित्याच्या मोबदल्यात दीडशे डॉलर देण्याची जबाबदारी स्वीकारतो.

या पद्धतीची द्वितीय त्रुटी म्हणजे पैशांचा अपव्यय आणि ऐपतीपेक्षा जास्त खर्च करण्याची मानसिकता निर्माण करणे होय. ही त्रुटी वाढविण्यात मोठा वाटा अमेरिका आणि इतर पाश्चात्य राष्ट्रांतील प्रचलित असलेल्या प्रोत्साहन देणाऱ्या जाहिरातींचादेखील आहे. या जाहिरातींमध्ये हर तऱ्हेच्या मानसिक तंत्रांचा जोरदार वापर करून उपभोक्त्यांना बऱ्याच सुंदर आणि अनावश्यक साहित्यांची प्रलोभणे दाखवून

आकर्षित केले जाते. मग सुलभ हप्त्यांच्या असामान्य सवलतींद्वारे उपभोक्त्यांना असे खर्च करण्यास तयार करतात. खरे पाहता उपभोक्त्यांच्या खिशात भरपूर रक्कम असूनही तो ही वस्तू रोख रकमेने खरेदी करण्यास तयार झाला नसता.

उपभोक्ते आपल्या आर्थिक जीवनाच्या प्रारंभी अशा प्रकारची पावले उचलतात, ते पुढच्या येणाऱ्या दीर्घ मुदतींपर्यंत हप्तेवारी कर्जांच्या भरमसाठ ओझ्यांखाली दबलेले असतात. मग पुढे नवीन गरजा समोर येतात. परंतु या गरजा ते पूर्ण करण्यास असमर्थ ठरतात. कारण सुरुवातीलाच त्यांनी कर्जावर घेतलेल्या साहित्यांच्या परतफेडीमध्ये त्यांची कमाई समर्पित झालेली असते. आपली कमाई वा अर्थार्जन वाढविणे किंवा नवीन गरजांकडे दुर्लक्ष करणे आणि निश्चित केलेल्या तारखांवर कर्जांचे हप्ते फेडणे यासारख्या काळजींच्या वलयांत तो जखडलेला असतो. कर्जाच्या विळख्यात सापडलेल्या या जीवनामध्ये व्यक्तींच्या स्वभावात प्रतिकूल भावना निर्माण होतात. तसेच त्यांच्या कार्यक्षमतांवर अनिष्ट प्रभाव पडतो.

संपूर्ण सामाजिक दृष्टिकोनानुसार या प्रणालीमध्ये ही विकृती आहे की समाजाच्या कार्यक्षमतेचा एक भलामोठा भाग हा हप्त्यांचा हिशोब जोडणे, हप्ते वसुली आणि परतफेड न करणाऱ्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही यासारखा वापरला जातो. नगदी पैसा देऊन साहित्य खरेदी करण्याची पद्धत या विकृतीपासून मुक्त आहे. हे सत्य आहे की उसने स्वरुपातील खरेदीचे बरेच लाभ आहेत, परंतु या स्वरुपाच्या खरेदीमुळे अमेरिका आणि इतर पाश्चात्य देशांत या पद्धतींमुळे तेथील लोकांच्या क्षमतांचा जो ऱ्हास होत आहे, ते निश्चितच खूप गंभीर आहे.

अर्थशास्त्राच्या एकूण स्वरुपावर विचार केल्यास असे निदर्शनास येईल की उसन्यामुळे माणसाच्या मागणींत वाढ होते आणि उद्योगनिर्मितीमध्ये विकास होतो. परंतु याचबरोबर या गोष्टीचे संभावित भयदेखील वाढते की उसन्या खरेदीच्या गतीत कमतरता येत असल्याकारणाने प्रभावशाली मागणीत घट होते आणि मिळकत, रोजगार आणि उत्पन्नात घट होऊन अरेरावीस सुरुवात (Recession) होते.

वरील मजकुरात संकेत केल्याप्रमाणे उसने खरेदीची सवलत ही उपभोक्त्यांसाठी खूप लाभदायक असून सर्वात मोठा लाभ असा आहे की जर जीवनाच्या प्रारंभीच सुखोपभोग्य साहित्य, निवास, मोटारगाडीसारख्या बाबी प्राप्त झाल्यास व्यक्तीच्या कार्यक्षमतेत वृद्धी होते. या सुखवस्तुंमुळे आणि वाढलेल्या कार्यक्षमतेमुळे त्याची कमाईदेखील वाढते आणि पूर्ण समाजास लाभ मिळतो. यापैकी बरेचसे सामान असे असते की जर एखादी व्यक्ती हे सामान खरेदी करण्यासाठी भांडवल जमा करू इच्छित असेल तर त्यासाठी त्यास एक दीर्घ मुदत लागेल. या मुदतीपर्यंत याच्या कार्यशक्तीवर आवश्यकतांचा पूर्ततेचा प्रभाव पडेल. ही मुदत गुदरल्यावर त्यास हे सामान मिळतही

असेल आणि पुढील जीवनात तो कर्जापासून वाचलेला असला तरीही काही परीस्थितींमध्ये हेच योग्य ठरेल की त्यास हे साहित्य आधीच मिळावे आणि नंतर त्याने या कर्जाचे ओझे सहन करीत राहावे. याचे कारण त्याची वाढ़लेली कार्यक्षमता आणि वैभव आहे, जे काही परिस्थितीत या सामानाच्या प्राप्तीशी संबंधित आहे.

न्यूनाधिक्यापासून मुक्त असलेल्या संतुलन बिंदूच्या संशोधनास मौलिक महत्त्व असावे. ही बाब अनुभवांतीच समोर येऊ शकते. मात्र या ठिकाणी आम्ही आमची ही भूमिका स्पष्ट करीत आहोत की उसन्या खरेदीच्या बाबतीत ज्या पद्धतीवर सादर करण्यात आलेल्या आहेत, यांचे प्रमाण इतके मर्यादित वाटते की यावरच अवलंबून राहणे हे समाजाकरिता हिताचे ठरणार नसून उलट घातकच ठरेल. त्यासाठी आणखीन काही पद्धती स्वीकारणे योग्य ठरेल.

उपभोक्त्यांच्या गरजांचा जो वेध आम्ही वरील मजकुरात घेतलेला आहे त्यानुसार, आमचे मत हे आहे की इस्लामी शासनास उपयोगी वस्तु खरेदी करण्याबाबत उपभोक्त्यांना सहाय्य करावयास हवे. हे सहाय्य निश्चित वस्तु (उद: निवास, गाडी, वगैरे) च्या नगदी खरेदीसाठी देण्यात येणाऱ्या कर्जांच्या स्वरुपातदेखील शक्य आहे. परंतु याची एक पद्धत हीसुद्धा आहे की शासनाने स्वत:च या बाबींच्या विक्रीसाठी प्रयत्नशील असावे आणि उपभोक्त्यांना सुलभ हप्त्याने परतफेडीची सवलत प्रदान करावी. आमचा प्रस्ताव असा आहे की दोन्ही पद्धतींचा अवलंब करण्यात यावा. कर्ज अथवा सामानाच्या किंमतीच्या वसुलीसाठी अशी पद्धत अवलंबण्यात यावी की या पद्धती उभय पक्षांसाठी सवलतपूर्ण असावी. उदाहरणार्थ, आर्थिक मोबदला (वेतन) असलेल्या (कर्मचारी) उपभोक्त्यांशी असा करार असावा की परतफेडीच्या हप्त्यांची कपात त्याच्या मासिक वेतनातून व्हावी आणि मग शासन कपात केलेल्या हप्त्याच्या रकमा संबंधित संस्थांना देईल. जे उपभोक्ते खरेदीदार इतर प्रकारे (उद : व्यापार वगैरे) पैसा कमवित असतील, त्यांच्या बाबतीत इतर योग्य पद्धतींचा अवलंब करण्यात येईल. कर्ज देण्याची एक तिसरी पद्धत अशीदेखील असू शकते की काही विशेष साहित्यांबाबत खरेदी प्रमाणपत्र वठवण्याची पूर्ण जबाबदारी शासनाने घ्यावी आणि हे कार्य राज्य बँक किंवा इतर योग्य असलेल्या संस्थांच्या स्वाधीन करण्यात यावे. तसेच निश्चित केलेल्या तारखांवर कर्जाचे हप्ते वसूल करावे.

उपयोगी वस्तुंचा उधारीत पुरवठा करण्याच्या बाबतीत इस्लामी शासनाची एक कार्यात्मक भूमिका स्पष्ट करण्याविषयी काही प्रमाण सादर करण्यात येऊ शकतात.

पहिली गोष्ट अशी की खाजगी व्यावसायिक संस्थांच्या तुलनेत राज्य शासनाला जास्त सवलत असेल. खरेदीदाराच्या परतफेड प्रणालीच्या बाबतीत होणाऱ्या कराराच्या पूर्ततेबाबत राज्यशासन हे गिरणीमालकांचे सहाय्य इतरांच्या तुलनेत जास्त सुलभतेने

मिळवू शकते. खरेदीदारांची एक मोठी संख्या ही शासकीय कर्मचाऱ्यांची व शासकीय संस्थाच्या कर्मचाऱ्यांची असेल. यांच्याकडून हप्त्यांची वसुली खूप सहज होईल.

दुसरी गोष्ट अशी आहे की उधारीत सामानाच्या पुरवठ्यासाठी लागणाऱ्या भांडवलाचा एक भाग राज्यशासन जनकल्याण-निधीच्या आत असलेल्या समाजसेवेसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या रकमेतून प्राप्त करू शकते. या भांडवलात आणखीन वाढ या व्यवसायाच्या नफ्यातूनसुद्धा होईल. उधारीमध्ये साहित्य खरेदी करणाऱ्यांची एक मोठी संख्या ही आर्थिक सक्षम नसल्यामुळे 'जकात' (अडीस टक्के जन कल्याण निधी) चे हक्कदारसुद्धा असू शकते. अशा अक्षम लोकांना व आर्थिक दुर्बलांना खरेदीसाठी कर्ज देणे वा उसन्या सामानाचा पुरवठा करणे वगैरे प्रकारच्या मदतीसाठी 'जकात' (अडीच टक्के जन कल्याण निधी) आणि 'उश्र' (दहा टक्के जनकल्याण निधी) च्या रकमेचादेखील वापर करता येणे शक्य आहे. या बाबी म्हणजे अशा सवलती आहेत ज्या इतर बाजगी व्यावसायिकांना उपलब्ध होत नसतात. त्यामुळे या कार्यपूर्तीसाठी राज्यशासनास पुढे यावे लागेल. गरजवंत उपभोक्त्यांत उपयोगी साहित्यपुरवठा करणे हे एक व्यावसायिक कार्य असण्याबरोबरच एक कल्याणकारी कार्यसुद्धा आहे. म्हणूनच या कल्याणकारी कार्यात राज्यशासनाचासुद्धा मोलाचा वाटा असावयास पाहिजे.

वस्तुस्थिती अशी आहे की, लोकांना त्यांची कार्यक्षमता वाढविणाऱ्या अशा उपयोगी साहित्याचा पुरवठा करणे हे एक महत्त्वपूर्ण समाजकल्याणाचे कार्य असून हे न केल्यास एका महत्त्वाच्या सामूहिक लाभास मुकण्यासारखेच होईल. तसेच लोकांची एक मोठी संख्या आर्थिक तंगी आणि हालअपेष्टांना बळी पडेल. व्याजमुक्त आर्थिक नीतीमध्ये खाजगी व्यवसाय करणारे आपली गरज पूर्ण करू शकत नसतील. बँकांवरसुद्धा या बाबतीत थोडीशी जबाबदारी टाकण्यात येऊ शकते. अशा परिस्थितीत हे योग्य होईल की आपसातील सहकार्याने संस्था आणि बँकांबरोबरच इस्लामी शासनसुद्धा महत्त्वाची भूमिका निभावू शकते.

इस्लामी शासन या बाबतीत आणखीन एका दृष्टिकोनानुसार रुची घेऊ शकते. अपव्यय टाळण्यासाठी उधारीची खरेदी व्यवस्था अशा प्रकारच्या नियमावलीत बांधणे आवश्यक होईल की उपभोक्ता हप्तेफेडीच्या सवलतीचा लाभ उचलण्यात संतुलनरेषेवर कायम राहावा. जेव्हा बहुतेक उपभोक्त्यांना या सवलतीचा लाभ घेण्यासाठी स्वत:हून राज्यशासनास विनंती करण्याची गरज पडेल, तेव्हा ही नियमावली अथवा संहिता सहज लागू केली जाऊ शकते. सवलत देण्यापूर्वी अर्जदाराची परीस्थिती, त्याच्या गरजा, त्याची कर्जफेडीची क्षमता वगैरे तपासून पाहून याच तपासणीनुसार त्यास देण्यात येणाऱ्या सवलतीच्या मर्यादा निश्चित करण्यात याव्यात. ज्या ठिकाणी या सवलती खाजगी व्यावसायिक संस्था अथवा बँकाकडून प्राप्त करण्यात येत असतील तेथेसुद्धा हे नियम लागू करता येणे शक्य आहे.

प्रकरण सातवे

काही स्पष्टीकरणे

मागील प्रकरणांत शिर्कत (भागीदारी) आणि बटाईच्या इस्लामी विधीच्या नियमांच्या आधारावर बँकिंगची एक परिपूर्ण व्यवस्था सादर करण्यात आली असून ही व्यवस्था कोणत्याही प्रकारच्या व्याजाशिवाय व्यवस्थित आणि अतिशय यशस्वीपणे राबविण्यात येऊ शकते. तसेच या प्रस्तावित व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेत त्या सर्व सेवा व सवलती पुरविण्यात येणे अगदी सहजतेने शक्य आहे, ज्या सेवा व सवलती प्रचलित बँकिंग व्यवस्थेत कठीणतापूर्ण पुरविणे शक्य आहेत. या प्रस्तावामध्ये काही बाबी समजण्यास अडचणी निर्माण होत आहेत. त्या अवघड बाबींचे आकलन आवश्यक आहेत. या प्रकरणात आपण अशाच काही बाबींचा अभ्यास करूया. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) बचतसामग्री

२) व्यावसायिकवर्गास भांडवलसामग्री

३) समाजाकरिता (Public sector) भांडवलपुरवठा

४) बँकिंग व्यवसायाचा लाभ

५) बँकांची रोख रक्कम (Liquidity)

६) व्याजमुक्त बँकिंग आणि राज्यशासन

व्याजमुक्त बँकांच्या कर्ज खात्यांत भांडवल जमा होणे आणि त्याचा मोठा भाग व्यावसायिकवर्गास कर्ज आणि बटाई भांडवलाच्या स्वरुपात स्थलांतरीत होण्याच्या विषयावर चर्चा करण्याची ठरल्यास यासाठी मागील चर्चेवर प्रकाश टाकण्यात आलेला आहेच. कर्ज खात्यात भांडवलसामग्री जास्त प्रमाणात बचतीवर अवलंबून नसून जनतेच्या 'त्या' सवयींवर अवलंबून आहे की जनता आपल्या कमाईचा मोठा भाग बँकेच्या चालू खात्यांत (Current Account) ठेवते आणि आर्थिक व्यवहारासाठी धनादेश पद्धतीचा वापर करते. या ठिकाणी जो प्रश्न चर्चेच्या ऐरणीवर आहे तो म्हणजे या बँकांत बटाई खात्यांत भांडवलाची आवक हा होय. या खात्यांमध्ये इतर खात्यांच्या तुलनेत दीर्घमुदतीसाठी (तीन महिने, सहा महिने वा यापेक्षा जास्त) भांडवल जमा करण्यात येते आणि धनादेशांच्या माध्यमाने रकमांच्या फेडी होत नसल्याने जनता स्वत:चे बचतभांडवलच जमा करील बटाई खात्यातील भांडवलसामग्री ही जनतेच्या बचतीच्या मानसिकतेवर अवलंबून आहे. या ठिकाणी अशी शंका येते की व्याजाची अवैधता ही बचतीच्या मानसिकतेस कमी करेल, परंतु असे मुळीच नाही. आमचे मत असे आहे की व्याजाची अवैधता ही बचतीच्या मानसिकतेस प्रभावित करू शकणार

नाही. बचतीची मानसिकता ही काही अंतर्गत प्रेरणात्मक बाबी व काही बाह्यात्मक परिस्थितींवर ठरविण्यात येईल. तसेच व्याज आणि व्याजदर या बाबींवर यांचा विशेष प्रभाव पड़णार नाही. आधुनिक अर्थतज्ञसुद्धा या बाबीशी सहमत आहेत. जे. एम. केनिझ (J.M. Keynes) यांनी बचतीच्या अंतर्गत प्रेरणांवर चर्चा करताना आठ बाबींचा उल्लेख केला आहे. १) अकस्मात संकटांच्या निर्मूलनासाठी पूर्वतयारी, २) भविष्यात येणारे खर्च, उदाहरणार्थ, वृद्धापकाळात अर्थमाध्यमे बंद पडल्यास गरजांच्या पूर्ततेसाठी अथवा मुलांच्या शिक्षणासाठी बचत करणे, ३) आपल्या जीवनाचा दर्जा वाढ़विण्यासाठी बचत करणे, ४) परावलंबी जीवनापासून मुक्त होण्यासाठी बचत करणे व अशा प्रकारच्या निस्पृह जीवनासाठी बचत करणे, ५) व्यावसायिक देवाणघेवाणीसाठी काही भांडवल जमा ठेवणे, ६) वारसांसाठी संपत्ती ठेवणे, ७) स्वाभाविक कंजुसी अंतर्गत बचत करणे या सात प्रकारच्या बाबींव्यतिरिक्त आठव्या कारणांविषयी स्वत: 'जे. एम. केनिझ' यांनी आपल्या शब्दांत लिहिले की, ८) व्याज आणि वाढ़ीव नफा मिळविणे. कारण भविष्यात जास्त वास्तविक उपयोगास वर्तमानाच्या तुलनेत कमी प्रमाणाच्या वापरावर प्राधान्य देण्यात येते.

(संदर्भ : J. M. Kenyes : The general Theory of Employment Interest and Money, Page 107, London Macmilan and Co., 1957)

प्रथमोल्लेखित सात प्रकारच्या बाबींवर व्याजास अवैध ठरविण्याचा काहीच परिणाम होत नाही. भविष्यात निर्माण होणाऱ्या गरजा, वारसांना संपत्ती सोडण्याची इच्छा आणि व्यावसायिक देवाणघेवाण वगैरेसाठी बचत करण्याची भावना ही व्याजमुक्त अर्थनीतीमध्येसुद्धा व्याजावर आधारित असलेल्या आर्थिक व्यवस्थेप्रमाणेच आढळते. या प्रेरणादायी भावनांअंतर्गत लोक आपल्या कमाईचा एक वाटा काटकसर करून बचत करीत असून व्याजाची मनाई असूनसुद्धा असे करीत राहतील.

आपल्या कमाईचा एक वाटा यासाठी वाचविणे की, या बचत झालेल्या रकमेच्या माध्यमाने कमाईत आणखीन वाढ़ करावी, हेसुद्धा बचत करण्यासाठी प्रेरणादायक बाब आहे. त्यामुळे मूळ प्रेरणादायक बाब ही व्याज नसून अतिरिक्त कमाई आहे. ही अतिरिक्त कमाई व्याजाच्या अर्थनीतीमध्ये अशा रितीनेसुद्धा प्राप्त करता येऊ शकते की बचत झालेले भांडवल दीर्घ मुदतीस्तव बचती (Time deposits) च्या चालू खात्यात (Saving accounts) ठेवून त्यावर एक निश्चित वार्षिक दरानुसार व्याज मिळविण्यात यावा. व्याजमुक्त अर्थ व्यवस्थेमध्ये अतिरिक्त कमाईची ही विशेष पद्धत नसली तरी इतर दुसऱ्या उत्तम प्रकारच्या आणि उपयुक्त पद्धती आहेत. या दुसऱ्या पद्धती बचत केलेल्या संपत्तीपासून अतिरिक्त धन कमाविण्यासाठी योग्य आणि विश्वासपूर्ण असतील तरीसुद्धा चर्चेत असलेली प्रेरणादायक बाब नष्ट होण्याचे काहीच कारण नाही.

त्यामुळे एखाद्या परिणामापर्यंत पोहोचण्याकरिता या गोष्टीचा तपास करावा लागेल की आम्ही सादर केलेल्या या दुसऱ्या पद्धतींना बटाई खात्यांत ठेवणे वा याचे व्यापारी रोखे (Shares) आणि शासकीय रोखे भागीदारी किंवा शासकीय असलेल्या बटाई रोखे खरेदी करणे, या गरजांसाठी खूप उपयुक्त आणि फायदेशीर आहे.

परंतु या समीक्षणात्मक अभ्यासापूर्वी ही गोष्ट उल्लेखणीय आहे की वर्तमान व्याजावर आधारलेल्या अर्थकारणातसुद्‌धा व्याजास बचतीची एक शक्तिशाली प्रेरक बाब ठरविण्यात आलेली नाही. तसेच त्यास बचतीच्या दुसऱ्या बाबींदरम्यान कोणतेच विशेष स्थान देण्यात आलेले नाही. याहून जास्त असे की व्याजदरातील वाढीमुळे बचत सामग्रीत वाढ होत नाही, यावर बरेच अर्थतज्ञ सहमत आहेत.

स्वत: 'जे. एम. केनिझ' यांनी समाजाची सामान्य परिस्थिती आणि इतर राजकीय स्थैर्य वा व्यवस्था यासारख्या परिस्थितीसोबतच बचतनिश्चितीचे निर्णायक महत्त्व कमाईच्या स्तराला दिले आहे. जे. एम. केनिझनंतर या विषयावर आणखीन संशोधन करण्यात आले आहे. यांच्या परिणामस्वरुप काही महत्त्वाच्या बाबी समोर आल्या आहेत त्याच्याप्रमाणे, कोणत्याही व्यक्तीची संपत्ती व त्याचे अशा प्रकारचे आधार की जे तत्काळ रोकडमध्ये परिवर्तीत करता येऊ शकतात, वस्तुंच्या वाढीव किंमती, समाजातील संपत्ती व उत्पन्नाची विभागणी, उपभोक्त्यांना कर्जपुरवठा, व्यक्तीच्या भूतकाळातील जीवनाचा दर्जा, तिची आर्थिक क्षमता आणि तिच्या उत्पन्नात वाढ या बाबींबरोबरच समाजाची नैतिक मूल्ये, व्यक्तींची व्यक्तिगत मानसिकता व प्रकृती आणि इतर बिगर आर्थिक बाबीसुद्धा बचतीच्या मानसिकतेस प्रभावित करतात. काही वर्षांपूर्वी अमेरिकेत संपत्ती आणि पत (Credit) यांच्या बाबतीत संशोधन करण्यासाठी स्थापण्यात आलेल्या लवादाने (commission) प्रसिद्ध केलेल्या अहवालात उपरोक्त बाबींवर प्रकाश टाकल्यानंतर व्याजदरावर अशी भूमिका व्यक्त केली,

"उपभोक्त्याच्या खर्चावरील व्याजदराच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणामांवर जे. एम. केनिझ आणि क्लीसीकी विचारसरणी या दोन्हींवर बरेच महत्त्व देण्यात आले आहे. परंतु वर्तमान दर्शनीय परिस्थितीचा प्रभाव या बाबीवर आहे की याचा परिणाम जर होत असेल तर ते इतर दुसऱ्या बाबींच्या तुलनेत खूप महत्त्वाचे आहे."

(संदर्भ : Commission on Money and credit (CMC) Impact of Monetory Policy, Page : 13 - 21, Prentice Hall Inc, 1964)

ब्रिटनमध्ये संपत्ती व्यवस्थेच्या निरीक्षणासाठी स्थापण्यात आलेल्या 'रेडकल्फ' कमिटीनेसुद्धा आपल्या अहवालात असे लिहिले आहे की यासमोर भूमिका व्यक्त करणाऱ्या अर्थतज्ञाच्या दृष्टिकोनानुसार व्याजदरातील वाढीमुळे व्यक्तिगत बचतीच्या प्रमाणात वाढ होत नाही.

(संदर्भ : रेड कल्फ कमिटीचा संपत्तीविषयक अहवाल, पृष्ठ : ५६, Her Majestry's Stationary Office, London, 1959)

वस्तुस्थिती अशी आहे की, बचतीची मानसिकता वाढ़ण्याची इतर बरीच कारणे आहेत. जमा करून ठेवण्यात आलेल्या संपत्तीत वाढ़ करण्याचा हेतु हा सामान्यांसाठी दुय्यम दर्जाची प्रेरणात्मक बाब आहे. आता आपण मूळ प्रश्नाकडे येऊया. व्याजमुक्त व्यवस्थेत भांडवलाच्या माध्यमाने नफा मिळविण्यासाठी तोट्याची संभावना अंगलट घेणे आवश्यक ठरते. मग भांडवल बटाई खात्यात जमा करण्यात येवो किंवा या भांडवलापासून रोखे (Shares) खरीदण्यात येवो. या दोन्ही परिस्थितीत नफ्यासहित नुकसानीची शक्यता असून कोणत्याही परीस्थितीत भांडवल हे वाढ़ीबरोबरच परत मिळण्याची शास्वती नसते. मग प्रश्न असा निर्माण होतो की साठवून ठेवण्यात आलेल्या भांडवलाच्या माध्यमाने संपत्ती कमावण्याचे एखादे शास्वत आणि सुरक्षित माध्यम नसेल तर या विशेष प्रेरणादायी पद्धतीनुसार बचत होणे बंद होणार नाही काय? अथवा संपत्तीच्या वाढ़ीकरिता हे अशास्वत आणि तुलनात्मक असुरक्षित माध्यमेसुद्धा बचतीसाठी प्रेरणा देतील काय?

या प्रश्नांचे समाधानकारक उत्तर मिळविण्यासाठी काही वास्तविकतांचा अभ्यास करावा लागेल. प्रथम बाब अशी आहे की स्वाभाविकरित्या तोट्याची शक्यता एवढ़ी जास्त नसतेच की नफ्याची आशाच मावळावी. मानवी इतिहास साक्ष आहे की नफ्याची शक्यता नुकसानीच्या शक्यतांपेक्षा जास्तच असतात. असे नसते तर बऱ्याच प्रमाणात जोखीम असलेल्या धंदे-व्यवसायात एवढ़ी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक झालीच नसती. आपल्या गरजांपेक्षा जास्त व अतिरिक्त भांडवल बाळगणाऱ्या व्यक्तींमध्ये बहुसंख्य लोक असे असतात जे नफ्याच्या आशेवर नुकसानीची जोखीम घेण्यास नेहमी तयार असतात. नेमके हेच कारण आहे की व्याजावर आधारित अर्थ व्यवस्थेतसुद्धा संपत्तीत वाढ़ करण्याचे (व्याज) हे एक सुरक्षित साधन असतानादेखील बरेच बचतकार आणि भांडवलदार हे सुरक्षित (?) साधन सोडून तोट्यांची शक्यता असलेल्या व्यवसायामध्येच आपले भांडवल गुंतवितात आणि यामध्ये व्याजदरापेक्षा जास्त नफा मिळवितात. यावरून लक्षात येते की नुकसानीची शक्यता ही काही भौतिकवाद्यांना रोखू शकते, परंतु सर्वांवर याचा काहीच प्रभाव पडत नाही. जास्तीतजास्त एवढ़ेच सांगता येईल की संपत्तीत वाढ़ करणारे व्याजासारखे सुरक्षित माध्यम उपलब्ध नसल्यास बचतकारांच्या एका वर्गासाठी बचतीची विशेष प्रेरणा संपेल. ही बाब सर्वच बचतकारांवर लागू होत नाही.

आमच्या मते ही बाब बहुतेक बचतकारांच्या बाबतीतही लागू होत नाही. याचे कारण ती दुसरी बाब आहे ज्याकडे आम्ही आपले लक्ष वेधू इच्छितो. हीच बाब वर्तमान समाजात व्याजास चालना देते. आजच्या काळात बचतीपासून एक अल्पसे अतिरिक्त उत्पन्न प्राप्त करण्याचे माध्यम उपलबध असल्याने बरेचसे बचतकार ही सोपी पद्धत अंगीकारताना दिसतात. म्हणून हे बचतकार ही पद्धत अंगीकारतात. जर ही पद्धतच बंद करण्यात आली तर बटाई खात्याच्या स्वरुपात नफ्यामध्ये भागीदारी तत्त्वावर भांडवल गुंतविण्याची एक अतिशय सोपी व प्रभावी पद्धत समोर येईल आणि यामुळे बचतकार

आपल्या संपत्तीवाढीची तहान भागविण्यापोटी हाच मार्ग स्वीकारतील. ही शंका एखाद्या निरीक्षणात्मक अभ्यासावर आधारित नाही की, संपत्तीत वाढ करण्यासाठी व्यापारासारखी सोपी पद्धत नसल्याने या विशेष प्रेरणात्मक बाबीपर्यंत बचत करणे लोक बंद करतील.

तिसरी वास्तविकता ही आहे की, जर व्याजमुक्त बँकिंग व्यवस्था उत्तम प्रकारे चालविण्यात आली तर बटाई खात्यात भांडवल जमा करणाऱ्यांना तसेच शासकीय रोखे खरेदी करणाऱ्यांना तोटा होण्याची संभावना खूपच कमी असू शकेल. बऱ्याच वेळा बहुतेक बँका आणि शासनासाठी हे शक्य होईल की आपले खातेदार आणि रोखे (Shares) च्या मालकांचे केवळ मूळ भांडवल सुरक्षित तर होईलच, शिवाय त्यांच्यादरम्यान नफादेखील वाटण्यात येईल.

मागील प्रकरणात स्पष्ट केल्याप्रमाणे या गोष्टीसाठी प्रयत्नशील असावे. बटाई खातेदारांना तोटा होऊ न देणे हेच बँकिंग व्यवसाय यशस्वीरित्या चालविण्यासाठी आवश्यक आहे. हे बँकेच्या हिताचे ठरेल. बटाई तत्त्वावर भांडवल गुंतवितेवेळेस व्यावसायिक पक्षाच्या निवडीमध्ये दक्षता बाळगून आणि भांडवल विभिन्न व्यवसायात गुंतवून तोट्यापासून स्वत:स वाचविता येते. अशा प्रकारे शासनसुद्धा प्रयत्नशील असू शकते की शासकीय रोखे खरेदी करणाऱ्यांना तोटा होऊ नये.

या तीन बाबी अर्थात नफ्याची आशा प्रबळ होणे, नुकसानीच्या संभावनेशिवाय नफा मिळविण्याचा मार्ग मोकळा होणे आणि भांडवल लावण्याच्या तोटामुक्त पद्धती अस्तित्वात असणे हे आमच्या मतानुसार पुरेसे आहे की, जे लोक आपल्या संपत्तीत वाढ होण्यासाठी बचत करतात, त्यांना बचत करण्यासाठी प्रवृत्त ठेवावे. त्याचबरोबर संपत्तीत वाढ इच्छिणे हे बचतीच्या प्रेरणात्मक बाबींपैकी केवळ एक बाब असून इतरही प्रेरणात्मक बाबी उपलब्ध असल्याने आम्ही या निर्णयापर्यंत पोहोचण्यात सत्याधिष्ठित असू की, व्याजास निषिद्ध ठरविल्यामुळे बचतीच्या एकूण सामग्रीत जर घट झाली तरी ही घट अत्यल्प असेल.

एका इस्लामी अर्थव्यवस्थेत असे आढळले की, जनतेची बचतीची प्रवृत्ती कमी असून भांडवलवृद्धी आणि विकासाला अपेक्षित स्तरावर नेण्याकरिता ही बचतप्रवृत्ती वाढवून राष्ट्रीय बचतीमध्ये वृद्धी करणे आवश्यक आहे. तेव्हा हे उद्दिष्ट साधण्याकरिता इतर योग्य प्रणालींचा अवलंब करता येऊ शकतो. अपव्यय, व्यर्थ व फाजील खर्चास आळा घालून आणि अशा स्वरुपाच्या विनाकारण व्यर्थ अभिमानापोटी वा भोगविलासासाठी फाजील खर्चांवर विधीवत बंदी घालून बचत मानसिकतेत वृद्धी करणे सहज शक्य आहे. (याच्या सविस्तर माहितीस्तव "इस्लाम का नज़र-ए-मिलकियत"; प्रकरण १२ आणि १५, उर्दू वाचावे) शिवाय गरजेनुसार बचतीची प्रेरणा आणि नैतिक आवाहनानेसुद्धा ही बाब साधणे सहज शक्य आहे. या शिवाय व्याजमुक्त अर्थनीतीमध्ये बटाई दरात योग्य वाढ करून बचत प्रवृत्तीत वाढ करता येऊ शकते. बटाईच्या दरात वाढ

करणे, म्हणजेच बटाई तत्त्वावर लावण्यात आलेल्या भांडवलाच्या व्यवसायात मिळणाऱ्या नफादरातील वाढ होय. ज्या वेळी व्यावसायिकवर्गामध्ये भांडवलाची मागणी वाढेल तेव्हा ते आपल्या नफ्याच्या भागात जास्त वृद्धी करू शकतील. परिणामी खातेदार आणखीन बचत करून बटाई खात्यात जास्तीतजास्त भांडवल जमा करतील.

एखादे वेळी बचत सामग्री जास्त झाल्यास आणि बँकांना बटाई तत्त्वावर व्यावसायिक मिळत नसल्यास बँका व्यावसायिक पक्षांकडून मिळणाऱ्या नफ्याच्या दरात घट करून भांडवलाची मागणी वाढवू शकतात. असे करण्यासाठी त्यांना बटाई खातेदारांना मिळणाऱ्या नफ्यात घट करावी लागेल. याचा परिणाम बचत सामग्रीच्या घटच्या स्वरुपात प्रकट होऊ शकतो. व्याजमुक्त अर्थव्यवस्थेमध्ये बटाई दरात होणारे योग्य परिवर्तन हे बचतीची मागणी आणि सामग्री या दोन्ही बाबींत संतुलन कायम ठेवण्याचे कार्य करील. हे कार्य वर्तमान व्याजावर आधारित अर्थव्यवस्थेत व्याजदरातील परिवर्तनासारखीच आहे.

२) व्यावसायिक भांडवलाचा पुरवठा

वरील चर्चा सामान्य लोकांची बचत आणि या बचतीच्या व्यावसायिकवर्गात स्थलांतरीत होण्याबाबत होती. परंतु ज्या ठिकाणी व्यवसायासाठी भांडवलाच्या सामग्रीचा प्रश्न येतो. आपण हे विसरता कामा नये की व्यावसायिक भांडवलाचे मोठे माध्यम हे आपली बचतच असते. व्यावसायिक भांडवलाच्या एकूण सामग्रीच्या या भागावर व्याज मिळाल्यास अथवा व्याजदरात कमी झाल्यास काहीच फरक पडणार नाही.

व्यावसायिक संस्था यंत्रपुरवठ्यासाठी जो घसारा भत्ता (Depreciation Allowance) ठरवितात, यामुळेसुद्धा भांडवलनिर्मिती होते. अमेरिकेमध्ये व्यावसायिक भांडवलाचा तीन चतुर्थांश भाग व्यावसायिक संस्थांच्या बाह्यात्मक माध्यमावर आधारित आहे. (संदर्भ : Paul M. Harvitz : Monetory Policy and the Financial System, P. 115, Prentice Hall inc, 1963) अमेरिकेत व्यावसायिक संस्थांची बचत ही एकूण राष्ट्रीय बचतीच्या प्रमाणात निम्मी (५०%) आहे. (संदर्भ : MC : Impacts of Monetory Policy, Op. cit P, 655) ब्रिटनमध्येदेखील अशीच अवस्था आहे. 'रेड कल्फ' कमेटीच्या रिपोर्टमध्ये असे वर्णन करण्यात आले आहे की, औद्योगिक विस्तारीकरणासाठी भांडवल व्यवस्थेच्या साधनांचे सर्वांत मोठे माध्यम हे व्यावसायिक संस्थांचा नफासुद्धा याच हेतुसाठी रोखण्यात येतो आणि यापेक्षा जास्त प्रमाणात या भांडवलाची राशी असते, जे मशीन व यंत्राच्या घसाऱ्यासाठी रोखण्यात आलेला नफा हे औद्योगिक विस्तारीकरणासाठी सर्वांत मोठे साधन राहिलेले आहे. दुसरे महत्त्वाचे साधन हे रोख्यांचा बाजार (शेअर बाजार) होय. बँकांच्या कर्जांनी या बाबतीत दुय्यम भूमिका निभावली आहे. (संदर्भ : रेड कल्फ रिपोर्ट, पृष्ठ : ८०)

अमेरिकेमध्ये कंपन्यांच्या एकूण नफ्याचा ७० टक्के भाग बचत करण्यात येतो. तसेच वैयक्तिक उत्पन्नामधील बचतीचे प्रमाण केवळ पाच टक्के एवढे आहे. दुसऱ्या देशांची परिस्थितीसुद्धा यापेक्षा जास्त भिन्न नाही. (संदर्भ : N. Katdor : Capital Accumulation and Economic Growth in the theory fo capital edited by D.C. Haque, Page 197, Macmilan London, 1965) नफ्यातून बचत करणाऱ्या या कंपन्यांचा उद्देश बचत राशींना ठराविक दराने व्याजपुरवठा करणे हा नसून नफ्यासाठी आपल्या व्यवसायात लावणे हा असतो. अर्थातच व्याजास निषिद्ध ठरविण्याचा अशा बचतीवर काहीच परिणाम होऊ शकत नाही. व्यावसायिक संस्थांची बचत. ही या संस्थांच्या आपल्या गरजा आणि त्यांच्या व्यवसायाचा नफा यासारख्या बाबींवरुन ठरल्या जातात. व्याजदराचा या बाबींवर विशेष परिणाम होत नाही.

(संदर्भ : MC : Impacts of Monetroy Policy, P. 673 - 74)

याप्रमाणे आपण या निष्कर्षावर पोहोचलो की व्याजास निषिद्ध घोषित करण्याचा व्यावसायिक भांडवले सामग्रीच्या मोठ्या भागावर काहीच परिणाम होत नसून लघू भागावर परिणाम पडला असला तरी तो परिणाम खूप अत्यल्पच असेल.

३) समाजासाठी भांडवलपुरवठा

समाजात (Public Sector) भांडवल गुंतवणुकीसाठी लोकांकडून त्यांच्या बचती प्राप्त करण्याच्या पद्धतींवर सातव्या प्रकरणात आपण चर्चा केली. या ठिकाणी आम्हीं या वास्तविकतेवर जोर देऊ इच्छितो की व्याजाऐवजी नफ्यातील भागीदारीला भांडवल पुरवठ्याचा आधार बनविणे हे समाजासाठी खूपच फायदेशीर ठरेल आणि तेसुद्धा विशेषतः अशा परिस्थितीत की ज्या वेळी शासकीय रोखे खरेदीदारांना तोट्यांपासून वाचविण्याचे प्रयत्न करण्यात येत असतील. नफ्यामध्ये भागीदारी पद्धतीचा अवलंब केल्याने लोकांची एका मोठ्या संख्येचे हित आणि समाजाच्या औद्योगिक यशावर अवलंबून असेल. शासकीय रोखे खरेदीदारांची मोठी संख्या ही अशा मजूर, कारकून, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची असेल, ज्यांची मिळकत समाज-व्यवहाराशी संबंधित असेल. या सर्वांची ही भावना असेल की रोख्यांवर मिळणारा नफा हा लोकांच्या औद्योगिक यशस्वीतेवर आणि त्याच्या भरमसाठ नफ्यावर अवलंबून असेल व हीच भावना त्यांना समाजाच्या कल्याण व हित जोपासण्यासाठी प्रेरक ठरेल. या उलट शासनास व्याजावर कर्ज देणारे लोक समाजवर्तुळाच्या औद्योगिक विकासाशी बेपर्वा असतात. कारण त्यांचा स्वार्थ निश्चित आणि सुरक्षित असतो. या उलट व्याजमुक्त व्यवस्थेत अशीच संभावना आहे की जनतेची प्रवृत्ती व मानसिकता आणि समाजवर्तुळाच्या व्यवसायाबाबतच्या त्यांच्या दृष्टिकोनातील परिवर्तन हे शासनासाठी समाजवर्तुळाच्या व्यवसायासंबंधी जनतेची प्रामाणिक मदत व सहकार्य मिळविणे सुलभ होईल.

४) बँकिंग व्यवसायाचा नफा

व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेच्या स्थैर्यासाठी हे आवश्यक आहे की बटाईवरून बटाईच्या (अर्थात या पद्धतीमध्ये बँक लोकांकडून बटाई तत्त्वावर भांवडल घेऊन बटाई तत्त्वावर व्यावसायिकांना भांडवल पुरवते) नियमानुसार नियोजनबद्ध करण्यात येणारा व्यवसाय हा एक अत्यंत फायदेशीर बँकिंग- व्यवसाय असून कमाल दर्जाच्या पात्रता आणि क्षमता असलेले भांडवलदार हा व्यवसाय करण्यास तयार असावेत. मागील प्रकरणात आम्ही या व्यवसायाचे जे सविस्तर वर्णन सादर केले आहेत, त्यानुसार या बाबतीत कोणत्याच शंकेस किंचितही वाव नाही की हा व्यवसाय भरमसाठ नफा देणारा असेल. याचे मोठे कारण असे आहे की जे महत्तम भांडवल बँकेच्या बटाई खात्यात येईल ते व्यवसायात वापरण्यात येईल व परिणामी मिळणाऱ्या नफ्यात बँकेस वाटा मिळेल, परंतु यात होणाऱ्या तोट्याची जबाबदारी बँकेवर नसेल.

स्वभावत:च बँका हे भांडवल अशा व्यवसायात गुंतवतील की ज्यापासून नफा मिळेल मात्र होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी बँकेवर नसेल.

५) व्याजमुक्त बँकिंग व्यवस्था आणि राज्यशासन

काही काळापूर्वी बँकिंग व्यवस्थेचे स्पष्टीकरण आणि वर्णन अशा प्रकारे करण्यात आले होते की जर राज्यशासन आर्थिक व्यवस्थेच्या सक्रीय मार्गदर्शनाऐवजी यात दखल न देण्याचीच नीती अवलंबिली तर बँकिंग व्यवस्था कशा प्रकारे चालेल. मागील ३० वर्षांत अर्थतज्ञ व बँकिंग व्यवस्थेची विचारसरणी पूर्णत: बदललेली आहे. (या बाबीं अडतीस वर्षापूर्वी लिहिण्यात आल्या होत्या. आता २००७ मध्ये सामान्य प्रवृत्ती ही परत एकदा बँकांना शासनाच्या दखलपात्र नीतीपासून स्वतंत्र ठेवण्याकडे आहे.) आता बँकिंग व्यवस्थेचे मार्गदर्शन आणि केंद्रीय बँकेच्या माध्यमाने सविस्तर नियमानुसार या व्यवस्थेस अपेक्षित पद्धतीने चालविणे अवघड वाटते. या पुस्तकात आम्ही व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेची जी प्रणाली सादर केली आहे, याचबरोबर राज्य शासनाच्या मार्गदर्शनाबरोबरच इस्लामी राज्याचा हेतु वा उद्दिष्टसुद्धा डोळ्यांसमोर ठेवणे आवश्यक आहे. अर्थशास्त्राच्या किंवा उत्पन्नाच्या इतर संस्थांबरोबरच बँकिंग व्यवस्थेच्या बाबतीतसुद्धा आमची विचारप्रणाली अशी आहे की ज्या वेळी आणि ज्या प्रकारे व ज्या दर्जात ही व्यवस्था आपल्या स्वतंत्र कार्यानुसार सामाजिकरित्या अपेक्षित हेतु साध्य करण्यात अयशस्वी ठरल्यास इस्लामी राज्याने आपले मार्गदर्शन आणि योग्य नीती ही कमतरता भरून काढण्यासाठी आणि अपेक्षित उद्दिष्ट पूर्णपणे प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील राहावे. हे प्रयत्न बँकिंग व्यवस्था आणि सार्वजनिक मालमत्ता अथवा सामाजिक गरजपूर्तीशी संबंधित असू शकतात. या पुस्तकाच्या सातव्या आणि आठव्या प्रकरणात या विचारसरणीचे काही प्रमाणात दर्शन घडू शकते.

वर्तमान बँकिंग व्यवस्था या ग्राह्य बाबींवर अवलंबून आहे की, लोकांना बँक स्थापन करणे आणि यांना स्वहेतु चालविण्याचे स्वातंत्र्य असावे. अर्थातच बँकांना राष्ट्रीय संपत्ती ठरविण्यात येणार नाही. परंतु जर कधीकाळी एखाद्या देशात इस्लामी शासन व्यवस्थेत सामूहिक हित आणि लाभ घ्यायचा असेल तर हे गरजेचे आहे की बँकिंगची सर्व व्यवस्था शासनाच्या हाती असली तरी वर्तमान स्वरुपात मूलभूत सुधारणेची गरज नसेल. व्याज घेणे व देणे ज्याप्रमाणे व्यक्तींदरम्यान निषिद्ध आहे, त्याचप्रमाणे शासन आणि रयतेदरम्यानसुद्धा निषिद्ध आहे. इस्लामी विधीने या विषयात कोणताच भेदभाव आणि अपवाद बाळगलेला नाहीच. इस्लामच्या दीर्घकालीन इतिहासातसुद्धा कधीच इस्लामी शासनात आपल्या रयतेशी व्याजव्यवहारास वैध ठरविले नाही.

राष्ट्रीय संपत्तीच्या कक्षेत असूनसुद्धा बँकांचा व्यवहार बटाई तत्त्वावर नियोजित करण्यात येईल. मात्र बँकांचे स्वभांडवल भागीदारी तत्त्वावर भागीदारांकडून प्राप्त होण्याऐवजी राष्ट्रीय संपत्तीतून पुरविण्यात येईल. आपले खातेदार अथवा व्यावसायिक पक्षाबरोबर बँकेच्या संबंधाचे स्वरुप अगदी तेच आणि तशाच प्रकारचे असतील जसे तिसऱ्या व चौथ्या प्रकरणात नमूद करण्यात आलेले आहे.

राहतो प्रश्न असा की इस्लामी तत्त्वावर आधारित उत्पन्नामध्ये बँकांना राष्ट्रीय संपत्तीत गृहीत धरणे योग्य ठरेल अथवा नाही? याचे उत्तर त्या विशेष परिस्थितीच्या सविस्तर अभ्यासानंतरच देण्यात येईल. येथे नियमानुसार एवढ़ेच सांगता येईल की सामान्य परिस्थितीत असे करणे योग्य ठरणार नाही. बँकांना राष्ट्रीय संपत्ती ठरविण्याचा परिणाम हा अर्थनियोजन, देशाची राजकीय व्यवस्था आणि वैयक्तिक स्वातंत्र्याच्या मर्यादांवर पडेल. तसेच इस्लामने ठरवून दिलेले स्वातंत्र्य आणि नियमाच्या पालनातील संतुलन प्रभावीत होईल. परंतु एखाद्या देशाच्या विशिष्ट परिस्थितीत या बाबीची गरज पडली की इस्लामच्या सामूहिक हिताचे संरक्षण आणि विधीच्या उद्दिष्टपूर्तीसाठी ही पावले उचलली गेल्यास इस्लामने यावर कोणतेच निर्बंध लावले नाहीत. आपल्या गरजा व हितांचा इस्लामी विधीने अंगीकार केलेला आहे, अर्थातच या गरजा व हितांची गरज पडल्यास असे केले जाऊ शकते. एका व्याजावर आधारित असलेली व्यवस्था व्याजाच्या जोखडातून मुक्त करण्यात येत असलेल्या परिस्थितीत अशा प्रकारच्या प्रयत्नांची गरज समोर येऊ शकते. खरे पाहता समाजातील सामान्य व्यक्तीतील प्रामाणिकता आणि नीतीमत्ता वगैरेचे प्रमाण खालावलेले असेल, हजारो वर्षांपासून सुरु असलेल्या व्याजाचा खातमा, अत्याचार आणि शोषणाचे पूर्णत: उच्चाटन करून न्यायाची प्रस्थापना करण्यासाठी जर अस्थायी स्वरुपात वैयक्तिक स्वातंत्र्याच्या कक्षेत मर्यादित करण्यासाठी आणि उत्पन्नाच्या या उपयुक्त उद्योगाच्या पूर्तीप्रमाणे राज्यशासनाच्या ताब्यात ठेवण्यासाठी कठीण वा अशक्य समजल्यास अवश्य असेच करावे. तरीदेखील हे पाऊल एक दुर्बलतेचेच लक्षण समजण्यात येईल. एका प्रतिभावंत आणि प्रबळ समाजात बँकिंग व्यवसायाचा मूळ दर्जा हा व्यवसायाचा स्वतंत्र आणि वैयक्तिक दर्जा होय.

प्रकरण आठवे

केंद्रीय बँक

देशाची आर्थिक व्यवस्था सुरळीत चालविण्यासाठी बँकिंग-व्यवस्थेची देखरेख आणि मार्गदर्शन तसेच वित्त आणि व्यवसायासंबंधी राज्याचे धोरण राबविण्यासाठी एक केंद्रीय बँक असेल. ही बँक शासनाच्या नियंत्रनाखाली असेल. या बँकेचे उद्दिष्ट नफा मिळविणे नसून सामान्यांच्या हिताचे रक्षण असेल.

व्याजमुक्त अर्थव्यवस्थेमध्येसुद्धा आजच्या प्रचलित बँकिंग व्यवस्थेप्रमाणेच वेतन अदा करण्यात येईल. या बँकेमार्फत 'करन्सीनोट' (चलनी नोट) जारी करण्यात येईल. अर्थात हे केंद्रीय बँकेवर बंधनकारक नाही. परंतु प्रचलित व्यवस्थेत हे कार्य केंद्रीय बँकेच्याच स्वाधीन करण्यात आले असल्याने ही पद्धत जास्त सोईस्कर वाटते. मात्र चलनी नोट जारी करण्यासंबंधी केंद्रीय बँकेचे अधिकार हे देशाच्या विधान परिषदेच्या अधीन असतील. ही बँक शासनाची असेल आणि या बँकेत शासन आपले खाते उघडेल. परदेशातील आर्थिक व्यवहार याच बँकेमार्फत चालतील. तसेच इतर देशांशी निर्माण होणारे आर्थिक संबंध याच बँकेच्या देखरेखीत असतील. म्हणजेच इतर सर्व बँकाप्रमाणेच ही केंद्रीय बँकसुद्धा कार्यरत असेल. सामान्य बँकांप्रमाणेच व्यावसायिक पक्ष आणि व्यावसायिक लोक व संस्था आणि जनतेसाठी केंद्रीय बँक कार्यरत असेल. या बँकेत सर्व बँकांची खाती उघडलेली असतील आणि गरजप्रसंगी सामान्य बँकांना येथून कर्जप्राप्तीची व्यवस्था असेल. केंद्रीय बँक आर्थिकदृष्ट्या रोजगार, मिळकत आणि सामान्य वस्तुंच्या दरांवर नजर ठेवून त्यांना योग्य प्रमाणानुसार विकसित करण्यासाठी अथवा पाहिजे असलेल्या प्रमाणावर कायम ठेवण्यासाठी आवश्यक असलेले प्रयत्न करील. आपल्या या प्रयत्नांच्या माध्यमाने केंद्रीय बँक भांडवली करणाच्या वित्तीय साधनांना उद्योग आणि व्यवसाय सामूहिक हिताच्या दृष्टिकोनातून प्रथम महत्त्व असलेल्या विषयांकडे घेऊन जाईल. तसेच भांडवलनिर्मितीसाठी गरजेनुसार 'पत' (Credit) पुरवठा आणि वित्त पुरवठ्याच्या मागणीस सुसंगत ठेवण्याचा प्रयत्न करील. सामान्यांच्या वित्तीय गरजा आणि सामान्य बँकेच्या वित्तीय गरजांच्या दृष्टीने अर्थपुरवठा केंद्रीय बँकेकडून करण्यात येईल. त्याचप्रमाणे सामान्य बँकांच्या आर्थिक कार्यक्रमास सामान्यांच्या हितासाठी योग्य प्रकारे कार्यरत ठेवण्याचे कार्यसुद्धा केंद्रीय बँकेचे असेल. केंद्रीय बँक शासनाच्या आर्थिक गरजांची पूर्तता आपल्या मर्यादाकक्षेत राहून करील. उदाहरणार्थ, शासनास अस्थायी स्वरुपात कर्जपुरवठा करणे, यासाठी सामान्य बँका, व्यावसायिक संस्था आणि जनतेस भागीदारी स्वरुपात कर्जपुरवठा करणे आणि शासनातर्फे जारी करण्यात आलेल्या व्यावसायिक रोख्यांच्या (Shares) बाजारात अवास्तव आणि अवाजवी किंमतींना

अवाजवी चढ़-उतारांपासून सुरक्षित ठेवणे वगैरे. (यासंबंधी सविस्तर माहिती पुढील प्रकरणात येईलच) केंद्रीय बँकेतर्फे देशातील चलनी नाण्यांच्या देशामधील व देशाबाहेरील किंमतीवर लक्ष ठेवून असेल आणि देशाच्या स्वार्थ आणि हिताविरुद्ध बदलणाऱ्या किंमतीवर अकुंश ठेवण्यात येईल.

सामान्य बँकांचे मार्गदर्शन करणे, त्यांना सामान्यजणांच्या आर्थिक हितांसाठी योग्य असलेल्या नीती व धोरणांचा अवलंब करण्यासाठी प्रेरित ठेवणे आणि आपण ठरवून दिलेल्या व्यावसायिक नीती व धोरणानुसार त्यांना कार्य करण्यासाठी प्रेरित ठेवणे व यासारख्या इतर कामांसाठी केंद्रीय बँकेचे सर्वांत मोठे माध्यम हे योग्य मार्गदर्शन आणि नैतिक आवाहन असेल. केंद्रीय बँक ही आवश्यक बाबींची माहिती देईल. तसेच संख्या व गणनेचे प्रकाशन आणि बँका व व्यावसायिक संस्थांना अर्थशास्त्राचे एकूण वित्तपुरवठा, पतपुरवठा आणि भांडवलनिर्मितीच्या मार्गांची ओळख होईल. केंद्रीय बँक त्यांना या गोष्टींचे स्पष्टपणे मार्गदर्शन करील की, समाजाच्या सामुदायिक हितांसाठी कोणत्या उद्योग आणि व्यवसायांत बटाईच्या तत्त्वांवर कर्जपुरवठा करणे योग्य ठरेल आणि कोणत्या उद्योग व व्यवसायांना कर्जपुरवठा करण्यासाठी प्रथम प्राधान्य देण्यात यावे. त्याचप्रमाणे नुकसान होणाऱ्या उद्योग व व्यवसायांकडे अंगुलीनिर्देश करुन बँकांचे संभावित नुकसान टाळण्यासाठीही केंद्रीय बँक मार्गदर्शन करील.

जर अशी अपेक्षा करण्यात येत असेल की बऱ्याच गोष्टीसंबंधी आवश्यक असलेल्या नीती व धोरणांचा अवलंब करण्यासाठी एवढी बाब पुरेशी ठरेल की यासंबंधी आवश्यक असलेली सर्व माहिती आणि या माहितीनुसार आपसातील सामंजस्यपूर्ण सल्लामसलतीने संपादित करण्यात आलेली नीती वा धोरण बँकांसमोर यावे, परंतु केंद्रीय बँक गरजेनुसार सामान्य बँकांना असे मार्गदर्शन पत्रसुद्धा देऊ शकते, ज्यावर अंमलबजावणी सामूहिक हितांसाठी आवश्यक असेल. जर खूपच आवश्यक आणि नितांत गरजेचे असेल तर या मार्गदर्शनांना नियम व आदेशांचे स्वरुपसुद्धा दिले जाऊ शकते. सामान्य परिस्थितीत केंद्रीय बँक आणि सामान्य बँकांचे विश्वस्त आपसात सल्लामसलत करून सर्वांच्या सहमतीने योग्य निर्णय घेऊ शकतात. यासाठी परिषद बोलावणे, बैठक बोलावणे व यासारख्या पद्धतींसुद्धा अवलंबिण्यात येऊ शकतात. मात्र याव्यतिरिक्त असलेल्या बाबींचा निर्णय हा केंद्रीय बँकेचाच अधिकार असेल. शेवटी हा विषय केंद्रीय बँकेच्या अधिकारांची मर्यादा काय असेल आणि सामान्य बँकांना केव्हा कोणत्या बाबीसंबंधी कोणत्या प्रकारचे निश्चित आदेश देण्यात येतील, हे देशाची विधान परिषद ठरविणार. हे निश्चितीकरण नियमस्वरुपी असेल तरीदेखील यासाठी पूर्णत: प्रयत्न करण्यात येतील की, केंद्रीय बँकेचा पूर्णपणे प्रभाव असूनसुद्धा सामान्य बँकांना आपला विकास साधण्याचे पूर्णपणे स्वातंत्र्य असेल. सामान्य बँका आणि केंद्रीय बँकेदरम्यान सहकार्य, विश्वास आणि सलोख्याचे वातावरण कायम ठेवण्याचे सतत प्रयत्न करण्यात येतील.

मौलिक नियम

या ठिकाणी उपरोल्लेखित बाबींचे वर्णन शक्य नाही. या ठिकाणी केंद्रीय बँक आणि सामान्य बँकांदरम्यान असणारे प्रमुख संबंध आणि केंद्रीय बँकेच्या वित्त आणि बँकिंग व्यवस्थावरील प्रभावाविषयी थोडक्यात चर्चा करुया. हे नियम प्रारंभापासूनच ठरविण्यात आलेले असतील आणि याची माहितीसुद्धा स्पष्ट करण्यात आलेली असेल. मात्र या उद्देशपूर्तीस्तव आणि विशेषत: वित्तीय पुरवठ्यात गरजेनुसार विस्तार करण्यासाठी अथवा त्यात घट करण्यासाठी या नियमांत काहीं प्रमाणात सुधारणा करण्याचे अधिकार बँकेस असतील. या नियमांचे अस्तित्व हे जनतेसाठी सामान्य बँकांवर विश्वास ठेवण्याची हमी असेल. कारण केंद्रीय बँकेतर्फे सामान्य बँकांना अशा प्रकारचे मार्गदर्शन, मुदत, सहकार्य आणि निगरानी करण्यात येईल की सामान्य बँकांनी जनतेशी केलेले करार पूर्ण करावेत. हे नियम अशा प्रकारचे आहेत.

१) आपल्या कर्ज आणि बटाई खात्यातील एकूण भांडवलाची एक ठराविक टक्केवारी रक्कम नगदीच्या स्वरुपात सुरक्षित ठेवणे सामान्य बँकेस बंधनकारक असेल. नगदी सुरक्षित राशी आणि खात्यातील राशीदरम्यान असलेल्या प्रमाणास आपण यापुढे 'सुरक्षित प्रमाण' (Reserve Ratio) असे संबोधन देऊया. आमचा विचार असा आहे की हे प्रमाण १० टक्के असावे. या 'सुरक्षित प्रमाण' राशीचा एक भाग केंद्रीय बँकेत जमा करण्यात यावा आणि दुसरा भाग सामान्य बँकेत असावा. त्याचप्रमाणे प्रत्येक सामान्य बँकेने आपल्या राखीव राशीचा सरासरी ५० टक्के भाग केंद्रीय जमा ठेवावा. मात्र सवलतीसाठी एवढे करता येईल की, ज्या ठिकाणी केंद्रीय बँकेची एखादी शाखा नसेल अशा ठिकाणच्या लहान-सहान बँकांना हा नियम लागू पड़णार नाही अथवा अशा बँका या नियमातून मुक्त असतील. परंतु केंद्रीय बँकेत ठेवण्यास्तव असणारी राखीव रक्कम तिच्या स्वत:जवळच सुरक्षित असावी. ही पद्धती प्रचलित व्यवस्थेमध्येसुद्धा चलनात आहे.

या नियमाचा हेतु असा नाही की कोणत्याही परिस्थितीत बँकेची सुरक्षित प्रमाण राशी ही तिच्या खात्याच्या प्रमाणानुसार १० टक्केच असावी. यासाठी एवढे पुरेसे आहे की दर आठवड्यास तिच्या सुरक्षित प्रमाण राशीचे दैनंदिन प्रमाण हे तिच्या खात्यांच्या रोजच्या प्रमाणाच्या १० टक्के असावे: त्याचप्रमाणे हेसुद्धा पुरेसे आहे की केंद्रीय बँकेत या बँकेच्या खात्यातील जमा रकमेचे दैनंदिन प्रमाण प्रत्येक आठवड्याच्या तिच्या नगदी सुरक्षित राशीच्या उपरोल्लेखित प्रमाणाच्या ५० टक्के एवढे असावे.

वरील मजकुरात आम्ही हे स्पष्ट केलेले आहे की प्रत्येक बँकचे केंद्रीय बँकेत खाते असेल. बँकेच्या राखीव रकमेचा निम्मा भाग हा तिच्या याच खात्यात जमा असेल. या अनिवार्य राखीव रकमेव्यतिरिक्त आपल्या खात्यात अतिरिक्त रक्कम ठेवण्याचे बँकेस

पूर्ण स्वातंत्र्य असेल. ही अतिरिक्त रक्कम कोणत्याही प्रसंगी परत काढून घेण्याचे बँकेस स्वातंत्र्य असेल. तसेच ती धनादेशाच्या (Cheque) माध्यमाने इतर बँकेत टाकण्याचासुद्धा अधिकार बँकेस असेल. आठवडाभरातील दररोजचे सरासरी प्रमाण नियमापेक्षा कमी असल्यास मात्र या बँकेने ठेवलेल्या अनिवार्य-राखीव रकमेचा वापर मुळीच करता येणार नाही. कोणत्याही बँकेस तिची राखीव रक्कम केवळ आपला व्यवसाय बंद करून आपल्या वित्तीय जवाबदाऱ्यांतून मुक्त झाल्यावरच परत मिळेल.

या नियमानुसार बँकांमध्ये असलेल्या नगदी राशीमध्ये त्यांच्या खात्यांच्या प्रमाणातील केवळ पाच टक्के नगदी स्वरुपात असणे पुरेसे आहे. आपण असे गृहीत धरुया की, सामान्य परिस्थितीत बँकेत दररोज जमा होणाऱ्या नगदी रकमेस मिळून कर्ज आणि बटाई खात्यातून नगदी स्वरुपात परत काढ़ण्यात येणाऱ्या रकमा अदा करण्यासाठी पुरेसे ठरेल. (मागील प्रकरणात आपण असे गृहीत धरले होते की जर बँक आपल्या खात्यांच्या प्रमाणाच्या १० टक्के भाग राखीव ठेवीत असेल तर जनतेच्या नगदीच्या मागण्या पूर्ण करणे शक्य होईल. मात्र यावर या गोष्टीची भर टाकण्यात आली आहे की १० टक्के राखीव रकमेचा ५० टक्के भाग केंद्रीय बँकेत जमा असेल. ही बाब पुढ़ील पानांवर स्पष्ट होणारच आहे. आपल्या ताब्यातील नगदी रकमेव्यतिरिक्त सामान्य बँकांना वेळप्रसंगी केंद्रीय बँकेकडून अतिरिक्त नगदी अर्थसुद्धा प्राप्त होणे शक्य होईल.) सहसा कर्ज खात्यांतूनच रकमा काढण्याचे प्रमाण जास्त असेल आणि बँकेत याची पूर्वसूचनासुद्धा मिळणार. या पूर्वसूचनेनंतर गरजेनुसार नवीन नगदी राशी प्राप्त करण्यासाठी आवश्यक प्रयत्न करण्यात येतील. बटाई खात्यातून जास्त रकमा त्रैमासिक मुदत संपल्यानंतर म्हणजेच निश्चित केलेल्या तारखांवरच काढ़ण्यात येतील. परंतु या तारखांमध्ये बटाई खात्यांमध्ये नवीन रकमांची भर पड़ेल आणि काही व्यावसायिक पक्षांकडून रकमासुद्धा वसूल होतील.

२) प्रत्येक बँकेस हे बंधनकारक असेल की आपल्या कर्ज खात्यातील जमा भांडवलाचा एक ठराविक टक्केवारी भाग कर्ज स्वरुपात देण्यास तयार असावे. आमचा प्रस्ताव असा आहे की हे ठराविक प्रमाण ५० टक्के असावे. या प्रमाणासाठी आपण यापुढ़े 'कर्ज-प्रमाण' (Lending Ratio) असे संबोधन वापरुया.

याची गरज नाही की, प्रत्येक वेळी बँकेने आपल्या कर्जखात्याच्या निम्म्या प्रमाणात अथवा या प्रमाणापेक्षा कमी वा जास्त कर्ज दिलेले असेल. बँकेची तयारी असल्यास ती यापेक्षा जास्तही कर्ज देऊ शकते. मात्र या कर्जांमुळे बँकेस कोणत्याही प्रकारचा नफा होणार नसल्याने अनुमान असेच आहे की कोणतीही बँक या प्रमाणापेक्षा जास्त कर्ज देऊ शकणार नाही. असेही शक्य आहे की कर्जाची मागणी कमी असेल आणि व्यावसायिकवर्ग बटाई तत्त्वावर प्राप्त केलेल्या भांडवलापासून जास्तीतजास्त लाभ घेऊ इच्छित असेल.

या नियमाच्या पूर्ततेसाठीसुद्धा प्रत्येक आठवड़ा कर्जखाते आणि दिलेल्या कर्ज-राशींच्या दररोजच्या सरासरी प्रमाणावर लक्ष ठेवावे लागेल. या नियमानुसार रोजचा जमा-खर्च आणि हिशेब वेगवेगळे ठेवण्याची गरज नाही.

३) सामान्य बँकांना जनतेच्या नगदी मागण्या पूर्ण करण्यासाठी आपल्याजवळील नगदी राशीव्यतिरिक्त आणखीन भांडवलाची गरज भासत असल्यास त्यांना आपल्या दिलेल्या कर्जांचे अथवा हुंडींच्या बदल्यात देण्यात आलेल्या रकमांची प्रमाणपत्रे सादर करून केंद्रीय बँकांकडून कर्ज घेता येईल. ही कर्जे अस्थायी स्वरुपाची असतील आणि बँकेने दिलेल्या कर्जाच्या एका ठराविक टक्केवारीपेक्षा जास्त कर्जाची राशी नसावी. केंद्रीय बँकेकडून मिळणारे कर्ज आणि बँकेतर्फे देण्यात येणाऱ्या कर्जाचे संतुलना (यामध्ये हुंडींच्या मोबदल्यात दिलेल्या रकमासुद्धा आहेत) दरम्यान असलेल्या प्रमाणास आपण यापुढ़े 'कर्जप्रमाण' (Borrowing Ratio) असे संबोधन देऊया. आमचा प्रस्ताव असा आहे की, हे प्रमाण २५ टक्के असावे.

कर्ज-नियमांनुसार बँकेकडून केवळ अशा वेळीच कर्ज मिळेल की जेव्हा जनतेच्या नगदीच्या वाढ़त्या मागणीमुळे बँकांना अतिरिक्त वाढ़ीव नगदी-राशीची गरज पडली असेल. हे कर्ज सुरुवातीस अल्प मुदतीसाठी म्हणजेच एक आठवडा, दोन आठवडे किंवा तीन आठवड्यांपुरते देण्यात येईल. मात्र जर जनतेच्या नगद्दीच्या मागणीत घट होत नसेल तर केंद्रीय बँक या कर्जांची मुदत वाढवून देईल. याचा उद्देश असा की केंद्रीय बँकेकडून घेण्यात आलेली राशी बँकेने विस्तारासाठी न वापरता नगदीची मागणी वाढ़ल्यामुळे येणाऱ्या बिकट परिस्थितीचा सामना करण्यासाठीच वापरावी. अर्थातच याचे स्वरुप स्थायी नसते. जर जनतेच्या नगदीच्या मागणीत सतत वाढ़ होत असेल तर या परिस्थितीत केंद्रीय बँकेतर्फे बँकिंग व्यवस्थेस स्थायी स्वरुपात नगदी राशीचा पुरवठा करून ही समस्या सोडविण्यात येईल. याकरिता केंद्रीय बँक रोखे खरेदी करण्याचा प्रयत्न करील. याचा तपशील आपण पुढ़ील पानांवर पाहूया.

४) देण्यात येणारे कर्ज आणि व्यावसायिक हुंडींच्या बदल्यात देण्यात येणाऱ्या रकमांच्या विविध प्रकारांवर कर्जांचे प्रमाण ठरविण्याचे केंद्रीय बँकेस अधिकार आणि स्वातंत्र्य असेल. उदाहरणार्थ, कृषी-व्यावसायिकांना जी कर्जे देण्यात आलेली असतील, त्यांच्या एकूण राशीच्या ४० टक्के प्रमाणात कर्ज देण्याचे आश्वासन देण्यात येईल आणि एखाद्या विशिष्ट उद्योगास देण्यात येणाऱ्या कर्जांवर केवळ १० टक्के कर्ज देण्याचे जाहीर करण्यात यावे. कापूस-व्यवसायाबाबतींत हुंडींवर ३० टक्के कर्ज देण्याचे आश्वासन देण्यात येईल. याव्यतिरिक्त अन्न-धान्य व्यवसायाबाबतींत हुंडींवर कर्जाचे प्रमाण २० टक्के ठरविण्यात यावे, वगैरे याचे वर्णन पुढे येईलच. अर्थधोरणात भांडवलनिर्मितीच्या मार्गांना प्रभावित करण्यासाठी आणि व्यवसायाच्या विशेष-वतुळांत पतपुरवठ्यावर अंकुश ठेवण्यासाठी या नियमाचा केंद्रीय बँक वापर करील.

५) केंद्रीय बँकेस व्यावसायिक रोखे (Business Shares) खरेदी करण्याचे अधिकार असतील. पुढील पानांवर याचे सविस्तर स्पष्टीकरण देण्यात येईल की, या नियम आणि कायद्यांचा केंद्रीय बँकेतर्फे कशा प्रकारे सामान्य बँकेच्या व्यावसायिक आणि वित्तपुरवठ्यावर अंकुश ठेवण्यासाठी वापर करण्यात येईल. नगदी सुरक्षित प्रमाणात योग्य बदल घडवून सामान्य बँकेच्या वित्तनिर्मितीची क्षमता यथायोग्य ठेवण्याचा प्रयत्न केंद्रीय बँक करील, तसेच त्यांच्या नगदी राशीस प्रभावित करून वित्ताच्या एकूण पुरवठ्यामध्ये आवश्यकतेनुसार वृद्धी अथवा घटसुद्धा करील. कर्जप्रमाणात परिवर्तनाच्या सहाय्याने केंद्रीय बँक जनतेच्या सतत बदलणाऱ्या नगदीच्या मागणीनुसार सामान्य बँकांच्या नगदीच्या गरजांच्या पूर्ततांच्या सहाय्याने ही गोष्ट शक्यप्राय करील की ते प्रत्येक प्रसंगी आपल्या खातेदारांच्या नगदीच्या मागण्या पूर्ण व्हाव्यात.

असामान्य परिस्थितीत किंवा परिवर्तनात वित्तविस्तार थांबविण्यासाठी अथवा त्यामध्ये घट घडवून आणण्यासाठी उपयोगात आणता येईल. विभिन्न प्रकारच्या हुंडी आणि व्यवसायाच्या विभिन्न क्षेत्रांसाठी देण्यात आलेल्या कर्जांचे विभिन्न प्रमाण ठरविण्याचा हेतु हा विशेष उद्योगांसाठी कर्जाच्या पुरवठ्यामध्ये वाढ अथवा घट करणे असेल. या पद्धतीचा बटाई तत्त्वावर भांडवल पुरविण्याच्या बाबतीत महत्त्वपूर्ण आणि प्रमाणापेक्षा कमी महत्त्व असलेल्या उद्योगांच्या ओळखीनुसार अर्थकारणात भांडवलनिर्मितीस अनुकूल परिस्थितीकडे घेऊन जाण्यासाठी वापर करण्यात येईल. असामान्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी वित्तपुरवठ्यामध्ये वृद्धी किंवा घट घडवून आणण्याचे कार्य प्रभावीपणे चालण्यासाठी केंद्रीय बँक व्यावसायिक रोख्यांच्या खरेदी-विक्रीस बँकांना नवीन नगदी राशी पुरविण्याचे अथवा परत घेण्याचे माध्यम बनवील. त्याचप्रमाणे एका प्रगत अर्थनीतीमध्ये वित्ताच्या वाढत्या मागणीस समोर ठेवून वित्तपुरवठ्यामध्ये सतत वृद्धी करण्यासाठी बँकांच्या नगदी राशींमध्ये सतत वृद्धी करण्यात यावी. कर्ज प्रमाणात परिवर्तनाचा हेतु हा व्यवसायासाठी दीर्घ आणि अल्प मुदतीच्या भांडवलांदरम्यान संतुलन कायम ठेवणे होय. निम्नलिखित उदाहरणांवरून याचे स्पष्टीकरण होईल.

येथे या गोष्टीचा उल्लेख आवश्यक आहे की वरील मजकुरात आपण नगदी सुरक्षित राशी, कर्ज आणि कर्जमागणीचे जे प्रमाण निश्चित केलेले आहेत ते केवळ उदाहरणास्तव आहेत. हे प्रमाण दिलेल्या उदाहरणांपेक्षा भिन्नही असू शकतात. योग्य प्रमाणांचे निश्चितीकरण हे व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेची स्थापना आणि प्रयोगानंतरच शक्य होईल.

यापूर्वी आपण वित्ताच्या पुरवठ्यात घट अथवा वृद्धी करण्यासाठी राखीव, कर्जमागणी आणि भाग (Shares) खरेदी-विक्रीच्या साधनांच्या वापरावर व त्यांच्या

प्रभावांवर लक्ष देऊन निरीक्षण करुया. वास्तविकतांचा उल्लेख करणे आवश्यक वाटते की वस्तुत: वित्ताच्या पुरवठ्यामध्ये वृद्धीचे प्रयत्न प्रभावी ठरणे हे एवढे विश्वासपूर्ण वाटत नाही की जेवढे यामध्ये घट करण्याचे प्रयत्न प्रभावी सिद्ध होतात. ही गोष्ट प्रचलित व्याजव्यवहारात ज्याप्रमाणे आढळून येते त्याचप्रमाणे व्याजमुक्त व्यवहार व्यवस्थेतसुद्धा आढळून येते. कारण याची भीस्त व्याजावर नसून इतर बाबींवर आहे. केंद्रीय बँकेच्या विस्तारीकरणाच्या प्रयत्नांमुळे सामान्य बँकांमध्ये वित्तनिर्मिती शक्य होईल. परंतु यासाठी हेसुद्धा आवश्यक आहे की व्यावसायिक पक्षांकडून भांडवलाची मागणीसुद्धा असावी. अन्यथा विस्तारीकरणाचे प्रयत्न यशस्वी ठरणार नाहीत. या उलट यामध्ये घट करण्याचे प्रयत्न झाल्यास बँकेस व्यावसायिक पक्षांकडून भांडवल परत घ्यावे लागेल आणि अशा तऱ्हेने वित्ताच्या एकूण पुरवठ्यामध्ये घट करणे शक्य होईल. परंतु जास्त काळापर्यंत असे प्रयत्न करणे शक्य ठरणार नाही. चलनवाढ (Inflation) थांबविण्यासाठी वित्त पुरवठ्यामध्ये घट करणे जास्त सोपे आणि सोईस्कर आहे. याच्या तुलनेत मात्र वित्तामध्ये घट (Deflation) संपविण्यासाठी वित्तपुरवठ्यामध्ये वाढ करणे खूप कठीण आहे. यापेक्षाही जास्त असे की या दोन्ही उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी वित्तांविषयी प्रयत्न (Monetary Measures) यशस्वी होण्याचीसुद्धा एक मर्यादा आहे. या प्रयत्नांबरोबरच सामान्य संपत्तीविषयी प्रयत्न करणे (Fiscal Measures) सुद्धा आवश्यक आहे.

बँक-वित्ताची निर्मिती आणि संपुष्टता म्हणजेच 'पत' (Credit) चा विस्तार आणि घट होणे हे बँकेच्या नगदी राशींच्या वृद्धी व घट होण्यावर अवलंबून आहे. कारण बँक नेहमी आपले खाते आणि आपल्या हवाल्यांमधील राशीदरम्यान एक विशेष प्रमाण कायम ठेवण्यासाठी प्रयत्नशील असते. म्हणून ज्या वेळी बँकेस नवीन रोकड़ प्राप्त होते, त्या वेळी हे प्रमाण कायम ठेवण्यासाठी खात्यांच्या संख्येत वाढ करण्याचे प्रयत्न करण्यात येतात. तसेच जेव्हा त्यांच्या जवळील रोकड ही आवश्यक प्रमाणापेक्षा कमी होते, तेव्हा हे प्रमाण कायम ठेवण्यासाठी खात्यांच्या संख्येत घट करण्याचे प्रयत्न करण्यात येतात. याविषयी मागील प्रकरणात विस्तारपूर्ण स्पष्टीकरण देण्यात आले आहे. या ठिकाणी एवढ़ेच स्पष्टीकरण पुरेसे आहे की, केंद्रीय बँकेस असे वाटत असेल की, सामान्य बँकांच्या खात्यांमध्ये वृद्धी व्हावी, तर याकरिता असे प्रयत्न करण्यात यावेत की बँकांमध्ये प्रमाणापेक्षा जास्त नगदी रोकड़ असावी. या उलट खात्यांच्या संख्येत घट करावयाची असल्यास बँकांचे प्रमाण कायम ठेवण्यासाठी आणखीन वाढ़ीव नगदीची गरज किंवा चणचण निर्माण व्हावी. राखीव, कर्जमागणी आणि रोख्यांच्या बाबतींत या प्रयत्नांच्या स्वरुपांचे स्पष्टीकरण खाली देत आहोत.

१) नगदी सुरक्षित राशीच्या प्रमाणात बदल

आधुनिक बँकिंग व्यवस्थेच्या इतिहासावरून हे सिद्ध होते की प्रारंभीच्या काळात राखीव राशीच्या नियमाचा हेतु आणि उद्देश केवळ एवढ़ाच होता की खातेदारांच्या हिताचे रक्षण आणि जोपासना करण्यासाठी बँकांमध्ये नगदीचे प्रमाण कायम ठेवण्यात यावे. परंतु आधुनिक काळात हा उद्देश इथपर्यंतच मर्यादित नसून तो असा आहे की, या नियमामुळे केंद्रीय बँक सामान्य बँकांच्या व्यवसाय आणि वित्त पुरवठ्यांवर अंकुश ठेवणे शक्य व्हावे आणि या नियमांच्या अशाच स्वरुपांमुळे वस्तुत: महत्त्व प्राप्त आहे. त्यामुळे हे नियम तयार करताना ही गोष्ट दृष्टीसमोर ठेवण्यात येते की, या नियमांना केंद्रीय बँकेच्या आर्थिक धोरणाचे साधन बनविण्यात यावे.

कोणत्याही देशातील सामान्य बँका अगर विभिन्न भागांतील बँकांसाठी केंद्रीय बँक राखीव राशीचे कोणते व किती प्रमाण निश्चित करते, या विषयावर येथे विस्तारित चर्चा करण्याची गरज नाही. उपरोल्लेखित सुधारणेव्यतिरिक्त या निश्चितीकरणाचा आधार हा जनतेचे स्वत:चे भांडवल नगदी स्वरुपात आपल्याजवळ ठेवण्याची आणि बँकेत जमा ठेवण्याची सवय होय. या सवयीमुळे अल्पावधित एखादे लक्षणीय परिवर्तन होत नाही. त्यामुळे महत्त्वाचा आणि वास्तविक प्रश्न हा सुरुवातीपासूनच ठराविक आणि नगदी राशीतील प्रमाण कायम ठेवण्याचा आहे. या परिवर्तनामुळे केंद्रीय बँकेस सामान्य बँकांच्या नगदी राशीवर प्रभाव पाडून वित्तपुरवठ्यात वृद्धी आणि घट करणे शक्य होते.

केंद्रीय बँकेस 'पत' (Credit) मध्ये घट करावयाची असेल तर ते नगदी सुरक्षित राशीच्या प्रमाणात वृद्धी घडवून आणणार. या वृद्धीच्या परिणामस्वरुपी सामान्य बँकांनाही आपल्या नगदी राशीमध्ये वृद्धी करण्याची गरज भासेल.[१] कारखान्याचे योग्य व्यवस्थापन करण्यात शासनाचा सहभाग आणि जवाबदारी जास्त असल्याने इतर भागीदारांच्या तुलनेत शासनास जास्त प्रमाणात नफा मिळणे योग्य ठरेल. नुकसान झाल्यास मात्र या नुकसानीचे प्रमाण नेहमीच भांडवलपुरवठा करणाऱ्यांवर भांडवलाच्या प्रमाणात जवाबदारी टाकण्यात येईल.

---

१. या ठिकाणी असे गृहीत धरण्यात येत आहे की बँकांमध्ये अतिरिक्त रक्कम नसून रोख सुरक्षित राशीसुद्धा ठराविक प्रमाणाच्या आत आहे. भांडवल वृद्धीच्या प्रसंगी या राशीमध्ये घट करण्याचे प्रयत्न करण्यात येत असल्याने याचीच संभावना जास्त असेल की भांडवलाच्या वाढत्या मागणीचा लाभ घेऊन बँकांनी जास्तीतजास्त भांडवल बटाई आणि कर्जांच्या स्वरुपात पुरविले असल्याने आता मात्र अतिरिक्त अर्थसाठा त्यांच्याकडे उपलब्ध नसेल. एवढे असूनही या गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक आहे की बँकांजवळ अतिरिक्त नगदी राशी उपलब्ध असल्यास त्यांच्या नगदी सुरक्षित राशींच्या ठराविक प्रमाणात वृद्धी होऊनसुद्धा नवीन नगदीची त्यांना गरज भासू नये आणि व्यावसायिकवर्गाकडून भांडवल परत घेण्याची गरज पडू नये. वस्तुत: ही संभावना खूप कमी आहे तसेच केंद्रीय बँक नगदी सुरक्षित राशीच्या प्रमाणात एवढी जास्त वृद्धी करू शकते की त्यांनी भांडवल परत मागण्यासाठी विवश व्हावे.

उपरोल्लोखित उदाहरणावरून असे स्पष्ट होते की शासकीय भागीदारी रोख्याची संख्या आणि मुदत ठरविण्याबरोबरच सर्व भागीदारांना मिळणाऱ्या नफ्याचे आणि होणाऱ्या नुकसानीचे प्रमाण निश्चित करणे आवश्यक ठरते. रोख्यांवर या गोष्टीचीसुद्धा नोंद असेल की भागीदाराची आर्थिक जवाबदारी मर्यादित स्वरुपाची आहे अथवा अमर्याद आहे. जर एखाद्या विशिष्ट उद्योगासाठी रोखे जारी करण्यात आल्यास याचीसुद्धा नोंद ठेवणे आवश्यक ठरेल. बटाईच्या शासकीय रोख्यांप्रमाणेच भागीदारी रोख्यांचा नफा दरवर्षी वाटप करण्यात येईल. तसेच मुदत पूर्ण होताच रोखे भांडवल चालू वर्षाच्या हिशेबानुसार वृद्धी वा न्यूनतेसह परत करण्यात यावे.

प्रत्येक रोख्याचे प्रमाणपत्र हे मुळात एका सामायिक व्यवसायात एका अंशाच्या मालकीचे प्रमाणपत्र असल्याकारणाने यांची खुल्या बाजारात खरेदी-विक्री करता येईल. याची विक्री ही सामायिक मिळकतीच्या एका भागाची वा एका अंशाची विक्री करण्यासम असेल. प्रत्येक रोखेधारकास अर्थात भागीदारास आपल्या आंशिक भागीदारीचा मालकी अधिकार वाटेल त्या वेळेस इतर पक्षास विक्री करण्याचा पूर्ण अधिकार असेल. नफावाटणी अथवा व्यवस्थापन मंडळाच्या निवडणुकीत भाग घेण्याचा अधिकार नफा वाटपाच्या आणि निवडणुकीच्या वेळी रोख्यांचे मालक असलेल्या भागीदारांनाच असेल. एखाद्या भागीदारी रोख्याचा मालकी अधिकार ज्या वेळी इतर पक्षास विकण्यात येईल, त्या वेळी याची पूर्ण माहिती शासनास अथवा शासनाच्या नेमलेल्या संबंधित अधिकाऱ्यास देऊन त्याची नियमानुसार नोंद करणे आवश्यक ठरेल.

शासकीय भागीदारी रोखे (Shares) खरेदी-विक्रीमध्ये पक्ष आणि संस्थांवर रोखे प्रमाणपत्रांवरील नियम बंधनकारक नसतील. उदाहरणार्थ, एक लाख रुपये किंमत असलेल्या भागीदार रोख्याची खरेदी-विक्री त्याच्या मूळ किंमतीपेक्षा जास्त वा कमी भावातसुद्धा करता येते. ज्याप्रमाणे व्यवहारात एखाद्या माणसाला आपला कारखाना पाहिजे तेव्हा आणि पाहिजे त्या किंमतीत विक्री करण्याचा व त्याचा हा कारखाना इतर पक्षास रीतसर सौदा करून खरेदी करण्याचा अधिकार असतो, नेमक्या याचप्रमाणे प्रत्येक भागीदारास कारखान्याचा त्याच्या वाट्यास आलेला मालकीअधिकार विकण्याचा व कोणत्याही पक्षास त्याचा मालकीअधिकार खरेदी करण्याचा रीतसर अधिकार आहे.

बाजारात शासकीय भागीदारी रोख्यांचे दर त्यावर मिळणाऱ्या नफ्याच्या प्रमाणावर ठरतील. संभावित नफ्याचे दर जास्त असल्यास रोख्यांच्या दरात वाढ होईल, तसेच नफ्याचे दर कमी असल्यास रोख्यांचे दरसुद्धा कमी होतील. याशिवाय या कारखान्यात निर्माण होणाऱ्या उत्पादनाची किंमत आणि मागणीवरसुद्धा रोखेविक्रीचा दर अवलंबून असेल. उत्पादनक्षमतेत घट झाल्यास अथवा बाजारातील उत्पादनाची मागणी कमी झाल्यास अथवा कारखान्यात नफा होण्याऐवजी नुकसान होण्याचे चिन्ह दिसत असल्यास भागीदारी रोख्यांचे भाव त्यांच्या मूळ किंमतीपेक्षाही कमी होतील. नफ़ावाटणीची वेळ

जवळ आल्यास रोख्यांच्या दरांत चढ़-उतार होणे आणि वर्षाच्या इतर काळात रोख्यांचे दर स्थिर असणे, ही एक नैसर्गिक व आपोआप घड़णारी प्रक्रिया होय. या भागीदारी रोख्यांची बाजारातील अवस्था ही वर्तमानकाळातील व्यापारी कंपन्यांच्या सामान्य अवस्थेसम असेल. एवढ़े मात्र नक्की की शासनाची उच्च प्रतिष्ठा आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना नफादायक स्वरुपात चालविण्याचे शासनाचे धोरण (या विषयावर आपण 'शासकीय बटाई रोखे' शीर्षकाखाली सविस्तर चर्चा केलेली आहे) पाहता या रोख्यांचे बाजारातील दर स्थिर राहण्याची जास्त हमी व शाश्वती असेल.

येथे असा विचार मांडण्यात येतो की या रोख्यांच्या बाज़ारात सट्टा व ज़ुगाराची मानसिकता फोफावू शकते. कारण त्यांचा बाजारभाव बऱ्याच प्रमाणात नफा व तोट्याच्या केवळ अनुमानावर अवलंबून असतो. या महत्त्वपूर्ण विषयावर या ठिकाणी सविस्तर चर्चा करणे शक्य नाही. संक्षिप्तपणे एवढ़े सांगता येईल की इतर संपत्ती व वस्तुप्रमाणेच खरेदी-विक्री नफा-नुकसानीच्या संभावनांच्या आधारावर ठरविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असावे. परंतु अशा समस्यांचे निराकरण व निर्मूलन करणे आवश्यक आहे. रोख्यांच्या दरांमध्ये कृत्रिम चढ़-उतार निर्माण करुन नफा मिळविण्याच्या अपराधास अवश्य पायबंद घालण्यात यावा. मागील प्रकरणात आम्ही या गोष्टीकडे आपले लक्ष वेधलेले आहे. केंद्रीय बँकसुद्धा रोख्यांच्या भावांना चढ़-उताराच्या बिकट परिस्थितीपासून सुरक्षित ठेवण्याचे पूर्ण प्रयत्न करील.

शासनाची प्रतिष्ठा, शासकीय भागीदारी रोख्यांची लाभदायकता आणि त्यांची बाजारात असलेल्या सततच्या मागणीमुळे नफा मिळविण्याच्या गरजेपोटी बँका, सर्वसामान्य लोक आणि व्यावसायिक संस्था यात आपले भांडवल जास्तीतजास्त प्रमाणात लावण्याचा प्रयत्न करतील. बचत करणाऱ्या ज्या बँका अल्पावधीसाठी आपली भांडवलगुंतवणूक करण्यासाठी इच्छुक असतील, त्यांच्यासाठी ही पद्धत खूप फायदेशीर ठरेल. कारण रोखे खरेदी केल्यावर परत विकताना मूळ किंमतीपेक्षा जास्त दरात विकण्यात येतील. यामध्ये मुळात नुकसान होण्याची संभावना नसणार. जर एखाद्या रोखेधारकास आपले रोखे बाजारभावानुसार विकण्याची इच्छा नसेल तर, त्याच्यासाठी मुदत पूर्ण झाल्यावर रोखे परत करून आपले भांडवल नफ्यासकट परत घेण्याचा मार्ग मोकळा असेल. आम्हाला असे वाटते की या रोखेधारकांना वस्तुत: नुकसान होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही. याच कारणास्तव शासकीय भागीदारी रोख्यांना वारेमाप मागणी निर्माण होईल. आज बऱ्याच व्यावसायिक आणि व्यापारी संस्थांनी याच पद्धतीचा अवलंब करून आपले अंतिम उद्दिष्ट साधण्यात यश संपादन केले आहे. म्हणून इस्लामी शासनानेच दिलेल्या या प्रणालीत इस्लामी शासनास यश निश्चितच मिळेल.

आम्ही हेसुद्धा निश्चित करु की, शासकीय भागीदारी रोख्यांची भांडवल राशी आणि मुदत सामान्यतः शासकीय बटाई रोख्यांच्या भांडवलराशी आणि मुदतीपेक्षा

जास्त ठेवण्यात यावी. शासकीय बटाई पद्धत लघू बचतकारांसाठी सोप्या आणि साधारण नियमांवर आधारित बनविण्यात यावी आणि शासकीय भागीदारीरोख्यांना बटाईच्या तुलनेत दीर्घ मुदतींवर आधारित मोठे भांडवल मिळविण्यात उपयोगी आणण्यात यावे. नफ्याच्या वाटणीचे नियम असे तयार करण्यात यावे की, नफा होण्याच्या परिस्थितीत भागीदारी रोखे खरेदी करणाऱ्यांना बटाई रोख्यांपेक्षा जास्त प्रमाणात नफा मिळावा. उदाहरणार्थ, जर बटाईवर ५० टक्के नफा देण्यात येत असेल तर भागीदारी रोख्यांवरील व्यवसायाचा नफा ७५ टक्के निश्चित करण्यात यावा. परंतु भागीदारीचे भांडवल हे जास्त लाभदायक आणि नुकसानीची संभावना असलेल्या उद्योगधंदे आणि व्यावसायिक संस्थांमध्ये गुंतविण्यात यावे. अशा रितीने योग्य व्यवस्थापन केल्यास याचा असा फायदा होईल की बाजारात विभिन्न प्रकारचे रोखे उपलब्ध होतील आणि लघूबचतकार, बँका, सामान्य संस्था आणि मोठमोठ्या भांडवलदारांना त्यांना हवे तशा प्रकारचे योग्य रोखे प्राप्त करण्याची संधी मिळेल.

वरील मजकुरात चर्चा केल्याप्रमाणे 'बटाई रोखे' आणि भागीदारी रोख्यांदरम्यान मौलिक स्वरुपाचे चार फरक आढळतात. ते खालील आराखड्यावर आपल्या आकलन सोयीसाठी मांडत आहोत.

भागीदारी रोखे	बटाई रोखे
१) रोखे खरेदीदारांना संबंधित उद्योग चालू ठेवण्यासाठी स्वत: निवडून दिलेले प्रतिनिधी कामकाज सांभाळतील.	रोखे खरेदीदारांना ही संधी उपलब्ध नसेल.
२) पाहिजे तेव्हा रोखे विक्री करण्याचे अधिकार असतील.	रोखे खरेदीदारांना आपले भांडवल परत घेण्यासाठी रोख्यांची मुदत पूर्ण होण्याची वाट पाहावी लागेल.
३) रोखे खरेदीदारांना व्यवसायातील नफ्यात बटाईच्या तुलनेत जास्त नफा मिळेल.	रोखे खरेदीदारांना भागीदारी व्यवसायाच्या तुलनेत कमी नफा मिळेल.
४) मोठ्या रकमांचे (महाग) आणि दीर्घ मुदतींचे रोखे जारी करण्यात आलेले असतील.	छोट्या रकमांवर आणि अल्प मुदतींवरसुद्धा रोखे उपलब्ध असतील.

अनुभवातून जर हे चार फरक योग्य वाटत नसल्यास लघू रकमांवर आणि अल्प मुदतींसाठीसुद्धा भागीदारी रोख उपलब्ध करून देण्यात काहीच गैर नाही.

मागील प्रकरणामध्ये केंद्रीय बँकेतर्फे ज्या शासकीय रोख्यांच्या खरेदी-विक्रीचा उल्लेख करण्यात आलेला आहे, मुळात त्यांचे स्वरुपसुद्धा भागीदारी रोख्यांचेच आहे. केंद्रीय बँक 'शासकीय बटाई' चे रोखेसुद्धा खरेदी करू शकते, परंतु नवीन रोख राशी प्राप्त करण्यासाठी रोखे (Shares) विक्री आणि व्यावसायिकवर्गास पुरविलेल्या भांडवलाचा एक भाग परत घेण्याकरिता ते विवश असतील. कारण अशा परिस्थितीमध्ये त्यांना केंद्रीय बँकेकडून कर्जप्राप्ती शक्य होणार नाही. भाग (Shares) विक्री आणि व्यावसायिकवर्गाकडून भांडवल परत घेण्याच्या परिणामस्वरुपी त्यांच्या खात्यांच्या संख्येत घट होईल आणि 'पत' (Credit) मध्येसुद्धा सतत घट होत राहील.

जर केंद्रीय बँक अर्थ व्यवहारात 'पत' (Credit) मध्ये वृद्धी आणि विकास इच्छित असेल तर यासाठी त्यास नगदी सुरक्षित राशीमध्ये घट करील. याच्या परिणामस्वरुपी बँकांमध्ये असलेल्या जमाराशींव्यतिरिक्त राशी उपलब्ध होईल आणि तिच्या साह्याने अथवा त्यास भांडवल बनवून भाग (Shares) खरेदी अथवा व्यावसायिकांना बटाई तत्त्वावर भांडवलपुरवठा करण्याचा प्रयत्न करील.[१] व्यावसायिकांना भांडवल पुरवठ्याच्या वृद्धीच्या परिणामस्वरुपी बँकांच्या खात्यांत भांडवल जमा करण्याचे प्रमाण वाढेल आणि 'पत' (Credit) मध्ये सतत विस्तार होत राहणार.

याचा थोडक्यात तपशील खाली सांख्यिकी उदाहरणांवरून देण्यात येत आहे. पहिल्या उदाहरणांवरून 'पत' (Credit) मध्ये घट करण्याची प्रक्रिया स्पष्ट करण्यात येत आहे. गृहीत धरा, चिंतनाच्या सुरुवातीस नगदी सुरक्षित राशीचे प्रमाण १० टक्के होते.

---

१. येथे असे गृहीत धरण्यात येत आहे की व्यावसायिकांत भांडवल मागणीची प्रवृत्ती आहे. परंतु तोट्याच्या संभावनेमुळे ही मागणी लोप पावत असल्यास बँका अतिरिक्त नगदी राशींचा लाभदायक वापर करू शकणार नाहीत. या ठिकाणी याकडे इशारा करणे योग्य ठरेल की व्याजावर आधारित अर्थव्यवस्थेत बँकेकडून कर्जांची मागणी ही केवळ अशा परीस्थितीपर्यंतच होत राहते की जोपर्यंत भांडवलाच्या साह्याने मिळणाऱ्या नफ्याचा दर ठराविक व्याज दरापेक्षा जास्त असेल. व्याजमुक्त व्यवस्थेत बँक ठराविक व्याजदराऐवजी व्यावसायिक पक्षाच्या नफ्यामध्ये भागीदार असेल. मग हा नफा कमी असो वा जास्त असो. याचा अर्थ असा झाला की, बँकेकडून बटाई तत्त्वावर भांडवल मिळविण्याची इच्छा त्या वेळेपर्यंत कायम असेल की जोपर्यंत भांडवल वापराच्या परिणामस्वरुपी संभावित नफ्याचा दर शून्यापेक्षा जास्त असेल अथवा शून्यापर्यंत पोहोचत नाही. राहिला प्रश्न कर्ज भांडवलाचा, तर यासाठी व्याजमुक्त अर्थ व्यवस्थेत बटाईची व्यवस्था आहेच.

परंतु केंद्रीय बँकेने आता यामध्ये वाढ करून हे प्रमाण ११ टक्के एवढे केले. भागच्या पद्धतीप्रमाणेच अजूनही या राखीव भागाचा निम्मा भाग केंद्रीय बँकेकडे जमा करणे आवश्यक आहे. परंतु खालील आराखड्यात याचे स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. तसेच संपूर्ण राखीव राशी नगदी सुरक्षित राशीच्या स्तंभात भांडण्यात आली आहे. आम्ही सादर केलेल्या उदाहरणावर या गोष्टीमुळे काही फरक पडत नाही की बँकेतील राखीव राशीचा किती भाग कोणत्या खात्यात आहे.

ज्या वेळी हे प्रमाण १० टक्के होते, तेव्हा बँकांच्या एकूण हिशेबांचा आराखड़ा हा पंहिल्या वाक्यात मांडण्यात आलेला होता. नगदी सुरक्षितचे प्रमाण वाढवून ११ टक्के केल्यानंतर 'पत' (Credit) मध्ये घट करण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर एकूण हिशोबांचा आराखड़ा हा दुसऱ्या वाक्यात मांडण्यात आलेला आहे.[१]

जबाबदाऱ्या (Liabilities)		भांडवल (Assets)			वित्ताचा एकूण पुरवठा
कर्ज खाते	बटाई खाते	नगदी सुरक्षित	कर्ज	बटाई	(Money supply)
60,000	40,000	10,000	30,000	60,000	1,00,000
54,000	36,000	10,000	27,000	53,000	90,000

पहिल्या वाक्यावरून जी परिस्थिती स्पष्ट होते, तिच्या दुसऱ्या ओळीत या परिस्थितीतील परिवर्तनाचे कारण असे की, नगदी सुरक्षित राशीच्या प्रमाणात वृद्धी झाल्याने बँकांनी आपल्या नगदी जमाराशीत एक हजाराची वाढ आवश्यक समजून कर्ज आणि बटाईवर पुरविलेल्या भांडवलातून एक हजार परत घेतले. याची विभिन्न स्वरुपे असून या संपूर्ण स्वरुपांच्या पद्धती एकत्रितरित्या वापरता येतील. उदाहरणार्थ, काही रोख्यांची विक्री, निश्चित मुदतींसाठी देण्यात आलेल्या कर्जांच्या परतीची मागणी, मुदत पूर्ण झालेल्या कर्जांचे नूतनीकरण न करणे आणि बटाई तत्त्वांवर देण्यात आलेले भांडवल मुदतपूर्व काळात परत काढून घेणे वगैरे ज्या वेळी बँक एक हजार परत घेईल, त्या वेळी याच बँकेच्या खात्यामध्येसुद्धा एका हजाराची घट होणारच. दुसऱ्या शब्दांत असे की जे एक हजार परत मिळतील ते याच बँकेतून काढून देण्यात येतील आणि वस्तुतः त्यांच्या नगदी राशीमध्ये कोणतीच वृद्धी होणार नाही. मात्र खात्यांमध्ये एक

१. सोयीसाठी दुसऱ्या ओळीत प्रमाण स्पष्ट करताना हजारापेक्षा कमी असलेल्या रकमा मांडण्यात आल्या नाहीत. हिशोबानुसार वित्ताचा एकूण पुरवठा '९०९०९' एवढ़ा व्हावयास हवा. याचप्रमाणे सर्व प्रमाण वर मांडण्यात आलेल्या प्रमाणांपेक्षा थोड़े जास्त असेल.

हजाराची घट झाल्याने आता त्यांना नगदी सुरक्षिततेची नवीन प्रमाण पूर्ण करण्यासाठी एक हजाराऐवजी केवळ ८०० रुपयेच लागतील. ही २०० रुपयांची घट भरून काढण्यासाठी जेव्हा ते आणखीन भांडवल परत घेतील तेव्हा हीच प्रक्रिया सतत घडत राहणार. मात्र प्रत्येक वेळी बँकांना पहिल्यापेक्षा कमी भांडवल परत घ्यावे लागेल. एक प्रसंग असा येईल की अतिरिक्त भांडवल परत घेण्याची गरज उरणार नाही. कारण त्यांच्या खात्यांत १० हजारांची घट झालेली असणार. तसेच त्यांच्या वर्तमान नगदी जमाराशीत अर्थात १० हजार खात्यांच्या नवीन संतुलनाच्या ११ टक्के होईल. हिशेबांचा विस्तारित आराखड़ा हा दुसऱ्या वाक्यात मांडण्यात आलेला असेल. बँकांच्या हिशेबातील प्रमाण अथवा समतोल कायम होईल आणि नवीन नगदी सुरक्षित राशीचे प्रमाण पूर्ण होत राहील. या संपूर्ण प्रक्रियेचा खुलासा हा आहे की नगंदी सुरक्षित राशीच्या प्रमाणात होत असलेल्या वृद्धीमुळे बँका भांडवल परत घेऊन आणखीन नगदी राशीच्या प्राप्तीचे प्रयत्न करतील, परंतु आणखीन नगदीच्या प्राप्तीऐवजी त्यांच्या खात्यांत एवढ़ी घट होईल की त्यांच्याकड़े सध्या असलेल्या नगदी राशी या नगदी सुरक्षित राशीच्या प्रमाणात येईल.

दुसऱ्या वाक्यातील जवाबदाऱ्यांच्या आराखड्यावरून हे स्पष्ट होते की अद्यापही कर्जखाते व बटाई खात्यांदरम्यान तेच प्रमाण कायम आहे, जे सुरुवातीस होते. याचे कारण हे आम्ही गृहीत धरलेली ही बाब होय की, ज्या वेळी बँकांतून रकमा काढ़ण्यात येतात त्यांचे कर्जखाते आणि बटाई खात्यांच्या तुलनेतील प्रमाण हे अनुक्रमे ६० आणि ४० एवढ़े असते. या ग्राह्य बाबीचे स्पष्टीकरण मागील प्रकरणात करण्यात आलेले आहेच. असे गृहीत धरावे की, बँका भाग (Shares) विक्री करीत आहेत. हे भाग विकत घेणाऱ्यांपैकी काहीजण असे असतील की जे आपल्या कमाईतून बचत करून आपली ही बचत राशी व्यवसायात गुंतवून नफा मिळविण्याचे इच्छुक असतील. तसेच काहीजण हे त्यांना मागील काळात झालेल्या बचती (बँकेतील बटाई खात्यांत असलेल्या बचती) भाग (Shares) खरेदी करण्यासाठी निवेश करतील. अर्थातच हे लोक बटाई खात्यांतील रकमा काढून भाग (Shares) खरेदी करतील. त्याचप्रमाणे जर बँक व्यावसायिकांकडून बटाई तत्त्वावर दिलेले भांडवल आणि कर्ज परत घेत असेल तर यामुळे व्यवसायाच्या सीमा अकुंचन पावतील आणि कमाईमध्ये घट होईल. याचा परिणाम कर्ज खाते आणि बचत म्हणजेच बटाई खात्यावर होईल. याचे स्पष्टीकरण मागील प्रकरणात करण्यात आलेले आहेच. जर दोन्हीं खात्यांच्या दरम्यान असलेल्या प्रमाणाच्या बाबतीत ही ग्राह्य बाब बाजूला ठेवली तरीसुद्धा वित्ताच्या पुरवठ्यात घट होण्याच्या प्रक्रियेवर काहीच परिणाम होणार नाही.

दुसऱ्या ओळीत आधाराच्या रकान्यात नगदी सुरक्षित राशीचे प्रमाणसुद्धा अजूनदेखील एवढ़ेच आहे, जेवढ़े पहिल्या वाक्यात स्पष्ट करण्यात आले होते. याचे कारण वरील मजकुरांत स्पष्ट करण्यात आलेले आहेच. जनतेच्या नगदीच्या मागणीची इच्छा ही, आपण एका परिस्थितीवर कायमची गृहीत धरीत असल्याने आणि बँकेकडून नवीन नगदी राशी प्राप्त होत नसल्याने, तसेच केंद्रीय बँकेने भाग (Shares) विक्रीच्या माध्यमाने सामान्य बँकांच्या नगदी राशीचा एक भाग परत घेतला असल्याने बँकांच्या खात्यांतील जमा राशींमध्ये कोणतीच वाढ़ अथवा घट होणार नाही.

नियमानुसार कर्ज स्वरुपात पुरविलेले भांडवल अद्यापही कर्ज खात्याचा निम्मा भाग आहे. कर्ज भांडवल परत घेण्यासाठी बँकांना या नियमाचे पालन करणे बंधनकारक असेल. तसेच कर्जखात्यांत होणारी घट भरून काढ़ण्यापुरतेच कर्ज परत घेण्याचे अधिकार बँकेस असतील.

बटाई तत्त्वावर पुरविण्यात आलेले भांडवल हे केवळ पूर्वीपेक्षाच कमी नसून या भांडवलातील टक्केवारीची घट कर्ज देण्यात आलेल्या भांडवलातील टक्केवारीत निर्माण होणाऱ्या घटीपेक्षा जास्त आहे. याचे कारण असे आहे की, ज्या अर्थी बँकांना जास्त राखीव रक्कम ठेवायची असेल, त्या अर्थी त्याचा प्रभाव कर्ज खात्याच्या त्या भागावरसुद्धा होणार, जो भाग लाभदायक व्यवसायात वापरण्यात येत असेल. बटाई तत्त्वावर देण्यात आलेले भांडवल हे एकूण भांडवलाच्या ६० टक्के प्रमाणात होते. बाकीच्या ४० टक्के भागापैकी १० टक्के राखीव आणि ३० टक्के कर्ज देण्यासाठी राखीव ठेवण्यात येईल. या पद्धतीनुसार बटाई तत्त्वावर देण्यासाठी केवळ ५९ टक्के भांडवल उपलब्ध असेल. यावरून असा निष्कर्ष निघतो की सुरक्षित नगदी राशीच्या प्रमाणातील वृद्धीच्या परिणामस्वरुपी वित्त पुरवठ्यामध्ये घट होण्याबरोबर बँकांच्या लाभदायक व्यवसायांत अल्प आणि वाढ़ीव या दोन्ही प्रकारची घट होत असते.

आराखड्याच्या दुसऱ्या ओळीत पहिल्या ओळीच्या तुलनेत असे स्पष्ट होते की सुरक्षित नगदी राशीच्या प्रमाणात वृद्धीच्या परिणामस्वरुपी वित्तपुरवठ्यात १० हजारांची घट झालेली आहे. म्हणजेच १० हजाराएवढ़ी बँकवित्त लोप पावले आहे. अर्थातच बँकांच्या खात्यांचे प्रमाण १० हजारांनी कमी झाले.

जर केंद्रीय बँकेने सुरक्षित नगदी राशीच्या प्रमाणात १० टक्के घट वा कमी करून हे प्रमाण नऊ टक्के केले तर 'पत' (Credit) मध्ये विस्तार होईल. ही प्रक्रिया खाली दर्शविण्यात आलेल्या आराखड्यावरून आकलनात येईल. आराखड्याच्या पहिल्या ओळीत बँकांच्या हिशोबांचा तोच आराखड़ा सादर करण्यात आलेला आहे जो १० टक्के प्रमाणातील नगदी सुरक्षित राशीनुसार मागील पानावर सादर करण्यात आलेला

आहे. दुसऱ्या वाक्यावरून हे स्पष्ट करण्यात आले आहे की नगदी सुरक्षित राशीचे प्रमाण नऊ टक्के (९%) केल्यास 'पत' (Credit) च्या टप्पेवारी विस्ताराची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर बँकांच्या हिशोबाचे स्वरुप काय असेल.[१]

जबाबदाऱ्या (Liabilities)		भांडवल साधने (Assets)			वित्ताचा एकूण पुरवठा
कर्ज खाते	बटाई खाते	नगदी सुरक्षित	कर्ज	बटाई	(Money supply)
60,000	40,000	10,000	30,000	60,000	1,00,000
66,000	44,000	10,000	33,000	67,000	1,10,000

पहिल्या परिस्थितीचे दुसऱ्या परिस्थितीत परिवर्तन होण्याची सविस्तर माहिति अशी आहे की नगदी सुरक्षितचे प्रमाण नऊ टक्के झाल्यावर बँकांना स्वत:जवळ १००० नगदी अतिरिक्त राशी उपलब्ध होईल. ही राशी लाभदायक व्यवसायात गुंतविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. जर बटाई तत्त्वावर भांडवल प्राप्त करण्याची मागणी असेल तर या कार्यात यश मिळेल. व्यावसायिकवर्गास भांडवलाच्या पुरवठ्यामध्ये वृद्धी करण्याच्या परिणामस्वरुपी बँकांच्या खात्यात खूप भांडवल जमा होईल. त्यांनी १००० रुपयांचे रोखे (Shares) जरी खरेदी केले तरी हेच घडेल.

बँकांकडून रोख्यांच्या मालकांना अथवा व्यावसायिक पक्षांना जे १००० रुपये प्राप्त होतील, ते शेवटी बँकांच्या खात्यांतच जमा होतील. बँका १००० च्या नवीन खात्याच्या तुलनेत ९० रुपये आपल्या नगदी जमा राशीत जमा करुन ९१० रुपये परत दुसऱ्यांदा उपयोगात आणतील. यामुळे त्यांच्या खात्यात आणखीन वाढ़ होईल. जर भांडवलाची मागणी असेल तर ही प्रक्रिया सतत चालू राहील. मात्र प्रत्येक वेळी बँका पहिल्यापेक्षा कमी भांडवल पुरवितील. अशारितीने एक प्रसंग असा येईल की भांडवल पुरविणेच अशक्य होईल आणि खात्यांत होणारी वाढसुद्धा येथेच थांबेल.

या वेळेपर्यंत बँकांच्या खात्यांत १० हजारांची वाढ़ झालेली असेल. बँकांतील नगदी १० हाजारांची राशी, ही खात्यांत वाढ़ झालेल्या संख्या अर्थात एक लाख १०

---

१. दुसऱ्या ओळीतील राशी संख्या हिशेबानुसार सोयीसाठी कमी संख्येत मांडण्यात आली आहे. उदाहरणार्थ, वित्ताचा एकूण पुरवठा एक लाख, १० हजार, १११' असावयास हवी, परंतु त्याऐवजी 'एक लाख १० हजार' एवढीच मांडण्यात आली आहे. हीच अवस्था इतर रकमाबाबतीत आहे. अशा प्रकारच्या प्रणालीमुळे आराखड्यातील मांडण्यात येणाऱ्या संख्यांचा अभ्यास करणे सोईस्कर ठरते. चर्चेच्या परिणामावर याचा काहीच फरक पड़त नाही.

हजारांच्या नऊ टक्के (९%) एवढी आहे. या संपूर्ण प्रक्रियेचा खुलासा हा आहे की वित्तप्रमाणात घट होण्याच्या परिणामस्वरुपी बँकांनी आपल्या नगदी जमा राशीच्या एका भागास अतिरिक्त ठरवून लाभदायक कार्यांत वापरण्यासाठी व्यावसायिकांना पुरविली. यामुळे त्यांच्या खात्यांत वृद्धी आणि 'पत' (Credit) मध्ये विस्ताराची एक शृंखला सुरु झाली आणि ही शृंखला अतिरिक्त नगदी राशी परत एकदा सुरक्षित राशीत सामील करण्यात आल्यावरच थांबली.

आराखड्याच्या दुसऱ्या वाक्यात कर्ज आणि बटाई खात्यांदरम्यान असलेले प्रमाण हे, पहिल्या वाक्यात स्पष्ट करण्यात आलेल्या प्रमाणाएवढेच आहे. यामुळे आम्ही असे गृहीत धरले की, जेव्हा बँकेत नवीन भांडवल जमा करण्यात येते तेव्हा या दोन्ही खात्यांत '६०:४०' एवढे प्रमाण असते. या प्रमाणाव्यतीरिक्त इतर दुसरे प्रमाण जरी वापरण्यात आले तरी वित्तपुरवठ्यामध्ये विस्तार प्रक्रियेच्या स्वरुपात फरक पडणार नाही. नगदी सुरक्षित राशी अद्यापही १० हजार एवढी आहे. जनतेच्या नगदीच्या मागणीस आपण एका ठराविक परिस्थितीपर्यंत कायम गृहीत धरीत असल्याने आणि बँकांच्या नगदीमध्ये केंद्रीय बँकेच्या एखाद्या प्रयत्नाच्या परिणामस्वरुपी कमी-जास्त होत नसल्यामुळे या संख्येत कोणताच बदल होणार नाही. मात्र आता नगदी सुरक्षित राशी खात्यांतील वृद्धी गतप्रमाणाच्या केवळ नऊ टक्के (९%) एवढीच असेल. कर्जावर देण्यात आलेले भांडवल अद्यापही कर्ज खात्यांच्या ५० टक्के इतकेच आहे. कारण नियमही असाच आहे. बटाई तत्त्वावर देण्यात आलेल्या भांडवलात केवळ वृद्धी झाली नसून यात होणारी टक्केवारीवाढ ही कर्ज भांडवलात होणाऱ्या टक्केवारीवाढीपेक्षा जास्त आहे. नगदी सुरक्षित राशीच्या प्रमाणातील 'घटी'मुळे बँकेस इतरांच्या तुलनेत जास्त भांडवलनिर्मितीच्या व्यावसायिक वापराची संधी प्राप्त होते. परिणामी वित्तपुरवठ्यामध्ये या प्रणालीमुळे बँकाच्या नफ्यात वाढ होते.

दुसऱ्या आणि पहिल्या वाक्याच्या तुलनात्मक निरीक्षणावरून हे स्पष्ट होते की, वित्त पुरवठ्यामध्ये १० हजारांची वाढ झाली आहे. या वृद्धीमुळे १० हजाराच्या संख्येत नवीन वित्तनिर्मिती झाली, अर्थात बँकांच्या खात्यांमध्ये १० हजारांची वाढ झाली.

या चर्चेतून हे सिद्ध होते की, व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेत केंद्रीय बँक 'पत' (Credit) मध्ये वृद्धी अथवा घट करण्यासाठी नगदी सुरक्षित राशीच्या प्रमाणात परिवर्तनाच्या पद्धतीचा अवलंब करील. हे एक प्रभावी साधन होय. याच्या वापरामुळे केंद्रीय बँकेस वित्ताच्या एकूण पुरवठ्यावर अंकुष ठेवणे शक्य होईल.

२) कर्ज देण्याच्या प्रमाणातील बदल

जनता आपल्या कमाईचा अल्पसा भाग नगदी स्वरुपात ठेवून बाकीचा संपूर्ण भाग बँकांमध्ये सुरक्षेस्तव जमा ठेवतात. या दोन्ही भागांच्या दरम्यान असलेल्या प्रमाणाची भिस्त ही एखाद्या देशातील लोकांच्या खर्च व जमा करण्याच्या सवयी, बँकांची कारकिर्द आणि इतर बाबींवर असते. परंतु काहीं अस्थायी आणि किरकोळ बाबींमुळे हे प्रमाण कमी-जास्तसुद्धा होत असते. उत्सव आणि मौज-मजा अथवा समारंभांच्या वेळी किंवा ऋतुमानात परिवर्तनावेळी लोकांना आपल्या वाढ़लेल्या खर्चासाठी जास्त प्रमाणात नगदी पैशांची गरज असते. सुट्टयांमध्ये सहलींवर जाण्यांसाठी तर सामान्य दिवसांपेक्षा खिसा गरम असावा असे त्यांना वाटते. व्यावसायिक संस्थांना पगार वाटपासाठी आणि कामांचे पैसे देण्यासाठी अथवा भत्ते वगैरे देण्यासाठी महिन्याच्या काहीं विशेष तारखांना अतिरिक्त नगदी पैशांची गरज असते. नगदी राशीच्या मागणीतील वृद्धीचा अनुमान भूतकाळातील अनुभव आणि परिस्थितीच्या अभ्यासावरून खूप पूर्वीपासून लावण्यात येऊ शकतो. या विशेष निमित्तांशिवाय कधीकधी देशाच्या राजकीय आणि आर्थिक उलथापालथीच्या संभावनांप्रसंगी जनतेच्या मानसिकतेवर असा प्रभाव पड़तो की त्यांच्या नगदी राशीच्या मागणीत तीव्र वाढ़ होत असते. काही परिस्थितींमध्ये त्यांच्या रोख राशीच्या मागणीत घटसुद्धा होत असते. अशा प्रकारच्या परिस्थितींचा पूर्वानुमान लावणे शक्य नसते. असे प्रसंग नेहमी येत असतात, जेव्हा जनतेला आपल्या वित्ताचा कमी-जास्त भाग नगदी स्वरुपात आपल्याजवळ ठेवण्याची इच्छा असते. या परिस्थितींत अशा मागण्या पूर्ण करण्यासाठी केंद्रीय बँक भाग (Shares) खरेदी-विक्री करीत असते. याविषयी पुढ़ील प्रकरणात सविस्तर चर्चा करण्यात येईल. या ठिकाणी आपण आपले संपूर्ण लक्ष हे जनतेच्या अस्थायी स्वरुपाच्या नगदी मागणीतील वाढ़ होत असल्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीवर केंद्रित करुया. बँकिंग व्यवस्था यशस्वीपूर्ण चालविण्यासाठी आणि या व्यवस्थेवर जनतेचा विश्वास संपादन करण्यासाठी अशा प्रसंगावधानावर त्यांच्या नगदीची मागणी बँकेने पूर्ण करणे आवश्यक आहे.

वरील चर्चेतून स्पष्ट झाल्याप्रमाणे बँकांजवळ जनतेच्या कमाईचा जो भाग जमा असतो, त्याचा केवळ एक अल्पसा भाग अर्थात बँकेच्या भाषेत १० टक्के भाग नगदी स्वरुपात असतो. बाकीचा नव्वद टक्के (९० %) भाग हा बँकांच्या नोंदवहीत (On Register) नोंदणीच्या स्वरुपात असतो. सामान्य परिस्थितींमध्ये बँकांजवळ रोज-रोज

जमा होणारी रोख राशी आणि त्यांच्याकडील नगदी राशी ही यासाठी पुरेशी ठरते की जनता आपल्या खात्यातून ज्या रकमा नगदी स्वरुपात काढू इच्छिते, त्या त्यांना प्रदान करण्यात याव्यात. परंतु ज्या वेळी जनतेच्या रोख मागणीत वृद्धी होण्याच्या कारणास्तव खात्यांतून रकमा काढण्याची गती जास्त आणि खात्यांत पैसा जमा करण्याची गती कमी झाल्यास बँकेसाठी जनतेच्या रोख राशीच्या मागण्या पूर्ण करणे केवळ अशा परिस्थितीतच शक्य होईल जेव्हा त्यांना इतर माध्यमांनी रोख राशी प्राप्त होत असेल.

वरील मजकुरात आम्ही संकेत दिले आहेत की सामान्य बँका नगदी राखीवव्यतिरिक्त आपल्या भांडवलसाधनांचा एक भाग अशा परिस्थितीत ठेवतील जे तात्काळ नगदी स्वरुपात बदलता येईल. उदाहरणार्थ, अशा प्रकारचे कर्ज जे मागणी होताच परत मिळविता यावे अथवा ज्यांची मुदत पूर्ण होत असेल किंवा असे भाग (Shares) जे तोट्यांच्या संभावनांतून मुक्त आणि कोणत्याही वेळी विकणे शक्य असतील. परंतु या भांडवल साधनांच्या माध्यमाने कोणत्याही एका बँकेसाठी तर कदाचित हे शक्य होईल की रोख राशीची गरज पडल्यास रोख राशी प्राप्त करील. परंतु सर्वच बँकांना एकाच वेळी असे करणे मुळीच शक्य नाही. सर्वच बँका दिलेली कर्जे परत घेऊ लागल्यास अथवा भाग (Shares) विक्री करीत असल्यास त्यांच्या खात्यांत निश्चितच घट होईल आणि रोख राशी प्राप्त करण्याच्या प्रयत्नात वित्तराशीमध्ये घट होईल. कारण लोक आपल्या वाढत्या नगदी राशीच्या मागणीस दृष्टीसमोर ठेवून बँकिंग व्यवस्थेस रोख्यांच्या मोबदल्यात नगदी पैसा देण्यास तयार होणार नाही.

सर्वच बँकांना एकूणरित्या अतिरिक्त रोख राशी मिळण्याची शक्यता ही केवळ केंद्रीय बँकेकडून होणाऱ्या रोख वित्तपुरवठ्यामुळेच शक्य आहे. कर्ज देण्याचा नियम यासाठी तयार करण्यात आला आहे की संभावित परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी सामान्य बँकांना केंद्रीय बँकेकडून नगदी स्वरुपात वित्तपुरवठा व्हावा. केंद्रीय बँक सामान्य बँकांना गरजेनुसार रोख राशी पुरवून त्यांचा व्यवसाय सुरळीत चालू ठेवण्यास आणि वित्तपुरवठ्यामध्ये घट न येऊ देण्यास मदत करील. केंद्रीय बँकेने असे न केल्यास वित्ताची एकूण पुरवठ्यामध्ये लोकांच्या रोख रकमेच्या मागणीच्या उतार-चढ़ावामुळे असामान्य उलथापालथ निर्माण होऊन वादळी स्थिती निर्माण होईल. अर्थातच वित्त पुरवठ्यातील अस्थैर्यामुळे निर्माण होणाऱ्या वादळी परिस्थितीस दृष्टीसमोर ठेवून वित्तीय धोरणात उत्तम आणि यशस्वी कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात यावा. हे यशस्वी धोरण हे आहे की वित्त पुरवठ्यातील चढ़-उतार आणि अर्थव्यवसायातील कार्यात्मक गरजांनुसार हे धोरण केंद्रीय बँकेच्या देखरेखीत राबविण्यात यावे.

केंद्रीय बँक सामान्य बँकांना गरजेनुसार अतिरिक्त रोख राशीचा पुरवठा करून जनतेसाठी सवलत निर्माण करील. यामुळे आपल्या वित्ताचा जो काही भाग रोख अर्थात नाणी व नोटांच्या स्वरुपात जनतेस स्वतःजवळ ठेवणे शक्य होईल. संपूर्ण अर्थकारणाच्या दृष्टिकोनानुसार केवळ एवढेच परिवर्तन घडवून आणता येईल की आतापर्यंत जे वित्त बँकांच्या रजिस्टर्समध्ये केवळ नोंदणीच्या स्वरुपात होते, त्याचा एक भाग चलणी नोटांत परिवर्तीत होईल. या परिवर्तनाशिवाय वित्ताच्या एकूण पुरवठ्यात सांख्यिकी प्रमाणात कोणताच बदल शक्य नाही. केंद्रीय बँकेमार्फत बँकांना जी नवीन रोख राशी मिळेल ती जनतेत वाटप होईल आणि याच प्रमाणात त्यांच्या खात्यांत घट निर्माण होईल. बँकेच्या खात्यांत होणाऱ्या 'घटी'मुळे वित्तपुरवठा कमी होत असताना दिसत असली तरी ही वास्तविक कमतरता वा घट नाही. कारण खात्यांतील कमतरतेच्या प्रमाणात नगदीच्या स्वरुपात जनतेमध्ये ही राशी संक्रमण करीत राहील.

केंद्रीय बँकेस या गोष्टीचे प्रयत्न करावे लागतील की कर्ज देण्याच्या नियमास अनुसरूनच कर्ज द्यावे. म्हणजेच जनतेची नगदीची मागणी पूर्ण होण्याइतपतच कर्ज देण्यात यावे. या नियमास नवीन नगदी राशी प्राप्त करून व्यावसायिकांना आगाऊ भांडवलपुरवठा करण्यासाठी वापरता कामा नये. या प्रकारच्या प्रयत्नातून बँकांच्या हिशोबांची देखरेख योग्यप्रकारे आणि सुरळीत होईल. दुसरीकडे या गोष्टीचे प्रयत्नसुद्धा व्हावेत की, लागू करण्यात आलेल्या कर्ज मागणीच्या प्रमाणानुसार बँकाना जी जास्तीतजास्त प्राप्त होत असलेली राशी जर जनतेच्या नगदी राशीच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी कमी पडत असेल अथवा अपूरी ठरत असेल तर या राशीत ही कमतरता भरून काढण्यासाठी वाढ करण्यात यावी. केंद्रीय बँकेस चलनी नाणी व नोटा जारी करण्याचे अधिकार प्राप्त असल्यामुळे ही कमतरता पूर्ण करण्यासाठी तिला कोणतीच अडचण येणार नाही. जनतेस या गोष्टीची पूर्ण संधी प्राप्त व्हावयास हवी की, जनतेस हवा असलेल्या आपल्या वित्ताचा भाग चलनी नोटांच्या स्वरुपात ठेवावा. जोपर्यंत नवीन नोटांच्या माध्यमाने 'पत' (Credit) मध्ये विस्तार होत नाही, तोपर्यंत बँकांचे खाते नोटांमध्ये परिवर्तीत होत असल्यानें वित्तवृद्धीची कोणतीच संभावना नसते.

केंद्रीय बँकेने दिलेली कर्जे अस्थायी स्वरुपाची असतील. ही अस्थायी कर्ज लोकांच्या नगदीच्या मागण्या पूर्ण होताच परत करावी लागणार. त्याचप्रमाणे लोकांच्या नगदी मागणीमध्ये असामान्य वृद्धी झाल्यास अथवा वृद्धीची संभावना असल्यास कर्जराशीमध्येसुद्धा वाढ करणे आवश्यक ठरेल. ही असामान्य परिस्थिती संपल्यानंतर कर्ज देण्याचे प्रमाण परत आपल्या मूळ अवस्थेत येईल. अशा तऱ्हेने केंद्रीय बँक या

पद्धतीनुसार म्हणजेच या नियमाच्या आधारे बँकांची नगदी रोकड अबाधित ठेवून जनतेच्या विश्वासास अबाधित राखणार.

असामान्य परिस्थितीत कर्ज देण्याच्या प्रमाणातील घट अथवा कमतरतेचा वित्तपुरवठ्यामध्ये विस्तारप्रक्रियेस थांबवून अथवा घट करून घेण्यासाठी वापर करता येईल. लोकांच्या नगदी मागणीच्या वृद्धीसह जर अर्थवृद्धीची भावना वाढीस लागली असेल तर अशा प्रसंगीसुद्धा हेच कार्य करता येईल. समजा सामान्य बँकांनी या नियमाच्या आधारे शक्य होईल तेवढे कर्ज घेऊन टाकले तरीदेखील जनतेच्या नगदी राशीची मागणी अद्यापही जर पूर्ण झाली नाही तर अशा परिस्थितीत जर केंद्रीय बँकेने वाढीव कर्ज देण्याचे नाकारले असेल अथवा या कर्जराशीत काहीं अंशी कमी केले असेल तर सामान्य बँकांसाठी हे आवश्यक ठरेल की, जनतेची मागणी पूर्ण करण्यासाठी भाग (Shares) विक्री करून वित्तनिर्मिती करावी आणि व्यावसायिकांकडून भांडवल परत घ्यावे. या पद्धतीमुळे वित्तपुरवठ्यामध्ये घट प्रक्रिया होणे निश्चित आहे. केवळ व्यावसायिकांकडून भांडवल परत घेतल्यानेच बँकांना रोख राशी प्राप्त होणार नाही. तर यासाठी त्यांच्या कर्ज खात्यांच्या प्रमाणात होणारी घट हीसुद्धा या कर्जांच्या प्रमाणात अतिरिक्त न्यूनतेचे साधन सिद्ध होईल. मात्र न्यूनतेचे हे साधन केवळ अशा असामान्य परिस्थितीतच उपयोगी सिद्ध होईल की ज्या वेळी जनतेची नगदी राशीची मागणी वाढल्यामुळे बँकांमधील जमा असलेली नगदी राशी प्रभावित होईल.

एखादी बँकिंग व्यवस्था यशस्वीपणे चालविण्यासाठी ही बाब अत्यावश्यक आहे की सामान्य बँकांना गरजप्रसंगी कोणत्याही माध्यमाने तत्काळ नगदी राशी प्राप्त व्हावी. अर्थात हे केंद्रीय बँकेच्याच अर्थ सहाय्यामुळे शक्य असते. वर्तमान 'सऊदी अरब' येथील आर्थिक व्यवस्थेमध्ये सामान्य बँका प्रत्यक्षपणे केंद्रीय बँकेकडून व्याजावर कर्ज घेत असतात. (ही पद्धत विशेषत: इंग्लंडमध्ये चालू आहे. काहीं संस्था कर्जरोख्यांच्या खरेदी-विक्री आणि काही उच्च दर्जाच्या कर्जरोख्यांची करतात. या व्यवसायासाठी सामान्य बँकांकडून ते तत्काळ परताव्याच्या अटीवर भांडवल मिळवितात. केंद्रीय बँक या संस्थांकडूनही, कर्ज रोखे खरेदी करण्याबरोबरच अर्थात निश्चित व्याजदरानुसार सवलती (Discount) सह त्यांच्या मोबदल्यात रोख राशी पुरविण्यासाठी नेहमी तयार असते. ज्या वेळी बँकांना नगदी राशीची गरज पडते. तेव्हा व्यावसायिकांना दिलेली कर्जे ती परत घेते. या कर्जांच्या फेडीसाठी कर्ज रोख्यांच्या मोबदल्यात (सवलतीसह) भांडवल प्राप्त करून बँकांची कर्जे फेडण्यात येतात. अमेरिकेमध्ये सामान्य बँकाचे कर्ज अर्थात 'फेडरल फन्ड्स' प्रत्यक्षात खरेदी करता येतात. काही इतर देशीमध्ये उदाहरणार्थ, फ्रान्स आणि जर्मनीमध्ये सामान्य बँका केंद्रीय बँकाकडून ठराविक

व्याजदरावर कर्ज घेतात.) केंद्रीय बँक सामान्य बँकांना कर्ज देण्यासाठी सदैव तत्पर असते, परंतु कर्ज घेणाऱ्यांचा उत्साह आणि धैर्य खच्चीकरणासाठी व्याजदरात वृद्धी करण्याची संभावना असते. केंद्रीय बँक अशा कर्जांसाठी मोठे अथवा जास्त व्याजदर निश्चित करीत असल्याने आणि वित्तबाजारात व्याजदर सामान्यत: केंद्रीय बँकेने निश्चित केलेल्या व्याजदरापेक्षा जास्त असते. म्हणून व्याजदरातील अतिरिक्त वाढीमुळे सामान्य व्याजदरातही वृद्धी निर्माण करते आणि परिणामी बँकांकडून होणाऱ्या कर्जाच्या मागणीत घट होते. केंद्रीय बँक आपल्या व्याजदराच्या वृद्धीच्या माध्यमाने वित्तपुरवठ्यामध्ये घट निर्माण करते. या उलट जेव्हा केंद्रीय बँकेस पतपुरवठा सोपा आणि सोईस्कर व स्वस्त करू इच्छिते, तेव्हा या हितासाठी ते आपले व्याजदर कमी करते. आम्ही सादर केलेल्या नियमांच्या आधारे केंद्रीय बँकेसाठी हे शक्य होईल की सामान्य बँकांना केंद्रीय बँकेकडून प्राप्त होत असलेली कर्जे गरजेनुसार कमी-अधिक करता येतील. तसेच याचा प्रभाव मात्र व्यावसायिकांना पुरविण्यात येणाऱ्या भांडवलाच्या अटीवर पडणार नाही. कारण हे भांडवल प्राप्त होणाऱ्या नफ्यात भागीदारी तत्त्वावर पुरविण्यात येईल. अर्थात निश्चित व्याजदरावर मुळीच पुरविला जाणार नाही.

विभिन्न कारणे आणि परिस्थितीनुरूप केंद्रीय बँकेतर्फे व्याजदरातील वृद्धीचा आधुनिक काळात असा मुळीच प्रभाव पड़ला नाही, ज्यामुळे हे सिद्ध होईल की, भांडवलनिर्मितीच्या प्रमाण व गतीमध्ये लक्षणीय घट निर्माण झाली असेल. ज्या वेळी भांडवल निर्मितीपेक्षाही आणि भांडवल गुंतवणुकीपेक्षाही संभावित नफ्याचा दर खूप जास्त असेल तेव्हा व्याजदरात एक ते दोन टक्क्यांच्या वृद्धीमुळे भांडवलाच्या मागणीत कोणत्याही प्रकारची घट होत नाही. हेच कारण आहे की, आता विभिन्न देशांमध्ये अशी पद्धत अवलंबिण्यात येत आहे की, केंद्रीय बँकेतर्फे सामान्य बँकांसाठी कर्जाची एक अंतिम मर्यादा अथवा निश्चित कोटा ठरविण्यात येतो. (ही पद्धत ऑस्ट्रीया, बेल्जीयम, कोलंबिया, कोस्टारिका, फ्रान्स, पश्चिम जर्मनी आणि पॅरिसमध्ये चालू असून आता सगळीकडे हीच पद्धत अवलंबिण्याचे प्रयत्न होत आहेत. यासाठी (Peterg Fousek : Foreign central banking page, 19, Federal आणि Reserve Bank of Newyork - 1957 चा अभ्यास अवश्य करावा) आम्ही सादर केलेल्या नियमानुसार कर्ज देण्याची पद्धतसुद्धा वस्तुत: याच नियमाशी सुसंगत आणि समानार्थक आहे.

वित्तधोरणाचा मूळ हेतु असा आहे की, पुरवठ्यास न्यूनाधिक्यापासून अबाधित ठेवीत तिला भांडवल गुंतवणुकीच्या वास्तविक गरजांनुसार सुरक्षित ठेवावे. एखाद्या विभागात किंवा क्षेत्रात भांडवल गुंतवणुकीचे दर काय आणि किती असावेत, जेणेकरून ते चालू राहील. या प्रश्नाचे उत्तर असे देता येईल की याचा वित्तधोरणाशी

काहीच संबंध नाही. हा निर्णय व्यावसायिकवर्ग आणि सामुदायिक हित पाहून शासनास घ्यावा लागेल. वित्तपुरवठ्यावर अंकुश ठेवण्याकरिता व्याजदरातील वृद्धी ही वस्तुत: या गोष्टीची घोषणाच आहे की ज्या व्यवसाय-वर्तुळात या वाढ़लेल्या व्याजदरापेक्षा जास्त दरासहित नफ्याची आशा नसेल, त्यामध्ये भांडवल गुंतवणूक करण्याची घोडचूक करण्यात येणार नाही. याचा वित्तधोरणाच्या हेतुशी काही एक संबंध नाही. आम्ही सादर केलेली अर्थव्यवस्था व्याजमुक्त असल्यामुळे त्यात हे घोर नुकसान होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

३) कर्ज प्रमाणाचा मुख्य वापर

प्रत्येक बँकेस असे वाटत असणार की त्यास गरज पडल्यास केंद्रीय बँकेकडून जास्तीतजास्त कर्ज मिळावे. कारण या कर्जावर कोणत्याच प्रकारचे व्याज देण्याची गरज नाही, तसेच याच्या माध्यमाने तिची रोख राशीसुद्धा स्थिर ठेवण्याची संधी मिळेल. केंद्रीय बँकेने जर अशी घोषणा केली की एखाद्या विशेष उद्योगांसाठी देण्यात आलेल्या कर्जांवर अथवा यासंबंधी असलेल्या हुंडींच्या रकमांवर ४० टक्के कर्ज देण्यात येईल. (खरे पाहता कर्जांच्या बाबतीत हे प्रमाण २५ टक्के एवढ़े असते.) अशा वेळी आणि अशा परिस्थितीत या विशेष उद्योगांवर जास्त कर्ज देण्याकडे बँकेचा कल आणि वृत्ती वाढेल. या उलट केंद्रीय बँक जर एखाद्या विशेष व्यवसायांसाठी देण्यात आलेल्या कर्जाचे प्रमाण सामान्य कर्ज प्रमाणापेक्षा कमी (उदाहरणार्थ, १५ टक्के वा याच्या जवळपास) असेल तर बँक या व्यवसायासाठी कर्ज देण्यास तयार होणार नाही. वरील मजकुरात आम्ही हे स्पष्ट केलेले आहेच की, व्यावसायिक पक्षांना कर्ज देण्याच्या बाबतीत बँकांना या गोष्टीचे अधिकार असावेत की, योग्य वाटत असल्यास कर्ज द्यावे आणि योग्य वाटत नसल्यास कर्ज देऊ नये. यामुळे ही आशा बाळगता येईल की विभिन्न उद्योगांना देण्यात आलेल्या कर्जराशीवर कर्ज देण्याचे प्रमाणसुद्धा योग्यतेनुसार कमी-जास्त ठेवता येऊन केंद्रीय बँकेस या गोष्टीस्तव प्रयत्नशील राहता येईल की काही उद्योगांसाठी कर्जांचा पुरवठा जास्त आणि काही उद्योगांसाठी कर्जांचा पुरवठा कमी ठेवण्यात यावा.

एखाद्या उद्योगामध्ये भांडवल गुंतवणूक वाढ़विण्यासाठी कर्ज पुरवठ्यामध्ये वृद्धी आणि कर्जे मिळविण्यामध्ये सवलत असावयास हवी. ही कर्जे अल्पमुदतींची असली तरी या उद्योगासाठी दीर्घ मुदतीच्या भांडवल पुरवठ्यामध्ये (जी भागीदारी अथवा बटाई तत्त्वावर मिळविलेली असेल) वृद्धी होईल. कारण हे सर्वज्ञात असेल की उद्योगासाठी कर्जप्राप्ती खूप सोपी आणि सोयिस्कर आहे. कारण व्यवसायासाठी दीर्घ मुदतींचे कर्ज सोप्या पद्धतीने आणि विनासायास मिळत असल्यामुळे त्यांच्या

नफ्यात लक्षणीय वाढ होते. या उलट व्यवसोंयाच्या ज्या वर्तुळात कर्जप्राप्ती अवघड होऊन बसलेली असते, त्यात दीर्घ मुदतीसाठी भांडवल गुंतवणुकीचे प्रमाणसुद्धा कमीच असेल.

जी गोष्ट आम्ही कर्जाच्या बाबतीत लिहिली आहे तीच गोष्ट व्यावसायिक हुंडींच्या बाबतीतसुद्धा लागू पडते. कारण हुंडी वठविणे हे कर्ज घेण्यासारखेच आहे. बँका व्यावसायिकांच्या ज्या हुंडी वठवतील, यांच्या जामिनासाठी या बँका केंद्रीय बँकेकडून कर्ज घेण्याच्या नियमानुसार कर्ज काढतील. केंद्रीय बँक हे विभिन्न प्रकारच्या हुंडींसाठी कर्ज देण्याचे विभिन्न प्रमाण निश्चित करून या गोष्टीसाठी प्रयत्नशील असेल की व्यवसायाच्या काही वर्तुळात हुंडी वठविणे जास्तीतजास्त सोपे व्हावे आणि काही वर्तुळात अवघडसुद्धा असावे. हुंडी वठविणे सोपे असलेल्या व्यवसायात सवलतीसुद्धा जास्त असतील आणि हुंडी वठविणे अवघड असलेल्या क्षेत्रांत सवलती मर्यादित असतील.

प्राधान्यपूर्ण कर्ज देण्याच्या प्रमाणाने केंद्रीय बँकेस वित्तशास्त्राच्या निवडक वर्तुळात 'पत' (Credit) विस्तार अथवा घट प्रक्रियेसाठी प्रभावी साधन म्हणून उपयोगी पडेल. हेच कार्य वर्तमान प्रगत युगात विभिन्न प्रकारच्या कर्जरोखे विक्री करण्यासाठी विविध दर ठरविण्यात येतात. किंवा बँकांकडून विविध उद्देशपूर्तीसाठी प्राप्त केलेल्या कर्जांसाठी व्याजाचे विविध दर निश्चित करण्यात येतात. (संदर्भ : Peterg Fousek : Foreign Central Banking, P.20 & 70, 71)

केंद्रीय बँकेस एखाद्या विशेष उद्योगास कर्ज देण्याची इच्छा नसल्यास एका ठराविक तारखेनंतर ते या उद्योगासंबंधी कर्जांच्या जामिनावर कर्ज देण्याचे प्रमाण शून्य होण्याची घोषणा करू शकते. दुसऱ्या शब्दांत यासाठी मुळीच कर्ज न देण्याची घोषणा करील. कारण अशा परिस्थितीत कर्ज दिल्यामुळे (व्याजाच्या स्वरुपात) बँकेस कोणत्याही प्रकारची कमाई होणार नाही.

शून्य प्रमाणातील कर्ज देण्याच्या अंतिम उदाहरणाच्या तुलनेत १०० टक्के प्रमाणातील कर्ज देण्याच्या प्रक्रियेचासुद्धा विचार करता येईल. जर एखाद्या परिस्थितीत उद्योग अथवा व्यवसायात असामान्य विकास आणि तीव्र गती हवी असेल आणि या उद्योगाचा भरमसाट विस्तार करावयाचा असेल तर त्या उद्योगास देण्यात आलेल्या कर्जावर कर्ज देण्याचे प्रमाण १०० टक्के असण्याची घोषणा करता येईल. अशा परिस्थितीत आशा केली जाऊ शकते की या उद्योगास कर्ज भांडवलाच्या साह्याने जास्तीतजास्त लाभ उचलण्याची संधी मिळावी. अमर्याद पुरवठा असूनसुद्धा हे कर्ज अल्प मुदतीसाठी देण्यात येत असल्याने कर्ज मागणीची इच्छा या गोष्टीवर अवलंबून

असेल की याच्या कार्यवर्तुळात दीर्घ मुदतीवर आधारित भांडवल गुंतवणुकीसाठी किती साधने उयोगात आणण्यात येत आहेत.

येथे या गोष्टीचा उल्लेख करणे योग्य ठरेल की जर केंद्रीय बँक एखाद्या वर्तुळासाठी कर्जपुरवठा मर्यादित करणे अथवा या पुरवठ्यात वृद्धी करण्यात उपरोल्लेखित पद्धतीचा वापर करून पूर्णपणे यशस्वी झाले नाही तर केंद्रीय बँक या हेतुपूर्तीसाठी सामान्य बँकांना योग्य मार्गदर्शन आणि आदेश पारित करील. मात्र हा पर्याय असामान्य परिस्थितीसाठी असेल.

कर्ज देण्याच्या प्रमाणाचा प्रामुख्याने वापर शासनास देण्यात येणाऱ्या कर्जांच्या पुरवठ्यात वृद्धी करण्यासाठीसुद्धा करता येईल. हीच पद्धत ग्राहकांना (Consumers) कर्जपुरवठ्यासाठी वापरली जाऊ शकते. या बाबींचे स्पष्टीकरण पुढील प्रकरणात करण्यात येईल.

४) व्यापारी रोख्यांची खरेदी-विक्री

उपरोल्लेखित कर्ज देण्याच्या नियमानुसार बँकांना नवीन रोख रकमेचा पुरवठाही बँकांकडून नगदी राशीच्या मागणीवर अवलंबून आहे. म्हणजेच बँकांकडून कर्जाची मागणी झाल्यावरच केंद्रीय बँक त्यांना कर्जपुरवठा करणार. यापेक्षाही जास्त असे की, या नियमानुसार नगदी राशीच्या पुरवठा अगर नगदी पुरविण्यात आलेल्या राशीच्या परताव्याची मागणी एकूण वित्तपुरवठ्यातील परिवर्तनामुळे सामान्य परिस्थितीत शक्य नसेल. केंद्रीय बँकेच्या वित्तधोरणास प्रभावीपणे राबविण्यासाठी अशा एका साधनाचीसुद्धा गरज आहे की ज्याच्या वापरामुळे बँकिंग व्यवस्थेस गरजेनुसार नगदी रकमेची प्राप्ती होत राहावी. तसेच या प्रकारच्या प्रयत्नांमुळे वित्तपुरवठासुद्धा पूर्ण प्रभावित व्हावा. व्याजावर आधारित असलेल्या वर्तमान अर्थव्यवस्थेमध्ये या हेतुच्या पूर्तीसाठी व्याजावर आधारित कर्ज-रोख्यांची (Loan Shares Certificates) खरेदी-विक्री करण्यात येते. हे कर्ज रोखे सरकारी तिजोरीतून अल्प मुदतीसाठी कर्ज घेण्यासाठी (व्याजदरांवर आधारित) जारी करण्यात येत असतात. व्याजमुक्त अर्थ-नीतीमध्ये या व्याजावर आधारित कर्जरोख्यांचे कोणतेही अस्तित्व नाही. आमचा प्रस्ताव असा आहे की, या व्याजमुक्त व्यवस्थेमध्ये हाच हेतु सरकारतर्फे जारी करण्यात आलेल्या व्यापारी रोख्यांच्या (Trade Shares Certificates) खरेदी-विक्रीतून साधता येतो. या रोख्यांचे स्वरुप पुढ़ील प्रकरणात स्पष्ट करण्यात येईल. येथे आम्ही केवळ एवढेच स्पष्ट करीत आहोत की, सरकारतर्फे जारी करण्यात आलेल्या रोख्याच्या खरेदी-विक्रीचा केंद्रीय बँकेस कसा उपयोग करून घेता येईल.

सरकारतर्फे राष्ट्रीय क्षेत्राच्या व्यावसायिक संस्थांसाठी भांडवलपुरवठा करण्यासाठी भागीदारीच्या नियमांवर आधारित जे व्यापारी रोखे जारी करण्यात येतील, त्यांची मोठी संख्या सामान्य बँका, इतर वित्तीय संस्था आणि सामान्य लोकांच्या मालकीची असेल. केंद्रीय बँकेने हे रोखे खरेदी करण्याचा निर्णय घेतल्यास रोखे मालकांकडून बाजार भावानुसार अथवा या भावांपेक्षाही जास्त दराने खरेदी करण्याची तयारी दाखवील आणि रोखेमालकांना रोखेविक्री करण्यासाठी प्रेरित करील. रोखेविक्री करणाऱ्यांना या रोख्यांची किंमत केंद्रीय बँकेकडून नगदीच्या स्वरुपात मिळेल. जनतेची ही सवय असते की आपल्या कमाईचा ९० टक्के भाग बँकेत ठेवावा. लोकांच्या या सवयींच्या आधारावर त्यांच्या रोख्यांची नगदी रक्कम शेवटी जवळपास ९० टक्क्या प्रमाणात बँकामध्येच जमा होणार. अशा प्रकारे बँकेमध्ये अतिरिक्त रोख रक्कम उपलब्ध झाल्याने आणि ही रोख रक्कम व्यवसायात वापरात येत असल्याने वित्तपुरवठ्यात सतत वाढ होणे सुरु होईल. जर व्यावसायिकवर्गामध्ये भांडवलाची मागणी असेल तर पूर्ण आर्थिक व्यवहारात वित्तपुरवठ्यात त्या भांडवलापेक्षा कितीतरी पटीने वाढ होण्याची शक्यता आहे. ही वाढ केंद्रीय बँकेने रोखेविक्री करणाऱ्यांना दिलेल्या किंमतीपेक्षाही खूप जास्त असण्याची संभावना असेल. रोख्यांची खरेदी ही वित्तपुरवठ्यातील विस्तार प्रक्रियेत वापरण्यात येणारे साधन आहे. कारण याच्या परिणामस्वरुपी बँकांना नवीन नगदी प्राप्त होत असते.

केंद्रीय बँकेने काही रोखे प्रत्यक्षात शासनाकडून खरेदी केले असल्याससुद्धा हाच परिणाम समोर येईल. कारण शासन या भांडवलास राष्ट्रीय कार्यवर्तुळातील व्यावसायिक संस्थांमध्ये गुंतवणुकीकरिता वापरणार. यामुळे मोबदला, पगार आणि भाड्यांच्या स्वरुपात 'आय'मध्ये वृद्धी होईल आणि वृद्धी झालेला हा पैसा बँकामध्येच जमा राहील.

केंद्रीय बँक दरवेळी या रोख्यांची एक ठराविक संख्या आपल्याजवळ ठेवील. यामुळे केंद्रीय बँकेस वेळप्रसंगी आणि गरज वाटेल तेव्हा हे रोखे विकून बँकांकडून नगदी राशी परत घेता येईल. केंद्रीय बँकेस बाजारभावानुसार किंवा यापेक्षा काही कमी भावात हे रोखेविक्री करणे नेहमी शक्य असते. कारण बँका, इतर वित्तसंस्था आणि सामान्य भांडवलदार या रोख्यांच्या माध्यमाने नफा मिळविण्याकरिता हे रोखे योग्य दरानुसार खरेदी करण्यास तयार असतील. ज्या बँका आणि भांडवलदार हे रोखेखरेदी करतील, केंद्रीय बँकेस या रोख्याची किंमत नगदी स्वरुपात अदा करावी लागेल. यामुळे बँकांमधील नगदी जमा राशीत घट निर्माण होईल. जर खरेदीदार हा स्वत: बँक असेल तर या कमतरतेचे कारण स्पष्टच आहे. तसेच खरेदीदार एखादी संस्था किंवा व्यक्ती असल्यास याची किंमत नगदी

स्वरुपात चुकविण्यासाठी बँकेतून रक्कम काढणार अथवा धनादेशाच्या माध्यमाने केंद्रीय बँकेत रक्कम जमा करणार. अशा रितीने बँकेतील नगदी राशीमध्ये सतत घट होण्याची सुरुवात होईल. जर या प्रक्रियेच्या सुरुवातीस बँकांमध्ये अतिरिक्त रक्कम नसती तर संपूर्ण अर्थव्यवहारात वित्तपुरवठ्यात भांडवलाच्या कितीतरी पटीने कमतरता निर्माण होईल. हेच भांडवल रोख्यांच्या विक्रीपुरवठ्यात घट निर्माण करण्याचे माध्यम होय. कारण याच्या परिणामस्वरुपी बँकांतील नगदी राशीमध्ये घट निर्माण होते.

ही बाब पुढील प्रकरणात स्पष्ट करण्यात येईल की, शासनातर्फे जारी करण्यात आलेल्या रोख्यांचा बाजारभाव अथवा दर हे त्यापासून प्राप्त होणाऱ्या संभावित नफ्याच्या दरावर पूर्णत: अवलंबून आहे. या संभावना बदलण्याबरोबरच याच्या दरामध्ये वृद्धी आणि कमतरता होणे शक्य आहे. परंतु सामुदायिक हिताची ही मागणी आहे की, मूळ संभावना अथवा निराधार संभावनांच्या आधारे तसेच जुगाराच्या परिणामस्वरुपी निर्माण होणाऱ्या असामान्य चढ़-उतार आणि उलथापालथीच्या परिस्थितीपासून या दरांचे रक्षण व्हावे. केंद्रीय बँक हा हेतु तत्काळ कार्यवाही करून साध्य करू शकते. शासनाने त्याच्या निगरानी खाली सुरु असलेल्या व्यावसायिक संस्थांची कारकिर्द आणि नफा व तोट्यांच्या हिशोबी संभावनांची केंद्रीय बँकेस माहिती पुरवावी. केंद्रीय बँक या हिशेबांच्या आधारांवर शासकीय रोख्यांच्या बाजारभावांवर नजर ठेवील. ज्या प्रसंगी केंद्रीय बँकेस रोख्यांचे भाव वाजवीपेक्षा कमी होत असताना आढळतील त्या वेळी हे रोखे योग्य किंमतीत खरेदी करील. रोखे मागणीतील वृद्धीमुळे त्यांच्या किंमतीत वृद्धी होईल आणि किंमतीतील घसरण बंद होईल. त्याचप्रमाणे जेव्हा केंद्रीय बँकेस रोख्यांचे दर वाजवीपेक्षा जास्त वाढ़ताना आढळतील, त्याप्रसंगी केंद्रीय बँकेकडून बाजारभावानुसार रोखेविक्री करून खरेदी इच्छुकांची खरेदीची मागणी पूर्ण करील. भांडवलदार आणि बँकांनी रोख्यांवर भांडवल गुंतवणुकीस भांडवलाच्या लाभदायक प्रमाणास सुरक्षित पद्धती समजावी आणि शासनास नफ्यातील भागीदारीच्या नियमांवर जनतेकडून भांडवल प्राप्त करणे सोपे आणि सोईस्कर व्हावे, यासाठी रोखे खरेदी आणि विक्रीच्या माध्यमाने केंद्रीय बँक यांच्या दरांना असामान्य उलथापालथ आणि चढ़-उताराच्या प्रतिकूल परिस्थितीपासून रक्षण करील.

आर्थिक प्रगती आणि व्यवसाय विस्ताराबरोबरच देशामध्ये पुरवठ्यात सतत वृद्धी होणे आवश्यक आहे. वित्त पुरवठ्यात सतत वाढ़ होण्यासाठी सामान्य बँकांना योग्य गतीने नवीन रोकड पुरविणे खूप आवश्यक आहे. आम्ही सादर केलेल्या व्यवस्थेमध्ये सामान्य बँकांना नवीन रोकड प्राप्त होण्याचे माध्यम म्हणजेच केंद्रीय बँकेतर्फे शासकीय रोख्यांची खरेदी होय. दररोजची खरेदी-विक्री नसली तरी काही

काळानंतर रोखेखरेदीची गती विक्रीच्या गती वा प्रमाणापेक्षा जास्त ठेवून केंद्रीय बँक सामान्य बँकांच्या नगदी जमा राशींमध्ये वाढ़ करण्याचा हेतु साध्य करू शकते. सार्वजनिक क्षेत्रातील व्यवसायात वाढ़ होत राहील आणि शासनांकडून नवनवीन रोखे बाजारात आणण्यात येतील. यामुळे दीर्घ मुदतीमध्ये या रोख्यांच्या पुरवठ्यातसुद्धा सतत वाढ होत राहण्याची संभावना आहे.

वरील चर्चेवरून रोख्यांच्या खरेदी-विक्रीचे तीन हेतु स्पष्ट होतात. दीर्घकाळात वित्तपुरवठ्यात सतत वाढ़ होण्यासाठी बँकांना नवीन रोकड़ पुरवीत राहणे, शासकीय रोख्यांचे दर असामान्य उतार-चढ़ावापासून सुरक्षित, अबाधित आणि स्थिर ठेवणे, वित्तपुरवठ्यात गरजेनुसार विस्तार वा घट करण्यासाठी बँकांना नवीन नगदी राशीचा पुरवठा करणे अथवा त्यांच्याकडून नगद वसूल करणे. ही तीन उद्दिष्टे स्पष्ट होतात. अर्थातच ही तिन्ही उद्दिष्टे दरवेळी आणि प्रत्येक परिस्थितीत एक दुसऱ्यांशी सुसंगत असतीलच असे नव्हे. असेदेखील शक्य आहे की, एका उद्दिष्टासाठी रोख्यांची खरेदी योग्य असेल, परंतु दुसरे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी रोखेविक्री करण्याची पाळी यावी. अशा परिस्थितीत या परस्परविरुद्ध प्रसंगाच्या समाधानासाठी केंद्रीय बँकेने रोखेखरेदी अगर विक्रीबरोबरच नगदी राशीच्या प्रमाणास अबाधित व सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न करावा अथवा कर्ज देण्याच्या प्रक्रियेत परिवर्तनाचा प्रयत्नसुद्धा अशा प्रकारे करावा की ही दोन्ही अथवा तिन्ही उद्दिष्टे एकाच वेळी पूर्ण व्हावीत. गरज पड़ल्यास या परस्परविरोधी परिस्थितीतून मार्ग काढ़ण्यासाठी दुसरा एखादा प्रयत्नही करता येईल. खाली आम्ही एका उदाहरणाने याचे स्पष्टीकरण करीत आहोत.

समजा, बाजारातील काही निराधार संभावित धोक्यांमुळे रोख्यांचे भाव कमी होत आहेत आणि केंद्रीय बँक या समस्येच्या समाधानास्तव रोखेखरेदी करण्याकडे पावले उचलत आहे. परंतु केंद्रीय बँक वित्तपुरवठ्यात वृद्धीची इच्छुक नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीत केंद्रीय बँकेने रोखेखरेदीबरोबरच नगदी सुरक्षित राशीच्या प्रमाणातच इतकी वाढ़ करावयास हवी की बँकेस मिळणाऱ्या नवीन नगदी राशीच्या माध्यमाने वित्तविस्तार व्हावा. समजा, अशा परिस्थितीत जर केंद्रीय बँक वित्तपुरवठ्यात घट करण्यास इच्छुक असेल, तेव्हा अशा परिस्थितीत नगदी सुरक्षित राशीच्या प्रमाणात तुलनात्मक जास्त वाढ़ करावी लागेल. यामुळे नवीन नगदी राशी प्राप्त होऊनसुद्धा बँकाना व्यावसायिकांकडून भांडवल परत घेण्यास भाग पाडावे.

रोख्यांच्या दरांमध्ये स्थैर्य निर्माण करण्यासाठी आणि वित्तपुरवठ्यात घट वा वृद्धी किंवा न्यूनाधिक्य पाहिजे असल्यास अर्थात एकाच वेळी ही दोन्ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठीसुद्धा हेच उदाहरण लागू होईल. बँकांतील नगदीच्या पुरवठ्यात सतत वाढ़

करण्याच्या उद्दिष्टपूर्तीसंबंधी विचार करावयाचा असल्यास हे एक दीर्घ मुदतीशी संबंधित उद्दिष्ट असल्याने यास अल्प मुदतीतील योग्य सुरक्षा प्रदान करताना प्राप्त करणे काहीच अवघड ठरणार नाही. येथे या गोष्टीकडे संकेत देणेसुद्धा योग्य वाटते की अर्थनीतीमध्ये नगदी राशीत वाढ केंद्रीय बँकेव्यतीरिक्त स्वत: शासनसुद्धा काही प्रयत्नांतून करू शकते. केंद्रीय बँकेतर्फे या उद्दिष्टपूर्तीचा एकमेव मार्ग म्हणजेच रोखे खरेदी करणे होय. (शासनाने केंद्रीय बँकेकडून कर्ज मिळवून आपला खर्च भागवावा. यामुळे अर्थव्यवहारात नगदी राशीत वृद्धी होईल. या विषयावर पुढील प्रकरणात स्पष्टीकरण देण्यात येईल.)

याविरुद्ध परिस्थितीपासून बचाव करण्यासाठी आम्ही अशी योजनादेखील सादर करू की ज्यामध्ये वित्तपुरवठ्यामध्ये न्यूनाधिक्य अधिकाधिक राखीव प्रमाणात बदल करण्यावर अवलंबून असेल आणि रोख्यांच्या खरेदी-विक्रीवर याची भिस्त नसेल. वित्तपुरवठ्यात न्यूनाधिक्यासाठी रोख्यांच्या खरेदी-विक्रीचा प्रयत्न नगदी सुरक्षित राशीतील परिवर्तन हा हेतू साध्य होण्यासाठी पुरेसे दिसत नसलेल्या किंवा पाहिजे असलेल्या हेतुस कमीतकमी मुदतीमध्ये प्राप्त करण्याची आवश्यकता असलेल्या असामान्य परिस्थितीत करण्यात यावा. उदाहरणार्थ, वित्तवृद्धीकडे लोकांची वाढत असलेली तीव्र मानसिकता तत्काळ थांबविण्यासाठी आजही जगात बऱ्याच देशांमध्ये वित्तपुरवठा काबूत ठेवण्याची जास्तीतजास्त भिस्त राखीव राशीच्या प्रमाणावर ठेवण्यात येते. या देशात प्रामुख्याने ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडसारख्या प्रगत देशांचा समावेश आहे.

(संदर्भ : Commission on Money and Credit Monetory Management, Page, 95, 104, 115 & 118. R. S. sayers : Centra Banking, Page. 112 7 130, Peter C Fousek : Foreign Central Banking Page 53)

फ्रान्स, इटली आणि नार्वेमध्येसुद्धा केंद्रीय बँक मोठ्या प्रमाणात सरकारी रोख्यांच्या खरेदीची पद्धत अवलंबित नाही. - (Economic Policy of our Time, Vol. 1, Page 70 Amsterdam - 1964)

शेवटी हेदेखील योग्य ठरेल की संक्षिप्तरित्या ती कारणेसुद्धा स्पष्ट करण्यात यावीत की ज्यांच्या आधारांवर आपण केंद्रीय बँकेसाठी केवळ शासनाने जारी केलेल्या रोख्यांची खरेदी-विक्री करीत आहोत. बाजारात वैयक्तिक वर्तुळासंबंधी व्यापारी रोख्यांचीसुद्धा प्रचंड संख्या अस्तित्वात असेलही. पहिले कारण असे आहे की केंद्रीय बँकेचा विचार करून उद्दिष्टे साधण्यासाठी किंमतीत जास्त बदल न होत असलेले रोखे जास्त योग्य ठरतील. आम्हास असे वाटते की शासकीय रोख्यांच्या बाजारभावात सामान्य रोख्यांच्या भावांच्या तुलनेत जास्त स्थैर्य आढळून येईल. याचे कारण म्हणजे शासनाची उच्च प्रतिमा

आणि राष्ट्रीयकृत व्यावसायिक संस्थांच्या लाभदायकतेबाबत असलेले धोरण होय. या विषयावर पुढे सविस्तर चर्चा करण्यात येईल. दुसरे कारण असे की, केंद्रीय बँकेजवळ असे कोणतेच प्रमाण नसणार की ज्यानुसार काही व्यावसायिक संस्थांकडून जारी करण्यात आलेल्या रोख्यांची निवड आणि नाकारण्याचा आधार बनविणे शक्य होईल. या उलट केंद्रीय बँकेचे प्रचंड संख्येत रोखे खरेदी केल्याने संबंधित व्यावसायिक संस्थांना असामान्य लाभप्राप्ती होण्याची शक्यता आहे. याकरिता नवीन रोखे जारी करणे आणि अतिरिक्त भांडवल पुरविणे सोपे आणि सुरळीत होईल. अशारितीने काही उद्योग आणि व्यावसायिक संस्थांबरोबर असे प्राधान्यपूर्ण वर्तन करावे लागेल की, ज्याच्यासाठी एखादा बुद्धिसंमत आधार असणे आवश्यक नाही. याचप्रमाणे जर एखाद्या वेळी केंद्रीय बँक एखाद्या व्यावसायिक संस्थेच्या रोख्यांची प्रचंड संख्या विकत असेल तेव्हा या रोख्यांचे भाव कमी होण्याच्या आणि या संस्थेसाठी अतिरिक्त भांडवलपुरवठा अशक्य होण्याच्या संभावना आहेत. या पक्षपाती वर्तनास कोणताच आर्थिक आधार नसेल.

जर केंद्रीय बँक दीर्घकाळामध्ये रोख्यांच्या विक्रीपेक्षाही जास्त रोखे खरेदी करीत असेल, तर याचा निश्चित अर्थ असा होईल की, केंद्रीय बँकेतर्फे शासनास प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे भांडवल गुंतवणुकीसाठी वाढीव अथवा अतिरिक्त भांडवलाचा पुरवठा करण्यात येत आहे. या भांडवलाच्या माध्यमाने राष्ट्रीय वर्तुळातील व्यावसायिक संस्थांना उत्पन्न व्यवसायात विस्तारीकरणाची संधी प्राप्त होईल. राष्ट्रीय वर्तुळाच्या हितातच शेवटी संपूर्ण समाजाचे हित आणि स्वार्थ जुळलेला आहे. त्याचप्रमाणे त्यास प्राधान्य दिल्यास कोणत्याही नागरिकास आवडेल. राष्ट्रीय वर्तुळातील उद्योगाशी प्राधान्यपूर्ण वर्तन आणि कार्य करण्यासाठी एका कल्याणकारी राज्यात भरपूर आर्थिक आधार आहेत.

५) कर्जप्रमाणात परिवर्तन

प्रचलित बँकिंग व्यवस्थेत व्यावसायिक आणि संस्थांना दीर्घमुदत-भांडवल गुंतवणुकीसाठी बँकांतर्फे बटाई आणि भागीदारी तत्त्वावर भांडवल प्राप्त होईल. परंतु मागील चौथे प्रकरण - 'बँकांचे कर्ज' मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे की, व्यवसाय सुरळीत आणि सोईस्कर चालू ठेवण्यासाठी अल्पमुदतींसाठी अस्थायी स्वरुपात काही भांडवलाची गरज असते. याकरिता बटाई आणि भागीदारीचे नियम हे या औद्योगिक काळात व्यवसाय कार्यासाठी आधार सिद्ध होत नाही. बँकांकडून अल्पमुदतींची लघुकर्जे मिळवून ही, गरज पूर्ण करता येईल. ग्राह्य बाब अशी आहे की, या भांडवलाची मागणी दीर्घमुदतीवर आधारित भांडवल गुंतवणुकीच्या प्रमाणावर अवलंबून आहे. व्यवसायाच्या विविध वर्तुळांमध्ये दीर्घमुदतीची भांडवलगुंतवणूक आणि कर्ज-

भांडवलाच्या गरजेदरम्यान असलेले प्रमाण भिन्न असले तरी सरासरी संपूर्ण अर्थकारणासाठी दोन्ही प्रकारच्या भांडवलांतील प्रमाण ठरविणे शक्य होईल. हे प्रमाण उत्पन्नाच्या पद्धतींवर, मालाचा साठा करण्यावर आणि त्यांच्या विक्रीसंबंधी ग्राहकांची मानसिकता व विक्रीचे प्रमाण वगैरेसारख्या बाबींवर अवलंबून असल्याने या प्रमाणात लवकर परिवर्तन घडण्याची शक्यता कमी असेल. केंद्रीय बँकेचे एक कार्य हे असेल की, भूतकाळातील अनुभव आणि वर्तमान काळातील समीक्षणात्मक अभ्यासाच्या आधारे हे प्रमाण निश्चित करावे आणि अशा स्वरुपाचे कर्जप्रमाण निश्चित करण्यात यावे की, व्यावसायिकवर्गासाठी ते यथायोग्य प्रमाणराशीत कर्जभांडवलाच्या पुरवठ्याचा योग्य प्रयत्न करीत राहावा. मुदतीच्या कर्जांच्या प्रमाणात समतोल नसल्यास व्यवसायामध्ये तंगी निर्माण होत असते. अशाप्रसंगी केंद्रीय बँकेस वाटल्यास कर्जप्रमाणात यथायोग्य परिवर्तनाच्या साह्याने या तंगीचे समाधान करता येईल.

अर्थव्यवस्थेत कर्जपुरवठा दीर्घमुदतीच्या भांडवल गुंतवणुकीच्या प्रमाणापेक्षा कमी असल्यास आणि व्यावसायिकवर्गाच्या कर्जांच्या गरजा पूर्ण होत नसल्यास व्यवसायकार्यात मरगळ येईल. आपल्या अत्यावश्यक गरजा पूर्ण होत नसल्याने व्यावसायिकवर्गास दीर्घमुदतीच्या भांडवल गुंतवणुकीत घट करणे भाग पडेल अन्यथा भांडवलाची एक राशी विभक्त करून अस्थायी गरजांची पूर्तता करता येणे व्यावसायिकांना शक्य होणार नाही. या विभक्त केलेल्या भांडवलातूनच त्यांना आपल्या छोट्या-मोठ्या गरजा पूर्ण करता येतील. सामुदायिक दृष्टिकोनातून पाहिल्यास ही बाब भांडवलाचा सदुपयोग ठरणार नाही. कारण जी गरज काही आठवड्यांपुरते भांडवल प्राप्त करून पूर्ण करता येऊ शकते आणि ती पूर्ण करण्यासाठी तीन महिन्यांच्या मुदतीसाठी भांडवल प्राप्त करण्यात यावे. हे निश्चितच योग्य भांडवल वापर ठरणार नाही. अशा परिस्थितीत जर केंद्रीय बँकेने कर्जप्रमाणात वाढ केली तर मात्र कर्जभांडवलाच्या पुरवठ्यात वाढ होईल. त्याचबरोबर बटाईच्या भांडवलपुरवठ्यात घट झाली तरी कर्जप्रमाणाच्या वृद्धीवर काहीच फरक पड़णार नाही. कर्जाची मुदत बटाई तत्त्वावर देण्यात आलेल्या भांडवलाच्या मुदतीपेक्षा कमी असल्याने या भांडवलाच्या उलाढालीच्या साह्याने जास्त लाभ घेता येईल.

कर्जपुरवठ्याची ही मागणी यावरून स्पष्ट होईल की बँकांना कर्ज घेऊ इच्छिणाऱ्यांच्या अशा प्रकारच्या गरजा पूर्ण करणेसुद्धा शक्य होणार नाही की, ज्यांना ते महत्त्वपूर्ण समजत असतील. कर्जमागणीचे बरेच अर्ज नाकारणे आवश्यक ठरेल. या उलट कर्जमागणीचे अर्ज जेव्हा कमी असतील आणि कर्ज देण्यासाठी पैसासुद्धा उपलब्ध असेल अथवा या मुदतीत बँक कर्ज देण्यासाठी विवश असतील तर हे या गोष्टीचे सूचक

असेल की, कर्जाचे प्रमाण आवश्यकतेपेक्षा जास्त असून हे प्रमाण कमी करण्यात यावे. कर्ज प्रमाणात घट केल्याने बटाई भांडवलपुरवठ्यात वाढ़ होईल. यामुळे अर्थकारणात स्थायी आणि दीर्घमुदतीच्या भांडवल गुंतवणुकीत वाढ़ होईल. कर्जपुरवठा कमी होईल. यामुळे व्यावसायिक पक्षास कर्जभांडवल काटकसरीने वापरणे भाग पड़ेल.

वर स्पष्ट केल्याप्रमाणे 'बँकांसाठी आपल्या कर्जखात्याचा एक ठराविक भाग कर्जस्वरुपात देण्यासाठी तयार असणे अनिवार्य आहे,' या नियमानुसार असा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे की व्याज निषिद्ध असूनसुद्धा व्यावसायिक आणि संस्थांना छोट्या मुदतींसाठी कर्ज प्राप्त होणे शक्य व्हावे. याचे स्पष्टीकरण पुढ़े येईलच. याच नियमाच्या आधारे शासन आणि ग्राहकांना कर्जपुरवठा शक्य होईल. एका व्याजमुक्त व्यवस्थेत हा लाभदायक आणि आवश्यक अर्थपुरवठा करणे म्हणजेच व्यावसायिकवर्ग, शासक आणि ग्राहकांना कर्जपुरवठा करणे हे या नियमाशिवाय शक्य होणार नाही. कर्जप्रमाणाच्या निश्चितीकरणाचा मार्गदर्शक नियम हा असेल की, या गरजांची यथायोग्य पूर्तता केल्यानंतर कर्ज खात्याची जास्तीतजास्त रक्कम बँकांसाठी लाभदायक वापरायोग्य असावी. केंद्रीय बँक कर्जप्रमाणात परिवर्तन घड़वून कर्जमागणीची कामना अर्थात ग्राहक, शासन आणि व्यावसायिकांच्या कर्जांची मागणी या यथायोग्य पूर्ण करण्याचा प्रयत्न करील.

कर्जप्रमाणातील परिवर्तनाचा एकूण वित्तपुरवठा आणि बँक खात्यांतील एकूण राशीच्या प्रमाणावर कोणताच परिणाम होत नाही. आम्ही आतापर्यंत केल्याप्रमाणे जर ग्राहक आणि शासनास यातून वगळण्यात आले तरी या परिवर्तनाचा व्यावसायिकवर्गास पुरवठा करण्यात आलेल्या एकूण संख्येवरसुद्धा काहीच परिणाम होणार नाही. याचा परिणाम केवळ बटाई तत्त्वांवर पुरवठा करण्यात आलेल्या भांडवल आणि कर्जभांडवलांदरम्यान असलेल्या संबंधावर पडतो. निम्नलिखित आराखड्यावरून हे स्पष्ट करण्यात येत आहे.

	जबाबदाऱ्या (Liabilities)		भांडवल साधने (Assets)		
कर्जप्रमाण	कर्जखाते	बटाईखाते	नगदी सुरक्षित	कर्ज	बटाई
50%	60,000	40,000	10,000	30,000	60,000
52.2%	60,000	40,000	10,000	31,500	58,500
47.5%	60,000	40,000	10,000	28,500	61,500

या आराखड्याच्या पहिल्या ओळीवरून कर्जप्रमाण पन्नास टक्के (५०%) असताना बँकेच्या हिशेबाचे एकूण स्वरुप लक्षात येते. दुसऱ्या ओळीतून कर्जप्रमाणात अड़ीच टक्के (२.५%) वाढ़ आणि तिसऱ्या ओळीतून कर्जामध्ये अड़ीच टक्के (२.५%) घट झालेली स्पष्ट होते.

कर्जखाते, बटाई खाते आणि नगदी सुरक्षित राशीच्या संख्येवर कर्जप्रमाणातील परिवर्तनाचा काहीच परिणाम झालेला नाही. देण्यात आलेली कर्जे आणि बटाई तत्त्वावर देण्यात आलेल्या कर्जावरच पूर्ण परिणाम झालेला आहे. पहिल्या आणि दुसऱ्या ओळींचा तुलनात्मक अभ्यास केल्यास हे स्पष्ट होते की, कर्जप्रमाणात अड़ीच टक्के (२.५%) वाढ़ झाल्यामुळे कर्जपुरवठ्यात १५०० ची वाढ़ आणि बटाई भांडवलपुरवठ्यात १५०० ची घट होते. पहिल्या आणि तिसऱ्या ओळीचा अभ्यास केल्यास लक्षात येईल की कर्जप्रमाणातील अडीच टक्के (२.५%) घट होण्याच्या परिणामी १५०० ची घट झाली. परंतु बटाई भांडवलपुरवठ्यात १५०० ची वृद्धीसुद्धा झाली.

कर्जपुरवठ्यासंबंधीच्या नियमानुसार आम्ही असा प्रस्ताव सादर करीत आहोत की, एखाद्या बँकेस केंद्रीय बँकेकडून मिळणारी कर्जराशी ही अशा कर्जाच्या राशीवर अथवा संख्येवर अवलंबून असेल जे तिने दिले आहे. अर्थात कर्ज देण्याच्या प्रमाणानुसारच त्या बँकेस केंद्रीय बँकेकडून कर्ज मिळेल. त्यामुळे कर्जप्रमाणावरील परिवर्तनाचा प्रभाव केंद्रीय बँकेकडून होणाऱ्या अर्थपुरवठा अथवा कर्जप्राप्तीवर पड़तो हे निश्चित. केंद्रीय बँकेस या कर्जराशीत कोणतेच परिवर्तन घड़वू इच्छित नसल्यास केंद्रीय बँकेस कर्जप्रमाणातील परिवर्तनाबरोबरच कर्जपुरवठ्याच्या प्रमाणातसुद्धा योग्य परिवर्तन करावे लागेल. मात्र कर्जप्रमाणात करण्यात आलेले परिवर्तन जर अल्पसे असेल आणि कर्जपुरवठ्याच्या प्रमाणात बदल करण्यासारखी परिस्थिती नसेल तर असे प्रयत्न करण्याची गरज नाही.

६) विविध साधनांचा वापर

वर केंद्रीय बँकेच्या वित्तासंबंधी धोरण व नीतीची उद्दिष्टे आणि ते साध्य करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साधनांचा जो अभ्यास करण्यात आला आहे, याच्या पूर्ततेसाठी या बाबींकडे संकेत करणे आवश्यक ठरेल की, बऱ्याच वेळी केंद्रीय बँकेस एखाद्या हेतुपूर्तीस्तव एकाच वेळी अनेक साधनांचा वापर करावा लागतो. उदाहरणार्थ, प्रचंड वित्तवृद्धीच्या मानसिकतेचा सामना करण्यासाठी वित्तपुरवठ्यात घट करण्यासाठी नगदी सुरक्षित राशीच्या प्रमाणात वृद्धी करण्यासाठी ज्या उद्योगांमध्ये समतोलाच्या मर्यादेपेक्षा जास्त गतीने भांडवल गुंतवणूक होत असेल, त्यासाठी त्यासंबंधी कर्जांच्या

तुलनेत कर्जपुरवठ्याच्या प्रमाणात घट करण्यासाठी आणि रोखेविक्री करण्याचे प्रयत्न एकाच वेळी केले जाऊ शकतात. याचप्रमाणे वित्तामध्ये घट होण्याच्या प्रसंगी स्थायी गरज असल्यास नगदी सुरक्षित राशीमध्ये घट करण्याचा, काहीं उद्योगांना देण्यात येणाऱ्या कर्जांवर (Against Loans) कर्ज देण्याच्या प्रमाणात (Borrowing Ratio) वाढ़ करण्याचा आणि भाग (Shares) खरेदी करण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो. त्याचप्रमाणे विविधप्रसंगी ज्यांचा संबंध वित्तपुरवठा, शासकीय रोख्यांचा दर आणि कर्ज व बटाई भांडवलादरम्यान समतोल साधण्याशी असतो. अशा विविध साधनांचा एकाच वेळी वापर करणे जास्त प्रभावी होऊ शकते. याची कित्येक उदाहरणे सहज तयार करता येतील.

या प्रकरणात व्याजमुक्त अर्थकारणात केंद्रीय बँकेची कृती आणि कार्य, तसेच तिच्या साधनांची जी माहिती मिळविण्यात आली आहे, यावरून असा निष्कर्ष समोर येतो की, व्याजास निषिद्ध जाणून व त्यापासून स्वत:स चार पाऊले दूर ठेवूनसुद्धा केंद्रीय बँक आपले कार्य व्यवस्थित आणि यशस्वीपणे चालवू शकते. व्याजमुक्त अर्थव्यवस्थेतसुद्धा वित्तीय धोरण, ही एक केवळ अर्थपूर्ण बाबच नसून यामध्ये एवढ़ी लवचीकता आहे की, यामध्ये परिस्थितीनुसार परिवर्तन करून कल्याणकारी राज्याच्या उच्च उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी त्यांचा यथायोग्य वापर करता येतो.

केंद्रीय बँक राज्याच्या सरकारी भांडवलावर स्थापन करण्यात येईल. या बँकेचा व्यवस्थापकीय खर्च काही प्रमाणात बँकेस होणाऱ्या नफ्यातून भागविण्यात येऊ शकतो. अर्थात शासकीय भागीदारी आणि शासकीय रोखेविक्री व बटाईमधून होणाऱ्या कमाईतून काही प्रमाणात हा खर्च भागविण्यात येईल. परंतु ही कमाई निश्चितपणे होईलच असेही नाही, तसेच व्यवस्थापनाचा पूर्ण खर्च यातून पूर्ण होणे हे सुद्धा कठीण आहे. म्हणून केंद्रीय बँकेचा खर्च पूर्ण करण्यासाठी दोन पद्धती आहेत. यांपैकी एका पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. त्यामुळे यास एक आवश्यक समाजसेवेचे महत्त्वपूर्ण साधन समजून तिचा पूर्ण खर्च शासनाच्या तिजोरीतून पूर्ण करण्यात यावा. तसेच इतर सामाजिक सेवेप्रमाणेच हिच्यासाठीसुद्धा वसुलीमाध्यमे असावीत अथवा या खर्चांची जवाबदारी सामान्य व्यावसायिक बँकांवर टाकण्यात यावी. या हेतुपूर्तीसाठी बँकांतील व्यावसायिक भांडवलांच्या प्रमाणानुसार ठराविक वार्षिक शुल्क आकारता येऊ शकते. परंतु आम्ही पहिल्या पद्धतीस प्राधान्य देत आहोत. म्हणजेच केंद्रीय बँकेच्या व्यवस्थापनाचा पूर्ण खर्च राज्याच्या तिजोरीतूनच उचलण्यात यावा. मात्र कर लावतेवेळेस बँकिंग व्यवसायावर विशेष कर लावण्याचे शासनास अधिकार असतील.

प्रकरण नववे

बँकिंग व्यवस्था आणि सार्वजनिक वित्त

व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेचे जे स्वरुप मागील प्रकरणात सादर करण्यात आले आहे, त्यामध्ये 'सार्वजनिक वित्त (Public Finance)' संबंधी कोणताच अडथळा येत नाही वा त्यास बगलही देण्यात आली नाही. याचे कारण असे आहे की, एका इस्लामी शासनात जोपर्यंत शासनाच्या कमाईची साधने आणि खर्चांचे तपशीलवार व सूक्ष्म निरीक्षण आपण करीत नाही, अर्थशास्त्राच्या विषयात या राज्याची उद्दिष्टे व लक्ष्य स्पष्ट करण्यात येत नाहीत आणि या स्पष्टीकरणाच्या आधारे त्यांना साध्य करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या साधनप्रणाली व प्रयत्नावर सविस्तर चर्चा होत नाही, तोपर्यंत सार्वजनिक वित्ताविषयी चर्चा पूर्ण होऊ शकत नाही. हे कार्य वेगळ्या पद्धतीने करण्यात यावे. परंतु सार्वजनिक वित्ताविषयी दोन बाबीं अशा आहेत की ज्यांचा वित्त आणि बँकिंग व्यवस्थेशी एवढा घनिष्ठ संबंध आहे की याशिवाय शासनाकडून भागीदारी आणि बटाई तत्त्वावर भांडवल प्राप्त करणे आणि कर्ज घेणे शक्य होणार नाही.

एखाद्या देशात वित्त आणि बँकिंगशी संबंधित केंद्रीय बँकेचे धोरण हे शासनाच्या महत्त्वपूर्ण हेतुंच्या अधीन असते व या हेतुंना समोर ठेवूनच हे धोरण तयार करण्यात येत असते. मागील प्रकरणामध्ये केंद्रीय बँकेच्या कृती आणि कार्याचा जो प्राथमिक आराखड़ा अथवा स्वरूप सादर करण्यात आला होता, त्यात आणखीन विस्तार आणि गुंता निर्माण होतो. ज्या वेळी आपण राज्याची आर्थिक उद्दिष्टे आणि लक्ष्यांसंबंधी विविध परिस्थितींत राबविण्यात येणाऱ्या विभिन्न धोरणांचा अभ्यास करतो तेव्हा, ही बाब स्पष्ट होते की सार्वजनिक वित्तासंबंधी उपरोल्लेखित बाबींचे निरीक्षण केल्यावर आपणास केंद्रीय बँकेच्या काही नवीन कार्यपद्धतींवर प्रकाश टाकणे शक्य होईल.

इस्लामी राज्य ही एक उद्दिष्टपूर्ण संस्थाच आहे. ती व्यवस्थित चालविण्यासाठीच्या खर्चाचे निश्चितीकरण हे बऱ्याच अंशी तिच्या उद्दिष्टपूर्तीच्या मागणीवर अवलंबून असते. राज्यास आपला खर्च भागविण्यासाठी भरपूर आर्थिक साधनांची गरज पडेल. आपण विस्तार- पूर्वक चर्चा न करता केवळ असे गृहीत धरून चर्चा करूया की या प्रगत काळातील इतर राज्याप्रमाणेच इस्लामी राज्यालासुद्धा वित्तीय साधने पुरविण्याकरिता विभिन्न पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे. यामध्ये कर (Tax), नफादायक व्यवसाय, भागीदारी आणि बटाई तत्त्वांवर भांडवल प्राप्त करणे आणि कर्ज घेणे यासारख्या बाबींचा समावेश असेल. आर्थिक गरजांचा विस्तार आणि साधनांच्या पुरवठ्यासाठी उपरोल्लेखित प्रणालींचा अवलंब करण्याची गरज असल्याच्या

समर्थनार्थ येथे केवळ थोडक्यात काही बाबींकडे अंगुलीनिर्देश करण्यात येत आहे. या प्रकरणात एक निर्णायक बाब, ही इस्लामी राज्याच्या आर्थिक जबाबदाऱ्या होय. यावर आम्ही वेगळी चर्चा केलेलीच आहे. (यासाठी ''इस्लामी रियासत की ज़िम्मेदारियां,'' 'इस्लाम का नज़रिये मिलकियत,' (उर्दू) प्रकरण अकरावे यांचा अभ्यास करावा.) या चर्चेचा खुलासा हा आहे की इस्लामी शासन त्याच्या राज्यसीमेत वसलेल्या समस्त मानवजातीच्या मौलिक गरजा यथायोग्य प्रमाणानुसार पूर्ण करण्याची हमी देते. अर्थात हे शासन राज्यातील प्रत्येक व्यक्तीस अन्न, पाणी, वस्त्र, आवास, आरोग्यपूर्ती आणि शिक्षण व प्रशिक्षणाची उत्तम व्यवस्था करील. तसेच राज्यातील नागरिकांच्या प्राण, संपत्ती, इभ्रत व शीलतेचे पूर्ण संरक्षण करील. कारण याशिवाय उपरोल्लेखित जबाबदाऱ्या पूर्ण करता येणे शक्यच नाही. तिसरी महत्त्वाची आर्थिक जबाबदारी अशी की, समाजात संपत्ती आणि मिळकतीच्या वाटणीमध्ये आढळणाऱ्या असामान्य तफावतीस कमी करणे होय. यापेक्षाही जास्त असे की इस्लामी शासन हे जनतेची प्रतिनिधी संस्था असण्याच्या नात्याने अशा सामुदायिक गरजाची पूर्तता करण्याचासुद्धा प्रयत्न करील ज्या आधुनिक संस्कृतीमध्ये अस्तित्वात आहेत.

आजच्या प्रगत काळामधील कल्याणकारी राज्यांसमोर वित्तासंबंधी सामान्यत: जी उद्दिष्टे असतात, तीच उद्दिष्टे इस्लामी राज्यांसमोरसुद्धा असतील. कारण यांचा संबंध जनतेच्या कल्याणाशी, त्यांच्या गरजा पूर्ण करण्याशी, समाजात स्थैर्य, शक्ती आणि क्षमता निर्माण करण्याशी असतो. म्हणजेच हे सर्वकाही इस्लामी राज्याच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी असते. वैयक्तिक स्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य आणि धर्मस्वातंत्र्याच्या आधारांवर एका पवित्र समाजाची निर्मिती करणे हा हेतू सुद्धा असतो. या महत्त्वपूर्ण उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी इतर प्रयत्नांबरोबरच सार्वजनिक संपत्ती आणि वित्त व बँकिंगसंबंधी साधनांचासुद्धा वापर करील.

शासनास मिळणाऱ्या कमाईसाधनांना इस्लामी धर्मशास्त्रात निषिद्ध ठरविण्यात आलेले नसून परिस्थितीनुसार यामध्ये बरीच सवलत असते. (याविषयी सविस्तर माहितीस्तव इस्लाम का नज़रये मिल्कियत' (उर्दू) तील सातव्या, आठव्या, अकराव्या आणि बाराव्या प्रकरणाचा अभ्यास अवश्य करावा.) या ठिकाणी या विषयावर चर्चा न करता आपण याविषयी चर्चा करुया की इस्लामी शासनास भागीदारी आणि बटाई तत्त्वावर रयतेकडून भांडवल प्राप्त करण्याची आणि रयतेकडून कर्ज घेण्याची गरजसुद्धा पडेल. आपण याठिकाणी संक्षिप्तरित्या या विशिष्ट गरजांचा उल्लेख करुया. तसेच हेदेखील स्पष्ट करण्यात येईल की, या गरजांच्या पूर्ततेच्या साधनांचा वापर कशारितीने करण्यात येईल.

१) शासनाचे विविध खर्च आणि उत्पन्नसाधने

शासनाच्या सामान्य आर्थिक गरजांचा आणि त्यावर येणाऱ्या खर्चाचा विचार केल्यास हा खर्च 'कर' (Taxes) वसूलीतून भागविण्यात यावा. देशाची व्यवस्था चालविण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी, तसेच देशात शांती व न्याय कायम ठेवण्यासाठी आणि देशाचे रक्षण करण्यासाठी येणारा खर्च हा या विषयात समाविष्ट असेल. शिक्षण आणि आरोग्यासारख्या मूलभूत कल्याणकारी सेवासुद्धा कराच्या माध्यमाने पुरविण्यात याव्यात. मात्र आर्थिक प्रगतीच्या योजना आणि कल्याणकारी सेवांवर येणारा खर्च हा शासकीय खर्चात समाविष्ट नसेल.

रयतेच्या जीवनावश्यक मूलभूत गरजा 'उश्र' (उत्पन्नातील १० टक्के जनकल्याणास्तव देण्यात येणारा निधी) आणि 'ज़कात' (उत्पन्नातील अडीच टक्के देण्यात येणारा अनिवार्य निधी) प्राप्ती व याव्यतिरिक्त इतर प्रकारच्या कर वसुलीच्या उत्पन्नातून भागविण्यात याव्यात. देशाच्या आर्थिक प्रगती आणि विकासास, तसेच आर्थिक स्थैर्यासाठी असलेल्या योजना राबविण्यासाठी आवश्यक असलेली विस्तीर्ण स्वरुपाची साधने केवळ कर लागू करून निर्माण करता येणे शक्य नाही. या उद्दिष्टपूर्तीसाठी दुसरे साधन हे संपत्तीनिर्मिती आणि राज्यशासनाच्या देखरेखीखाली राबविण्यात येणाऱ्या व्यवसायातील 'नफा' होय. परंतु वर्तमान युगातील राज्य, विशेषत: विकास करीत असलेल्या देशांच्या प्रयोगानुभवावरून हे सिद्ध झाले की, ही साधनेसुद्धा अपुरीच आहेत. यासाठी आर्थिक प्रगती साधणाऱ्या योजनांतर्गत जनतेने काटकसर करून जमा केलेला पैसा बटाई आणि भागीदारी तत्त्वावर मिळवावा. तसेच जनतेने बचत करून जमा केलेला पैसा कर्ज स्वरुपात घेण्यात यावा आणि हे उद्दिष्ट पूर्ण करावे.

या ठिकाणी ही गोष्ट लक्षपूर्वक समजून घेतली पाहिजे की राज्याच्या देखरेखीखाली प्रगती साधणाऱ्या योजना राबविण्यासाठी ही बाब मौलिक महत्त्वाची आहे की, जनतेने तिला शेती, मजुरी, कारागिरी अथवा उद्योग वा इतर साधनांतून मिळत असलेल्या अर्थप्राप्तीतून एक मोठा भाग जीवनावश्यक वस्तुंच्या निर्मितीमधून वेगळा काढावा आणि या बचतराशीवर भांडवली वस्तु (Capital goods) उभ्या करण्यात आणि या भांडवली वस्तुंची अशा उद्योगांत गुंतवणूक करावी की, ज्यामधून यापुढे वाढ़ीव वस्तु व साहित्य निर्माण करण्यासाठी नवीन उपकरणे आणि साहित्य वगैरे निर्माण करता येतील. जनतेकडून कराच्या स्वरूपातील उत्पन्न अथवा कर्ज किंवा भागीदारी व बटाई तत्त्वावर त्यांच्या उत्पन्नाचा एक भाग प्राप्त करण्याचे मौलिक महत्त्व हेच आहे की

नागरिकांच्या खरेदीशक्तीमध्ये आलेल्या मरगळ व न्यूनतेच्या प्रमाणातच वापर वस्तुंची मागणी कमी होते, आणि उत्पन्नातील एक भाग पृथक होतो. उत्पन्नाचा हाच भाग प्राप्त झालेल्या आर्थिक साधनांच्या माध्यमाने राज्यशासन विकासकार्यांत वापरण्यासाठी खरेदी करू शकते. असे न केल्यास या गोष्टीची संभावना आहे की, जास्त साधने ही वर्तमान गरजांच्या पूर्ततेसाठीच वापरात येऊन दीर्घमुदतीच्या भांडवलनिर्मितीच्या माध्यमाने आर्थिक विकास आणि स्थैर्याने प्रयत्न करणे शक्य होणार नाहीत. देशाची प्रगती आणि विकास साधणे ही इस्लामी शासनाची एक महत्त्वपूर्ण जवाबदारी असल्यामुळे या शासनास ही जवाबदारी पूर्ण करण्यासाठी संपूर्ण धर्मसंमत आणि वैध मार्गांचा अवलंब करणे आवश्यक ठरेल. एखाद्या युद्धप्रसंगी इस्लामी शासनास अर्थशक्तीची मोठी गरज पडल्यास शासनाच्या तिजोरीतील पैसा अपुरा पडण्याचीसुद्धा संभावना असते. तसेच केवळ करवसुलीच्या उत्पन्नातूनसुद्धा सामरिक खर्च भागविणे शक्य नसते. कारण एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त कर लागू केल्याने तऱ्हेतऱ्हेच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि व्यवस्थापकीय समस्या निर्माण होतात. अशा बिकटप्रसंगी नागरिकांकडून सेवाभावातून आर्थिक मदत प्राप्त करण्याच्या प्रयत्नांबरोबरच त्यांच्याकडून कर्जभांडवल मिळवावयास हवे.

इस्लामी शासनास काही अस्थायी समस्यांच्या समाधानासाठीसुद्धा कर्जाची गरज पडू शकते. वर्षभरामध्ये काही ठराविक काळातच शासनास जास्त उत्पन्न होत असते. अर्थात हा उत्पन्नाचा काळ म्हणजे या काळाच्या काही आठवड्यांत 'उश्र' (१० टक्के निधी), जकात (अड़ीच टक्के निधी) व इतर काही वार्षिक कर वसुलींचे सहामाही हप्ते वसूल करण्यात येतात. परंतु शासनास संपूर्ण वर्षभर खर्च भागविण्यासाठी सतत पैशांची गरज असते. उदाहरणार्थ, कर्मचाऱ्यांचा पगार, आवश्यक वस्तुंची खरेदी वगैरेसाठी वर्षभर पैसा लागतोच. म्हणजे ठराविक काळात मिळणारा पैसा आणि सतत होणारा खर्च यामध्ये खूप तफावत असते. यामुळे शासनास आपला सततचा खर्च भागविण्यासाठी कर्ज घेण्याची आवश्यकता असते. आधुनिक काळात प्रत्येक राज्यास याची आवश्यकता भासते आणि अल्पमुदतीवर आधारित रोखे जारी करून व्याजावर कर्ज घेण्यात येते आणि ही आवश्यकता पूर्ण करावी लागते.

उपरोल्लेखित आवश्यकतांव्यतिरिक्त जनतेकडून कर्ज मिळविण्याची पद्धत, ही सामान्य वित्तासंबंधी धोरणांचे एक मुख्य साधन होय. कधीकधी हे साधन केवळ याकरिता उपयोगात आणण्यात येते की, पूर्ण अर्थव्यवस्थेमध्ये प्रभावी मागणी कमी

होण्यासाठी लोकांकडून त्यांच्या उत्पन्नाचा एक भाग परत घेण्यात यावा. ही कृती वित्तवृद्धी संतुलित करण्यासाठी करवसुलीबरोबरच करण्यात येते किंवा करांमध्ये अतिरिक्त वाढ अयोग्य वाटल्यास केवळ ही एकच कृती करण्यात येते. बदललेल्या परीस्थितीत ज्या वेळी शासनास प्रभावी मागणीमध्ये वृद्धी योग्य वाटत असेल तेव्हा घेतलेले कर्ज परत करून जनतेच्या खर्चशक्तीमध्ये वृद्धी होण्यासाठी जनतेस अतिरिक्त धन अथवा पैसा शासनातर्फे देण्यात येऊ शकतो. इस्लामी शासनसुद्धा याचप्रमाणे आर्थिक धोरणाच्या या महत्त्वपूर्ण साधनाचा वापर करील. हासुद्धा शासनाकडून कर्ज घेण्याचा एक मौलिक आधार असेल.

वित्तसाधनांच्या पुरवठ्यासाठी कर्ज मिळविण्याच्या अथवा भागीदारी आणि बटाईच्या नियमांना आधार बनविण्याच्या बाबतीत आम्हास अधिक सविस्तर चर्चा करण्याची गरज भासत नाही. कारण आमचा हेतु केवळ एवढाच आहे की, काही अशा बाबी आपणासमोर मांडाव्यात, ज्यांचा संबंध इस्लामी शासनाने कर्ज घेणे अथवा भागीदारी आणि बटाई तत्त्वांवर भांडवल प्राप्त करण्याशी आहे. वित्तशास्त्र आणि सार्वजनिक वित्ताचा अभ्यास करणाऱ्यांना उपरोल्लेखित विषयाची चांगली माहिती आहे. विधीनुसार इस्लामी शासनासाठी कर्ज घेणे अथवा भागीदारी व बटाई तत्त्वांवर कर्ज घेण्यात काहीच गैर नाही. एवढेच नव्हे तर इतिहासात इस्लामी शासनांनी कर्ज घेतल्याची बरीच उदाहरणे आहेत. त्याचप्रमाणे विधीशास्त्रांनी स्पष्टीकरणसुद्धा केलेले आहे की, असे प्रसंग वा बिकट परिस्थितीतसुद्धा येण्याची शक्यता असते. ही परिस्थिती बदलण्यासाठी 'बैतुल माल' (जनकल्याण निधी) तून शासनास कर्ज घेण्याची गरज पडते. बटाई तत्त्वावर सरकारी जमिनी कृषीसाठी देणे आणि 'बैतुल-माल'मधून भांडवल पुरविण्याचीसुद्धा उदाहरणे इतिहासात आहेत.

शासनाच्या आर्थिक गरजांच्या पूर्ततेसाठी आणखीन एक पद्धत आहे आणि ती म्हणजे नवीन वित्तनिर्मिती अथवा वित्तहानी (Deficit Financing) होय. या पद्धतीत 'कर' वसुलीतून मिळणारे उत्पन्न, लोकांकडून घेण्यात आलेले कर्ज व बटाई आणि भागीदारी तत्त्वांवर मिळविलेल्या एकूण संपत्तीपेक्षाही जास्त प्रमाण खर्चाचे असते. ही हानी नवीन वित्तनिर्मितीच्या साह्याने भरून काढण्यात येते. अशा रितीने खर्च पूर्ण केल्याने वित्त-पुरवठ्यात होणाऱ्या वाढीमुळे किमान काही काळापुरते का होईना, वस्तुंच्या बाजारभावात वाढ होते. अर्थात वित्ताची खरेदीशक्ती कमी होते. प्रत्येक वित्तधारक अशाप्रसंगी नेहमीपेक्षा कमी वस्तु आणि सेवा खरेदी करतो. त्याचप्रमाणे शासन नवीन

वित्ताच्या साह्याने वस्तु आणि सेवेच्या प्रमाणावर ताबा मिळविते. कारण ही पद्धत अवलंबिण्यात न आल्यास परिस्थिती आवाक्याबाहेर जाते. वित्तहानी (Deficit Finance) चा प्रभाव हा गोरगरीब आणि श्रीमंत या सगळ्यांवरच सामान्य कराच्या (Common Tax) स्वरुपात एकसारखा पडतो. अल्पकाळात वस्तु, सेवानिर्मिती आणि वित्तपुरवठ्याच्या प्रमाणात वृद्धी करण्याच्या कार्यात शासनाने जर नवीन वित्तनिर्मितीचा वापर केला तर याच्या परिणामस्वरुपी भाववाढ होणार नाही आणि वस्तु व सेवांचे दर पूर्वपदावर येतील, तसेच वित्तातील खरेदीशक्ती (Purchasing Power) पूर्वपदावर येईल. म्हणूनच प्रगत देशांमध्ये ज्या वेळी निर्मितीक्षमता (Productivity Capacity) असूनसुद्धा केवळ मागणीअभावी बाजारात खरेदी-विक्रीमध्ये मरगळ (Depression) निर्माण होण्याची संभावना दिसते, तेव्हा याच पद्धतीचा अवलंब करण्यात येतो आणि याचे परिणामसुद्धा सरासरी चांगलेच मिळतात. कमी प्रगती असलेल्या देशांमध्येसुद्धा विकास योजना पूर्ण करण्यासाठी कधीकधी या पद्धतीचा अवलंब करणे योग्य वाटते, परंतु त्या ठिकाणी या पद्धतीचे परिणाम अपेक्षेनुसार चांगले मिळत नसून वस्तुंच्या दरांमध्ये कमतरता येत नाही, हे अनुभवावरून सिद्ध झाले. ही पद्धत न आवडण्याचे आणखीन एक असे कारणसुद्धा आहे की ज्या वेळी वस्तुंचे भाव वाढ़त असतात, तेव्हा वस्तुंच्या वाढ़त जाणाऱ्या किंमतींच्या प्रमाणात वाढ़त असलेली कमाई अथवा मिळकत असलेले समाजातील काही घटक या संधीचा असामान्य फायदा घेत असतात. या उलट समाजाचा दुसरा घटक असामान्य परिस्थितीशी झुंजत असतो. ही पद्धत सामाजिक न्यायास अनुसरून नसल्यामुले केवळ बिकट आणि प्रतिकूल परिस्थितीतच नाईलाजास्तव अवलंबता येईल. युद्धजन्य परिस्थिती अथवा इतर आपत्तीजनक परिस्थितीत निर्माण होणाऱ्या अपवादात्मक परिस्थिती वगळता विकास योजना पूर्ण करण्यासाठीसुद्धा केवळ एवढ्यापुरतेच या पद्धतीचा वापर करण्यात यावा की, जेव्हा याशिवाय दुसरा पर्यायच नसतो.

२) भागीदारी आणि बटाई तत्त्वावर भांडवलपुरवठा

उपजीविकेची सार्वजनिक क्षेत्रे (Public Sectors) आणि विकास योजनांवर या ठिकाणी सविस्तर चर्चा करणे योग्य ठरणार नाही. याठिकाणी केवळ एवढ़ेच स्पष्ट करणे योग्य ठरेल की, काही क्षेत्रे अशा स्वरुपाचे आहेत की, ज्या ठिकाणी भागीदारी आणि बटाई तत्त्वांवर पुरविण्यात आलेले भांडवल गुंतविणे शक्य आहे, तसेच काही क्षेत्रांत हे शक्य होणार नाही. लोकांकडून भागीदारी आणि बटाई तत्त्वांवर मिळविण्यात आलेले

भांडवल केवळ अशाच व्यावसायिक संस्थांमध्ये देणे योग्य ठरेल, ज्यांची उत्पादने खुल्या बाजारात विक्रीयोग्य असतील आणि त्यात नफा व तोट्याचा हिशोब लावणेसुद्धा शक्य आणि सोपे असेल अथवा त्यातील उत्पादन सार्वजनिक क्षेत्रातील एखाद्या कारखान्यात कच्च्या मालाच्या स्वरुपात वापरण्यायोग्य असेल आणि या कारखान्यातील उत्पादने खुल्या बाजारात विक्री योग्य असतील. या स्वरुपाच्या नसलेल्या वा या कसोटीवर न उतरणाऱ्या उद्योगांमध्ये केवळ राष्ट्रीय भांडवलच अर्थात शासनाचेच भांडवल गुंतविण्यात यावे. अणुशक्ती, हत्यारे व युद्धसामग्री निर्माण करणारे कारखाने, जलपुरवठा व जलसंवर्धनाच्या योजनास्तव मोठमोठी धरणे व यासंबंधित पाण्यापासून विद्युतनिर्मिती करणारे प्रकल्प, तसेच दळणवळणासंबंधी बऱ्याचशा योजनांवर भागीदारी आणि वाईट तत्त्वावर भांडवल लावू नये. कारण या योजनांतून मिळणारे उत्पन्न विकता येणे शक्य नसते, तसेच हे एका अत्यावश्यक असलेल्या सामाजिक गरजपूर्तीस्तव अशा आर्थिक मोबदल्यात या योजनांच्या लाभांचा पुरवठा करण्यात येतो की यामध्ये नफा व तोट्याची निश्चिती न करता इतर बाबींचाच विचार करण्यात येतो. या उलट यंत्राचे भाग (Machine Spare Parts), विद्युत साधने (Electrical Goods) घड्याळे, मोबाईल, रेडियो, संगणक संच, दूरध्वनी (Telephone) दूरदर्शन संच (T.V.), कार्स, दुचाकी, तीनचाकी, ट्रक्स, बसेस आणि कृषीयंत्रे वगैरे निर्माण करणारे कारखाने उपरोल्लेखित कसोटीवर उतरतात. याखेरीज एक मोठी लिस्ट अशा उद्योगांची आहे की त्यात उत्पादननिर्मिती ही दीर्घ कालावधित होत असल्यामुळे नफावाटणीत काही अडचणी निर्माण होतात, तरीसुद्धा या उद्योगांत भागीदारी व बटाई तत्त्वावर मिळविलेले भांडवल गुंतविणे योग्य ठरेल. पोलाद, तांबे, अल्युमिनियम आणि यासारखे इतर धातू तसेच खनिज वस्तुसंबंधित असलेले उद्योग, पेट्रोल, रासायणिक मिश्रणे, रासायनिक खत, सिमेंट आणि अवजड यंत्रासंबंधित उद्योगसुद्धा याच यादीत मोडतात.

सार्वजनिक क्षेत्रात (In Public Sector) भांडवलनिर्मितीसाठी भागीदारी आणि बटाई तत्त्वावर नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात भांडवल मिळविण्यासाठी हे मात्र आवश्यक आहे की नागरिकांना या गोष्टीची पूर्ण शाश्वती आणि विश्वास असावा की त्यांनी गुंतविलेले भांडवल निश्चित झालेल्या वेळी त्यांना प्रमाणबद्ध नफ्यासहित परत मिळेल. त्याचप्रमाणे या गोष्टीवरसुद्धा विश्वास असावा की खाजगी क्षेत्रात (Private Sector) भांडवल लावून मिळणाऱ्या नफ्याच्या प्रमाणापेक्षा कमी नफा यात मिळणार नाही. जर एक इस्लामी शासन भागीदारी आणि बटाई तत्त्वावर भांडवलपुरवठ्याची अशी

व्यवस्था अमलात आणण्यात यशस्वी झाले तर निश्चितच नागरिक, व्यावसायिक संस्था आणि बँकांकडून प्रचंड प्रमाणात भांडवल प्राप्त होईल. आम्हास विश्वास आहे की शासनास अशी योजना यशस्वीपणे राबविण्यात कोणतीच अडचण येणार नाही.

यापूर्वीच आम्ही सविस्तरपणे या गोष्टीवर चर्चा केली आहे की, भागीदारी आणि बटाईदरम्यान कोणता फरक आहे. हा फरक दृष्टीसमोर ठेवून आम्ही नागरिकांकडून शासनाने भांडवल गोळा करण्याचे दोन विविध स्वरुप सादर करीत आहोत. पहिले स्वरुप बटाई वर आधारित असून दुसरे स्वरुप भागीदारीवर आधारित आहे. पुढे याचे स्पष्टीकरण करण्यात येईलच. भांडवल गुंतवणुकीच्या या स्वरुपांमुळे बचत करणारे आणि भांडवल गुंतवणुकदारांना सवलत निर्माण होईल.

३) बटाईचे शासकीय रोखे

इस्लामी शासनास बटाई तत्त्वावर भांडवल मिळविण्यासाठी एखादा विशिष्ट कारखाना वा उद्योग किंवा सामान्यत: सार्वजनिक क्षेत्रातील काही उद्योगांमध्ये भांडवल गुंतवणुकीसाठी ठराविक रकमांचे रोखे (Shares) ठराविक मुदतीसाठी जारी करावे लागतील. उदाहरणार्थ, एक हजार, दहा हजार, एक लाख वगैरे दरांचे रोखे (Shares) असावेत. या रोख्यांची मुदत सहा महिने, वर्ष, दोन वर्षे, पाच वर्षे वगैरे असावी. प्रत्येक रोख्यावर शासन आणि रोखेदाराच्या नफ्याचे प्रमाण आणि मुदतीची तारीखनिहाय नोंद असावी. त्याचप्रमाणे संबंधित उद्योग व्यवसायात तोटा अगर नुकसान झाल्यास या तोट्याचा अंशसुद्धा रोखेदाराच्या भांडवलातून वजा करून बाकीची रक्कम परत करण्यात येईल. कारण बटाई तत्त्वावर देण्यात येणारे भांडवल हे होणाऱ्या नुकसानीच्या प्रमाणात कमी होत असते. अशा प्रकारे प्रत्येक रोखे खरेदीदार हा शासनासह बटाई ठराव करणारा असेल. या ठरावाबाबत आम्ही यापूर्वी ''शिर्कत और मुज़ारिबत के शरई उसूल (उर्दू)'' या पुस्तकात सविस्तर चर्चा केली आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो की शासन या रोख्यांच्या विक्रीच्या माध्यमाने जमा होणाऱ्या भांडवलाची ज्या उद्योगात गुंतवणूक करील, त्यावरील नफा व तोट्याचा हिशेब लावण्याची प्रणाली काय असेल? तर या प्रश्नाचे उत्तर मागील प्रकरणात देण्यात आलेले आहेच. शासन व्यावसायिक संस्थांमध्ये सहामाही अथवा वार्षिक प्रमाणे जमा-खर्चाचा हिशोब ठेवील. या हिशेबानुसार नफा व नुकसानीचे प्रमाण निश्चित करण्यात येईल. या व्यावसायिक संस्थांमध्ये शासन आपले भांडवल आणि कर्जस्वरुपात घेतलेले भांडवलसुद्धा गुंतवू शकते. अशा परिस्थितीतसुद्धा नफा व नुकसान ठरविण्याच्या नियमांवर मागील प्रकरणात सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे.

या रोख्यांची मुदत दीर्घ असली तरी सहा महिने वा वार्षिक काळ पूर्ण झाल्यास हिशेब करणेच योग्य ठरेल. समजा, रोख्यांची मुदत एक वर्ष ते दहा वर्षांपर्यंतची आहे आणि ज्या व्यावसायिक संस्थेत भांडवल गुंतविण्यात आलेले आहे, त्या ठिकाणी वार्षिक मुदतीवर हिशेब लावण्याची पद्धत प्रचलित आहे. अशा परिस्थितीत दरवर्षी प्रत्येक रोख्याच्या वाटणीस येणारा नफा रोखेधारकांना वाटण्यात यावा. ज्या वर्षी व्यवसायात तोटा झाला असेल, त्या वर्षी नफा वाटणीऐवजी रोखेधारकांना सूचना देण्यात येईल की, यावर्षी त्यांच्या भांडवलात एवढी (तोट्याच्या प्रमाणात) घट होऊन त्यांचे भांडवल इतके शिल्लक राहिले आहे. रोखेधारकांकडून व्यवसायात होणाऱ्या नुकसानीच्या प्रमाणातील भरपाईरक्कम परत मागण्याची गरज नाही. अशा रितीने एखाद्या रोख्यांची मुदत पूर्ण झाल्यास रोखेधारकांचे पूर्ण भांडवल या वर्षाच्या नफा व नुकसानीच्या पूर्ण प्रमाण हिशेबानुसार परत करण्यात येईल. जर एखाद्या कारखान्यात एकाच मुदतीच्या ठरावानुसार जमा करण्यात आलेले भांडवल गुंतविण्यात आले असेल तर हिशेब करणे जास्त सोपे व सोईस्कर ठरेल. परंतु एका कारखान्यात विविध मुदतीवरील रोख्यांचे भांडवल गुंतविल्यास काही विशेष समस्या निर्माण होणार नाहीत.

दरवर्षी शासनातर्फे बटाई रोख्यांची यादी जाहीर करून नवीन भांडवल गोळा करू शकेल व त्याचबरोबर दरवर्षी शासनास मुदत पूर्ण झालेल्या रोख्यांचे भांडवल परतसुद्धा करावे लागेल. सार्वजनिक क्षेत्रात भांडवलात वाढ करण्यासाठी शासन प्रयत्नशील असेल. त्याचप्रमाणे रोखेधारकांना मुदतीअंती परत करण्यात येणाऱ्या भांडवलापेक्षा रोखेविक्रीतून प्राप्त होणाऱ्या भांडवलात घट न होऊ देता त्यात वृद्धी करण्याचे सतत प्रयत्न शासन करील. यामुळे राष्ट्रीय वर्तुळातील व्यवसाय आणि उद्योगधंदे सतत चालू राहतील आणि यासाठी भांडवलाची चणचण भासणार नाही. एका प्रगत उपजीविकेमध्ये असे प्रयत्न करणे म्हणजे यशाचे शिखर गाठणे होय. विशेषत: अशा परिस्थितीत तर हे फारच आवश्यक आहे की ज्या वेळी शासनाने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे यशस्वीरित्या चालवून जनतेचा विश्वास संपादन केलेला असेल. या हेतुपूर्तीसाठी शासनास या गोष्टीकडे विशेष लक्ष पुरवावे लागेल की प्रशासनावरील खर्च संतुलित असावा.

एखाद्या वर्षी जर शासकीय बटाई रोख्यांच्या मागणीत घट वा न्यूनता आली आणि अपेक्षित प्रमाणात नवीन भांडवलपुरवठा होत नसेल तर अशा परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी विभिन्न प्रणालींचा अवलंब करता येईल. यासाठी शासनास बटाई दरातील

सुधारणास्तव नवीन रोखे खरेदीतील नफ्याचे प्रमाण वाढ़विता येईल. उदाहरणार्थ, रोखेधारकांना यापूर्वी मिळणारा नफा ३० टक्के देण्यात येत असे. तेव्हा या वेळी या नफ्याचे प्रमाण वाढ़वून ५० टक्के करता येईल. दुसरी प्रणाली अशी अंगीकारता येईल की, शासकीय बटाई रोख्यांतून मिळणाऱ्या नफ्यावर अस्थायी स्वरुपात आयकर (Income tax) लावण्यात येणार नाही. खाजगी क्षेत्रात ही सवलत नसल्याने भांडवल गुंतवणूकदार इतर ठिकाणी भांडवल न लावता शासकीय बटाई रोख्यांवरच भांडवल गुंतवणूक करील.

ही गोष्ट चांगल्यारितीने लक्षात घ्यावी की नुकसान होण्याच्या संभावनेमुळे शासकीय रोख्यांच्या मागणीत घट होत नसते. कारण व्याज कायद्यानुसार निशिद्ध असल्यामुळे इस्लामी मिळकतीत नफा मिळविण्यासाठी नुकसान अथवा तोटा न होणारी दुसरी पर्यायी व्यवस्था नसते. जी बाब सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यांसाठी बटाई आणि भागीदारी तत्त्वावर भांडवलपुरवठ्यात अड़थळा निर्माण करते, त्यात 'नुकसान होण्याची संभावना' मुळीच नसून या क्षेत्रात भांडवल गुंतवणुकीचे प्रमाण हे बँकाच्या बटाई खात्यात जमा करणे अथवा खाज़गी व्यवसाय करणाऱ्यांचे रोखे खरेदी करून मिळणाऱ्या नफ्यापेक्षाही जास्त नुकसान होण्याची संभावना होय. जर शासकीय बटाई रोखेखरेदीदारांना या बाबीवर विश्वास बसला की, भांडवल गुंतवणुकीची ही प्रणाली अवलंबिल्यास नुकसानीची संभावना इतर ठिकाणच्या गुंतवणुकीपेक्षा जास्त नाही, तर निश्चितच ते खाजगी क्षेत्रात भांडवलगुंतवण्यापेक्षा शासकीय क्षेत्रात भांडवल गुंतवणूक करतील. खरे पाहता नुकसान होण्याची संभावना नसतेच. शासनाने सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंदे व्यवस्थित आणि काटेकोरपणे चालविल्यास नुकसान तर होणार नाहीच, शिवाय नुकसान होण्याची कल्पनासुद्धा लोकांना स्पर्श करणार नाही आणि रोखेधारकांचे संपूर्ण लक्ष व्यवसायात होणाऱ्या नफ्यावरच केंद्रित होईल. यामुळे शासकीय रोख्यांच्या मागणीत प्रचंड वाढ़ होईल.

आमची भूमिका अशी आहे की, शासनाने जारी केलेल्या बटाई रोख्यांत निर्माण होणारी नुकसानीची भीती दूर करण्याचे एक वास्तववादी तंत्र आहे आणि ते असे की, ज्या उद्योगधंद्यांत शासन विकास साधण्यासाठी अतिरिक्त भांडवल गुंतवेल. त्यांतून मिळणाऱ्या उत्पादनाची प्रगत उपजीविकेमध्ये दिवसेंदिवस मागणी वाढ़त जाते. पोलाद, सिमेंट, यंत्र, इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक साहित्य, सामग्री, कृषी अवजारे वगैरेंची उदाहरणे आपल्यासमोर आहेतच. व्यवस्थापन कौशल्य उत्तम असल्यास आणि उत्पादन व विक्रीचे कौशल्य वापरल्यास नुकसान अथवा तोटा होण्याच्या कल्पनेस थारा देण्याची मुळीच गरज नाही. आमच्या या भूमिकेस पुष्टी देणारा आणखीन एक आधार आहे आणि तो असा की,

उत्पादन वस्तुंची विक्री खुल्या बाजारात करण्यात येत असली तरी शासन हेच या उत्पादन वस्तुंचे सर्वांत मोठे उत्पादक असल्यामुळे तेच पुरवठा आणि वस्तुंच्या किंमतींचे प्रमाण निश्चित करणार. शासन यासाठी प्रयत्नशील असेल की वस्तुंवर मिळणाऱ्या नफ्याचे प्रमाण उत्पादन खर्चापेक्षा जास्त असेल. राष्ट्रीय वर्तुळातील उत्पादनांच्या किंमतींचे निश्चितीकरण करण्याच्या बाबतीत वास्तवसंमत धोरण राबविल्यामुळे या गोष्टीची हमी निर्माण होईल की, या वर्तुळात भांडवल गुंतविणाऱ्या रोखेधारकांना खाजगी क्षेत्रांतील प्रत्येक उद्योगधंद्यातील नफ्यापेक्षाही जास्त नफा मिळेल.

आधुनिक काळातील विविध देशांच्या अनुभवावरून हे सिद्ध झाले की, शासन राष्ट्रीय पातळीवर भांडवल उभारणीसाठी एका निश्चित व्याज दरानुसार कर्ज भांडवल घेते. गुंतवणुकीत व्याजवृद्धी होत असूनसुद्धा सार्वजनिक क्षेत्रातील व्यावसायिक संस्थांना याकरिता लाभदायक आधारांवर चालविण्यात येते की, या लाभातून मिळणाऱ्या अर्थप्राप्तीने राष्ट्रीय वर्तुळात अतिरिक्त गुंतवणूक शक्य व्हावी. अशाच परिस्थितीत जर एखाद्या शासनाने बटाई तत्त्वावर भांडवल प्राप्त करून आपल्या उत्पादनांच्या किंमती निश्चितीकरणासाठी ही गोष्ट दृष्टीसमोर ठेवली की, शासनास बटाई वर भांडवल गुंतविणाऱ्या अशा दरांनुसार नफा द्यावयाचा आहे, ज्यामुळे शासनाने जारी केलेल्या रोख्यांच्या खरेदीची तीव्र प्रेरणा निर्माण होईल, तर निश्चितच यश तुमच्या पदरात पड़णार. (आणखीन एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. समजा, आपण असे गृहीत धरले की, एखाद्या वर्षी सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगधंद्यात नुकसान होण्याची संभावना गृहीत धरली, तर यासाठी अशी पद्धत अवलंबिण्यात येऊ शकते की यातून मिळणाऱ्या नफ्याचा काही भाग रोखून एका रिझर्व-फंड (Reserve Fund) ची स्थापना करावी. यामधून संभावित नुकसानीची भरपाई करता येईल आणि रोखेधारकांना तोटा सहन करण्याची पाळी येणार नाही. जास्तीतजास्त त्यांना नफ्यास मुकावे लागेल. या बाबतीत काहीं विशेष गोष्टींकडे तिसऱ्याप्रकरणात संकेत देण्यात आले आहेत.) शासकीय बटाई रोख्यांच्या खरेदीदार आणि व्याजदरांवर कर्ज देणाऱ्यांच्या हितांत केवळ एवढ़ाच फरक आढळतो की, रोखेधारकांना मिळणाऱ्या नफ्याचा दर निश्चित नसेल आणि हा दर एकाच पातळीवर स्थिरसुद्धा नसेल. या नफ्याचा दर प्रत्येक वर्षी कमी-जास्त होत राहील. याउलट व्याजावर कर्ज देणाऱ्यांचा व्याज अथवा अर्थप्राप्तीचा दर निश्चित आणि ठराविक मुदतीच्या आत एकाच पातळीवर स्थिर असेल. रोखेखरेदीदारांना कोणत्याही ठराविक दराप्रमाणे नफ्याची पूर्वहमी देता येणार नाही. मात्र तोटा होण्याची संभावना नष्ट करता येईल. शिवाय शासन यासाठी प्रयत्नशील असेल की नफ्याच्या दरातील न्यूनाधिक्य एका विशेष मर्यादेच्या आत असावे.

बटाई रोख्यांच्या खरेदीदारांना त्यांनी गुंतविलेल्या व्यवसायाच्या ध्येय-धोरणांत अथवा व्यवसाय निर्णयात दखल देता येणार नाही वा कोणत्याही प्रकारचा सहभाग असणार नाही. मात्र जे रोखे एखाद्या विशेष उद्योग अथवा व्यावसायिक संस्थांच्या नावावर जारी करण्यात आलेले असतील, त्या आधारे प्राप्त होणारे भांडवल त्या उद्योग वा व्यवसायात लावणे आवश्यक ठरेल. शासनास या उद्योग वा व्यावसायिक संस्थांचे स्वरुप आणि त्यासंबंधी मूळ ध्येयधोरणे वा व्यवसायनीतीमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा करता येणार नाही आणि यामुळे रोखेधारकांच्या हितांवर अनिष्ट परिणाम होणार नाही. जर एखाद्याप्रसंगी राष्ट्रीय हितासाठी अशा प्रकारच्या शासनास निर्णय घ्यावा लागल्यास याची स्पष्ट घोषणा करून रोखेधारकांना या गोष्टीची पूर्ण संधी देण्यात येईल की, ज्यांना हे परिवर्तन वा सुधारणा मान्य नाही. ते आपले भांडवल परत घेऊ शकतात.

सार्वजनिक क्षेत्रातील ज्या व्यावसायिक संस्थामध्ये शासकीय बटाई रोखेविक्री करून उभे करण्यात आलेले भांडवल लावण्यात येईल, ते राष्ट्रीय संपत्ती समजण्यात येईल. अर्थात रोखेधारकांची संपत्ती नसेल. रोखेधारक हे केवळ चालू व्यवसायात भांडवल गुंतवणूकदार असतील. रोखे खरेदीच्या वेळी त्यांना याचे पुरावाप्रमाणपत्र देण्यात येईल. शासनाच्या नोंदवहीत रोखेखरेदीदारांचा तपशील नोंद करण्यात येईल. 'शासकीय बटाई रोखे' नावाची प्रमाणपत्रे सामान्य लोक, बँका, व्यावसायिक आणि वित्तीय संस्था खरेदी करू शकतील. एखाद्या रोख्याची मुदत पूर्ण झाल्यास रोखेखरेदीदार मरण पावल्यास रोखेभांडवलाची रक्कम त्याच्या वारसास अथवा पालकास मिळेल. हीच पद्धत वार्षिक नफा वाटणीच्या वेळी अंगीकारण्यात येईल.

शासकीय बटाई रोखे बाजारात विकता येणार नसून शासनासच त्यांच्या विक्रीचे अधिकृत अधिकार असल्याने शासन राज्य बँक, पोस्ट ऑफिस वगैरे ठिकाणी उपलब्ध करून देईल. शासनाकडून रोखे खरेदी करणाऱ्यांना खरेदी करण्यात आलेली रोखे परत आपसात खरेदी-विक्री करता येणार नाहीत. कारण बटाईच्या ठरावानुसार अशा स्वरुपांच्या अटी असतील. या अटी आणि शर्तीनुसार बटाई रोख्यांचे मालक या व्यावसायिक संस्थेच्या (ज्या संस्थेत, भांडवल गुंतविण्यात आले) कोणत्याही घटकाचे मालक नसतील. बटाई रोखे हे मालकीहक्कांची प्रमाणपत्रे नसून ते केवळ भांडवलाचा पुरवठा करण्याचे प्रमाणपत्र असतील. शासकीय बटाई रोखे आणि शासकीय भागीदारी रोख्यांत हा फरक आहे. शासकीय बटाई रोख्यांचे हे स्वरुप आपण यापुढे पाहणार आहोत.

४) शासकीय भागीदारी रोखे

यापूर्वी स्पष्ट केल्याप्रमाणे की ज्या पक्षाकडून भागीदारी तत्त्वावर भांडवल मिळविण्यात येईल, त्या पक्षास व्यवसायात भागीदार बनविण्यात येईल. या भागीदारास व्यवसायात कार्यात्मक भूमिका बजावण्याचा पूर्ण अधिकार असेल. हाच मूळ फरक बटाई आणि भागीदारीमध्ये आहे. दुसरा फरक असा आहे की, भागीदारी तत्त्वावर उभे केलेल्या भांडवलावर चालविण्यात येणारा व्यवसाय हा सर्व भागीदारांची सामायिक संपत्ती असते. या नियमानुसार शासनाने जारी केलेली भागीदारी रोखे ही व्यवसाय मालकीची प्रमाणपत्रे असतील. समजा, शासनाने एक कोटीच्या भांडवलावर एक कारखाना उभा करण्याची योजना आखली. या योजनेसाठी भांडवल उभारणीस्तव एक-एक लाखाची १०० रोखे शासनातर्फे जारी करण्यात आली असून यामध्ये ६० रोखे शासनाने स्वत: खरेदी केली आहेत. बाकीचे ४० रोखे इतर बँका, भांडवलदार वगैरेंनी खरेदी केली. दुसऱ्या शब्दांत या एकूण भांडवलामध्ये ६० लाख रुपयांचे भांडवल स्वत: शासनाने लावून ४० लाख रुपये इतरांनी लावून या कारखान्यास यशस्वीपणे चालविण्याच्या कार्याची जवाबदारी १० जणांच्या एका व्यवस्थापनावर टाकली. हे व्यवस्थापक मंडळ हा कारखाना यशस्वीपणे चालविण्यासाठी कारखान्याचे धोरण आणि नियम तयार करील. या मंडळातील सहा सदस्य शासनातर्फे आणि चार सदस्य रोखेधारकांपैकी नियुक्त करण्यात येतील. या कारखान्यात सर्वांचे सामायिकरित्या मालकी हक्क असले तरी या व्यवस्थापकीय मंडळात शासनातर्फे नियुक्त केलेल्या सदस्यांची संख्या जास्त असेल. मुळात ही गोष्ट खूप महत्वपूर्ण आहे. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगातून राष्ट्रीय हिताची जोपासना होण्यासाठी हे आवश्यक आहे की, उद्योगात खाजगी भांडवल गुंतविलेले असूनसुद्धा उद्योग चालविण्यात स्थानिक हिताचे प्रतिनिधित्व करणाऱ्यांची भूमिका निर्णायक असेल. या उद्दिष्टाची पूर्ती केवळ अशा वेळीच शक्य ठरते की ज्या वेळी भागीदारीच्या भांडवलावर चालविण्यात येणाऱ्या राष्ट्रीय उद्योगांत इतर भागीदारांपेक्षा शासनाचा वाटा अर्थात रोख्यांचे प्रमाण जास्त असावे.

नियमानुसार या ठरावाचे स्पष्टीकरणसुद्धा सुरुवातीलाच व्हावयास पाहिजे की, व्यवस्थापन मंडळाच्या अंतिम निर्णयाची पद्धत व स्वरुप काय व कसे असेल? अर्थात कोणत्या बाबतींत दोन तृतियांश अथवा तीन चतुर्थांश एवढी सदस्यसंख्या निर्णय घेण्यासाठी आवश्यक असावी आणि कोणत्या बाबींवर निर्णय देण्यासाठी कमी संख्येची सहमती असूनही निर्णय घेता येईल. या बाबतींत योग्य नियम तयार करून ही गोष्ट

अमलात आणता येईल की, एकीकडे सामान्य भागीदारांनासुद्धा आपले हित समोर ठेवून उद्योग चालविण्यात दखल देण्याची पूर्ण संधी प्राप्त असावी तर दुसरीकडे राष्ट्रीय हिताविरुद्ध एखादा निर्णय जाता कामा नये.

यासाठी हे योग्य ठरेल की उपजीविकेचे व्यवस्थापन योग्य रितीने करण्यासाठी भागीदारांच्या आर्थिक जवाबदाऱ्या त्यांनी पुरविलेल्या भांडवलाच्या प्रमाणापेक्षा जास्त ठेवू नये. यासाठी दीर्घमुदतीवर आधारित भांडवल भागीदारांचे लावू नये, तसेच उधारीची देवाणघेवाण एकूण भांडवलाच्या प्रमाणाखालीच असावी. परंतु एखाद्या उद्योगात भागीदारीच्या भांडवलाबरोबरच मोठ्या प्रमाणात कर्ज घेऊन भांडवल लावणे आवश्यक ठरल्यास उपरोक्त प्रणाली अंगीकारण्यात काही गैर ठरणार नाही. नियमानुसार अशा परिस्थितीत भागीदारांची वित्त जबाबदारी अमर्याद असावी. यामुळे कर्ज मागणी करणाऱ्यांचे हित जोपासले जातील. परंतु वस्तुत: या हेतुमुळे कारखाण्यावर अशी बंधने येतात की एखाद्या बँकेचा जामीन मिळविल्याशिवाय अशा जबाबदाऱ्या उचलणे शक्य होत नाही.

'भागीदारी रोखे'सुद्धा ठराविक मुदतींचे असणे योग्य ठरेल. अल्प आणि दीर्घ कालावधीसाठी भांडवल लावणाऱ्या दोन्ही प्रकारच्या लोकांकडून भांडवल मिळविण्यासाठी योग्य किंमती व विविध किंमतींचे रोखे जारी करता येतील.

शासन आणि भागीदारांदरम्यान ही गोष्ट स्पष्टपणे निश्चित करण्यात यावी की, या रोख्यांच्या भांडवलावर मिळणाऱ्या नफ्याचे प्रमाण किती टक्के भागीदारांना मिळेल. नफा-वाटणीचे प्रमाण भांडवलाच्या प्रमाणावरसुद्धा निश्चित करता येईल. परंतु याची आवश्यकता नाही. आमच्या विचारसरणीनुसार शासनाच्या देखरेखीखाली राबविण्यात येणाऱ्या व्यावसायिक संस्थावर भागीदारी तत्त्वांवर भांडवलपुरवठा करताना शासनाच्या नफ्याच्या प्रमाणापेक्षा इतर भागीदारांच्या नफ्याचे प्रमाण कमी ठेवण्यात यावे.

उपरोल्लेखित उदाहरणामध्ये ४० भागीदारांना उद्योगातील एकूण नफ्यातून तीन चतुर्थांश भाग देणे योग्य ठरेल. उदाहरणार्थ, कारखान्यास जर वर्षाखेरीज एक लाखाचा शुद्ध नफा झाला असेल तर प्रत्येक सामान्य भागीदारास (या सामान्य भागीदाराचे एक लाख रुपये या व्यवसायात गुंतविण्यात आलेले आहेत) या नफ्यात ७५० रुपये वाटा मिळेल. बाकीचा नफा शासनांचा असेल. शासनाच्या गुंतविलेल्या प्रत्येकी एक लाखाच्या रोख्यावर ११६६ रुपये नफा मिळेल. भागीदारी व्यवसायात भागीदारांमध्ये नफ्याचे विविध प्रमाण निश्चित करणे धर्मसंमत वा वैध आहे. (संदर्भ : शिर्कत व मुज़ारिबत के शरई उसूल-उर्दू, पृष्ठ : ३६ व ३८) कारण काही भागीदारांत कार्य आणि

व्यवसायपात्रता जास्त असते व यासाठी ते आपले कार्य आणि व्यवसायपात्रता इतरांच्या तुलनेत जास्त प्रमाणात पणाला लावतात. या पात्रता व कार्यप्रमाणात त्यांच्या नफ्याचे प्रमाण जास्त ठेवण्यात येणे चुकीचे मुळीच नाही. उपरोल्लेखित उदाहरणामध्ये कारखाना एकदा खरेदी करण्यात आलेले रोखे परत लोकांना विकता येणार नाहीत. याउलट ही मुदत पूर्ण झाल्यावर आपले भांडवल परत घेऊ शकतो. वित्तपुरवठ्यातील वाढीसाठी उपजीविकेस नवीन नगदी राशी देण्यासाठी केंद्रीय बँकेत जमा असलेल्या रोख्यांची संख्या वाढलेली असल्यामुळे केंद्रीय बँक बटाई रोख्यांची एक ठराविक संख्या विकत घेऊ शकते. त्याचप्रमाणे मुदत पूर्ण झाल्यावर यांच्या भांडवलाच्या आधारे आणखीन रोखे खरेदी करून स्थायी स्वरुपात आपल्याकड़े 'बटाई रोख्यांची' मोठी संख्या जमा ठेवण्याचे प्रयत्न करील. वेळप्रसंगी आपल्या गरजेनुसार रोखेविक्री करण्याची पाळी आल्यास या केंद्रीय बँकेकडे भागीदारी रोख्यांचा साठा असणे आवश्यक आहे.

केंद्रीय बँकेतर्फे शासकीय भागीदारी रोखे आणि बटाई रोख्यांत एक मोठे भांडवल गुंतविणे म्हणजे राष्ट्रीय वर्तुळात मोठ्या प्रमाणात भांडवल गुंतविण्यासम असेल. जर हे संपूर्ण भांडवल नवीन वित्तस्वरुपात उभे करण्यात आले असेल तर (अर्थात केंद्रीय बँकेने रोखे खरेदी करण्यासाठी नवीन चलन तयार केले असेल तर) याचे परिणाम वित्तहानीच्या स्वरुपाचे असेल, मात्र ज्या मर्यादेपर्यंत या भांडवलाचा वापर करण्यात येईल (जे सामान्य बँकांची नगदी सुरक्षित स्वरुपात केंद्रीय बँकेत जमा आहे) त्या मर्यादेच्या आत असल्यास यास वित्तहानी ठरविण्यात येणार नाही. कारण बँकेची नगदी सुरक्षित राशी ही जनतेच्या बचत राशीचा एक भाग होय. ही बचतराशी विविध मार्गांनी केंद्रीय बँकेत आलेली असते. या राशीचा वापर प्रभावी मागणीमध्ये नवीन वृद्धी समान होणार नाही.

रोखे खरेदीसाठी केंद्रीय बँकेकडून वित्तपुरवठ्यात वृद्धी अशा परिस्थितीमध्ये अगदीच योग्य ठरेल, जेव्हा उपजीविकेच्या वाढत्या गरजा लक्षात घेता नवीन रोकड़ (Cash) पुरविण्याची गरज असेल. यापेक्षाही जास्त असे की, सार्वजनिक क्षेत्रात भांडवल गुंतवणुकीच्या परिणामस्वरुपी उत्पन्नात वाढ़ होत असल्यामुळे ही पद्धत अंगीकारल्याने अशा प्रकारचे उपद्रव निर्माण होण्याच्या संभावना कमी असतील की, ज्यामुळे तोट्याच्या वित्ताविषयी पथ्य पाळणे आवश्यक ठरविण्यात आले आहे. रोख्यांच्या किंमतीच्या स्वरुपात केंद्रीय बँकेतून जे भांडवल शासनास प्राप्त होईल, याच्या वापरातून कारखाने, यंत्रसामग्री, कच्चामाल आणि उत्पादने वगैरे साधनसामग्री अस्तित्वात येतील. वित्तपुरवठ्यातील वृद्धीमुळे वृद्धी होईल.

५) शासकीय कर्ज

वरील मजकुरात आम्ही या बाबीकडे लक्ष वेधले आहे की सार्वजनिक क्षेत्रातील काही उद्योगांचे स्वरुपच मुळात असे आहे की, ज्यामध्ये भागीदारी आणि बटाई तत्त्वांवर भांडवलगुंतवणूक करणे शक्य नाही. अशा उद्योगांना केवळ राष्ट्रीय भांडवलानेच चालविता येईल. हे उद्योग देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी अतिशय प्रमुख भूमिका बजावतात आणि याचप्रमाणे याच उद्योगांच्या स्थैर्यावर देशाच्या विकासाची गती अवलंबून असते. अणुशक्ती, जलसंवर्धन योजना, दळणवळण आणि संप्रेषण वगैरेसंबंधी योजना व इतर प्रकारच्या उद्योगधंद्याचे स्वरुपसुद्धा असेच असते. याव्यतिरिक्त लष्करी शक्ती आणि सुरक्षासंबंधी असणारे सर्व उद्योग राष्ट्रीय भांडवलावरच चालविणे शक्य असते. या उद्योगांना प्रचंड प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते. बऱ्याच वेळा या गरजा केवळ करवसुलीच्या उत्पन्नातून पूर्ण करणेसुद्धा शक्य नसते. वर्तमानकाळातील सर्व प्रगत राज्ये या उद्दिष्टपूर्तीसाठी देशाच्या नागरिकांकडून कर्ज घेतात. इस्लामी शासनासुद्धा विकासकार्यांसाठी दीर्घमुदतींची कर्जांची आवश्यकता भासेल.

ज्या वेळी देशास एखाद्या नैसर्गिक संकटमय परिस्थितीचा सामना करावा लागतो, तेव्हा शक्य असेल तितके जनतेकडून स्वयंसेवी आर्थिक मदत मिळविण्याचे प्रयत्न करण्यात येतील. त्याचप्रमाणे सवडीप्रमाणे करवसुलीसुद्धा काही जास्त प्रमाणात करण्यात येईल. मात्र जास्त योग्य आणि बुद्धिसंमत बाब अथवा संभावना अशी आहे की या मार्गाने गरजा पूर्ण होण्याइतपत पैसा गोळा करणे शक्य नाही. अशा परिस्थितीतसुद्धा शासनाने कर्ज मिळविण्याचे प्रयत्न करावयास हवे. हे कर्ज भविष्यात करवसुली आणि इतर मार्गांनी पूर्णपणे फेडता येतील. अशा रितीने युद्धावर येणाऱ्या खर्चाचे ओझे तात्पुरत्या स्वरुपात आर्थिक सक्षम असलेल्या लोकांवर टाकण्याऐवजी दीर्घमुदतीवर विस्तार करणे व भविष्यात तयार होणाऱ्या आर्थिक सक्षम लोकांवर टाकून त्यांना या कार्यात सहभागी होण्याची संधी देण्यात येईल आणि मुळात हीच न्याय व समानतेची मागणी होय.

वर उल्लेख केल्याप्रमाणे काहीं गरजांच्या पूर्ततेंसाठी शासनास अल्पमुदतींच्या कर्जांची गरजसुद्धा भासत असते. ज्याप्रमाणे खाजगी व्यवसाय करणाऱ्यांना अस्थायी स्वरुपात अल्प मुदतींच्या कर्जांची गरज पडते, त्याचप्रमाणे शासनाच्या देखरेखीखाली चालू असलेल्या व्यावसायिक संस्थांनासुद्धा अस्थायी स्वरुपाच्या अल्पमुदतींच्या

कर्जांची गरज असते. याशिवाय शासनास आपल्या खर्चासाठीसुद्धा सामान्य तिजोरीतून अल्प मुदतींसाठी कर्ज घेण्याची गरज भासते. कारण शासनास प्राप्त होणाऱ्या आर्थिक राशीमध्ये वर्षाच्या काही कोळात खंड पडत असतो.

अल्पमुदतींच्या कर्जांचा विचार केल्यास या बाबतीत काही अंशी अर्थपुरवठ्याचे ओझे बँकिंग व्यवस्थेवर टाकता येईल. कारण बँकांजवळ लोकांच्या बचतराशी मोठ्या प्रमाणात जमा असतात. अशा रितीने केंद्रीय बँकेकडून ही गरज पूर्ण करता येणे शक्य आहे. या पद्धतीवर पुढील प्रकरणात चर्चा करण्यात येईलच.

कर्ज देणाऱ्यांना एका ठराविक मुदतीच्या आत त्यांनी दिलेले कर्ज परत करण्याची जबाबदारी शासनावर असेल. मात्र या कर्जावर कोणत्याही प्रकारचे व्याज अथवा नफा मिळणार नाही. स्वाभाविकरित्या असा प्रश्न निर्माण होतो की अशा परिस्थितीत कर्ज देण्यामागे कोणती प्रेरणा कार्यरत असेल? या प्रश्नासंबंधीसुद्धा आपण चर्चा करुया की जर एखाद्या प्रसंगी कर्जपुरवठा गरजपूर्तीसाठी अपूरे पड़त असेल तर यात वृद्धी करण्यासाठी शासनास कोणते व कसे प्रयत्न करावे लागतील अथवा ही कमतरता भरून काढ़ण्यासाठी शासनास काय करावे लागेल? देशांची सुरक्षा, लष्करी शक्तीचे स्थैर्य आणि आर्थिक स्थैर्य व विकास ही अतिशय महत्त्वाची इस्लामी व सामाजिक उद्दिष्टे होत. इस्लामी समाजाच्या लोकांमध्ये या उद्दिष्टांचे धार्मिक स्वरुप आणि त्याच्या असामान्य महत्त्वाचे आकलन जेवढ्या स्पष्ट स्वरुपात होईल, तसेच या उद्दिष्टांना पूर्णपणे साध्य करण्याची भावना जेवढ़ी तीव्र असेल आणि यासाठी आपले स्वार्थ बळी चढ़विण्याची तयारी असेल, तेवढ्या जास्त प्रमाणात ही उद्दिष्टे पूर्ण होतील. इस्लामी शासन समाजात ही प्रेरणा सतत ज्वलंत ठेवील.

शासन समाजास आवाहन करील की आपल्या गरजांपेक्षा जास्त आणि अतिरिक्त भांडवलाचा एक भाग नफा मिळविण्याऐवजी कोणत्याही ऐहिक मोबदल्याची अपेक्षा न बाळगता पुण्यकर्म समजून शासनास कर्जस्वरुपात द्यावे. यामुळे निश्चितच शासनास कर्ज मिळण्याची शक्यता आहे. विशेषतः युद्धप्रसंगी तर शासनास मोठ्या संख्येत कर्ज मिळेल.

वर उल्लेखण्यात आलेल्या प्रेरक घटकाव्यतिरिक्त शासनास कर्ज मिळविण्यासाठी आणखीन मार्ग उपलब्ध आहेत. मागील चर्चेमध्ये आम्ही या गोष्टीचे स्पष्टीकरण केलेले आहेच की ज्या व्यक्ती आपली बचतराशी तोटा होण्याच्या भीतीपोटी लाभदायक व्यवसाय कार्यात गुंतवणुकीचे इच्छुक नसतील त्यांना आपली बचतराशी

बँकांच्या कर्जखात्यांत जमा करणेच आवडेल. या व्यक्तींचा उद्देश हा केवळ एवढ़ाच असेल की आपली बचतराशी सुरक्षित व अबाधित राहून काही मुदतीनंतर मूळ राशी कोणतेही घट न होता आपणास परत मिळावी. यामध्ये बऱ्याच प्रमाणात अशा लोकांची संख्या असते की दीर्घमुदतीपर्यंत त्यांनी साठविलेला पैसा वापरण्याची त्यांची इच्छासुद्धा नसते. उलट त्या बचती या उद्देशाने कर्ज खात्यांत ते जमा ठेवतात. म्हणून बँकांत आपली रक्कम ते कर्जखात्यात जमा करण्यापेक्षा शासनास कर्जाच्या स्वरुपात देण्यास प्राधान्य देतील. या स्वरुपास प्राधान्य देण्याचे पहिले कारण असे की शासन हे बँकेपेक्षा जास्त प्रतिष्ठित असते. तसेच बँकांच्या वचनबद्धतेपेक्षा शासनाच्या वचनबद्धतेवर लोकांचा जास्त विश्वास असतो. शासनास कर्ज देणाऱ्यांना या गोष्टीची पूर्णपणे हमी प्राप्त असेल की ठराविक मुदतीवर कर्ज देण्यात आलेली राशी त्यांना अवश्य प्राप्त होईल. दुसरे कारण असे की, शासनास कर्ज देऊन बचतकारांस कोणत्याही प्रकारचा त्याग न करता परलोकात याचा भरपूर मोबदला मिळविण्याचे आणि राष्ट्राची सेवा करण्याचे समाधान प्राप्त होईल. या विषयावर पुढ़ील प्रकरणात् चर्चा करण्यात येईलच.

शासनास देण्यात येणाऱ्या कर्जपुरवठ्यात वाढ़ होण्यासाठी उपरोल्लेखित आणि प्रेरणा निर्माण करण्याबरोबरच इतर प्रेरणासुद्धा यासाठी निर्माण करण्याची गरज आहे की बचत भांडवल सुरक्षित ठेवण्यासाठी बचतकारांनी इतर प्रेरणास्वरुपांवर प्रथमोल्लेखित प्रेरणास्वरुपास प्राधान्य द्यावे आणि भांडवलदारांमध्ये शासनास कर्ज देण्याची प्रचंड मानसिकता निर्माण व्हावी.

आमचा प्रस्ताव असा आहे की, शासनास कर्ज देणाऱ्यांना करात काही अशी सवलत दिल्यास हे उद्दिष्ट साध्य करणे सोईस्कर होईल. जर शासनास कर्ज दिल्यामुळे कर्ज देणाऱ्यांना कर्ज न देणाऱ्यांच्या तुलनेत कमी 'कर' द्यावा लागत असल्यास बचतदार जे दीर्घमुदतीसाठी आपली अशा प्रकारची शंका बाळगण्याचे काहीच कारण नाही की सामान्य हुंड्या आणि कर्जप्रमाण जर शासकीय कर्जासंबंधी असलेल्या कर्ज प्रमाणापेक्षा कमी झाल्यास व्यावसायिकांच्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण खूप कमी होईल. व्यावसायिकांना कर्जपुरवठा सुरळीत चालू ठेवण्यासाठी आपल्या ग्राहकांच्या कर्जांच्या मागण्या बँकांनी पूर्ण करावयास हव्या. कारण बँकांचा नफा हा व्यावसायिकांच्या नफ्यावर अवलंबून असतो. याचे दुसरे कारण असे असेल की शासन कर्जप्रमाणपत्रे बँकांना विकतात आणि केंद्रीय बँकेच्या कर्जप्रमाणात वृद्धी करून त्यांना जास्तीतजास्त प्रमाणपत्र खरेदी करण्यात यावीत. या दोन्ही प्रक्रियांमध्ये व्यावसायिकांच्या कर्ज

गरजांना दृष्टीसमोर ठेवण्यात येईल. शासनाने बँकांकडून कर्ज प्राप्त करताना व्यावसायिकांशी स्पर्धा करण्याऐवजी त्यांच्या कर्जमागण्या पूर्ण केल्यावर बँकांमध्ये कर्ज देण्याची अतिरिक्त क्षमता स्वत:मध्ये निर्माण करावी.

शासन कर्ज घेतलेल्या संपूर्ण रकमा कशा रितीने परत करील, याविषयी आपल्याला सविस्तर वर्णन करायची गरज नाही. थोडक्यात, ते आपल्या विकास योजनांची फळे, कर्जभांडवलावर चालणाऱ्या व्यावसायिक संस्थांचा नफा, सामान्य परिस्थितीत वसूल करण्यात येत असलेले कर आणि गरजेनुसार नवीन कर्जांच्या माध्यमाने कर्जांची परतफेड करील. अल्पावधित राष्ट्रीय पातळीवरील उद्योगांतून अपेक्षित उत्पन्न मिळत नसेल आणि काही विकास योजना पूर्णपणे प्रारंभिक स्वरुपात असतील तेव्हा नवीन करवसुलीव्यतिरिक्त नवीन कर्ज घेऊन कर्ज फेडण्यात यावे. शासनास एखाद्या सप्ताह वा वर्षास जेवढी कर्जे परत करावयाची आहेत, त्यांपेक्षा जास्त कर्जभाडंवल जमा करण्याचे प्रयत्न करावे लागतील. परिस्थिती नियंत्रणात आल्यावर आणि विकास योजनांतून शासनाच्या आयमध्ये वृद्धी झाल्यावर याच्यां उलट पद्धतीचा वापर करता येईल आणि नवीन कर्जराशी परत करण्यात येणाऱ्या कर्जाचे प्रमाण कमी ठेवून राष्ट्रीय कर्जाचे सरासरी ओझे कमी करता येणे शक्य होईल.

एखाद्या परिस्थितीत जनतेने दिलेल्या कर्जांवर शासनाची गरज पूर्ण होत नसल्यास अथवा याचे प्रयत्न करूनसुद्धा कर्ज परतफेडीची राशी नवीन शासकीय कर्जांच्या माध्यमाने प्राप्त होणाऱ्या भांडवलापेक्षा जास्त असल्यास आपली गरज पूर्ण करण्यासाठी वित्त-हानीराशीचा शासनास वापर करावा लागेल. याची वास्तविक पद्धत अशी असेल की शासन केंद्रीय बँकेस कर्ज प्रमाणपत्रांची विक्री करील. केंद्रीय बँकेस या कर्जप्रमाणपत्राच्या मोबदल्यात नगदी राशी पुरविण्यासाठी नवीन वित्तनिर्मिती करावी लागेल.

शासकीय तिजोरीत जमा होणारी संपत्ती आणि खर्चातील वेगाच्या तफावतीमुळे काही आठवड्यांसाठी हंगामी स्वरुपात शासनास कर्जांची जी गरज पडेल तिची पूर्तता केंद्रीय बँकेच्या साह्याने करण्यात यावी. शासन काही आठवडे किंवा तीन महिन्यांच्या मुदतींसाठी केंद्रीय बँकेस कर्जप्रमाणपत्रांची विक्री करील. परंतु कर्ज प्रमाणपत्रे विकली न गेल्यास नवीन-वित्तनिर्मिती करून ही पोकळी भरून काढण्यात येईल.

ज्या वेळी शासन वित्तहानीच्या संपत्तीमधून कमी खर्च करून अथवा अतिरिक्त संपत्ती (Surplus budget) ची पद्धत अवलंबित असेल तर याची पद्धत अशी असेल की

केंद्रीय बँकेकडून कर्ज परत घेऊन ते नगदीच्या स्वरुपात अदा करण्यात येईल. हा परतावा शासनाच्या खात्यात नोंदणीच्या अथवा शासनातर्फे केंद्रीय बँकेस चलनी पैसा स्थलांतरित करण्याच्या स्वरुपात असेल. केंद्रीय बँक या चलनी नोटा सध्या वापरात घेणार नाहीत. दोन्हीं परिस्थितीत उपजीविकेमध्ये एकूण वित्तपुरवठ्यात घट निर्माण होणार नाही.

या प्रकारचे उपाय योजूनसुद्धा शासनाच्या कर्जांच्या गरजा होत नसल्यास ते नागरिकांकडून लघूबचती आणि अत्यल्प मुदतींसाठी प्राप्त होऊ शकणाऱ्या रकमा गोळा करण्यासाठी टपालकचेरीत 'बचत बँक' (Saving bank) स्थापन करील. यामुळे नागरिकांना आपला पैसा बचत करून सुरक्षित करण्याची संधी मिळेल. बचत बँकांचे नियम सर्वज्ञात असल्याने त्यावर स्पष्टीकरण देण्याची गरज नाही. शासन या बचतींवर व्याज देत नसले तरी ते बचतकारांना त्यांच्या खात्यातील बचतपुरवठ्यात वृद्धी होण्याकरिता काही सवलती देऊ शकते. मागणी करताच परतावा आणि सुरक्षा सवलतीव्यतीरिक्त शासन इतर देशांच्या पद्धतींप्रमाणे अर्थसंपत्ती सुरक्षेस्तव बँकेच्या कर्जखात्यांत जमा ठेवत असतात अथवा आपल्या स्वत:जवळच सुरक्षित ठेवीत असतात. या ठेवींच्या पद्धतींऐवजी ते शासनास कर्ज देण्याच्या पद्धतींचा अवलंब करून आपली अर्थसंपत्ती सुरक्षित करून निश्चिंत होतील. समाजातील बरेच लोक नुकसान होण्याच्या भीतीपोटी आपली संपत्ती लाभदायक व्यवसायात न लावता संपत्ती अबाधित ठेवू इच्छित असल्यामुळे उपरोल्लेखित पद्धतीचा अवलंब करून शासनास भरघोस प्रमाणात कर्ज प्राप्त करता येईल. 'कर' भरण्यात सवलत मिळत असल्यामुळे त्यांना त्याग करण्याची गरजसुद्धा पडणार नाही.

वर्तमानकाळातील राज्यसुद्धा काही बाबींना प्रोत्साहन देण्यासाठी 'कर' भरण्यात सवलत देण्याची पद्धत अंगीकारीत असतात. दानधर्म आणि पुण्यकार्यांसाठी देण्यात येणाऱ्या देणग्या आणि समाजकल्याणाच्या कार्यांत होणाऱ्या खर्चावर व्यक्ती अथवा संस्थांना आयकर माफ करण्यात येतो. त्याचप्रमाणे 'प्रोव्हिडेन्ट फंडा'साठी आपल्या मिळकतीचा काही भाग खर्च झाल्यास खर्च करणाऱ्यावर आयकर लागू करण्यात येत नाही. ही सवलत याकरिता देण्यात येते की लोकांमध्ये आपल्या भविष्यासाठी पैसा बचत करून ठेवण्यास प्रोत्साहन व प्रेरणा निर्माण व्हावी. कधीकधी शासनास देण्यात येणाऱ्या देश सुरक्षाकर्ज अथवा विकास योजनांसंबंधी कर्जावर प्राप्त होणाऱ्या मिळकतीवरील 'कर'सुद्धा माफ करण्यात येतो. कारण यावरील 'कर' माफ केल्यामुळे भांडवलदार व बचतदारांत भांडवल गुंतवून व्याज मिळविण्याच्या या विशेष स्वरुपास इतर पद्धतींवर प्राधान्य देण्याची मानसिकता निर्माण व्हावी.

आयकरांमध्ये सूट देण्याच्या तजवीजीसंबंधीच्या वर्णणात्मक बाबींचे संपादन सखोल विचारांतीच करणे शक्य होईल. या ठिकाणी विषयांतराच्या भयास्तव हे शक्य नाही. याविषयी वेगळी चर्चा करणे आवश्यक आहे. शासनास कर्ज देणारी व्यक्ती चालू वर्षातील कमाईतील एका भागाची बचत करून कर्ज देईल अथवा भूतकाळात बचत केलेली राशी जी पूर्वी बँकेत जमा ठेवलेली होती, रोखे खरेदीमध्ये अथवा एखाद्या लाभदायक व्यवसायात गुंतविण्यात आलेली होती, आता मात्र या गुंतवणुकीतून परत काढून घेऊन शासनास कर्ज देण्यासाठी वापरील. पहिल्या परिस्थितीत त्यावरील आयकरात सूट देण्यात येईल आणि दुसऱ्या परिस्थितीत संपत्तीवरील करवसुलीमध्ये घट करण्यात येईल. जर सदरील संपत्तीवर कोणत्याही प्रकारचा 'कर' लावण्यात आला नसेल अथवा वर्तमान परिस्थितीतील करवसुलीत सवलतीचे योग्य स्वरुप अस्तित्वात नसेल तर यासाठी दुसरी पद्धत अंगीकाराची लागेल. उदाहरणार्थ, कर्जस्वरुपात देण्यात येणाऱ्या भांडवलाच्या प्रमाणानुसार त्या व्यक्तीवर लागू असलेल्या 'आयकरा'मध्ये काही प्रमाणात घट करण्यात यावी. सवलत देण्याच्या कोणत्याही पद्धतीमध्ये ही गोष्ट ध्यानात व दृष्टीसमोर ठेवावयास हवी की कर्ज देणाऱ्यांचे विविध समुदाय, छोटे बचतदार, मोठे भांडवलदार व गर्भश्रीमंत वगैरेंच्या दरम्यान न्यायपूर्ण वर्तणूक व्हावी. या गोष्टीचेसुद्धा भान ठेवायला पाहिजे की या सवलतींमुळे शासकीय तिजोरीत 'कर'वसुली होत नसल्यामुळे तिजोरीतील संपत्तीत घट होईल. ही घट करवसुलीत सवलत देण्यामुळे होईल. अशा प्रसंगी या गोष्टीवर गांभीर्याने विचार करावा लागेल की, 'कर'माफीची सवलत ही मुळात व्याजाच्या परीभाषेत घेणे योग्य ठरणार नाही. कारण 'करसवलत' आणि व्याज पद्धतींत असे काहीं मौलिक आणि स्पष्ट फरक आहेत की, ज्यामुळे 'कर-सवलत' नावाची ही पद्धत व्याजाच्या परीभाषेत येत नाही.

'व्याज' ही एक ठराविक टक्के रक्कम असल्याकारणाने आणि साल दर सालाच्या प्रमाणात वाढ़त असल्याने याची तुलना करसवलतींशी करताना आपणास या दोन्हीमध्ये स्पष्ट फरक दिसून येईल. याहीपेक्षा जास्त असे की 'कर'वसुलीमध्ये जी घट अथवा न्यूनता करण्यात येते, तिचा परिणाम आणि प्रभाव केवळ कर्ज देण्याच्या वर्षापुरताच असेल. त्याचप्रमाणे कर्जसंपत्ती शासनाकडे असल्याच्या काळात प्रत्येक वर्षी नवीन सवलत मिळणारसुद्धा नाही.

कर वसूलीतून प्राप्त होणाऱ्या मिळकती वा कमाईच्या प्रमाणराशीस अथवा संपत्तीकराच्या निश्चितीमध्ये संपत्तीच्या संख्याप्रमाणास 'कर' देणाऱ्याच्या परतफेड

करण्याची पात्रता हेच प्रमाण ठरवून महसूलराशीचा आधार ठरविण्यात यावा. अर्थात महसूलराशीच्या आधारावरच परतफेड पात्रतेचे प्रमाण निश्चित करण्यात यावे. प्रस्तावित सवलतीचा अर्थ हा केवळ एवढ्याच आहे की शासनास 'व्याजमुक्त' स्वरुपाचे कर्ज देण्यामुळे कर देणाऱ्याच्या देयकपात्रतेमध्ये न्यूनता निर्माण होते आणि यामुळे कर वसुलीतून प्राप्त होणाऱ्या राशीत घट निर्माण होते.

या बाबीसंबंधी विचार केल्यास हे स्पष्टपणे दिसेल की करातील न्यूनतेचे स्वरुप हे एका उचित आणि योग्य आधारावर मागणीतील न्यूनतेचे स्वरुप होय.

ही गोष्टसुद्धा लक्षात घेण्यासारखी आहे की, एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त मिळकत असलेल्या व्यक्तींवरच 'आयकर' आकारण्यात येत असतो. स्वाभाविकरित्या अशाच व्यक्तीं शासनास कर्ज देतील, ज्यांची कमाई 'आयकर' भरण्यासम असेल. शिवाय अल्प कमाई असणारे लोकसुद्धा शासनास कर्ज देतील. परंतु त्यांना या सवलतीशी काहीएक संबंध नसेल. या गोष्टीवरूनसुद्धा ही सवलत व्याज पद्धतीपेक्षा अत्यंत भिन्न स्वरुपाची सिद्ध होते. कारण व्याज हे प्रत्येक कर्जावर आकारण्यात येते. व्याज आकारण्यासाठी कर्जराशीच्या कमी-जास्त असण्याची कोणत्याच प्रकारची अट नसते. हीच अवस्था संपत्तीवर आकारण्यात येणाऱ्या कराची आहे. हा कर एका विशिष्ट मर्यादेपेक्षा जास्त संपत्तीवर आकारण्यात येतो. या करवसुलीवर मिळणाऱ्या सवलतीचा लाभ केवळ श्रीमंत असलेल्या कर्जदात्यांनाच होईल. प्रत्येकास याचा लाभ होण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही.

शासनास मिळणाऱ्या कर्जभांडवलाने संपूर्ण रयतेच्या हितांची सेवा व रक्षण होईल. आयकरसुद्धा याच हेतुस्तव आकारण्यात येतो. कर्जपुरवठ्यात वृद्धी करण्यासाठी करात घट करण्याची सवलत देणे म्हणजेच एका चांगल्या उद्दिष्टाची पूर्ती करण्यासाठी केवळ पद्धतीतील बदल करणे होय.

६) कर्ज प्रमाणपत्र

कर्जपुरवठ्यासाठी शासनास ही पद्धत अंगीकारणे योग्य ठरेल की शासनाने कर्जांसाठी असे प्रमाणपत्र तयार करावे की या कर्जप्रमाणपत्रावर कर्ज देणाऱ्याचे नाव, कर्जराशी आणि कर्जाची मुदत उल्लेखिलेली असावी. कर्ज देणाऱ्यास कर्ज दिल्याचा पुरावा आणि शासनातर्फे कर्जाची पोचपावतीवर आधारित कागदपत्रे कर्जदायकाच्या नावाची नोंद करून देण्यात यावे. या कागदपत्रांची नोंद शासनाकडेसुद्धा सुरक्षित असेल.

प्रत्येक प्रमाणपत्रावर कर्जपरतीचा उल्लेख करून ज्या संस्थेमार्फत कर्ज परतफेड करण्यात येईल, त्या संस्थेच्या नावाचीसुद्धा नोदं करण्यात यावी. ही प्रमाणपत्रे जारी करणे वा परत घेण्यासाठी शासन पोस्ट ऑफिस, राज्यबँक आणि काही निवडक राज्यबँका व शासकीय वित्त संस्थांची स्थानिक कार्यालये वगैरेंचा वापर करील. या पद्धतीमुळे लोकांना कर्ज देणे आणि परत घेण्याच्या प्रक्रियेत अडचण येणार नाही. कर्ज देण्याच्या प्रक्रियेत कर्जदायकास कोणत्याही प्रकारचा खर्च येऊ देता कामा नये.

कर्जाची एकूण राशी आणि मुदतीच्या विविध स्वरुपांसाठी विविध प्रमाणपत्रे तयार करण्यात यावीत. उदाहरणार्थ, एकूण कर्जराशीनुसार १० रुपयांपासून अनुक्रमे एक लाखांपर्यंत आणि मुदतीनुसार दोन आठवडे, एक महिना, तीन महिने आणि मग एक वर्ष ते तीन वर्षांपर्यंतची प्रमाणपत्रे असावीत. प्रत्येक प्रमाणपत्रावर कर्ज राशी आणि मुदतीचा स्पष्ट उल्लेख असावा. प्रत्येक कर्जराशी व प्रत्येक मुदतीची कर्ज प्रमाणपत्रे उपलब्ध असावीत. योग्य वाटल्यास १०० रुपयांच्या किंमतीपेक्षा कमी किमतीची प्रमाणपत्रेसुद्धा जारी करण्यात यावीत. वाटेल तेव्हा परत मिळणाऱ्या कर्जाची प्रमाणपत्रेसुद्धा जारी करण्यात आल्यास हे नियम बाह्य ठरणार नाहीत. परंतु शासनाने अशा स्वरुपाची कर्जप्रमाणपत्रे जारी केल्यास सामान्य बँका प्रभावित होतील. त्यात जमा होणाऱ्या राशीत असामान्य घट निर्माण होईल. या खात्यांशी बऱ्याच प्रकारचे सामुदायिक हित संबंधित असल्यामुळे आमची भूमिका अशी आहे की वाटेल त्या वेळी परत देण्यात येणाऱ्या स्वरूपाची कर्जे शासनाने स्वीकारू नये. अल्पमुदतीचे अर्थात तीन महिन्यांच्या मुदतींचे प्रमाणपत्रसुद्धा आवश्यक असल्यावरच स्वीकारावे.

शासकीय कर्जप्रमाणपत्रांची विक्री केवळ शासनालाच करता येईल. (या ठिकाणी हेतुपुरस्पर प्रमाण पत्राची खरेदी विक्रीसारख्या शब्दांचा प्रयोग करण्यात आलेला नाही. कारण हे काही रोखेपत्र नाही. हे कर्ज प्रमाणपत्र कर्जदायकांकडून गहाळ जरी झाले असले तरी त्याची कर्जाची रक्कम सुरक्षित आणि अबाधित असेल.) सामान्य लोकांना अथवा व्यावसायिक संस्थांना पैशांच्या मोबदल्यात ही प्रमाणपत्रे मुळीच विकता येणार नाही व कोणालाच खरेदीसुद्धा करता येणार नाही. इस्लामी शासनात व्याज निषिद्ध असल्याने या गोष्टीला मुळीच वाव असणार नाही की, मुदत पूर्ण होण्यापूर्वी प्रमाणपत्रावरील नोंदणीकृत रकमेपेक्षा कमी दरात हे प्रमाणपत्र विक्री वा खरेदी करण्यात यावे. कोणत्याही प्रकारची कमी वा वृद्धी न करता प्रमाणपत्र त्यावरील नोंदविण्यात आलेल्या रकमेच्या मोबदल्यात खरेदी-विक्रीचा कोणत्याही प्रकारचा मार्ग मोकळा

असता कामा नये. आम्ही सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणे, नगदी पैसा देऊन प्र
खरेदी व विक्री होऊ नये हा मुळात व्याजव्यवहाराचा मार्ग न उघडण्यासाठी एक उप

आमच्या विचारानुसार या बाबतीत काहीच चुकीचे ठरणार नाही की शा
कर्जप्रमाणपत्र बँकेकडून कर्ज घेण्यासाठी जामिनास्तव वापर करता येईल. अ
जामिनाच्या स्वरुपात शासकीय कर्ज प्रमाणपत्र बँकेत ठेवून त्यावर कर्ज घेता येईल कारण बँकेतून व्यावसायिक गरजेसाठी किंवा वस्तु खरेदी करण्यासाठी कर्ज घ्यावयाचे असल्यास जामिनाची गरज असते. म्हणून शासकीय कर्ज प्रमाणपत्र जामिनाच्या स्वरुपात वापरल्याने लोकांना कर्ज मिळविण्यात खूप सवलत निर्माण होईल. एखाद्या कर्जासाठी सादर करण्यात आलेल्या जामिनास्तव शासकीय कर्जप्रमाण पत्रातील कर्ज राशीच्या परताव्याची तारीख पाहूनच बँकेने कर्ज द्यावे. अर्थात बँकेकडून देण्यात येणाऱ्या कर्जाच्या परतफेडीची तारीख ही शासकीय कर्जाच्या परतफेडीच्या तारखेच्या नंतरची असावी. त्याचप्रमाणे कर्ज घेणाऱ्यांकडून लेखी 'हमीपत्र' वा 'जामीनपत्र' लिहून घ्यावे की, कर्ज घेणाऱ्याकडून कर्जाची परतफेड न झाल्यास बँकेस प्रमाणपत्रावर नोंदविलेली शासनाकडील रक्कम घेण्याचा पूर्ण अधिकार असेल.

एका प्रगत उपजीविका व्यवस्थेत शासनाची कर्जाची गरज म्हणजे एक स्थायी स्वरुपाची गरज होय. ही गरज पूर्ण करण्याची प्रणाली हीच असू शकते की, शासनाने दर सप्ताह आणि दरमासी नवनवीन कर्जप्रमाणपत्रे जारी करावीत. त्याचप्रमाणे शासनाची गरज पूर्ण होण्याइतपत प्रमाणपत्राची संख्या विक्री व्हावी. जर एखाद्या वेळेस गरजेपेक्षा कमी प्रमाणात कर्जपुरवठा झाला असेल तर यामध्ये वृद्धी करण्यासाठी उपाययोजनांवर मागे चर्चा करण्यात आली आहे. अर्थात ही उपाययोजना म्हणजे नैतिक अवाहन आणि आयकरात सूट होय.

मागील प्रकरणात आम्ही हे स्पष्ट केलेले आहे की, केंद्रीय बँक सामान्य बँकांना त्यांनी इतरांना दिलेल्या कर्जांच्या प्रमाणात आणि तुलनेत कर्ज देईल. या दोन्ही कर्जांतील प्रमाणास आपण 'कर्जप्रमाण' असे संबोधन दिले. यावरून असा निष्कर्ष समोर येतो की सामान्य बँकांनी काही कर्जप्रमाणपत्रे खरेदी केली असल्यास (अर्थात शासनास कर्ज दिलेले असल्यास) ही कर्जप्रमाणपत्रे दाखल करून केंद्रीय बँकेकडून ठराविक कर्जप्रमाणानुसार कर्ज प्राप्त करता येईल. केंद्रीय बँकेस जर असे वाटत असेल की सामान्य बँकांमध्ये शासनास कर्ज देण्याची मानसिकता वाढीस लागावी तर अशा प्रसंगी ते शासकीय कर्जांसाठी ठराविक कर्जप्रमाणास इतर प्रकारच्या कर्जांसाठी

असलेल्या कर्जप्रमाणापेक्षा वाढवून हा हेतु साध्य करील. उपरोल्लेखित परिस्थितींमध्ये ज्या वेळी शासकीय कर्जपुरवठ्याचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असेल तर केंद्रीय बँक या कर्जासंबंधी कर्जप्रमाणात वृद्धी करून बँकांतर्फे कर्जपुरवठ्यात वृद्धी करण्याचे प्रयत्न करू शकते. बचतींच्या साह्याने खातेदारांच्या सूचनांवर रकमा अदा करणे अथवा इतर खातेदारांच्या खात्यात स्थलांतरीत करण्याची सेवा पुरवू शकते. या पद्धतीस आधुनिक परिभाषेत 'Giro system' असे म्हणतात.

या ठिकाणी आम्ही परदेशातून मिळणाऱ्या कर्जांवर कोणतीच चर्चा केलेली नाही. कारण आपण एक स्वतंत्र आणि स्वावलंबी उपजीविकेवर चर्चा करीत आहोत. हा प्रस्ताव परदेशी साह्याविरुद्ध नाही. चर्चेसाठी हा विषय सोपा असावा, यासाठी आपण हा विषय अशा पद्धतीने हाताळला. परदेशाशी व्यापार आणि देवाणघेवाणीविषयी अध्ययनात वित्त आणि बँकिंगसंबंधी बरेच नवीन प्रश्न निर्माण होतात. म्हणून हा वेगळ्या चर्चेचा विषय आहे.

शासकीय भागीदारी रोखे, शासकीय बटाई रोखे आणि शासकीय कर्जप्रमाणपत्रांचे स्वरुप स्पष्ट करतेवेळी आपण बँकिंग व्यवस्थेशी यांच्या संबंधांविषयीसुद्धा चर्चा केली आहे. परंतु याविषयी आणखीन विचारपूर्वक चर्चेची गरज आहे. खाली थोडक्यात आम्ही या गोष्टीचे स्पष्टीकरण करू की, व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेत रोखे आणि 'प्रमाणपत्राचे' कार्य कसे असेल.

७) शासकीय कर्जप्रमाणपत्र आणि बँकिंग व्यवस्था

शासनास देण्यात येणाऱ्या कर्जांच्या तुलनेत केंद्रीय बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाचे प्रमाण इतर प्रकारच्या कर्जांवर मिळणाऱ्या कर्जापेक्षा जास्त असल्याने सामान्य बँका आपली रोखराशी स्थिर ठेवण्यासाठी शासकीय प्रमाणपत्रांची एक संख्या आपल्याकडे जमा ठेवतील. विविध मुदतींच्या या कर्जप्रमाणपत्रांच्या साह्याने गरज पडेल तेव्हा नगदी राशी प्राप्त करता येईल. ही प्रमाणपत्रे अल्पमुदतींची असतील. उदाहरणार्थ, एक सप्ताह, दोन महिने, तीन महिने वगैरे मुदतींची प्रमाणपत्रे सामान्य बँकांपेक्षा जास्त दीर्घमुदतींची प्रमाणपत्रे खरेदी करण्याची अपेक्षा करता येणार नाही. ज्या आठवड्यात बँकांना नवीन रोकडीची गरज पडेल त्या आठवड्यात त्यांच्यातर्फे खरेदी करण्यात येणाऱ्या प्रमाणपत्रांची एकूण किंमत ही त्या प्रमाणपत्रांच्या एकूण किंमतीपेक्षा कमी असेल की, ज्यांची मुदत या आठवड्यात पूर्ण होत असल्याने त्यांना रोख रक्कम परत करावी लागणार

असेल. ज्या आठवड्यात याच्या उलट परिस्थिती असेल, त्या आठवड्यात बँका मुदत पूर्ण होणाऱ्या प्रमाणपत्रांच्या मोबदल्यात नगदी परत घेऊन तेवढ्याच प्रमाणाचे अथवा त्या पेक्षा थोड्या जास्त प्रमाणात नवीन प्रमाणपत्रे खरेदी करतील. सामान्य परिस्थितीत ही गोष्ट (अर्थात एका बँकेने दिलेल्या कर्जप्रमाणाचा किती भाग शासकीय कर्जप्रमाणपत्र खरेदी करण्यासाठी राखीव ठेवते) यावर अवलंबून असेल की, ती आपले हित जोपासण्यासाठी व्यावसायिकांना कर्ज देण्यासाठी अथवा व्यापारी हुंडी वठविण्यासाठी रोख रक्कम अबाधित ठेवण्यास किती महत्त्व देते. एकाच काळात विविध बँका या बाबतीत वेगवेगळी धोरणे अवलंबतील. एकूण परिणामाची भिस्त सहसा जास्त करून या गोष्टीवर असेल की, व्यावसायिकांतर्फे कर्जांच्या मागणीमध्ये किती विस्तीर्णता असून भविष्याच्या काही काळातच आपल्या नगदींच्या गरजांबाबत बँकांचा अंदाज काय असेल.

या प्रश्नाचे उत्तर अनुभवांतीच मिळेल की शासकीय कर्जप्रमाणपत्रासाठी कर्जप्रमाण सामान्य कर्जप्रमाणापेक्षा किती जास्त असावे. वरील मजकुरात संकेत केल्याप्रमाणे कोणताही निर्णय घेतेवेळेस केंद्रीय बँकेचे संपूर्ण लक्ष केवळ एवढ्याच उद्देशावर असावे की बँकेकडून शासकीय कर्जपुरवठ्यामध्ये वृद्धी तर व्हावीच शिवाय बँकेचे व्यावसायिक हित, व्यावसायिकांच्या कर्जांची गरज, उपभोक्त्यांची कर्जे वगैरे बाबतीचा संपूर्ण विचार करावा लागेल.

शासकीय प्रमाणपत्र कर्जांवर बँकांकडून कर्ज घेतेवेळेस त्यांचा जामीन म्हणून वापर केल्याने बँकांसाठी सवलत निर्माण होईल.

शासकीय कर्जप्रमाणपत्राच्या माध्यमाने शासनाच्या वित्तधोरणाचे एक महत्त्वपूर्ण कार्य होईल. या बाबतीत वर स्पष्टीकरण करण्यात आले आहेच. या प्रमाणपत्राच्या आधारे हानी संपत्ती आणि अतिरिक्त राशीची पद्धत सोईस्कर ठरेल. या प्रमाणपत्रांची विक्री वाढवून शासनाच्या प्रभावी मागणीस कमी आणि परत करण्यात येणाऱ्या कर्जांच्या तुलनेत घट करून प्रभावी मागणीत वृद्धी करण्याचा उद्देश साध्य करता येईल.

८) शासकीय भागीदार रोखे आणि बँकिंग व्यवस्था

पाचव्या प्रकरणात संकेत दिल्याप्रमाणे बँका आपल्या रोख राशीच्या स्थैर्यासाठी नगदी राखीवव्यतिरिक्त द्वितीय राखीवच्या स्वरुपात असे रोखे खरेदी करतील. या रोख्यांवर नुकसानीची जोखीम कमी असावी आणि कोणत्याही क्षणी नगदी पैशांत विक्री होण्यास पात्र असावीत. आमच्या विचारानुसार शासकीय भागीदारी रोख्यांचे मोठे प्रमाण आपल्या

उद्देशाच्या पूर्तीस्तव उपयोगी पड़तील. आम्हाला निश्चितच या गोष्टीची खात्री आहे की शासकीय रोख्यांवरील हानी होण्याची शक्यता संपुष्टात येईल, त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या शंकाकुशंका केवळ यामुळेच संपतील की, जे एखाद्या रोख्याच्या आधारावर सिद्ध होतील. नुकसानीची संभावना नसल्याच्या परिस्थितीत त्यांचे दर त्यावरील नोंदणीकृत असलेल्या किंमतीपेक्षा खाली उतरणार नसून त्यांच्यात एका संतुलित मर्यादेपर्यंत परिवर्तीत होतील. बँका आपल्या खात्याचा एक भाग शासकीय भागीदारी रोखे खरेदी करण्यावर खर्च करतील. ज्या वेळी त्यांना नगदीची गरज भासेल तेव्हा ही रोखे बाजारात विकून नगदी राशी प्राप्त होईल. असे करण्यात नुकसानीची संभावना असली तरी नफ्याची आशासुद्धा असेल. त्याचप्रमाणे नुकसान झाल्यास ते खूप अल्प असेल. जे रोखे त्यांची मुदत पूर्ण होण्यापूर्वी त्यांना विकण्याची गरज पडू नये. त्यांची मुदत पूर्ण झाल्यावर बँक शासनाकडून रोख्यांवर मिळालेला नफा वसूल करील. अशी अपेक्षा करता येईल की विविध बँका सार्वजनिक क्षेत्रातील विविध कारखान्यांत रोखे जास्त प्रमाणात खरेदी करून आपला प्रभाव पाडतील. असे करण्यात यश मिळाल्यास भागीदारी रोख्यांची विक्री करून शासनास बँकांकडून मोठ्या संख्येत भांडवल प्राप्त होणे शक्य असेल.

गरज पडल्यास बँकिंग व्यवस्थेची रोख राशी आणि खातेदारांचे हित अबाधित ठेवण्यासाठी केंद्रीय बँक सामान्य बँकांवर नियमांनुसार असे निर्बंध टाकू शकते की आपले कर्ज आणि बटाई खात्याची एकूण रक्कम अथवा प्रमाणांचे एक ठराविक टक्के भाग शासकीय भागीदारी रोखे खरेदी करण्यात खर्च करण्यात यावा. परंतु आमचा प्रस्ताव असा आहे की व्याजमुक्त व्यवस्थेवर आधारित बँक सुरु करतेवेळी असे न करता बँकांना याचे स्वातंत्र्य देण्यात यावे. शासन सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगातील उच्च कारकिर्दीच्या आधारावर भागीदारी रोख्यांना या बचतींत गृहीत धरलेल्या स्थानावर स्थानापन्न करील. अर्थात यावरील तोट्याच्या संभावना पूर्णत: नष्ट करून त्यांच्या भाजारभावात स्थैर्य निर्माण केल्यास अशी अपेक्षा करता येईल की, बँका आपोआप दुय्यम राखीव स्वरुपात रोख्यांचा वापर करतील. त्यामुळे दुय्यम राखीव पद्धती आणि त्यांचे प्रमाण वास्तविक अनुभव आणि परंपरेनुसार बँकांच्या स्वतंत्र निर्णयांच्या आधारे होतील.

मागील प्रकरणात स्पष्ट केल्याप्रमाणे शासकीय भागीदारी रोख्यांच्या खरेदी आणि विक्रीच्या माध्यमाने केंद्रीय बँक वित्तपुरवठ्यात वाढ अथवा घट करील. रोखे खरेदीच्या प्रमाणातील गती त्यांच्या विक्रीच्या गतीपेक्षा जास्त ठेवल्यास केंद्रीय बँकेस नगदी पुरवठ्यात सतत वाढ करण्याचे उद्देश साध्य करता येईल.

१) शासकीय बटाई रोखे आणि बँकिंग व्यवस्था

हे रोखे बाजारात खरेदी विक्रीस पात्र नसल्यामुळे बँकिंग व्यवस्थेत यांचा सहभाग खूप मर्यादित असेल. केंद्रीय बँकेस ज्या वेळी काही रोखे कायमस्वरूपी आपल्याकडे वा स्वत:कडेच ठेवून घ्यायचे असल्यास बटाई खरेदी करील. सामान्य बँकांमध्ये बटाई संख्येबाबत जास्त आकर्षण नसेल. कारण रोखेखरेदी आणि व्यावसायिकांना बटाई तत्त्वावर भांडवल पुरवठ्यादरम्यान केवळ एवढाच फरक असेल की, रोख्यात भांडवल लावण्यात तोटा होण्याची संभावना वास्तविक पाहता मुळीच नसेल. रोख राशीच्या प्रमाणानुसार बटाई रोखे फायदेशीर नसून अनुभवावरून हे सिद्ध होईल की या प्रक्रियेनुसार भरपूर दराने नफाप्राप्ती झाल्यास आपल्या व्यावसायिक भांडवलाचा एक भाग रोखे खरेदीत गुंतविणे पसंत करतील. बटाई रोखे इतर भांडवल साहित्यांप्रमाणेच कर्ज घेणारे आणि संस्था जामिनाच्या स्वरुपात सादर करतील. अट मात्र एवढीच आहे की, त्यांची कर्जमुदत परतण्याची मुदत पूर्ण होत असावी. बटाई रोखे बहुतेक लघू बचतकारांसाठी बँकेच्या बटाई खात्यांत भांडवल जमा करण्यासाठी योग्य मोबदल्याच्या स्वरुपात उपयोगी पड़तील.

उपरोल्लेखित रोखे आणि प्रमाणपत्रांची मोठी संख्या (जी देशाच्या आर्थिक व्यवस्थेत सवलत आणि नियमानुसार) निर्माण होण्याचे माध्यम सिद्ध होईल. यामुळे बचतीचा लाभदायक वापर आणि कर्जाची देवाणघेवाण व कर्जांचा जामीन सादर करण्यात सवलत असेल. बँकांना दुय्यम राखीव राशी ठेवणे व सुरक्षितरित्या भांडवलावर नफा मिळविण्यासाठी वापरणे आणि केंद्रीय बँकेकडून कर्ज घेण्यासाठी या रोख्यांची मदत मिळेल. केंद्रीय बँक हे रोखे आणि प्रमाणपत्रांना सामान्य बँकांवर आपले निर्णय लागू करण्याच्या स्वरुपात वापर करील. शासन आपल्या वित्तीय धोरणांची अंमलबजावणी करण्यासाठीसुद्धा वापर करील.

प्रकरण दहावे

व्याजमुक्त बँकिंग व्यवसायाची २५ वर्षे

१) इस्लामी बँकांची स्थापना

विसाव्या शतकाच्या चौथ्या, पाचव्या आणि सहाव्या दशकात विविध देशांत व्याजमुक्त संस्था स्थापन झाल्या. भारतामध्ये बचत आणि कर्जसंस्था कायम झाल्या. तसेच इजिप्त, पाकिस्तान आणि मलेशियामध्येसुद्धा व्याजमुक्त अर्थशास्त्रानुसार व्याजमुक्त बँका स्थापन झाल्या. परंतु सर्वांत प्रथम इस्लामी बँक अर्थात व्याजमुक्त बँक इ. सन १९७५ मध्ये दुबई येथे स्थापन करण्यात आली. ही एक खाजगी स्वरुपाची बँक होती. याच वर्षी 'ऑर्गनायझेशन ऑफ इस्लामिक कॉन्फरन्स' च्या देशांनी 'इस्लामिक डेव्हलपमेंट बँक' स्थापन केली. या बँकेचे मुख्यालय 'जिद्दाह' (सऊदी अरब) येथे आहे. इ. सन १९७० च्या दशकात आणखीन चार इस्लामी बँका आणि इ. सन १९८० च्या दशकात वीस आणि त्यानंतर आजपर्यंत आणखीन चोवीस इस्लामी बँका स्थापन झाल्या आहेत. शिवाय यांच्या भरपूर शाखासुद्धा उघडण्यात आल्या आहेत.

इस्लामिक डेव्हलपमेंट बँका मुस्लिम राष्ट्रांत स्थापन झाल्या असून बाकीच्या इतर सर्व बँका 'प्रायव्हेट सेक्टर' मध्ये कंपन्यांच्या स्वरुपात काम करीत आहेत. यामध्ये पाकिस्तान, ईराण आणि सुडानदेखील आहेत. कारण या देशांनी अशी घोषणा केली आहे की ते आपल्या बँकिंग व्यवस्था व्याजमुक्त करीत असून इस्लामी अर्थव्यवस्थेवर आधारित बँकिंग व्यवस्थांची पुनर्रचना करण्यात येत आहे. मलेशियामध्ये केवळ एकच इस्लामी बँक असली तरी इतर बँकासुद्धा इस्लामी आर्थिक सेवा पुरवितात. तसेच तेथील केंद्रीय बँक व्याजावर-आधारित आणि व्याजमुक्त अशा दोन्ही प्रकारच्या बँकिंगची व्यवस्था सांभाळते. त्याचप्रमाणे इंडोनेशियातील 'बँकिंग व्यवहार' या संस्थेची संपूर्ण देशात व्याजमुक्त अर्थव्यवस्थेची पाळेमुळे पसरलेली आहेत. जणू पाच राष्ट्रांमध्ये शासनाच्या देखरेखीखाली व्याजमुक्त इस्लामी बँकिंग यशस्वीपणे चालू आहे. याचबरोबर जगातील सर्व इस्लामी राष्ट्रांत इस्लामी बँका स्थापन्याचे प्रयत्न तर होत आहेतच, शिवाय इस्लामिक डेव्हलपमेंट बँकेच्या सहकार्याने इस्लामी अर्थ- व्यवस्था विकास करीत आहे. दुसऱ्या शब्दांत असे की इंटरनॅशनल मॉनेटरी फंड (IMF) च्या सदस्यराष्ट्रांची एक तृतियांश संख्या व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेचा प्रयोग करू पाहत आहे.

२) सामान्य बँकांच्या इस्लामी शाखा

मोठ्या संख्येतील मुस्लिम ठेवीदार, भांडवलदार आणि व्यावसायिक संस्थाचालकांची ओढ व्याजमुक्त इस्लामी बँकांकडे असल्यामुळे सामान्य व्यावसायिक बँकांनीसुद्धा व्याजमुक्त अर्थसेवा पुरविण्यास सुरुवात केली आहे. कदाचित त्यांचे जुने

ग्राहक त्यांना सोडून इस्लामी बँकांकडे आकर्षित होत असतील. असो. आता परिस्थिती अशी झाली आहे की मुस्लिम देशांत आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असणाऱ्या बँकांच्या कार्यरत असलेल्या शाखांपैकी बहुतेक शाखांनी इस्लामी विभाग (Islamic Windows) उघडले आहेत. व्याजावर आधारित बँकांच्या या व्याजमुक्त हिशोबांच्या माध्यमाने सामान्य बचतकारांसाठी हे शक्य झाले आहे की, एकीकडे तर या आजमावलेल्या आणि प्रसिद्ध बँकांची सेवा प्राप्त करून घ्यावी आणि दुसरीकडे व्याजापासून कायमचे दूर आणि मुक्त राहावे.

काही प्रसिद्ध बँकांनीदेखील इस्लामिक बँकिंगकरिता स्वतंत्र शाखाच उघडल्या आहेत. 'सऊदी अरब' मध्ये 'नॅशनल कमर्शियल' बँकेच्या पन्नासपेक्षाही जास्त शाखा केवळ व्याजमुक्त अर्थव्यवहारासाठी उघडल्या आहेत. त्याचप्रमाणे 'सिटी बँकेने' 'बहरीन' मध्ये एक स्वतंत्र शाखा केवळ इस्लामी बँकिंगसाठी स्थापन केली आहे.

सांगायचे तात्पर्य असे की आता जगामध्ये व्याजमुक्त बँकिंग तीन पद्धतीने कार्य करीत आहे. १) इस्लामी बँकेच्या माध्यमाने, २) व्याजावर आधारित बँकांच्या इस्लामी शाखांच्या माध्यमाने आणि ३) व्याजावर आधारित बँकांच्या इस्लामी काउंटरच्या माध्यमाने. ही व्याजमुक्त सेवा प्रत्येक मुस्लिम देशात उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे मुस्लिमबहुल देशांमध्ये (भारत, फिलीपाइन्स, श्रीलंका वगैरे) देखील अशी सेवा उपलब्ध आहे. यूरोप आणि अमेरिकामध्ये इस्लामिक बँका कायम झाल्या नसल्या तरी विभिन्न प्रकारच्या अशा आर्थिक संस्था आहेत की ज्या ठेवीदारांच्या ठेवींच्या रकमा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या व्यवसायात गुंतवून ग्राहकांना वा ठेवीदारांना वैध नफा मिळवून देत आहेत.

३) भांडवलनिर्मितीचा एकत्रित इस्लामिक बँकिंग

मागील २५ वर्षांत बँकिंग व्यवस्था आणि बाजार-मंडीत आलेल्या मोठ्या परिवर्तनापैकी एक परिवर्तन हेदेखील आहे की, मोठमोठ्या व्यावसायिक संस्था भांडवल प्राप्त करण्यासाठी बँकांचा आधार मिळविण्याऐवजी प्रत्यक्षपणे शेअर बाजारातून शेअर्स किंवा बाँड्स (Bonds) अर्थात व्याजावर कर्जांचे प्रमाणपत्र विकून भांडवल प्राप्त करू लागल्या आहेत. या परिवर्तनाच्या प्रतिक्रियेत राष्ट्रीय कायदा परवानगी देत असलेल्या ठिकाणी बँकांनी बाँडस (Bonds) आणि शेअर्सच्या व्यवहारातसुद्धा प्रवेश केला आहे. दुसरे मोठे परिवर्तन असे की ठेवीदार हे आपल्या ठेवीवर नफा मिळविण्यासाठी बँकांऐवजी भांडवलनिर्मितीच्या एकत्रित निधीत (Mutual Fund) उदा : 'यूनिट ट्रस्ट ऑफ इंडिया' मध्ये आपल्या ठेवी ठेवत आहेत. सुरुवातीस एकत्रित बचतीचा अल्पसा भाग म्युच्युअल फंडाच्या नशिबी येत असे. परंतु आता तर अमेरिकेसारख्या प्रगत देशात अशा फंडामध्ये जमा असलेल्या रकमा या अमेरिकेच्या एकूण व्यावसायिक बँकांमध्ये

जमा असलेल्या एकूण रकमेसमान झाल्या आहेत. (अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व बोर्ड'ने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार इ. स. १९९८ मध्ये व्यावसायिक बँकांचे एकूण मूळ भांडवल हे पाच ट्रिलियन, ६३५ बिलीयन आणि ४६० मिलियन एवढे होते, तर म्युच्युअल फंडचे मूळ भांडवल हे पाच ट्रिनियल, ५२५ मिलियन आणि २०९.३ मिलीयन एवढे होते.)

एकत्रित शेअर फंड्स आणि बाँड्सच्या क्रय-विक्रयाच्या माध्यमाने नफा मिळवून यास अशा लोकांत वाटप करण्यात येते ज्यांनी त्यांच्याकडे भांडवल जमा केलेले होते. अशा प्रकारे उपरोक्त दोन्ही परिवर्तने, व्यावसायिक संस्थांचा वित्तबाजाराकडे आकर्षित होणे आणि जनतेचे आपल्या बचती म्युज्युअल फंडांच्या स्वाधीन करणे हे एकदुसऱ्यांशी समरुप ठरते. परिणामस्वरुपी बँकांच्या तुलनेत वित्तबाजाराच्या इतर संस्थांचे महत्त्व खूप वाढते. याच मानसिकतेच्या प्रभावाखाली 'इस्लामिक इन्व्हेस्टमेंट कंपन्यां' कडे लोकांचा कल आणि आकर्षण वाढत असल्याने उपरोल्लेखित इस्लामिक बँकांशिवाय कित्येक इस्लामिक इन्व्हेस्टमेंट कंपन्या जोमाने व यशस्वीपणे कार्यरत आहेत. वस्तुबाजारात पूर्वीपासूनच सक्रीय असलेल्या जगप्रसिद्ध म्युच्युअल फंडांनीसुद्धा व्याजमुक्त 'इस्लामिक फंड' सादर केले असून यांना बरीच प्रसिद्धी मिळत आहे. हे इस्लामिक फंड या बाबतीत वचन देत आहे की, ते अशा प्रकारच्या कंपन्यांचे शेअर्स खरेदी करणार नाहीत, ज्यांच्या भांडवलाचा मोठा भाग व्याजावर कर्जाच्या स्वरुपात प्राप्त केलेला असेल. २५ वर्षापूर्वी व्याजमुक्त बँका स्थापण्याची शृंखलाच सुरु झाली होती. त्यामध्ये या बँका इस्लामी वित्तबाजारात (Islamic Financial Market) या बाबीं काटेकोरपणे जोपासत आहेत. इन्शूअरन्स कंपन्या, इन्व्हेस्टमेंट कंपन्या, म्युच्युअल फंड आणि स्टॉक एक्सचेंज याच्याच पुनरुज्जीवनाच्या कड्या आहेत.

४) राष्ट्रीय पातळीवर व्याजमुक्त बँकिंग व्यवस्था

३८ वर्षापूर्वी पाकिस्तानने आपली अर्थ व बँकिंग व्यवस्था व्याजमुक्त करण्याची प्रक्रिया सुरु केली. यानंतर चार वर्षांनी 'ईराण' आणि पाच वर्षानंतर 'सुडान'नेसुद्धा शासकीय पातळीवर ही प्रक्रिया सुरु केली होती. नियमानुसार आज ही तिन्ही राष्ट्रे व्याजमुक्त बँकिंग व्यवस्थेचे दावेदार आहेत.

तिन्ही देशांत काही बाबींत साम्य आहे. डिमांड डिपॉझिट्स (Demand Deposites) हेदेखील अशाच प्रकारे कार्य करीत आहेत की ज्याप्रमाणे प्रचलित बँकिंग व्यवस्थेचे स्वरुप (अर्थात यावर कोणताच नफा न मिळता मूळ भांडवल अबाधित राहते आणि वाटेल तेव्हा खात्यातून पैसा काढ़ता येतो) आहे. बचत खाते किंवा दीर्घमुदत खाते किंवा गुंतवणूक खात्यावर नफा मिळणे हे बँकेस नफा मिळण्याच्या अटींवर अवलंबून आहे. तसेच या नफ्याचे दर बदलत राहतात. परंतु वस्तुतः हे दर शासन

निश्चित करीत असते आणि याचा हिशोब बँकांना भांडवलापासून मिळणाऱ्या प्रमाणानुसार लावण्यात येत नाही. तिन्ही देशांत बटाई आणि भागीदारी तत्त्वावरील भांडवल गुंतवणुकीचे प्रमाण खूप कमी असून हे प्रमाण पाकिस्तानात सर्वांत कमी आहे. याचा एक परिणाम असा झाला की, बँकांची जास्त भांडवलगुंतवणूक ही अल्पमुदतीची असते. नियमानुसार हे भांडवल शेअर बाजारात शेअर विक्री करून प्राप्त व्हावयास हवे. परंतु या सर्वच देशांमध्ये शेअर बाजार खूप मंद आहे.

ईरानमध्ये सर्व बँका शासकीय अधिपत्याखाली आहेत. शासन हे निधीची घसरण आणि तोटा दूर करण्यासाठी नोटा छापून ही गरज पूर्ण करणाऱ्या केंद्रीय बँकेकडून कर्ज घेते. धर्मनीतीनुसार या गोष्टीची परवानगी आहे की, व्यावसायिक हुंडींच्या मोबदल्यात दलालीत कपात करून बाकी रक्कम रोख स्वरुपात देण्यात यावी. व्यावसायिक बँकांसाठी हे नफा मिळविण्याच्या माध्यमाबरोबरच या बँकांच्या माध्यमाने शासनासाठी जनतेकडून कर्ज घेण्याचे माध्यमदेखील बनले आहे. यापेक्षाही जास्त की, व्यापारी रोख रकमेची गरज पडल्यास ठराविक दरानुसार 'नफा' प्राप्ती तत्त्वावर कर्ज मिळविता येणे शक्य आहे.

सुडानमध्ये 'गव्हर्नमेंट मुशारिका सर्टिफिकेट' (GMC) या नावाने असलेले प्रमाणपत्र विकून आणि केंद्रीय बँक 'सेंट्रल मुशारिका सर्टिफिकेट' (CMC) या नावाने प्रमाणपत्र विकून जनतेकडून भांडवल मिळविण्याचे प्रयत्न करीत आहे. या भांडवलाचा एक वापर असादेखील आहे की शासन सामान्य व्यावसायिक बँकांमध्ये भागीदारी होऊन त्यांच्या नफ्यात वाटेकरी होते आणि यातून प्राप्त होणाऱ्या नफ्याचा एक भाग प्रमाणपत्राच्या मालकांना वाटण्यात येतो.

पाकिस्तान, ईराण आणि सुडानमध्ये पूर्णपणे आणि मलेशिया आणि इंडोनेशियामध्ये आंशिक स्वरुपात शासनाच्या व्याजमुक्त बँकिंग व्यवस्था चालविण्यात सहभागी होण्याचा तेथील आर्थिक वातावरणावर मोठा परिणाम पडला आहे. आता इस्लामी बँकिंग व्यवस्था ही काही धार्मिक लोकांची गरज पूर्ण करण्याचे एक माध्यम राहिलेले नाही की ज्यास प्रचलित बँकिंग व्यवस्थेच्या एका कडेला एक कंटाळवाण्या अस्तित्वाच्या स्वरुपात सहन करण्यात यावे. या उलट व्याजमुक्त इस्लामी बँकिंग व्यवस्था ही प्रचलित व व्याजावर आधारित बँकिंग व्यवस्थेसाठी एक असा ठोस पर्याय सिद्ध झाली आहे की, ज्याच्याशी जगाचा एक प्रचंड व्यक्तींसमूह संबंधित आहे.

५) व्याजमुक्त वित्तसंस्थांचे चलन

बँकिंग व्यवस्थांचे प्रत्यक्षपणे जागतिक क्षेत्रात व्याजमुक्त इस्लामी बँकिंग अल्पावधित जनसामान्यापर्यंत पोहोचून तिचे सार्वत्रीकरण होणे, हा काही आपोआप

घडलेला चमत्कार नाही. ही मानवी इतिहासातील किंबहुना पहिलीच संधी आहे की, साम्यवादाप्रमाणे (Communism) बँकिंग व्यवस्था आणि वित्तबाजारास पूर्णत: रद्दबातल ठरविण्याच्या जागी एक असा पर्याय सादर करण्यात आला आहे, जो व्यवसाय स्वातंत्र्याबरोबरच स्वलाभास मूळ प्रेरणादायी बाब मान्य करतो. परंतु याबरोबरच सामूहिक हिताच्या रक्षण आणि न्याय प्रस्थापनेसाठी व्याज आणि सट्टा निषिद्ध ठरवून यांच्याशिवायही वित्त बाजार आणि बँकिंग व्यवस्थेच्या पुनरुज्जीवनाचे धैर्य बाळगतो. बचत करणाऱ्या व व्यवसाय करणाऱ्यांना मूळ रूची किंवा आकर्षण पैसा कमावण्यात आहे. त्या कमाईंच्या पद्धतीशी त्यांना काहीच देणेघेणे नाही. मानवी इतिहासात व्यावसायिक नफा, भाडे आणि कराबरोबरच व्याजाचे प्रकटीकरण हे जमा असलेल्या भांडवलावर मुदत गुदरण्याबरोबरच नफा मिळविण्याच्या एका पद्धतीच्या स्वरुपात झाले होते. आता मात्र जर प्राचीन आणि आधुनिक प्रयोगाच्या प्रकाशात ही प्रणाली अत्याचारावर आधारित, अन्यायी व विश्वशांतीसाठी संकट सिद्ध झाल्यास यापासून दूर राहून भांडवलास लाभदायक बनविण्यासाठी पर्यायी प्रणालींना अवश्य आजमावून पाहण्यात यावे.

पूर्वीच्या काळाच्या तुलनेत सध्या या गोष्टीस खूप महत्त्व प्राप्त होत आहे की, भांडवल लावून नफा कमाविण्याच्या पद्धती अशा नसावयास पाहिजे की, ज्यामुळे जागतिक वातावरण दूषित होईल आणि विश्वशांती भंग होण्याचा धोका निर्माण होईल किंवा मानवाच्या एखाद्या समूहात वैफल्य, अत्याचार, पीड़ा वाढ़त जाईल. कारण अशा प्रणालीच्या माध्यमाने कमाविण्यात आलेला 'नफा' हा समाजासाठी महासंकट निर्माण करतो, तसेच समाजाच्या विध्वंसाबरोबरच नफा मिळविणारे लोकसुद्धा उद्ध्वस्त होत असतात. वर्तमान बँकिंग व्यवस्था आणि वित्त बाजाराच्या वर्तमान कार्यपद्धतींच्या प्रभावाखाली या समस्या कमी होत नसून आणखीन उग्र स्वरुप धारण करीत आहेत. व्याज आणि जुगारापासून मुक्त नैतिक मूल्यांचे मार्गदर्शन करणाऱ्या इस्लामी बँकिंग व्यवस्थेच्या वर्तमान स्वरुपास या दृष्टिकोनानुसार पाहणेच अत्यावश्यक ठरले आहे.

६) या बाबींना प्राधान्य देण्याची कारणे

मूळ कारणमीमांसा

आम्ही हे स्पष्ट करू की 'रोकड आणि वित्तव्यवस्था' (Monetory & Financial System) मध्ये ज्या ठिकाणी व्याजाचा वापर आहे, त्या ठिकाणी भागीदारी व बटाई व्यवस्थेचा प्रयोग करून हा अन्याय संपवून न्यायाची स्थापना, आर्थिक साधनांचा योग्य वापर, आर्थिक स्थैर्य आणि विकास सिद्ध होईल. मागे स्पष्ट केल्यानुसार, वस्तुत: बँकांना अशा पद्धतींचादेखील अवलंब करावा लागत आहे की, ज्यामुळे कर्जवृत्ती अस्तित्वात येऊन त्यामुळे उपरोल्लेखित पात्रतांमध्ये घट होत असते.

परंतु वर्तमान परिस्थिती ही अस्थायी असू शकते आणि जर व्याज व जुगारापासून अर्थव्यवस्था मुक्त व पवित्र करण्यावर सर्व सहमती झाली तर मानवसमाज जास्त सुलभरित्या बटाई आणि भागीदारी तत्त्वावर आधारित अर्थव्यवस्थेकडे येईल. त्यासाठी पुढील मजकुरात आम्ही या व्यवस्थेच्या लाभदायकतांच्या विषयावर चर्चा करू.

७) अत्याचार निर्मूलन व न्याय प्रस्थापना

प्रचलित अर्थव्यवस्था रोख भांडवलांचे मालक आणि भांडवल व्यवसायात गुंतवून लाभ देणाऱ्यांदरम्यान भेदभावपूर्ण व्यवहार करीत असते. बँकांच्या दीर्घमुदत खात्यात जमा करण्यात येणाऱ्या रोख भांडवलाच्या मालकांना ही व्यवस्था या गोष्टीचा जामीन देते की, त्यांना त्यांचे भांडवल वाढीव स्वरुपात परत मिळेल आणि हे भांडवल वेळेच्या किंवा मुदतीच्या प्रमाणात वाढत जाईल. देशाच्या सर्व कायदानिर्मिती संस्था, न्यायालये... पोलिस या जामिनीच्या समर्थनास आपली शक्ती पणाला लावतात. परंतु जे लोक भांडवल कर्जावर घेऊन त्यास निर्मिती व्यवसायात लावतात, त्यांना कोणीही या गोष्टीची जामीन देत नाही की त्यांना नफा मिळेलच. वस्तुस्थिती अशी की, या गोष्टीची हमी वा जामीन देणे शक्यच नाही. व्यवसायात नफा आणि नुकसान या दोन्ही बाबींची संभावना असतेच. मानवी जीवनाची अवस्थाच मुळात अशी आहे.

मानवांच्या आवडीनिवडीत होणारे बदल, नवनवीन संशोधने वगैरेच्या परिवर्तनामुळे भविष्यसामग्री आणि मागण्या व मूल्यांचा नेमका अनुमान लावता येत नाही. वर्तमानकाळात होणाऱ्या निर्णयाचे आधार हे आजच्या आशा आणि भूतकाळातील घटनांपेक्षा खूप भिन्न असतात. जेव्हा जेव्हा नगदी रोकड निर्मिती व्यवसायात लावण्यात येईल, तेव्हा या गोष्टींची शक्यता निर्माण होईल की, व्यवसायाचे परिणाम निर्मितीविक्रीच्या माध्यमाने पुन्हा नगदी रोकड वा भांडवलाच्या स्वरुपात परत येईपर्यंत परिस्थितीत बदल होईल. मग नफ्याच्या स्वरुपात असो वा तोट्याच्या स्वरुपात. या वस्तुस्थितीला समोर ठेवून भांडवलामध्ये मुदत गुदरत असण्याबरोबरच वृद्धी होण्याची शाश्वती मुळीच नाही.

मात्र मानवी इतिहासात भांडवलदारांचे पारडे कष्टकरी आणि व्यावसायिकांपेक्षा नेहमीच जड राहिले आहे. शासनांनी त्यांच्याकडून कर्ज घेऊन लढाया लढल्या, व्यावसायिकांनी भांडवल घेऊन व्यवसाय विस्तारित केले आणि बऱ्याच वेळा गरीब व दारिद्र्यरेषेखालील जनतेने आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांच्याकडून कर्ज घेण्याची विवशता आणि नामुष्की पत्करली. एवढेच नव्हे तर कर्ज घेतलेल्या लोकांनी विवश होऊन कर्जफेडीसाठी आपले राहते घरदार विकून मुलाबाळांना रस्त्यावर आणले. शेतीवाडी विकून आपल्या मुलाबाळांना दोन वेळेच्या घासापासून वंचित केले. एवढेच नव्हे तर या कर्ज परतफेडीसाठी भांडवलदारांनी त्यांचे स्वातंत्र्य हिरावून त्यांना

गुलामीच्या बेड्यात कायमस्वरुपी जखडले. तेव्हा एकूणरित्या जगातील सर्व धर्मांचा विरोध झुगारून देऊन व्याजावरील कर्जाने आपले भयानक पाय पसरले.

न्यायाची मागणी हीच आहे की, भांडवल व्यवसायप्रक्रियेत गुंतविल्यावर व्यवसायात नफा होण्याच्याच परिस्थितीत वाढ़ीव स्वरुपात घ्यावा. केवळ मुदतीच्या प्रमाणात दिलेली राशी वाढ़ीव स्वरुपात घेणे हा अतिशय घोर अन्याय आहे. कारण वातावरण या वाढीव राशीची हमी देत नाही.

काही विचारवंतांनी स्पष्टपणे ही वस्तुस्थिती स्पष्ट केली की, आजकाल बँकेकडून कर्ज घेऊन व्यवसाय करणाऱ्यांपैकी काही मोठ्या व्यावसायिक संस्थादेखील असतात. त्यांना भरमसाठ नफा होतो. या तुलनेत त्यांचे व्याजदर अत्यल्प असतात. दुसरीकडे आपले भांडवल बँकेमार्फत व्यावसायिक संस्थांना व्याजावर पुरविणाऱ्या खातेदारांमध्ये बहुतेकजण कमी आय असणारे असतात. ते आपल्या बचती बँकांमार्फत लाभदायक बनवू इच्छितात. वर्तमान व्यवस्थेत भरमसाठ नफा मिळविणाऱ्यांपेक्षा लहान बचतकारांना जेवढ़ी संपत्ती नफ्याच्या स्वरुपात मिळावयास हवी, तेवढ़ी मिळत नाही. नफ्यामध्ये भागीदारी तत्त्वावर जनतेच्या बचती भांडवलाची मागणी करणाऱ्यांपर्यंत पोहोचविण्याची पद्धत ही उपरोल्लेखित दोन्ही प्रकारच्या विकृतीपासून मुक्त आहे. या पद्धतीमुळे मोठ्या नफ्याच्या स्वरुपात खातेदारांना जास्त वाढ़ीव नफा मिळतो. नफा मुळीच न झाल्यास व्यावसायिक किंवा खातेदारांवर विनाकारण कोणताच बोजा पडत नाही. तसेच व्यवसायात तोटा झाल्यास व्यावसायिकांवर हा अन्याय होत नाही. काही व्यावसायिकांना नुकसान होऊनसुद्धा आपल्या एकूण भांडवलामध्ये मोठ्या प्रमाणात व्यावसायिक पक्षांना भांडवलपुरवठा करण्यात येतो, या आधारावर थोडाफार नफा खातेदारांनादेखील वाटप करण्यात यावा.

८) उत्तम कारकिर्द

जेवढ़ा उत्पन्नव्यवसाय कर्जावर भांडवल उचलून चालविण्यात येतो, तिथपर्यंत देशाची माध्यमे निर्मितीच्या वापराच्या संभावित वाटा किंवा मार्गापैकी एका मार्गाची निवड या वापराच्या उत्पन्नाऐवजी या प्रमाणानुसार करण्यात येते की कर्ज मागणी करणाऱ्यात या गोष्टीची किती पात्रता आहे, तो आपल्या सध्याच्या संपत्तीच्या बळावर कर्ज परत करण्याची आणि त्यावरील व्याज परत करण्याची क्षमता किती आहे. निर्मितीकार्य (Productivity) च्या ठिकाणी फेडीस (Credit worthiness) आर्थिक माध्यमे ठरविण्याचा समाजावर खूप वाईट परिणाम होईल. कारण श्रेयस्कर बाब हीच आहे की, नैसर्गिक माध्यमे उदा : शेती, श्रम, भांडवल आणि नियोजन पात्रतासारख्या बाबी या कार्यात लावण्यात यावे. यामुळे संपत्तीत सारखी वाढ़ शक्य आहे. अर्थातच कर्जमागणी

करणारे हे कोट्यधीश असले तरी त्यांची कोट्यधीशता ही या गोष्टीची जामीन ठरू शकत नाही की, त्यांनी घेतलेल्या कर्जावर होणाऱ्या व्यवसायात नफा मिळेलच. त्याच्या मोठ्या भांडवलावर आधारित या व्यवसायात जबर तोटादेखील होऊ शकतो. दुसरीकडे खिशात एक खडकी नसतानासुद्धा एखादा माणूस बँकेसमोर एक अशी उत्तम व्यावसायिक योजना ठेवू शकतो की ज्याच्या यशस्वीतेची आणि लाभदायकतेची सर्वसहमत संभावना दिसते. परंतु वर्तमान कायद्यानुसार व्यवसायात लावण्यात येणाऱ्या कर्जभांडवलाची व्याजासकट परतफेड या व्यवसायाच्या निर्मिती आणि नफ्यावर मुळीच आधारित नाही. व्यवसायात नफा होवो की तोटा, प्रचलित व्याजदरापेक्षा कमी, कोणत्याही परिस्थितीत कर्ज घेणाऱ्यास ठराविक वेळेवर व्याजासकट मूळ रक्कम परत करण्यास अक्षमता दर्शविल्यास बँक न्यायालय व पोलिस यंत्रणेची मदत घेऊन आपले मूळ भांडवल चक्रवाढ व्याजासह वसूल करतेच. अर्थातच कर्ज घेणाऱ्यांची कर्जफेडीची आर्थिक पात्रता मोजूनच बँक त्यास कर्ज देते अन्यथा कर्ज मिळत नाही.

नफ्यामध्ये भागीदारी तत्त्वावर आधारित व्याजमुक्त बँकिंग व्यवस्था या वायफळ आणि विशुद्ध व नुकसानकारक बाबींपासून मुक्त असेल. या व्यवस्थेत भांडवल कर्ज देणाऱ्यांना नफा केवळ याच परिस्थितीत मिळेल जेव्हा त्याच्या वापरामुळे नफा मिळाला असेल. कर्ज देतेवेळेस या गोष्टीचा अभ्यास करण्यात येईल की, ज्या व्यावसायिक योजनेच्या पूर्तीसाठी भांडवल घेण्यात येत आहे, त्यातून नफ्याची संभावना किती प्रमाणात आहे. हे करणे आवश्यकच ठरेल. कारण जर व्यवसायात तोटा झाला तर कर्ज घेणाऱ्याची स्वसंपत्ती बँकेच्या कोणत्याच कामी येणार नाही. भागीदारी व्यवस्थेत भांडवल आणि निर्मिती साधनांचा ओघ हा निर्मितीच्या वृद्धीच्या संभावनांकडे जास्त असेल आणि हेच मानवासाठी श्रेयस्कर आहे.

९) स्थैर्य

मानवी जीवनात नेहमीच चढ़उतार येतच असतात. आर्थिक बाबी, वाढ़ीव किंमती, रोजगार व निर्मितीचे स्तर, संपत्तीची बाह्य खरेदीशक्ती वगैरे एकाच पातळीत स्थिर नसतात. असामान्य चढ़-उताराच्या ठिकाणी समस्या निर्माण होतात. अशावेळी वादळी परिस्थिती निर्माण होते. सतत संपत्तीत होणारी घट आणि उतार तसेच दीर्घमुदतीपर्यंत असणारी मंदीसुद्धा विनाषक सिद्ध होते. या परिवर्तनामुळे लक्षावधी नव्हे तर कोट्यवधी लोक दारिद्र्याच्या गर्तेतत पडून सामाजिक शांती भंग पावते. यामुळे आर्थिक शक्ती आणि साधनांचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होतो. परिस्थितीच्या निरीक्षणावरून हे सिद्ध झाले आहे की, रोख व्यवस्था आणि वित्तबाजारात अस्थैर्य निर्माण होणे हे व्याजव्यवहाराचे भयानक परिणाम होय.

व्याजावर कर्ज घेऊन व्यवसाय करण्यात येतो तेव्हा व्यावसायिकांच्या जबाबदाऱ्या, परतफेडीच्या रकमेची राशी, परतफेडीच्या तारखांसहीत ठरविण्यात येते. उदाहरणार्थ, अमक्या तारखेपर्यंत एवढी रक्कम (मूळ भांडवल व्याजासकट) परत करण्यात यावी. परंतु व्यवसाय करणाऱ्यास मिळणाऱ्या रकमेची राशी व तारखा कधीही निश्चित करण्यात येत नाही ! दोन्ही बाबी बाजारमंडीच्या बदलत्या परिस्थितीवर अवलंबून असतात. व्यावसायिक व्यक्ती व्यापारी, उद्योजक शेतकरी वगैरेसाठी परत फेडीची वेळ आली तरी मात्र जर मालच तयार झाला नाही आणि विकलाच गेला नाही किंवा त्याची किंमतच मिळाली नाही तर तो काय करू शकेल ? शेवटी नवीन कर्ज घेऊनच जुन्या कर्जाची परतफेड करावी लागेल आणि व्याजावर व्याज देता देता संपूर्ण जीवनच संपून जावे. पहिल्या प्रकरणी बँकांना समस्यांचा सामना करावा लागेल, कारण त्या आपल्या जबाबदाऱ्या (उदाहरणार्थ, बँकेच्या खातेदारांच्या वेळेवर हिशोब चुकवता येणार नाही) याचा वाईट परिणाम संपूर्ण व्यवस्थेवर पडेल. दुसऱ्या परिस्थितीत नवीन कर्ज जास्त व्याजदराने मिळेल. कारण पहिले कर्ज वेळेवर न फेडल्यामुळे कर्ज घेणाऱ्याची प्रतिष्ठा मलीन झालेली असते. अशा प्रकारे लागतमध्ये आणखीन वाढ होऊन नफ्यात घट होईल. ज्या आशांवर त्यांचे व्यावसायिक नियोजन आधारित होते, त्या आशांची पूर्ती होणार नाही. ही बाब विसरता कामा नये की व्यावसायिकाचे कर्जफेडीचे कर्तव्य आणि बँकेच्या वसुलीदरम्यान निर्माण होणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीचे मूळ कारण हे केवळ व्याजावर कर्ज घेणे होय. जर हेच कर्ज व्याजावर न घेता बटाई अथवा भागीदारी तत्त्वावर घेण्यात आले असते तर अशी प्रतिकूल परिस्थिती निर्माण होण्याचा प्रश्नच निर्माण झाला नसता.

कर्जफेडीचे कर्तव्य आणि वसुलीचे अधिकार यादरम्यान निर्माण होणारी प्रतिकूल परिस्थिती अशाप्रसंगी जास्तच विस्फोटक बनते की, जेव्हा व्यवसायातून मिळणारी एकूण कमाई ही घेतलेल्या कर्ज भांडवलापेक्षाही कमी होते. (अर्थात व्यवसायात तोटा होतो.) परिणामी एकीकडे व्यावसायिक पक्ष किंवा संस्था ही आपल्या पूर्वीच्या संपत्तीपासून वंचित होईल आणि पुढील व्यावसायिक प्रयत्नांतून अंग काढून घेण्याची शक्यता निर्माण होईल. शिवाय दुसरीकडे बँकिंग व्यवस्था वसुली कमी झाल्याने होणाऱ्या घसाऱ्याच्या भरपाईसाठी दुसरीकडे लावलेले भांडवल परत काढून घेण्याचे प्रयत्न करील. याचे दूरगामी परिणाम होऊ शकतात. शेवटी व्यावसायिक भांडवलाच्या सामग्रीत आणि निर्मिती व रोजगारात व घट होऊ शकते.

भागीदारी आणि बटाई वर आधारित भांडवल अशा दुष्परिणामांपासून मुक्त आहे. यामध्ये कर्जफेड आणि वसुली या दोन्हीदरम्यान अनुकूल परिस्थिती निर्माण होईल आणि अस्थैर्य निर्माण होण्याचे सर्वांत मोठे कारण शोधूनही सापडणार नाही.

भागीदारी आणि बटाई तत्त्वावर भांडवल घेऊन व्यवसाय करणाऱ्यांची ही जबाबदारी आहे की, ज्या वेळी निर्मिती विक्रीच्या परिणामस्वरुपी भांडवल नगदीच्या स्वरुपात येईल, तेव्हा नफ्यात निश्चित झालेल्या वाट्यासहित भांडवल परत करावे. नफा मुळीच झाला नसल्यास भांडवलाची मूळ रक्कम परत करावी. तोटा झाला असल्यास उरलेली भांडवलाची राशी परत करावी. भांडवल जर बँकेकडून घेतलेले असेल आणि व्यावसायिक नियोजनाची वेळ ठरविण्यात आलेली असेल व ही ठराविक वेळ निघून जाऊनही व्यवसाय नियोजन पूर्ण झालेले नसेल तर बँकांनी हे ठरवावयास हवे की वेळेवर हिशेब चुकता करण्याचा आग्रह करावा किंवा नफ्याची आशा बाळगून बाजाराची परिस्थिती अनुकूल होण्याची वाट पाहावी. आग्रह करावयाचा झाल्यास ठरलेल्या करारानुसार व्यावसायिक पक्षाने भांडवलास नगदीचे स्वरुप देण्यासाठी आवश्यक असलेले प्रयत्न करावे. परंतु आणखीन दुसरीकडून कर्ज घेऊन या कर्जाची परतफेड करण्यास त्याला विवश केले जाऊ नये. ज्या ठिकाणी खातेदार आणि बँकांच्या संबंधांचा प्रश्न येतो, त्या ठिकाणीसुद्धा व्याज़ावर आधारित असलेल्या अर्थव्यवस्थेतील भांडवलराशी व तारखांच्या निश्चिततेप्रमाणे व्याजमुक्त व्यवस्थामध्ये बंधने नाहीत. खातेदारांकडून एखाद्या विशेष तारखेचे बंधन निश्चित झालेच असेल तर हा करार देखील पूर्ण होऊ शकतो. कारण खातेदारास किती रक्कम मिळेल हे हिशोबनुसार ठरविण्यात येईल, पहिल्यापासून या बाबतीत करार करण्यात येणार नाही. अर्थातच जो घटक अर्थव्यवस्थेत बोजड ठरतो तो निघून जाईल आणि व्यवस्थेत स्थैर्यासाठी आवश्यक असलेली मृदुता निर्माण होईल.

१०) अधिकांश वृद्धी व विकास

सतत वाढणारी लोकसंख्या आणि मानवांच्या दैनंदिन गरजांची मागणीच ही आहे की, स्थैर्य व न्यायाबरोबरच विकासही व्हावा. तसेच निर्मिती व संपत्तीत वर्षानुवर्षे वृद्धी व्हावी. जे अर्थ बाजार (Market economy) व्याजाऐवजी नफा भागीदारास देतील, ते बाजार जास्त गतीने विकसित होतील. याचे पहिले कारण असे आहे की, भागीदारी व्यवस्थेत निर्मितीसाधनांचा उत्तम विनियोग असेल. दुसरे कारण असे की न्याय स्थापन झाल्यास कष्टकरी आणि व्यावसायिक या दोहोंच्या कार्य प्रेरणांस बळ व शक्ती प्राप्त होईल. विशेषत: कष्टकरीवर्ग वैफल्य आणि अन्याय व अत्याचारापासून मुक्त होऊन उद्योजकांशी सहानुभूतीने वागेल. याचा चांगला परिणाम निर्मितीवर होईल. भागीदारी व्यवस्था नगदी व वित्तामध्ये अतिरिक्त निर्मितीसंपत्तीचे तिसरे कारण असे आहे की, ते असामान्य वादळी परिस्थिती, संपत्ती घट आणि मंदीच्या दोन टोकांदरम्यान लोंबकाळण्याऐवजी स्थैर्य प्राप्त करेल. स्थैर्य हे बचत, भांडवलकार्य आणि नियोजनार्थ प्रयत्न या सर्वांसाठीच जास्त अनुकूल वातावरण निर्माण करते.

उपरोल्लेखित मजकुराचा सारांश असा की, अन्यायाचे निर्मूलन आणि न्याय प्रस्थापना, निर्मितीसाधनांचा अती उत्तम विनियोग, स्थैर्य व विकास या चारी प्रमाणांवर व्याजमुक्त भागीदारी व्यवस्था ही वर्तमान स्थितीतील व्याजावर आधारित अर्थव्यवस्थेवर निश्चितच प्राधान्य देण्यासारखी आहे.

राहिला प्रश्न असा की, ज्याअर्थी भागीदारी आणि बटाई सोबतच इस्लामी बँका आपल्या विशिष्ट प्रणालीनुसार जरी संपत्ती पुरवित असेल, तेव्हा उपरोल्लेखित प्राधान्य देण्यात आलेल्या बाबींवर किती परिणाम पडेल ? या प्रश्नाच्या उत्तरादाखल दोन बाबीं सांगता येतील. प्रथम बाब अशी की या पद्धतीनुसार संपत्ती पुरविण्याच्या परिणामस्वरुपी जे कर्जपत्रके तयार होतात, यांची एकूण संख्या आणि भागीदारी व बटाई तत्त्वांच्या आधारांवरील पत्रे यांची एकूण संख्या या दोन्हींचे प्रमाण यावर अवलंबून असेल की, बँकांच्या एकत्रित भांडवलपुरवठ्यात याचे किती प्रमाण आहे. आमच्या मते हे प्रमाण जेवढे कमी असेल तेवढे चांगले आणि याच प्रमाणानुसार उपरोल्लेखित प्राधान्य देण्यात आलेल्या बाबींचे नुकसानदेखील कमी होईल. दुसरी बाब अशी की, कर्जपत्र तयार करणाऱ्या पद्धतींचे प्रमाण काहीही असले तरी परिस्थिती मात्र व्याजव्यवहारा पेक्षा खूप वेगळी आणि उत्तमच असेल. याचे कारण असे की प्रत्येक कर्जपत्र हे एखाद्या वास्तविकबाब वस्तु वा सेवा वगैरे पुरवठ्याशी सुसंगत असेल. व्याजमुक्त अर्थनीतीमध्ये अक्रमबद्ध वा असुसंगत रोख कर्ज देण्याच्या परिणामस्वरुपी खूप कमी कर्जपत्रे अस्तित्वात येतील. व्याजावर आधारित अर्थनीतीमध्ये कर्ज हे अमर्याद विस्तारलेले असते. याउलट व्याजमुक्त अर्थव्यवस्थेत मुराबहा (नफा घेऊन वस्तुविक्री), 'सलम' (सुरक्षितता किंवा एखाद्या वस्तुची किंमत आधीच देणे), इस्तिस्ना (निर्मिती) आणि ठेकेदारीच्या परिणामस्वरुपी अस्तित्वात येणाऱ्या कर्जाची संख्या ही वास्तविक अर्थनीतीच्या मर्यादेबाहेर जाऊ शकत नाही.

या दोन्ही गोष्टींवरून असे सिद्ध होते की, इस्लामी बँकिंग व्यवस्थेत शिर्कत (भागीदारी) आणि मुज़ारिबत (बटाई) बरोबरच कर्जावर प्रभाव टाकणाऱ्या पद्धतींतील वृद्धी- व्यतिरिक्त त्यास प्रचलित असलेल्या व्याजखाऊ वित्तव्यवस्था आणि बँकिंग व्यवस्थेवर प्राधान्य देण्यासाठी भरपूर कारणे असून व्याजाचे हे शापित नष्ट व्हावे आणि जगातील समस्त मानवजातीस व्याजाच्या अत्याचारी जोखड़ातून मुक्ती मिळावी. परंतु हे केवळ इस्लामी बँकिंग व्यवस्थेमध्येच शक्य आहे.

*** समाप्त ***